म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ९४३

REFBK-0007393

म. ग्रं. सं. ठाणे
निबंध
२०३

# पुढें व्हा...

ागे बढो' चा अनुवाद

दुनाथ थत्ते

शव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

# पुढें व्हा !

स्वेट् मॉर्डेन ह्यांच्या
'Pushing to the front'
ह्या पुस्तकाच्या आधारें

दा. क्र. ७३९३

यदुनाथ थत्ते

अनुक्रम
REFBK-0007393

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य दीड रुपया

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४४
पुनर्मुद्रण : १९५०

मुद्रक : आ. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे,
श्री समर्थ-सदन,
गिरगांव, मुंबई ४



ज्यांच्या पितृतुल्य प्रेमाच्या
छायेंत एक तप घालविलें त्या
मातामह ती. स्व. दादांना
(डॉ. नारायण गोविंद साठ्ये)

समर्पण

— यदुनाथ

# निवेदन

१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामांत पाथेय म्हणून माझ्या मित्रांनीं मला स्वेद् मॉर्डेनच्या पुस्तकाचा 'आगे बढो' हा हिंदी अनुवाद दिला होता. तुरुंगामध्यें त्याचा 'पुढें व्हा' म्हणून मीं अनुवाद करून ठेवला होता.

'पुढें व्हा' ची पहिली आवृत्ति सहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली होती. पुस्तकाचें मराठी वाचकांनीं चांगलें स्वागत केलें. डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनेंही बक्षीस देऊन पुस्तकाचा गौरव केला.

परंतु पहिली आवृत्ति स्वातंत्र्याच्या पूर्वकाळांत प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर देशाच्या परिस्थितींत चांगलाच फरक पडला आहे. पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढतांना ह्या गोष्टीची दखल घेऊन पुस्तक अधिक उपयोगी व्हावें असा प्रयत्न केला आहे.

पहिल्या आवृत्तींतही स्वेद् मॉर्डेनच्या पुस्तकाचा केवळ अनुवाद केला नव्हताच. त्याच्या निबंधांच्या आधारें बरीच भर घालून हे निबंध तयार केलेले आहेत. मूळ पुस्तकांत नसलेले दोन विषयही नव्यानें पुस्तकांत समाविष्ट केले. 'प्रसन्नता' व 'नम्रता' ह्या प्रकरणांना स्वेद् मॉर्डेनच्या पुस्तकाचा कोठल्याही प्रकारचा आधार नाहीं. तीं प्रकरणें आपल्या समाजाच्या आवश्यकतेच्या दृष्टीनें समाविष्ट केलेलीं आहेत.

ह्या पुस्तकाच्या बरोबरीनें जोड-वाचन म्हणून 'जीवनधर्म' व 'तपश्चर्या' हीं दोन पुस्तकें वाचकांनीं अवलोकावीं अशी विनंती आहे. हीं तीन पुस्तकें वाचल्यानेंच हें वाचन पूर्ण होईल असें मला तरी वाटतें.

मराठी वाचक पहिल्या आवृत्तीप्रमाणें ह्या संशोधित आणि परिवर्धित नव्या आवृत्तीचेंही स्वागत करतील अशी खात्री आहे.

जयहिंद

यदुनाथ थत्ते

२८ ऑगस्ट १९५०

| | | |
|---|---|---|
| १ | मनुष्य आणि संधि | १ |
| २ | कमनशीब मुलें | १५ |
| ३ | फुरसतीचा वेळ | ३७ |
| ४ | प्रतिकूल परिस्थिति | ५० |
| ५ | जीवनाचा उद्देश | ६४ |
| ६ | एकाग्रता | ७७ |
| ७ | वेळेचें महत्त्व | ८८ |
| ८ | शिष्टाचार | १०७ |
| ९ | उत्साह | ११९ |
| १० | व्यवहारकुशलता | १३५ |
| ११ | आत्मसन्मान आणि आत्मविश्वास | १४५ |
| १२ | वास्तविकता | १५५ |
| १३ | प्रसन्नता | १६५ |
| १४ | नम्रता | १७८ |

# १ : मनुष्य आणि संधि

§ योग्य संधीला अलंकाररहित आणि काव्यगुण नसलेले शब्द उच्चारले तरी ते मानवाला अधिक शोभा देतात. —*संस्कृत सुभाषित*

§ सतर्कतेनें संधीची वाट पाहाणें, साहसानें नि कौशल्यानें संधि प्राप्त करणें, शक्ति आणि दृढतापूर्वक संधीचा फायदा घेऊन कार्य यशस्वी करणें, हेच मनुष्याला यशस्वी करणारे गुण, हाच मनुष्याला यशस्वी करणारा मार्ग. —*ऑस्टीन फेल्पूस्*

§ तुम्ही अंतःकरणापासून उद्योगी आहांत काय ? जर असाल तर चालू क्षण व्यर्थ दवडूं नका. जी गोष्ट तुम्ही करूं इच्छितां किंवा ज्या गोष्टीचीं तुम्ही सुखस्वप्नें रंगवितां ती गोष्ट करण्यास आरंभ करा.

§ मी स्वतःच ध्येयमार्ग शोधून काढीन अथवा स्वतःसाठीं ध्येयमार्ग तयार करून घेईन. —*वरले*

नाईल नदीचें युद्ध नजीक येऊन ठेपलें होतें. नेल्सन आपल्या सेनानायकांच्या समोर आला. त्यानें लढाईचा आराखडा त्यांच्या पुढें ठेवला. त्यांना समजावून दिला. कॅप्टन बेरीनें आराखडा अवलोकन केला. त्याला फार आनंद झाला. हर्षातिरेकानें तो म्हणाला, " जर आम्हांला विजय मिळाला तर जग काय म्हणेल ? "

नेल्सन चुप राहूं शकला नाहीं. त्याला बेरीचा राग आला. तो म्हणाला, " ' जर ' ह्या शब्दाला माझ्याकडे स्थान नाहीं. आम्हांला विजय निश्चित मिळणारच. आमच्या विजयाच्या कथा रंगवायला कोणी वांचेल किंवा नाहीं ह्याची मात्र शंका आहे. परंतु तो प्रश्न अलग आहे." थोड्या वेळानें जेव्हां कप्तान जाऊं लागले तेव्हां नेल्सन त्यांना निश्चयानें



क्रमांक २११२४

म्हणाला, " उद्यां ह्या वेळेपर्यंत एक तर विजयश्री मला माळ घालील किंवा वेस्टमिनिस्टरमध्यें माझ्यासाठीं थडगें तयार होईल. "

सर्व लोक निखून गेले. ज्या बाबतींत त्याच्या इतर मित्रांना पराजयाची शंका वाटत होती, त्यांतून नेल्सनला विजयाचें उज्ज्वल भविष्य दिसत होतें. त्याला दिव्य दृष्टि प्राप्त झाली होती.

* * *

" सेन्ट बरनार्ड " चें निरीक्षण करून आलेल्या इंजीनियरांना नेपोलियननें विचारलें, " ही वाट चालून जाणें शक्य आहे का? " इंजीनियरांनीं जरा साशंकतेनें सांगितलें, " महाराज, कदाचित् हा मार्ग पार करणें आपल्याला शक्य होईल. "

" शूर शिपायांनो, फ्रान्ससाठीं, तुमच्या मायभूसाठीं सर्वस्वाचा होम करणाऱ्या वीरांनो, डगमगूं नका; पुढें व्हा! " पुढें येणाऱ्या मोठमोठ्या अडचणींकडे दुर्लक्ष करून नेपोलियननें सैन्याला संदेश दिला. ह्या त्रुटक्या माणसाचीं मनोराज्यें ऐकून इंग्लंडचे लोक त्याला हसले. ऑस्ट्रियाच्या लोकांनीं त्याची चेष्टा केली. युरोपांतल्या इतर राजकारणी तज्ज्ञांनीं त्याला वेड्यांत काढलें. त्यांना वाटे ह्याच्याजवळ ६० हजार शिपाई, हजारों इतर माणसें आणि हा कसचा आल्प्स पर्वत ओलांडतो! तें त्यांना अशक्य वाटे. ह्याच वेळीं त्याचा जिवलग मासेना शत्रुवेढ्यांत पडला होता. तो भुकेनें व्याकूळ होत होता. त्याचें सैन्य शरण जाण्याच्याच पंथाला होतें. असल्या संकटांत आपल्या जिवलगाला सोडणें नेपोलियनला अशक्य होतें.

जेव्हां ही अशक्य समजली जाणारी गोष्ट नेपोलियननें शक्य करून दाखविली, तेव्हां लोकांनीं तोंडांत बोटें घातलीं; परंतु कांहीं दुरभिमानी म्हणूं लागले, " ह्यांत विशेष तें काय झालें? हें तर ह्यापूर्वींही शक्य होतें! " मार्गांत येणाऱ्या अडचणींच्या कल्पनेनें इतर लोक हें

अशक्य समजत होते. पुष्कळांच्या जवळ नेपोलियनपेक्षां भव्य लढवय्यी सेना होती, हत्यारांचे सांठे होते, साधनसामुग्रीचा खच पडला होता; परंतु नेपोलियनच्या जवळ जी कार्यनिष्ठा, जी दृढता, जी कर्तव्यपरायणता, जी सामर्थ्याची योग्य जाणीव होती, ती नव्हती. संकटें पाहून नेपोलियनला आनंदातिशय होत असे. संकटाला बिलकुल तो डरत नसे. उलट संकटें पाहून त्याच्यांत दुप्पट जोम, अनेकपट स्फूर्ति निर्माण होत असे. अत्यंत कठीण प्रसंग आला असतांही तो बिलकुल डगमगत नसे; उलट जोरानें कामाला लागे नि विजयश्रीचा मालक बने.

ह्या सर्व गोष्टी काय आपोआप विनासायास झाल्या? होरेशस केवळ दोन अनुयायांसह नव्वद हजार सेनेला टायबर नदीचा पूल उध्वस्त होईपावेतों रोखूं शकला. सीझरनें युद्धांत आपला पराजय होतोसें पाहिलें. तो खालीं उतरला आणि भाला घेऊन शत्रूशीं जाऊन भिडला. त्यानें पराजयाचें परिवर्तन विजयांत केलें. विंकल रीडनें ऑस्ट्रेलियनांच्या समोर आपली छाती उघडी केली. तो त्यांच्या नग्न तलवारींना आणि भाल्यांना भ्यायला नाहीं. आपल्या प्राणांची आहुति द्यायला तो तयार झाला. स्वातंत्र्य त्याच्या हाताशीं आलें. अनेक वर्षांचे नेपोलियनचे प्रयत्न त्यानें धुळीस मिळविले. त्याचा पराभव झाला. बाजी प्रभूनें केवळ आपल्या मोजक्या मावळ्यांनिशीं शत्रूची लाखोंची सेना घोडखिंडींत रोखून धरली. शिवाजीच्या सुखरूपतेच्या इशाऱ्यासरसा त्यानें आपला देह ठेवला. विजयी झाला. स्वर्गाचें द्वार मोकळें झालें.

इतिहासाचीं पानें असल्या हजारों उदाहरणांनीं भरलीं आहेत. पण आपण एकाद्या भाटाप्रमाणें त्यांचें वाचन करतों. शाळेच्या परीक्षांच्या तयारींत आपल्याला जीवनाच्या परीक्षेचा विसर पडतो.

सगळ्या उदाहरणांवरून एकच सिद्धान्त निघतो. जो एकाद्या गोष्टीचा शीघ्र निर्णय करतो, किरकोळ गोष्टींसाठीं वेळ खर्च करीत नाहीं, आपल्या निर्णयावर दृढ असतो, ज्याला कोणतीही गोष्ट करतांना खरोखरच आत्मिक स्फूर्ति मिळते, जो पुऱ्या दिलानें कोणतेंही काम करतो त्याच्यापुढें संकटें कस्पटासमान आहेत. विजयश्री त्याला सदैव माळ घालीलच. अपयश हा शब्दच त्याला शिवणार नाहीं. हेच ते यशस्वी जीवनाचे सिद्धान्त. हाच तो दिव्य यशोमार्ग !

कित्येक लोक असाधारण संधीची वाट पाहात बसतात. त्यांना वाटतें, सामान्य संधींतून दिव्य यश निर्माण होणें अशक्य आहे. संधि कोणतीच कमी वा अधिक महत्त्वाची नसते. योग्य मार्गानें प्रयत्न करणारावरच तिचें दिव्यत्व अवलंबून असतें. कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या संधीचा योग्य फायदा घेतला असतां, पुऱ्या दिलानें काम केलें असतां त्यांतून दिव्य यश विकसित होईल. कमी महत्त्वाच्या संधीचें महत्त्व वाढेल.

ई. एच्. चेपीन म्हणतात, " सर्वोत्तम मनुष्य तो नव्हे, कीं जो उत्तम संधीची वाट पाहात बसतो. हातीं आलेल्या संधि कमी प्रतीच्या लेखून त्यांकडे दुर्लक्ष करतो नि संधि न मिळण्यावर आपल्या अपयशाचें खापर फोडतो. सर्वोत्तम मनुष्य तोच, कीं जो सामान्य संधीतून उज्ज्वळ नि मार्गदर्शी विजय प्राप्त करतो. लाखों संधींची परीक्षा करितांनाही तुम्हांला योग्य संधि क्वचितच सांपडेल. तुमच्या आसपासच्या वातावरणांत हजारों दुर्लक्ष झालेल्या अनाथ संधि तुमच्या नायकत्वाची वाट पाहात असतात. तुमच्यांत इच्छाशक्ति असेल, काम करायची ताकद नि हिम्मत असेल तर तुम्ही स्वतःच त्यांच्यांतून उज्ज्वल यश विकसित करूं शकाल. "

संधि न मिळाल्याची तक्रार कमजोर आणि भीरु स्वभावाचीं माणसेंच करतात. शाळा–कॉलेजांतला, जीवनांतला प्रत्येक क्षण म्हणजे एक सुसंधि आहे. प्रत्येक परीक्षा जीवनांतली एक संधि आहे. संकटांतला, अडचणींतला प्रत्येक क्षण म्हणजे एक संधि असते. सदुपदेशाचें प्रत्येक वाक्य संधि आहे. व्यापारांतली प्रत्येक गोष्ट एक संधि आहे. प्रत्येक संधीला तुम्ही नम्राभिवादन करा. तुमच्यांत त्यामुळें नम्रता येईल, मनुष्यत्व येईल, इमानदारी येईल, मित्र जोडण्याची कला साध्य होईल. आपल्या विश्वासार्हपणाचा पुरावा प्रत्येक क्षणीं तुम्ही उपस्थित करूं शकतां. मनुष्यजीवन म्हणजे संधीचा एक प्रवाह आहे. त्यांतून योग्यायोग्य निवड करून ध्येयसिद्धीच्या कडेला आपली जीवननौका लावण्याचें काम आपलें आहे.

आळशी माणसें तक्रारी असतात. त्यांना वेळ नसल्याची तक्रार नेहमींच करतां येते. संधि न मिळाल्याची तक्रार त्यांचीच. काम करणारा कर्तव्यदक्ष मनुष्य अशा तक्रारी कधींच करीत नाहीं, तो ह्यांपासून अलिप्त असतो. लहानसहान संधींचा योग्य उपयोग करून कांहीं नवयुवक इतकीं मोठालीं नि आश्चर्यकारक कामें करून जातात, कीं साऱ्या जन्मभर रखडूनही जीं करणें अशक्य समजलें जात असे. मधमाशांसारखी त्यांची वृत्ति असते. प्रत्येक लहानमोठ्या फुलांतून मधुगुण ते संकलित करीत असतात. दिवसांतून भेटणारा प्रत्येक मनुष्य, प्रत्येक घटना, त्यांची ज्ञानवृद्धि करीत असते, त्यांचें व्यक्तिमत्व वाढवीत असते.

कारडीनल म्हणतो, “असा एकही मनुष्य नसेल, कीं ज्याला भाग्योदयाची एकही संधि मिळाली नसेल! तो जर संधीच्या आगमनप्रसंगीं निद्रिस्त असेल, संधीची त्याला शुद्धबुद्धही नसेल तर आलेली संधि त्याच पावलीं परत जाते. पण तिचें स्वागत करायला

तो तयार असेल, उत्साहानें, आनंदानें, तिची वाट बघत असेल तर त्याला यशोमार्ग तत्काल सांपडतो. "

रॉकफेलरला आपला भाग्योदय मातीच्या तेलांत — घासलेटांत दिसला. त्याच्या डोळ्यांसमोर मंद मंद प्रकाशानें प्रकाशित झालेलीं लाखों घरें होतीं. पेट्रोलियम तर मुबलक होतें. त्याच्या सफाईची व्यवस्थाच तेवढी नव्हती. रॉकफेलरनें हीच संधि साधली. सॅम्युअल अँड्र्यूज नांवाच्या एका पोर्टरला त्यानें आपला भागीदार बनविलें. एका नव्या पद्धतीनें तेलाची सफाई होऊं लागली. वीस वर्षांच्या कालांत प्रथम एक हजार डॉलरपेक्षां कमी किंमत असलेल्या ह्या कारखान्याचें " स्टँडर्ड ऑइल ट्रस्ट " मध्यें परिवर्तन झालें. कंपनीचें मूळ भांडवल ९ कोटी डॉलर झालें. स्टॉकची किंमत १७ कोटी डॉलर व बाजार-भावानें त्याचीच किंमत १ खर्व ५ कोटी डॉलर आहे.

असे अनेक लोक आहेत, कीं जे संधीचा योग्य फायदा घेऊन आज करोडपति झाले आहेत. संधिक्षेत्र येथेंच समाप्त होत नाहीं. नव्या पिढीपुढें केवळ धनवान् होण्याच्याच आकांक्षा नाहींत. उत्तम कवि, लेखक, विद्वान्, इंजीनियर, कलाकोविद् बनविणाऱ्या संधीही कांहीं कमी नाहींत. संधीचा फायदा घेऊन धनवान् बनणें हाच केवळ माणसाचा उद्देश नाहीं. हा उद्देश तितकासा उज्ज्वलही नाहीं. ह्यांहून अनेक श्रेष्ठ कामेंसुद्धां आपण करूं शकूं. धनवान् होण्यांतच जीवनाचें साफल्य नाहीं. मनुष्यजीवनाचें अंतिम लक्ष्य धन नाहीं. धनवान् होणें हा एक जीवनसाफल्याचा कमी महत्त्वाचा भाग मात्र आहे. दुसऱ्या प्रकारच्या संधीचा फायदा घेऊन तुम्हीही आपल्याला महत्त्वशाली बनवूं शकतां, आपल्या देशाचा गौरव वाढवूं शकतां.

एलिजाबेद फ्रॉय नांवाच्या स्त्रीला आपली संधि इंग्लंडच्या तुरुंगांत सांपडली. तिला त्या काळकोठडींतच आपल्या ध्येयसिद्धीचा मार्ग

सांपडला. १८१३ पर्यंत लंडनच्या तुरुंगांची स्थिति फारच भयानक नि भीषण असे. ब्रिटिश अमदानींतले भारतांतले तुरुंग नि तुरुंग-जीवनच फक्त त्यांची बरोबरी करूं शकेल. एकाच कोठडींत ३०० स्त्रिया आणि त्याही अर्धनग्न अवस्थेंत कोंडल्या जात असत. त्यापेक्षां कोंडवाडा कित्येक पटींनीं बरा म्हणावा लागेल. त्यांना अंगावर घालायला नि लज्जारक्षणार्थ पुरेसे कपडेही मिळत नव्हते, मग झोंपायला बिस्तरा कोठून मिळणार ? त्या स्त्रिया तुरुंगांत सडत पडत असत. म्हाताऱ्या, तरुणी नि बालवयी सर्वच गवत, पेंढा, कचऱ्याचा ढीग आणि कपड्यांच्या चिंध्या ह्यांवर आपल्या कारावासाच्या रात्री काढीत असत. तुरुंगांतून ज्ञानदीप लावण्याचें पवित्र काम त्या पवित्र फ्रॉय नांवाच्या स्त्रीनें घेतलें. तेंच तिचें ध्येय. त्यांतच ती रंगून गेली. त्याच्याचसाठीं तिनें सर्वांचा परित्याग केला. जीवनाची सार्थकता तिनें केली. तुरुंगांतल्या स्त्रियांचा प्रथम फ्रॉयच्या ह्या बातमीवर विश्वासच बसेना. कोणाला असें वाटत होतें, कीं ह्या दलित स्त्रियांचा उद्धार करणारी एकादी विभूति ह्या पृथ्वीवर जन्माला येईल ? कोणाला वाटलें होतें, कीं एक स्त्री आईच्या प्रेमानें, जिव्हाळ्यानें ह्या दलित स्त्रियांना आपल्या हृदयाशीं धरील ? शेवटीं शिक्षणाचें काम सुरू झालें. शिक्षणानें त्या स्त्रियांत आमूलाग्र क्रान्ति केली. तीनच महिन्यांत त्या स्त्रिया भयंकर सुधारल्या. माणसांत आल्या. त्यांची पशुप्रवृत्ति जाऊन त्यांच्यांतली मानवतेची ज्योत जागृत झाली. सुधारणांचा फैलाव झाला. तुरुंग हीं शिक्षणालयें असल्याचें सिद्ध झालें. तुरुंग हा कैद्याला माणसांतून उठवतो, समाजांतून त्याचें उच्चाटन करतो ही भावना नाहींशी झाली. कैदीही माणसाळूं शकतात, सुधारूं शकतात हें त्या साध्वीनें आपल्या दीर्घोद्योगानें सिद्ध केलें. श्रीमती फ्रॉयची योजना आतां जगविख्यातच राहिली नसून तिची अंमलबजावणी सुरू

झाली आहे. सभ्य नि स्वतंत्र देशांतल्या लोकांना तो आदर्श झाला आहे.

एक मुलगा कुठेंसा जात होता. तिकडून पोंऽ पोंऽ करीत मोटार आली. मुलाला धक्का लागला. त्याची एक नस तुटली. रक्ताची धार वाहूं लागली. 'काय करावें' कोणालाही सुचेना. थोडा वेळ तसेंच रक्त वाहातें, तर मुलगा मरून जाता. त्याच वेळीं ऑस्ट्रेल नांवाच्या तरुणानें हें करुण दृश्य पाहिलें. त्याची कल्पनाशक्ति जागृत झाली. नसेच्या हृदयाकडच्या भागांत त्यानें जखमेजवळ एक पट्टी आवळून बांधली. रक्ताची धार बंद झाली. मुलाचे प्राण वांचले. तरुणाची वाहवा झाली. ऑस्ट्रेलला आपल्या कर्तृत्वाविषयीं अभिमान वाटूं लागला. त्याच्यांत आत्मविश्वास आला. जगांतला पहिल्या प्रतीचा सर्जन तो बनला.

एक दिवस हाथॉर्न आणि लॉंगफेलो भोजनाला बसले होते. त्यांचे मित्र जेम्स फील्डही त्या ठिकाणीं हजर होते. ते म्हणाले, 'कित्येक दिवसांपासून हाथॉर्नला एका आर्केडीयन दन्तकथेच्या आधारावर गोष्ट लिहायला सांगतों आहें ! कथानक असें आहे — आर्केडीयन लोकांच्या पळापळींत एका तरुणीची नि तिच्या प्रियकराची चुकामूक होते. त्याला शोधण्यांत तिनें आपलें सारें आयुष्य वेंचलें. शेवटीं एका इस्पितळांत मृत्युशय्येवर तो पडलेला तिला सांपडला.' हें ऐकून लॉंगफेलोला आश्चर्य वाटलें. हाथॉर्नला तो म्हणाला, "तुम्ही ह्यावर गोष्ट लिहीत नाहीं, तर मला ह्यावर कविता करण्याची संधि द्या !" हाथॉर्ननें मान्य केलें. काव्य तयार झालें. त्याचें नांव "इवेंजेलीन." जगांतलें एक ख्यातनाम काव्य नि इंग्रजी भाषेचा अलंकार हें काव्य झालें आहे.

जरा डोळे उघडे ठेवा. प्रत्येक ठिकाणीं संधींचा खच पडला आहे. कान उघडे असलेल्यांच्या कानांवर असहाय्यांच्या, दीनदुबळ्यांच्या

किंकाळ्या गेल्याशिवाय कशा राहतील ? पुऱ्या दिलानें आणि मुक्त हस्तानें दान करणाऱ्याला दान द्यावयाच्या वस्तूंची कमतरता पडणार नाहीं, ह्याचप्रमाणें रिकाम्या हातांना संधि साधून काम करण्याचीहि कमतरता पडणार नाहीं.

प्रत्येक जणाला ठाऊक आहे, पाण्यानें भरलेल्या भांड्यांत दुसरी वस्तु टाकली असतां पाणी बाहेर पडतें. परंतु आपल्या ज्ञानाचा उपयोग कोणालाही करतां आला नाहीं. आर्कीमिडीजनें हें पाहिलें. त्याच्या ध्यानांत आलें, कीं बुडलेल्या भागाच्या आकारमानाचें पाणी बाजूला होतें. जगांतल्या सर्व वस्तूंचें आकारमान काढण्याची पद्धत निघाली. आर्कीमिडीजचें नांव त्याच्या सिद्धान्ताबरोबर अमर झालें.

टांगलेली वस्तु झोके देतांच इकडे तिकडे झोके घेते हें कोणाला ठाऊक नव्हतें ? झोके घेणाऱ्या वस्तूची गति, हवा व घर्षणाच्या योगानें कमी कमी होत जाते आणि शेवटीं तो पदार्थ स्थिर होतो. ह्या साध्या गोष्टीचें महत्त्व कोणालाही वाटलें नाहीं ; परंतु अल्पवयी गॅलीलियोची नजर एकदां पॉइजा नगरच्या चर्चमध्यें टांगलेल्या दिव्यावर पडली. हवेमुळें दिवा झोके घेऊं लागला. त्याच्या गतीवरून 'पेंड्युलम' चा शोध लागला. घड्याळाचा जन्म झाला आणि गॅलीलिओचें नांव अमर झालें.

सर्वांना ठाऊक होतें, कीं वरून सोडलेली वस्तु जमिनीवर येऊन पडते. झाडावरून फळ जमिनीवर पडतांच गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटननें लावला.

संधि म्हणजे कांहीं भाकरीचा तुकडा नाहीं, कीं भरदिशीं तुकडा मोडला नि खाऊन टाकला. डोळे उघडून संधि ओळखावी लागते. तींत योग्य त्या सुधारणा कराव्या लागतात. तिला आपल्या शक्तीच्या नि कार्याच्या अनुकूल बनवावें लागतें. संधीचा उपयोग म्हणजे शेतांत

बी पेरणें. हें बीज पेरलें तर त्यांतून वृक्ष निर्माण होईल आणि तो फळही देईल. भूतकालांत उद्योगी माणसांनीं ज्ञान आणि उपयोग देणाऱ्या अनेक वस्तु तयार केल्या. आज त्याच वस्तु घरोघर मातीमोलानें होत असतात.

सध्यांच्या काळांत एका संयमी आणि सुशिक्षित तरुणाला, एका चपराशी मुलीला, एका कारकुनाला, दारोदार भटकणाऱ्या अनाथ मुलाला, शेकडों सुगम असे यशोमार्ग चोखाळतां येतात. पूर्वीं बोटांवर मोजण्याइतकेच असे प्रसंग असत; आज शेकडों, हजारों असले प्रसंग दररोजच्या जीवनांत येतात. संधींची कमतरता नाहीं, भाग्यचक्र फिरविणाऱ्या गोष्टींची कमतरता नाहीं, कमतरता आहे ती कार्यशील व दृढव्रती नवतरुणांचीच.

चित्रप्रदर्शनांत एका प्रेक्षकानें प्रवेश केला. त्या ठिकाणीं अनेक चित्रें टांगलेलीं होतीं. पुष्कळशीं चित्रें तेथें होतीं. एका चित्रांत एका व्यक्तीचा चेहरा केसांनीं झाकला होता आणि तिच्या पायांना पंखांची जोड दिलेली होती.

प्रेक्षक म्हणाला, ‘ कशाचें हो हें चित्र ? ’

प्रदर्शक : ‘ संधीचें चित्र आहे हें ! ’

प्रेक्षक : ‘ मग हिचें तोंड कां बरें झांकलेलें आहे ? ’

‘ जेव्हां मनुष्यांच्या सन्निध ही येते तेव्हां ते हिला ओळखूं शकत नाहींत म्हणून ! ’

‘ हिच्या पायांना पंख कां बरें आहेत ? ’

‘ कारण ही क्षणांत अदृश्य होते आणि एकदां एकापासून ती निघून गेली म्हणजे त्याच मनुष्यापाशीं पुन्हा ती येत नाहीं. ’

'एका लॅटिन लेखकानें म्हटलें आहे, " संधीच्या चेहऱ्यावर केसांचें जाळें पसरलेलें असतें व बाकीचीं शरीराचीं वस्त्रें अंगाला अगदीं चिकटलेलीं असतात. जर ती पुढें येतांच आपण ओळखून तिच्या झिंज्या पकडल्या, तर ती आपल्या ताब्यांत येईल; परंतु एकदा का तिचें तोंड दूर गेलें, कीं ती ओळखूं येऊनसुद्धां तुम्ही तिला पकडून आपली दासी करूं शकणार नाहीं. तुमच्याच काय पण मग प्रत्यक्ष परमेश्वराच्यासुद्धां ती ताब्यांत येऊं शकत नाहीं."

जे लोक आलेल्या संधीचा योग्य फायदा घेऊं शकत नाहींत, जे इच्छीत नाहींत, ज्यांच्यांत संधीचा योग्य उपयोग करण्याची बुद्धि नसते; जे भविष्यकाळीं संधीचा उपयोग करणार नाहींत त्यांचें जीवन व्यर्थ होय. उत्तमांतली उत्तम संधि येऊनही ते अद्वितीय, अलौकिक बनणार नाहींत.

अरनॉल्डमहाशयांच्या म्हणण्याप्रमाणें आयुष्यांतला प्रत्येक महत्वाचा क्षण म्हणजे एक एक संधि आहे. आम्हांला आमच्या शक्तींचा विकास करून त्यांचा संग्रह करून ठेवला पाहिजे. अचानक आलेली संधि त्याच लोकांना उपयोगी पडेल, कीं ज्यांच्याजवळ सामर्थ्यांचा संग्रह केलेला असेल. नाहींतर आलेली संधीही फुकट जाईल.

आम्ही नेहमीं अशा संधीची वाट पाहात असतों, कीं जीमुळें आम्ही एका क्षणांत कीर्तिवान् बनूं शकूं. जुगाराप्रमाणेंच एकाच क्षणांत आम्ही धनवान्, भाग्यवान् आणि कीर्तिवान् बनण्याची इच्छा करतों. मेहनती-शिवाय आम्ही स्वतःला त्या त्या विषयांतले पारंगत म्हणवूं इच्छितों. इच्छा करतों, कीं लोकांनीं आम्हांला विशेषज्ञ म्हणावें आणि तशी बतावणीही करतों. बतावणी करण्याइतकेही श्रम जर आम्ही ती गोष्ट करण्यांत घेतले, तर आम्ही खरोखरच तसे बनूं शकूं. अज्ञानी असून



अनुक्रम ९७७९...

ज्ञानी म्हणविण्याची इच्छा म्हणजे दुसऱ्याचें धन उधार किंवा कर्जाऊ घेऊन श्रीमंत बनणें. हे प्रयत्न म्हणजे जनतेची व आपली स्वतःचीही फसवणूक. मात्र हा शेखी मिरविणें फार दिवस शक्य होत नाहीं. सत्य संपूर्ण नग्नावस्थेंत जनतेसमोर येतेंच. अशा मार्गानें जीवनाचा सत्यानाश होतो. प्रत्येकानें आत्मपरीक्षण करून स्वतःला या फसवेगिरीच्या मार्गापासून अलिप्त ठेवलें पाहिजे.

परमेश्वरानें निर्माण केलेला दिवस आळसांत घालण्यासाठीं नव्हे. त्याचा आपण सदुपयोग केलाच पाहिजे. दिवसाचा सदुपयोग करणें हीच खरी ईश्वरोपासना. हात पाय हलवा. काम चालू ठेवा. ज्ञानाच्या वाढत्या संपत्तींत भर घाला. आपलें जीवन यशस्वी करा, कृतार्थ करा. खरें मनुष्यपण प्रयत्नशीलतेंतच आहे. प्रयत्न करा नि आपलें मनुष्यत्व सिद्ध करा.

अशा एका उज्ज्वल परंपरेच्या देशांत तुमचा जन्म झाला आहे, कीं ज्या ठिकाणीं सुसंध्या आणि साधनसामग्री पडली आहे. कार्य करायची शक्ति नि बुद्धि परमेश्वरानें तुम्हांला दिली आहे. तेंच तुमचें भांडवल. ह्या भांडवलावर तुमचा धंदा खात्रीनें यशस्वी होईल. ईश्वरानें तुमच्यासाठीं संधि आणि साधनसामग्री भरपूर दिली आहे, तिचा उपयोग करा. आपली जीवनयात्रा यशस्वी करून दाखवा. तुम्हांला करण्यासारख्या कामाचे ढीगच्या ढीग जगांत इतस्ततः पडलेले आहेत. जरूर आहे ती काम करणारांचीच.

निसर्गतःच मनुष्यजीवन असें बनलेलें आहे, कीं एक मार्गदर्शक शब्द आणि एक तुच्छ, पण मार्गदर्शक वस्तु जीवनाला संकटापासून बचावूं शकते. जीवनाला यशोमार्गाला लावते. दृष्टीसमोर आम्हांला उत्साह देणारीं, धाडस देणारीं व मार्गदर्शन करणारीं लाखों उदाहरणें

आहेत. सध्यां जगांत प्रत्येक क्षण आम्हांला नवनव्या संधींच्या दाराशीं नेऊन उभा करीत असतो.

संधींची वाट पाहात बसूं नका. तुम्ही स्वतःच संधि शोधा नि कामीं लावा. फर्गसन नांवाच्या एका धनगराच्या मुलाचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवा. गुरें चारतांना कांचेच्या तुकड्यांतून पाहातां पाहातां त्यानें ताऱ्यांचा नि त्यांच्या गतींचा शोध लावला. तो एक मोठा खगोलज्ञ बनला. जॉर्ज स्टीफन्सला विसरूं नका. खाऱ्या पांढऱ्या मातीचे तुकडे नि कोळशाचे तुकडे ह्यांच्यावर तो गणिताचे नियम शिकला.

युद्धाच्या नि शांततेच्या दिवसांत ज्याप्रमाणें आपल्याला योग्य अशा संधि निवडून लहान माणसें विभूति बनलीं, त्यांचीं उदाहरणें डोळ्यांसमोर ठेवा. तुम्हांलाही तसें करणें शक्य आहे. सहज साध्य आहे. मग तुम्ही स्वस्थ कां ? सामान्यांतूनही उद्योगी मनुष्य दिव्य निर्माण करूं शकतो.

जेव्हां भाग्य उदयाचलीं असेल, कर्तव्यमार्ग स्पष्टपणें दिसत असेल, अंगांत स्फुरण नि उत्साह ओसंडत असेल तर संधि वाया घालवूं नका. भयामुळें घाबरून पाऊल मागें घेऊं नका. सुख तुम्हांला आपणांकडे आकर्षून कर्तव्यमार्गापासून परावृत्त करूं बघेल तर त्याकडे दुर्लक्ष करा. सुखाचा मार्ग चालूं लागलांत, कीं यशाचा आणि ध्येयसिद्धीचा मार्ग चुकलाच म्हणून समजा. वीरवृत्तीनें आपल्या कर्तव्यमार्गांतून पार व्हा. संधि तुमची वाट पाहात आहे.

तुम्हांला माहीत आहेत त्या आनंदीबाई जोशी. इंग्रजीचें एक अक्षरही त्या बाईला ठाऊक नव्हतें. परंतु लग्नानंतर इंग्रजी शिकून अमेरिकेंत जाऊन त्या उत्कृष्ट डॉक्टर झाल्या. आणि ते सुभाषचंद्र. देश पारतंत्र्यांत

आहे, हातांत शस्त्र घेतलें नाहीं कधीं, असें म्हणत हताश होऊन ते बसले नाहींत. आपल्या कर्तबगारीवर पहिलें आझाद हिंद सरकार त्यांनीं स्थापलें, आझाद फौज उभी राहिली. हिंदमधून इंग्रजांना घालविण्यासाठीं पूर्वसीमेवरून त्यांनीं धडका मारल्या. एक शाळामास्तर सरंजामशाही-विरोधी लढ्यांत जनतेचें नेतृत्व करील हें वाटतें का खरें ? पण काश्मीरचे शेख अबदुल्ला ह्यांच्याकडे नजर टाका. आणि हिंदमधला जगद्विख्यात गणिती रामानुजम् गणितांतले नवनवे सिद्धान्त स्वतंत्र रीतीनें शोधणारा. तो संधीकडे आशाळभूतपणें पाहात बसला नव्हता. आपल्या गणितांमधल्या गतीनें हार्डीसारख्या इंग्रज गणितज्ञालाही त्यानें चकित केलें.

मागें सेनापति बापटांना स्वामी सत्यदेव भेटले होते. म्हणाले, "हिंदुस्थान एका दृष्टीनें साऱ्या जगांत अति भाग्यवान् आहे. येथें कोणी-कडेही पाहा, कामाचे ढीगच्या ढीग पडले आहेत. तरुणांच्या कर्तबगारीला आवाहन करीत आहेत." आणि आतां तर आपला देश स्वतंत्र झाला आहे. संधि–क्षेत्रांतील परकीयांची आडकाठी दूर झाली आहे. हिंदी युवकांनो, आतां पुढें व्हा. साऱ्या जगाला दाखवा, ज्ञानविज्ञानकलेच्या कोणत्याही क्षेत्रांत आम्ही मागें नाहीं. ह्या देशाचा सर्वांगीण विकास करावयाचा आहे. कामाला लागा. अखंड उद्योग करा. प्रिन्स बिस्मार्क म्हणे, "To youth I have but three words, work, work, work." कामाला लागा, संधिक्षेत्र तुमच्या स्वागतार्थ तयार आहे.

★

## २ : कमनशीब मुलें

§ गरिबी, दारिद्र्य ह्यांना भावी उज्ज्वल जीवनाच्या दृष्टीनें एक वरदान समजलें पाहिजे.

§ जीवनांत संकटें येतात; परंतु येणारीं संकटें हीं शाप नसतात. जीवनांत प्राथमिक अवस्थेत येणारीं संकटें बहुधा उज्ज्वल भविष्याचीं निदर्शक असतात. यशस्वी रीतीनें पार पडलेलीं संकटें, अडचणी आम्हांला केवळ धडे देत नाहींत; परंतु भविष्यकाळीं प्रयत्न करण्याला स्फूर्ति नि साहस देतात. —शार्प

कीटो नांवाचा एक बहिरा मुलगा होता. आपण खूप शिकावें असें त्याला वाटे. एकदां तो आपल्या वडिलांना म्हणाला, 'बाबा, मी उपाशी मरेन अशी धास्ती तुम्हांला कां वाटते? आपल्याजवळ सर्व कांहीं आहे. भूक मारण्याचा उपाय मला ठाऊक आहे. हाटेन्टाट नांवाचे जंगली लोक आहेत. दिवसांतून फक्त एकदाच डिंग खाऊन हे लोक आपली जीवितयात्रा चालवितात. त्यांना जेव्हां भयंकर भूक लागे तेव्हां आपल्या पोटाच्या चारी दिशांना ते पट्ट्या बांधून घेत. मला का हें नाहीं करतां येणार? जंगलांत बोरी-करवंदी आहेत, त्यांच्या सहाय्यानें पोट भरणें का कठीण आहे?"

तो एक गरीब मुलगा होता. एका दारुड्याचा, एका जुगाऱ्याचा होता तो मुलगा. लोक म्हणत, जोडे शिवण्याशिवाय दुसरें कोणतें काम ह्याला येणार! परंतु तोच मुलगा, आपल्या निष्ठेच्या, दृढतेच्या जोरावर बायबलचा एक प्रतिभाशाली पंडित बनला.

क्रियो एक गरीब मुलगा होता. त्याच्या मेंदूंत ललितकला खच्चून भरल्या होत्या. सौंदर्यदेवतेचा तो उपासक होता. ग्रीस देशचा तो

एक गुलाम होता. ग्रीसमध्यें कायदा होता. काळा कायदा होता. ह्या कायद्यानें गुलामांना कलेचा अभ्यास करायला बंदी होती. स्वतंत्र माणसांनाच फक्त तो अधिकार असे. त्या काळीं ग्रीसमध्यें दोन वर्गांचे लोक होते. एक गुलाम, दुसरा स्वतंत्र: स्वतंत्र माणसांना सर्व सुखसोयी, सर्व कलाप्रेम. गुलामांना कठीणांत कठीण काम दिलें जाई. ज्या वेळीं वरचा अन्याय्य कायदा पास झाला, त्या वेळीं क्रियो एका सुंदर मूर्तींत मग्न झाला होता. संगमरवरी दगडांतून तो आपलें कौशल्य ओतीत होता. दगडांतून देव निर्माण करीत होता. आपले प्राण मूर्तीला देत होता. त्याचें ध्येय होतें पेरिक्लीजपासून इनाम मिळविणें. नव्या कायद्यानें बिचाऱ्याला अगदीं असहाय करून सोडलें होतें. त्याचें हृदय विदीर्ण केलें होतें.

क्रियोला एक बहीण होती. तिला ह्या कायद्यानें केवढा धक्का बसला! बिचारीचीं सारीं मनोराज्यें धुळीला मिळालीं. ती रात्रंदिवस देवाला आळवूं लागली. डोळयांत आसवें आणून त्याची करुणा भाकूं लागली. त्याला शरण गेली. त्याच्यावर तिनें आपला सारा भार टाकला. म्हणाली, "परमेश्वरा, तुझ्यावरच सारा गरीबांचा हवाला. माझ्या भावाचें रक्षण कर. आम्ही तर तुझींच लेकरें. तुझाच एकट्याचा आम्हांला आश्रय. तुझी कृपा असली तरच आमच्या जीवनाची बाग फुलेल. आमच्या मनोराज्याच्या वसंताला फुलें फळें येतील. तूं माझ्या भावाला दिलेल्या कलाप्रेमाचें रक्षण कर."

भावाला घेऊन ती तळघरांत गेली. साऱ्या साऱ्या जरुरीच्या वस्तु त्याला दिल्या. त्याच्यासाठीं रात्रंदिवस नंदादीप तेवत ठेवला. त्याच्या जेवणाखाणाची व्यवस्था केली. भावाला ती म्हणाली, "भाऊ, तूं बिलकुल काळजी नको करूं. मी तुला सारी सारी मदत करीन. ईश्वर आपल्याला खात्रीनें यश देईल. तुझें काम दुप्पट उत्साहानें

चालू असूं दे. ईश्वराचा आपल्याला आतां आधार आहे. तोच तारील किंवा मारील!"

क्रियो मूर्ति घडविण्यांत गढून गेला. वहीण क्रियोची सेवा करण्यांत गढून गेली. रात्रंदिवस तो आपलें प्रतिभाप्रसूत मूर्तिकाव्य रचण्यांत रंगून गेला.

अथेन्स नगरांत कलाप्रदर्शन भरलें. साऱ्या जगांतले लोक उपस्थित होते. एगोरा नांवाच्या ठिकाणीं प्रदर्शन भरलें. पेरिक्लीज अध्यक्षस्थानीं होते. शेजारीं फिडीयस, सॉक्रेटीस बसले होते.

कलाकृतींचे अनेक नमुने त्या ठिकाणीं मांडलेले होते. एका मूर्तिसमूहावर सारे प्रेक्षक विशेष खूष दिसले सर्व त्याच समूहाकडे ओढले जात होते. इतर समूहांत तो विशेष उठावदार होता. तो इतका सरस होता, कीं जणूं कांहीं कला-देवता अपोलोनें स्वतःच तो घडला असावा. दुसऱ्या कलाविशारदांना द्वेष वाटूं लागला मूर्तिकाराचा. त्या समूहाचें सौंदर्य त्यांच्या डोळ्यांत खुपत होतें.

कोण बरें ह्याचा मूर्तिकार? अनेकांनीं प्रश्न केले. उत्तर मिळालें नाहीं. मूर्तिकाराविषयीं लोकांना कुतूहल आणि त्याला पाहाण्याची उत्सुकता दिसत होती. लोक अनेक प्रकारच्या तर्क वितर्कांत गुंग झाले होते. एका मुलीला शान्तिरक्षकांनीं सभेंत ओढीतच आणलें. तिचे कपडे अस्ताव्यस्त झाले होते. चेहऱ्यावर केसांच्या बटा नाचत होत्या. ओठ बंद होते. चेहऱ्यावरून तिच्या निश्चयीपणाची साक्ष पटत होती.

'ह्या मुलीला कारागिराचें नांव ठाऊक आहे. ती सांगत नाहीं.' शान्तिरक्षक रागानें म्हणाले.

त्या मुलीला अनेकांनीं अनेक प्रकारें विचारलें, पण तिनें उत्तर दिलें नाहीं. ती उत्तर देत नाहीं असें पाहून पेरिक्लीजनें फर्माविलें, "कायद्याची अंमलबजावणी जरूर झाली पाहिजे. हिला तुरुंगांत बंद करा."

हे शब्द सभेच्या कानांवर पडतात न पडतात, तोंच एक तरुण धावतच पुढें आला. त्याचे केस उडत होते. डोळ्यांतून प्रतिभेची ज्योति तेजाळत होती. पेरिक्लीजचे त्यानें पाय धरले. नम्रपणें पण दृढपणें तो म्हणाला, " महाराज, क्षमा करा. त्या मुलीला वांचवा. ती निरपराध आहे. माझी बहीण आहे ती. खरा अपराधी मी आहें. तो मूर्तिसमूह ह्याच गुलाम हातांनीं केला."

" गुलाम आणि कला ? करा ह्याला कैद ! "

पेरिक्लीज उठून उभे राहिले. जनतेला शांत करून म्हणाले, " नाहीं, मी जोंपर्यंत जिवंत आहें, तोंपर्यंत असें होणें शक्य नाहीं. पाहा, पाहा त्या मूर्तिसमूहाकडे एकदा. कलादेवता अपोलोच प्रत्यक्ष संदेश देत आहे, कीं हा कायदा किती कठोर, किती जाचक, मारक आहे. कायद्याचा उद्देश कलेचा विकास हाच आहे. आमचें कलाप्रेमच आम्हांला अमर बनवील, हे कैदखाने नव्हेत ! ह्या तरुणाची जागा कैदखान्यांत नाहीं, ती माझ्यापाशीं आहे."

लाखों माणसांसमक्ष तो तरुण सिंहासनावर बसला. जनतेनें जयघोष केला.

अमेरिकेचें माजी राष्ट्राध्यक्ष विल्सन म्हणतात, "माझा जन्म गरिबींत झाला. घरांत धान्याचा एकही कण नसतां, भाकरीचा एक तुकडा नसतां आईपाशीं भाकरीचा हट्ट घेणें कशाला म्हणतात ह्याचा मला अनुभव आहे. वयाच्या दहाव्या वर्षीं मीं आपलें घर सोडलें. अकरा वर्षें उमेदवारी केली. वर्षांत एकच महिना शाळा शिकायला मिळे. अकरा वर्षांचें वेतन म्हणून मला फक्त ८४ डॉलर मिळाले. स्वतःच्या क्षणिक सुखासाठीं मीं ह्या वर्षांत कधीं एक डॉलरसुद्धां खर्च केला नाहीं. एकवीस वर्षांचा होईपर्यंत पै न् पैचा हिशेब ठेवला.

एकवीस वर्षांचा होण्यापूर्वी मी महिनेच्या महिने जंगलांत फिरलों आहें. बैल हांकले आहेत. लाकडें तोडलीं आहेत. मी पहाटेच्या अंधारांतच उठत असें आणि संध्याकाळपर्यंत अगदीं गुरासारखा राबत असें. मला महिन्याकांठीं फक्त सहा डॉलर मिळत. त्या वेळचा प्रत्येक डॉलर मला पूर्णिमेच्या चंद्राएवढा वाटत असे. ''

आत्मशिक्षण आणि आत्मसुधारणेची एकही संधि विल्सननें वाया जाऊं दिली नाहीं. जगांतले फारच थोडे लोक आपल्या फुरसतीच्या वेळेला त्यांच्याइतकें महत्त्व देत असतील. २१ वर्षांचें वय होण्यापूर्वी १००० उत्तम उत्तम ग्रंथांचें त्यांनीं अध्ययन केलें होतें. २१ वर्षांचे होतांच नॉटिक नांवाच्या शहरांत ते गेले. त्यांच्या गांवापासून हें गांव १०० मैल दूर होतें. जातांना ते बोस्टन बंदरावरून गेले. त्यांना ह्याच वेळीं ऐतिहासिक स्थळांचें अवलोकन करतां आलें. एवढ्या लांबच्या प्रवासांत त्यांनीं फक्त १ डॉलर ६ सेंट खर्च केले.

एक वर्षाच्या अवधींत ते नॉटिक वादविवाद सभेचे एक महत्त्वाचे वक्ते बनले. ८ वर्षांच्या आंतच मॅसॅच्यूसेट्सच्या असेंब्लींत त्यांचें भाषण झालें. गुलामगिरीविरुद्ध ते बोलले. बारा वर्षांनंतर अमेरिकन कॉंग्रेसमध्यें त्यांचा प्रवेश झाला. त्यांचा प्रत्येक क्षण महत्त्वाचा होता. प्रत्येक क्षणाचें महत्त्व ओळखून ते वागले. जीवनांतल्या प्रत्येक घटनेला त्यांनीं विजयसाहाय्यक बनवून घेतलें.

सुमारें १०० वर्षांपूर्वी लियॉन्स शहरांत एक प्रीति-भोजन दिलें गेलें. देशाचे सारे मोठमोठे लोक तेथें हजर होते. त्यांच्यांत वादविवाद सुरू झाला. ग्रीसच्या प्राचीन पौराणिक कथांवर वादविवाद चालला होता. वादविवाद चित्रांच्याबद्दल होता. पाहुण्यांचा वाद जोरांत आला. यजमानानें हें पाहिलें. त्यानें आपल्या एका नोकराला बोलावून आणलें.

नोकरानें सर्व समजावलें. खुलासेवार, सरळ आणि विश्वसनीय पुराव्या-सह त्यानें उत्तर दिलें. सर्वांना उत्तर पटलें, आवडलें. सर्वांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. त्यांच्यामधल्या वादविवादाचा योग्य निवाडा झाला होता. एका पाहुण्यानें आदरानें विचारलें, "आपलें शिक्षण कोठल्या शाळेंत झालें?" नवयुवकानें नम्रतेनें सांगितलें, "महाराज, माझें बरेंचसें शिक्षण विपत्ति-विद्यालयांत झालें." गरिबींतूनही तो किती वर आला. गरिबीच्या शाळेंत तो शिकला होता. मोठा झाला होता. संकटांनाच त्यानें आपले गुरु केलें होतें. त्या वेळीं जरी तो एक गरीब नोकर होता, तरीही लवकरच तो एक सिद्धहस्त लेखक बनला. साऱ्या युरोपभर त्याचें नांव झालें, कीर्ति झाली. त्यानें आपल्या कुलाचा उद्धार केला. 'गरिबी'ची इस्टेट आपल्याला पूर्वजांनीं ठेवल्याबद्दल त्याला अभिमान वाटे. आनंद वाटे. आज कोणता देश महान् क्रान्तिकारी रूसोला, त्या फ्रेन्च क्रान्तिवीराला, समाजाला स्फूर्ति देणारें आदर्श इतिहासवाङ्मय निर्माण करणाऱ्याला ओळखत नाहीं?

विल्यम कॉबेट आठ वर्षें नांगर चालवीत होता. वरून तो पळाला. लंडनला आला. ८ वर्षें कायदेपत्रांच्या नकला केल्या. खर्डेघाशी केली. नंतर लष्करांत भरती झाला. सैनिक-शिक्षणाच्या पहिल्या वर्षांत एका वाचनालयाचा तो सभासद झाला. वाचनालयाचीं बहुतेक पुस्तकें त्यानें वाचून काढलीं. तो लिहितो, "मला जेव्हां सहा पैसे रोज मिळत तेव्हां मीं व्याकरणाचा अभ्यास केला. माझ्या कोठडींतला कोपरा माझी अभ्यासाची खोली होती. शिपायांची पिशवी म्हणजे माझें पुस्तकांचें कपाट. मजजवळची लाकडी फळी माझें टेबल होतें. एक वर्षाच्या आंतच मीं व्याकरण संपवलें. मेणबत्त्या आणि तेल खरेदीलासुद्धां माझ्याजवळ पैसे उरत नसत. थंडीच्या दिवसांत मला रात्री अंधारांत काढाव्या लागत. निखाऱ्याच्या उजेडावरच मी

काम भागवीत असे. कागद-पेन्सिलीसाठीं मला माझ्या भोजन-खर्चांत काटछाट करावी लागे. कधीं कधीं मला अर्धपोटीं राहावें लागे. मला सवड अशी क्षणभरही मिळत नसे. दहा शिपाई एकत्र जमले, कीं त्यांचें हसणेंखिदळणें, गाणेंबजावणें सुरू होई. ह्यांतच मला आपला अभ्यास करावा लागे. लिहिण्याच्या सामानासाठीं खर्च होणारा एक फार्दिंग मला फार मोलाचा वाटे. एक दिवस अर्धा पेन्स हरवला, तर मला रडूं कोसळलें. मी रडलों देखील.''

कॉवेट गरीब होते. आपल्या गरिबीचाही त्यांनीं उपयोग केला. ते ज्ञानी बनले. यशस्वीपणें त्यांनीं आपली जीवननौका हाकारली. जगांत जर त्यांच्यासारख्यानेंही विषम परिस्थितींतून मार्ग काढला, तर सर्वांनाच असा मार्ग काढणें शक्य आहे.

सानें गुरुजी आज महाराष्ट्राचे साहित्य-भूषण झाले आहेत. त्यांच्या पुस्तकांनीं अनेकांना स्फूर्ति दिली. अनेकांच्या जीवनाला त्यांनीं वळण लावलें. अनेकांना ते आदर्शभूत झाले. साने गुरुजींचें बालपण फार कष्टांत गेलें. एकादे दिवशीं त्यांचा वार लागलेला नसे. जवळ पैसे तर थोडे. महत्त्वाकांक्षा तर फार मोठी. ते बाजारांत जात. दोन दिडक्यांच्या निःसत्त्व नि बेचव गोवारीच्या शेंगा आणीत. त्याच खात. त्यावर दिवस काढीत. कधीं फुटाणे, तर कधीं नुसतें पाणीच. परंतु लायब्ररींत त्यांना कोणींही केव्हांही शोधायला यावें. इतक्या हाल-अपेष्टांतून त्यांनीं मार्ग काढला. मुंबई विश्वविद्यालयाची एम्. ए. ची उच्च पदवी प्राप्त केली. सारें जीवन देशाला दिलें. आज महाराष्ट्राच्या तरुणांच्या गळ्यांतले ते ताईत झाले आहेत. तरुणांचीं हृदयें त्यांनीं हलवलीं. त्यांच्यांत क्रान्ति करून सोडली.

थियोडर पारकर एक दिवस आपल्या वडिलांना म्हणाला, 'बाबा, मला उद्याच्या दिवस सुटी द्याल का ?' गरीब बापाला आश्चर्य वाटलें.

तो मुलाकडे आश्चर्यानें पाहूं लागला. दुसऱ्या दिवशीं काम तर खूप होतें. मुलाची इच्छा त्याला अमान्य करवली नाहीं. थियोडर पहाटेच उठला. १० मैल पायीं चालला. हार्वर्ड कॉलेजांत जाऊन पोहोंचला. त्यानें तेथल्या प्रवेशपरीक्षेस बसण्याची इच्छा दाखविली. वयाच्या ८ व्या वर्षापासूनच त्याला नियमित शाळेंत जाणें अशक्य झालें होतें. थंडीच्या दिवसांत तीन महिने तो शाळेंत जाई. इतर दिवसांत आपलें शेतीचें काम करतांनाच तो शाळेचा अभ्यास करी. इकडे तिकडे वांचलेला प्रत्येक क्षण तो चांगल्या ग्रंथांच्या अध्ययनांत खर्च करी. भीक मागून तो पुस्तकें आणून वाची व जशींच्या तशीं परत करी. एक पुस्तक मागून त्याला मिळेना. पुस्तकाची तर फार जरुरी होती. पुस्तक तसेंच महत्त्वाचें होतें. एकदा उन्हाळ्याच्या दिवसांत तो पहाटे उठला. त्यानें रानांत जाऊन बोरें जमवलीं. तीं पिशवींत भरलीं. बोस्टनच्या बाजारांत जाऊन तीं विकलीं. आलेल्या पैशांत त्यानें लॅटिन कोश खरेदी केला.

थियोडरला घरीं यायला बरीच रात्र झाली. त्याचे वडील त्याची वाट पाहात होते. थियोडर घरीं आला. सारी हकीगत त्यानें वडलांना सांगितली. वडलांनीं त्याला शाबासकी दिली. त्यांना आपल्या असहायतेचें वाईट वाटलें. थियोडर वडलांना धीर देऊन म्हणाला, " बाबा, तुम्ही बिलकूल वाईट वाटून घेऊं नका. मी शाळेंत जाणार नाहीं. मी घरींच अभ्यास करीन. शेवटची परीक्षा देईन नि सनद मिळवीन ! ' त्यानें आपले शब्द खरे केले. तो देशांतल्या लोकांचा कंठमणि झाला. त्यांना आदर्शरूप झाला.

एल. ड्रुबरीटला त्याच्या आयुष्यांतली महत्त्वाची वेळ ती वाटली, जेव्हां त्यानें होमरच्या इलियडच्या फक्त १५ ओळीच वाचल्या होत्या. वडील वारले तेव्हां तो सोळा वर्षांचा होता. तो लोहारी शिकत होता. दिवसांतले १० । १२ तास त्याला भाता फुंकीत बसावें लागे. भाता

फुंकतां फुंकतां तो गणिताच्या सिद्धान्तांचा अभ्यास करी. १० वर्षांनंतर त्यानें बुस्टरच्या वाचनालयांत नांव दाखल केलें. तो भयंकर परिश्रम करी. त्याला १८ भाषा आणि ३२ उपभाषा यायला लागल्या. विद्वान् लोहार ह्या नांवानें तो प्रसिद्ध झाला. इतक्या कठीण परिस्थितींत तो विद्वान् बनला. त्याचें उदाहरण पाहून थोड्याशा सोयी असूनही शिक्षण न घेणारांनीं माना खालीं घालाव्या. त्याच्यापासून धडा शिकावा. त्याचा आदर्श डोळयांपुढें ठेवावा.

टालपेज नवजवानांशीं बोलतांना म्हणे, " तुम्हांला का संकटें पाहून भीति वाटते ? गरीबी का तुमच्या मार्गांत तुम्हांला धोंड वाटते ? नीट विचार करा. तुम्ही आज त्याच परिस्थितींत आहांत, जींत आजचे हजारों विद्वान् नि धनवान् आपल्या बाळपणीं होते. माझ्या शब्दांचा नीट विचार करा. योग्य दिशेनें वागा आणि ३० वर्षांनंतर ह्या गोष्टीचा विचार करा. तुम्हांला आढळून येईल, कीं त्या वेळचे लाखोपति, प्रभावशाली वक्ते, प्रतिभावान् कवि, भावोद्दीपन करणारे लेखक, मोठे मोठे व्यापारी, मानव-धर्मप्रेमी, राष्ट्रधर्मप्रचारक, आज तुमच्याच बरोबर उभे आहेत. तुमच्यापेक्षां एकही इंच जास्त उंच कोणी नाहीं. ते अत्यंत कठीण परिस्थितीनें जखडलेले आहेत."

" तुमच्याजवळ कांहीं नसेल, सुतळीचा तोडाही नसेल तर वाचनमंदिरांचा आश्रय घ्या. पुस्तकें वाचा. परमेश्वरानें बनविलेल्या त्या आश्चर्यकारक यंत्राचा–शरीराचा–अभ्यास करा. डॉक्टरांच्या बरोबर इस्पितळांत जा. शरीराच्या अंतर्भागाचें दर्शन करा. चुकूनही आपल्या तोंडून असे शब्द काढूं नका, कीं जीवननौका यशस्वी रीतीनें ध्येय–किनाऱ्याला लावण्याला लागणारें भांडवल परमेश्वरानें आमच्यापाशीं दिलें नाहीं. प्रत्येक गरिबांतल्या गरीब तरुणालाही परमेश्वरानें सगळ्या साधनसामुग्रीनें सुसज्ज करून पाठविलें आहे.

खूप परिश्रम करा आणि जगांत आपल्या कीर्तिकिरणांनीं ध्येयमार्ग प्रकाशित करा."

वर्तमानपत्रविक्र्याचा धंदा जीवनयात्रा यशस्वी करणारा का आरंभ आहे जीवनाचा ? वर्तमानपत्रें विकून जेमतेम जीविका चालवितां येते, पण असें असूनही अमेरिकेच्या व्यापाराचें पुनरुज्जीवन करणारा एडिसन, ग्रॅन्ड ट्रंक रेल्वेवर वर्तमानपत्रें विकत मोठा झाला. एडिसन ह्या वेळीं केवळ १५ वर्षांचा होता. ह्याच लहान वयांत त्यानें रसायन शास्त्राचा अभ्यास करायला सुरुवात केली होती. लहान वयांतच शास्त्रीय ज्ञानाला त्यानें आपलें ध्येय बनविलें. त्याला 'यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली कोणती ?' असा प्रश्न करतांच तो म्हणे, "मी व्यसनांपासून नेहमीं दूर राहिलों आहें आणि माझ्या कामाव्यतिरिक्त इतर कामांत भयंकर संयम पाळला आहे."

दोन अशिक्षित नि अज्ञान माणसें एका गांवांत आलीं. गरीब होते बापडे. एका स्वस्त दराच्या हॉटेलांत उतरले. त्यांनीं देशाच्या एका दुर्गुणाचा नाश करायचें ठरवलें होतें. हे रक्तानें माखलेले अपराध त्यांना असह्य झाले होते. एका बाजूला हे गरीब, अननुभवी पण तेजस्वी तरुण होते, तर त्यांच्या विरुद्ध पक्षांत होते मोटमोठे विद्वान्, अनुभवी पत्रपंडित, राजनीतिज्ञ, धर्मोपदेशक, लाखोपति आणि पुढारी. समाजांतला सारा वरचा वर्ग त्यांच्या विरुद्ध होता. ते स्वार्थानें लढणारे होते, तर हे निःस्वार्थीपणें लढणारे होते. त्यांच्या हातीं अलोट सामुग्री, तर हे साधन-सामुग्रीरहित. त्यांना एक कठीण मार्ग पार करायचा होता. राष्ट्राच्या एका दुष्ट रूढींतून राष्ट्राला मुक्त करायचें होतें. त्याचा उद्धार करायचा होता. उच्च उद्देश हीच त्यांची साधनसामुग्री. उच्च ध्येयाची आग त्यांच्या हृदयांत भडकत होती. ती त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. त्या आगीच्या जोरावर ते सारा देश पेटवायला तयार झाले होते. त्यांना त्या

दुष्ट रूढीची राख ह्या अग्नींत करायची होती. देशाला अग्निशुद्ध करायचें होतें. त्याचसाठीं ते अग्निदिव्य करायला निघाले होते. त्यांचें काम सत्यावर अधिष्ठित झालें होतें. त्यांना कोणाची भीति नव्हती. सत्याला का कोणाची भीति असते? त्या उच्च ध्येयप्रेरित, तेजस्वी तरुणांतल्या एकाचें नांव होतें बेंजामिन लॉन्डे. त्यानें ओहीयोहून एक वर्तमानपत्र काढलें. 'दि जीनियस ऑफ युनिव्हर्सल लिबर्टी' (विश्वस्वातंत्र्याची प्रतिभा) हें त्याचें नांव. किती पवित्र नांव. ज्या पवित्र आत्म्याचे उद्गार, भावना ह्यांत प्रकाशित होत, त्याला शोभणारेंच होतें तें नांव. पवित्र वरतूंचें प्रतीकही पवित्रच. दर महिन्याला त्या पत्राच्या वीस हजार प्रती पाठीवरून तो वीस मैल नेई. विचारांचें ओझें कमी करण्यासाठीं त्याला हें ओझें सहन करावें लागे. वैचारिक ओझ्यापुढें हें ओझें कितीतरी हलकें वाटे त्याला. आपले विचार सर्वांना कळावे, म्हणून चारशें मैलांचा प्रवासही त्यानें केला. प्रवास करतां करतां जणुं तो आपल्या विचारांनाही गति देत होता. त्याच्या ध्येयनिष्ठेनें त्याला असामान्य बनविलें, त्याच्या श्रमांनीं त्याला असाधारण बनवलें.

विल्यम लॉईड गॅरिसनही असेच पवित्र पुरुष होते. दोन ध्येयवाद्यांचा संगम झाला. ते आणखी पवित्र बनले. आणखी कार्यक्षम बनले. त्यांचें कार्यक्षेत्र वाढलें. एकमेकांना ते साहाय्य करीत. धीर देत. हमरस्त्यावर काम करणाऱ्या गुलामांना पाहून, त्या अभागी प्राण्यांनीं भरून येणारीं जहाजें पाहून, त्यांच्या हृदयविदारक कथा ऐकून गॅरिसनला त्यांचा कळवळा आला. त्यांच्या उद्धाराची तळमळ लागली त्याला. एका माणसानें आपल्या स्वार्थासाठीं दुसऱ्याला गुलाम म्हणून वागवणें त्याला आवडलें नाहीं. त्याच्या पवित्र आत्म्याला तें रुचलें नाहीं. गरिबीच्याच चिखलांत हें कमळ फुललें होतें. शाळेच्या उच्च

शिक्षणाच्या वातावरणाचा त्याला गंध नव्हता. गरिबाच्या झोपडींत, कष्टांच्या शाळेंत, अन्यायांचा प्रतिकार करायचें शिक्षण त्याला मिळालें होतें. गुलामांना स्वतंत्र करण्यासाठीं, त्यांच्यांत मानवता भरण्यासाठीं, आपल्या देशावरचा हा कलंक धुण्यासाठीं त्याचा आत्मा तळमळत होता, जळत होता. त्याच कामाला त्यानें वाहून घेतलें. आपलें जीवन गुलामांच्या स्वातंत्र्यासाठीं वांधून घेतलें.

पत्राचा पहिला अंक निघाला. "गुलामींतून तत्काल मुक्तता" ह्या विषयावर त्यानें एक जोरदार अग्रलेख लिहिला. त्याच्या पवित्र आत्म्याचा ओजस्वीपणा त्या लेखांत उतरला. त्याचें लेखन त्याच्या आत्म्याचा आरसा झालें. लेख वाचून सारा देश खळबळला. कांहीं त्याला शिव्या देऊं लागले. त्या तपस्व्यानें शांतपणें हें सहन केलें. समाज एवढ्यावरच थांबला नाहीं. त्याला कैद केलें. जेलच्या बंदिवान जीवनांत त्याला ढकललें. त्याला दंड झाला होता. ४९ दिवसांनंतर तो सुटला. त्याला पवित्र विचारासाठीं, स्वतंत्र विचारासाठीं, वयाच्या चोविसाव्या वर्षीं कठोर कारावास सहन करावा लागला. त्या भयाण कारावासांत तो आणखीच दृढ बनला. ध्येयदीपानें प्रज्ज्वलित झालेला मार्ग त्याला आणखीनच व्यवस्थित दिसूं लागला. आपल्या तारुण्याचा सारा जोम, सारी शक्ति त्यानें राष्ट्राचा कलंक पुसण्यांत खर्च केली.

बिनभांडवलानें, कोणाच्या ओळखीशिवाय, कोणाच्या मदतीशिवाय त्यानें पुन्हा पहिल्यापेक्षां जोरानें 'बोस्टन' मधून 'लिबरेटर' पत्र काढलें. पहिली घोषणा त्यानें केली, त्याच्या पवित्र आत्म्यानें पहिले शब्द काढले, 'मी सत्यासारखा कठोर नि न्यायासारखा दृढव्रती राहीन. मी अंतःकरणापासून सत्याचा जप करीन, सत्याला धरून राहीन, मी कांहीं फुकटचें शब्दजंजाळ रचणारा नव्हे. असत्याला मी क्षमा करणार नाहीं. तें मला चव्हाट्यावर आणलेंच पाहिजे. मी माझ्या व्रतापासून

एक इंचही मागें हटणार नाहीं. मी सत्य सांगणारा आहें, मला कोणाचीही भीति नाहीं. साऱ्या जगतानें जरी माझ्याविरुद्ध आगीचा डोंब उसळवला तरी मी त्यांत भस्म होईन, पण सत्य सोडणार नाहीं. मी सांगतों तें सत्य आहे. तें तुम्हांला ऐकावेंच लागेल !' सारे ज्याच्या विरुद्ध होते, तो मुलगा पहा किती धैर्यानें नि अचलपणें सर्वांना बजावतो आहे ! यशस्वी होण्यासाठीं अशी निष्ठा, असा त्याग नि अशी दृढता लागते.

दक्षिण कारोलिना भागांत ऑनरेबल रॉबर्ट्स नांवाचा एक गृहस्थ असे. त्यानें बोस्टनच्या मेयरला विचारणा केली, " माझ्याकडे कोणीं अज्ञात इसमानें लिबरेटरची एक प्रत पाठवली आहे. कृपा करून त्याच्या प्रकाशकाचें नांव कळवावें. " मेयरला तपासाअंतीं कळलें, कीं एक नवयुवक एका लहानशा खोलींत लिबरेटर छापतो. त्याला कांहीं मुलांची मदत असते.

याच नवयुवकानें एका लहानग्या खोलींतून लिबरेटर काढून क्रान्तीचा कहर करून सोडला. लोकांनीं विचार केला, ह्याचा बंदोबस्त करणें जरूर आहे. लिबरेटरच्या प्रति विकणाराला पकडून देणारास विजिलन्स असोसिएशननें १५०० डॉलरचें बक्षीस लावलें. परंतु लिबरेटरचा संपादक का त्या गुलामांना सांपडणार ? एक दोन ठिकाणच्या गव्हनरांनीं संपादकाचें शिर आणून देणारास इनाम ठेवलें. जॉर्जियाच्या असेंब्लीनें त्याला पकडून दोषी ठरवून देणारास ५००० डॉलरचें बक्षीस लावलें.

गॅरिसनला प्रत्येक जण प्रत्येक ठिकाणीं धमकी देत होता. त्याला धाक घालीत होता. तो आपल्या ध्येयापासून तसूभरही ढळला नाहीं. तो हिमालयासारखा निश्चल आणि सागरासारखा गंभीर राहिला. त्याचे अनुयायी त्याला मदत करीत राहिले. त्याच्या तपश्चर्येचें त्याला फळ मिळालें. अमेरिकेंतून गुलामांच्या पद्धतीचें उच्चाटन झालें. राष्ट्रानें त्याची

खरी योग्यता ओळखली. त्याचा सन्मान केला. देशाच्या इतिहासांत त्याचें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहिलें गेलें.

लंडनमध्यें मायकेल फॅरडे राहात होता. वर्तमानपत्रें विकायचा धंदा करी बिचारा. वयाच्या सातव्या वर्षीं एका पुस्तकें बांधणाराकडे तो कामाला राहिला. सायक्लोपीडियाचें बाइंडिंग करतां करतां त्याची नजर विजेसंबंधींच्या एका लेखावर पडली. त्यानें तो लेख वाचला. मजा वाटली त्याला त्यांत. विजेवरचे इतर ठिकाणचे लेख त्यानें वाचले, मनन केले, त्याच्यावर विचार केला. लहानसहान साधनें जमवून त्यानें प्रयोगाला सुरुवात केली. मुलाचा दीर्घोद्योग पाहून एक ग्राहक त्याच्यावर फार खूष झाला. हम्फ्रे डेव्हीचें भाषण ऐकायला एकदा तो मुलाला घेऊन गेला. फॅरडेनें भाषणाचे मुद्दे लिहिले नि ते डेव्हीला पाठवून दिले. डेव्ही खूष झाला. आपल्या घरचीं यंत्रें व्यवस्थित ठेवण्यासाठीं त्यानें त्याला नोकरीला ठेवून घेतलें. फॅरडे डेव्हीचे प्रयोग नीट लक्षपूर्वक पाही. त्यांचा अभ्यास करी. कांहीं दिवसांनंतर एका मोठ्या सभेंत भाषण द्यायला त्याला निमंत्रण गेलें. नंतर वूलवीचच्या रॉयल ॲकॅडमींत अध्यापक म्हणून त्याची नेमणूक झाली. त्यानें विद्युत्शास्त्रांत अनेक नवीन नवीन प्रयोग केले. त्याचें नांव अजरामर झालें.

भाग्यहीन डिझरेली म्हणतो, " ज्या गोष्टी एकदा झाल्या त्या पुन्हा होऊं शकतात. मी गुलाम नाहीं, अपराधी कैदी नाहीं. आपल्या शक्तीच्या जोरावर मी माझ्या मार्गांतल्या अडचणी दूर करूं शकतों. " डिझरेलीला सर्व कांहीं विरुद्ध होतें. परिस्थिति अननुकूल. घरची गरिबी. आधार द्यायला फक्त हजारों ऊर्जितावस्थेला पोहोंचलेल्यांची उदाहरणें होतीं काय तीं. तो विचार करी. त्याला ४००० वर्षांपूर्वींची यहुद्याची गोष्ट आधार देई. जोसेफ एक गरीब यहुदी होता. त्यानें जिवापाड मेहनत केली. तो ग्रीसचा प्रधानमंत्री झाला. त्याला

टे, मग मला कां इंग्लंडचा मुख्य प्रधान होणें अशक्य आहे ?
ो हलक्या दर्जाच्या लोकांतून वर चढला. मध्यम वर्गालाही त्यानें
ागें टाकलें. वरच्या दर्जाच्या लोकांनाही त्यानें मागें टाकलें. तो
ाजनीतिज्ञ बनला. सामाजिक शक्तींचा राजा बनला तो. पार्लमेंटमध्यें
लोकांनीं प्रथम त्याची मस्करी केली, थट्टा केली, उपहास केला, त्याचा
अपमान केला. तो त्या वेळीं एकच वाक्य बोलला. त्यानें आपलें
म्हणणें खरें करून दाखविलें. तो म्हणाला, “ एक वेळ अशी येईल,
कीं त्या वेळीं तुम्ही माझें म्हणणें मोठ्या उत्सुकतेनें नि गांभीर्यानें
ऐकाल.” वेळ येतांच हाच भाग्यहीन मुलगा इंग्लंडचा मुख्य प्रधान
बनला. राष्ट्राच्या गळ्यांतला हार बनला. लोकांनीं त्याला निवडून दिलें.
त्याला आपला प्रतिनिधि, पुढारी म्हटलें. २५ वर्षें तो इंग्लंडचा मुख्य
प्रधान राहिला. त्यानें इंग्लंडचें भविष्य बनविलें. वर्तमान राखलें.

एक गरीब विधवा होती. अगोदरच गरीब, त्यांत विधवा. तिला
तीन मुलें होतीं. तिघांना मिळून अंगावर घालायला दोन पायजमे
होते. गरिबी छळीत होती त्यांना. आईला वाटे, ‘ आपल्या मुलांनीं
लिहावाचायला शिकावें. विद्वान व्हावें त्यांनीं. साऱ्या कुळाचा उद्धार
करावा. ’ ती मुलांना शाळेंत पाठवी. शिकायला पाठवी तिथें
मास्तरांच्या कांहीं दिवसांनीं लक्षांत आलें, कीं प्रत्येक मुलगा तीन
दिवसांतून एक दिवस गैरहजर असतो. गरिबीमुळें त्यांना तसें करावें
लागे. मुलांनीं खूप परिश्रम केले. खूप अभ्यास केला. त्यांच्यापैकीं
एक प्रोफेसर, दुसरा डॉक्टर नि तिसरा धर्मोपदेशक बनला. त्यांनीं
कुळाचा उद्धार केला. आईला आनंद दिला नि साऱ्या जगाला एक
उज्ज्वल उदाहरण त्यांनीं घालून दिलें. ‘ आम्हांला संधिच नाहीं. आम्ही
पडलों कमनशिबी .’ असल्या रडव्या शब्दांना त्यांच्याकडे जागा
नव्हतो. रडवेपणा त्यांना ठाऊक नव्हता. त्यांना एकच महामंत्र

ठाऊक होता. प्रयत्न करणें, प्रयत्न करणें आणि प्रयत्न करणें, हाच तो दिव्य मंत्र. ह्याचे मंत्रानें ते उज्ज्वल झाले. पूजनीय झाले. प्रयत्न हाच त्यांचा देव होता. " यत्न तो देव जाणावा. "

यशस्वी होण्याचे थोडेच मार्ग आहेत. त्याच रस्त्यानें जाऊन मनुष्य विजयी होतो. परिस्थितीवर मात करतो. आपलें भविष्य आपण बनवतो. प्रत्येक तरुणांत दृढ इच्छाशक्ति पाहिजे. तो आपल्या निश्चयावर हिमालयासारखा स्थिर, अढळ, निश्चल राहिला पाहिजे. हजारों संकटें आलीं, तरी त्यानें हातीं घेतलेलें काम तडीस नेलें पाहिजे. कोणतेंच काम मुळांत वाईट नसतें. कोणतेंही काम करायला आपल्याला लाज वाटूं नये. अपमान वाटूं नये. लोक काय म्हणतील, ह्याची फिकीर वाटूं नये. कोणत्याही कामाचा त्याला तिरस्कार वाटतां कामा नये. कोणतेंही काम त्यानें नीच नको लेखायला. कोणतेंही काम प्रामाणिकपणें केलें, तर आपली योग्यता वाढतच असते. योग्यता कामावर अवलंबून नसते. ती काम करणारावर नि कामावरील त्याच्या प्रेमावर, निष्ठेवर आणि काम करायच्या पद्धतीवर अवलंबून असते. सुतारी काम करून उच्च कुळांतला मुलगा सुतार होत नाहीं. सुतारींतसुद्धां तो आपलें कौशल्य ओतूं शकेल. आपलें जीवन, आपला आत्मा ओतूं शकेल. आडव्या येणाऱ्या संकटांची तुम्हांला भीति वाटते ? त्यांच्याशीं लढण्याची शक्ति तुमच्याजवळ नाहीं ? अपयश पदरीं पडलें तरी अपयशाचीं कारणें शोधून यशोमार्ग तुम्हीं काढूं नाहीं शकत ? अपयश म्हणजे कांहीं आपला दोष नव्हे. योग्य मार्गावर आणणारे ते मार्गस्थ दगड आहेत. आपल्याच पायांवर उभें राहाण्याची हिंमत नि ताकद तुमच्यांत आहे ना ? आपल्या उज्ज्वल भविष्यावर तुमचा विश्वास आहे ना ? जर तुमचा अढळ विश्वास असेल, तर गरिबी तुमचा ध्येयमार्ग रोखूं शकत नाहीं,

तुम्हांला आड येऊं शकत नाहीं. प्रयत्नाच्या शिडीनें गरिबी तुम्हांला सहज ओलांडतां येईल. तहान–भूक तुमच्या आकांक्षा दबवूं शकणार नाहींत. पैशाची आणि मदतीची कमतरता तुमचा उत्साहभंग करूं शकत नाहीं. जगानें केलेली थट्टा तुम्हांला कार्यापासून परावृत्त करूं शकणार नाहीं. तुमच्या स्वागताची तयारी यशोमार्गापलीकडे चालली आहे. संकटांच्या ढगांतून निरुत्साहाच्या नद्यानाल्यांतून एकनिष्ठेच्या मित्राबरोबर पार व्हा. यशोदेवी तुमचें स्वागत करील. तुमच्यावर आनंदाश्रूंचा वर्षाव करील. आपल्या एका प्राचीन ऋषीनें उपनिषदांत अशा युवकांची फार सुंदर व्याख्या केली आहे. तो ऋषी म्हणतो, " युवास्यात् आशिष्ठो, दृढिष्ठो, बलिष्ठः " युवक आशिष्ठ, दृढिष्ठ आणि बलिष्ठ असावा. आशिष्ठ म्हणजे आशावान्, श्रद्धावान्. आपलें ध्येय निश्चितपणें साध्य होईलच अशी मनोमन खात्री त्याला पटलेली असावी. ही जर खात्री असेल तर तो श्रद्धावान् राहील व त्यांतून त्याला कार्याची अपरंपार प्रेरणा मिळेल. त्याचप्रमाणें तो दृढिष्ठ असावा. म्हणजे एकदा ज्या ध्येयमार्गाचें दर्शन झालें त्यापासून यत्किंचितही त्यानें चळूं नये. त्यावर दृढ असावें आणि ध्येयवाद जर अंमलांत आणावयाचा असेल तर त्याच्यामध्यें तितकें बल, तितकी ताकदही पाहिजे. नाहींतर त्याची आशा त्याला आशाळभूत बनवील, परमुखापेक्षी बनवील. आपल्या यशासाठीं अखंडपणें त्याला दुसऱ्याकडे पाहावें लागेल, त्याचें यश हें स्वतःचें नसेल, तें परावलंबी असेल. जो युवक असा असेल त्याला बाह्य परिस्थिति कितीही विपरीत असो, प्रतिकूल असो, त्याला जरूर तें भांडवल परमेश्वरानें दिलें असें समजावें. खरा तरुण तोच कीं जो आशिष्ठ, दृढिष्ठ आणि बलिष्ट असेल. भारती तरुणांचा हा आदर्श आहे. स्वतंत्र भारतांत जर अशा तरुणांची नवपिढी निघेल तर त्याचा कायापालट व्हावयाला वेळ लागणार नाहीं.

एक गरीब मुलगा होता. बिचाऱ्याजवळ धड पुरे कपडेही नव्हते. एकच सदरा होता त्याला. तोच त्याला नेहमीं घालावा लागे. घाण कपडे घालणें तर अशक्य. बिचारा संध्याकाळीं कपडे धुवी. रात्रीं वाळवी. दुसऱ्या दिवशीं अंगांत घाली. कपड्याला लावायला सोडा नव्हता. साबू नव्हता. दररोज कपडे धुणें तर बिचाऱ्याला भाग होतें. तशाच स्थितींत त्यानें दिवस काढले. एकनिष्ठेनें अभ्यास केला. ध्येयमार्गापासून तो थोडासुद्धां ढळला नाहीं. तो पुढें मोठा झाला. समाजाचा आलोचक बनला. समाजाची त्यानें व्यवस्थित निर्भीड कानउघाडणी केली. समाजाला योग्य मार्गावर आणलें. तो समाजसुधारक बनला. गोपाळराव आगरकर हेच बरं का ते वीर!

दुसराही असाच एक गरीब विद्यार्थी होता. विद्याजनांची त्याला फार हौस. शिक्षणाची भयंकर गोडी. शिक्षणासाठीं वाटेल तो त्याग करायला तो तयार होता. त्रासाची त्याला पर्वा नव्हती. अडचणींची क्षिति नव्हती. दुःखाची भीति नव्हती. दिवसा जेवणाचा उद्योग करावा. अभ्यास मागें पडे ह्या उद्योगांत. रात्रीं अभ्यास करावा, तर दिवा कोण देणार? तो रात्रीं म्युनिसिपालिटीच्या कंदिलावर अभ्यास करी. त्या म्युनिसिपालिटीच्या मिणमिण्या दिव्यावर त्यानें आपला ज्ञानदीप पेटविला. तो उजळला. त्याच्या विद्वत्तेची ख्याति सर्वत्र झाली. अनेकांचें मार्गदर्शन त्यानें केलें. ना. गोपाळराव गोखल्यांचें नांव कोणाला ठाऊक नाहीं? त्यांच्या अद्वितीय त्यागानें, अलौकिक कर्तृत्वानें, अखंड परिश्रमानें, दृढ तपश्चर्येनें त्यांचें नांव अजरामर झालें. साऱ्यांच्या तोंडीं झालें.

एक गरीब मुलगा होता. दारिद्र्य हीच त्याच्या वडिलांनीं त्याला संपत्ति ठेवली होती. शाळेंत त्याला धड शिक्षणही मिळालें नव्हतें. त्यानें अखंड परिश्रम केले. आपल्या कामानें मानवजातीच्या गळ्यांतला

१५७०

तो ताईत बनला. अमेरिकेंतल्या युद्धाच्या वेळीं तो राष्ट्राध्यक्ष होता. त्यानें गुलामगिरीचीं बंधनें तोडून चार लाख लोकांना बंधमुक्त केलें. गुलामगिरीचा डाग धुतला. मानवता निर्माण केली. दिव्यत्व निर्माण केलें त्यानें.

त्याच मुलाला जंगलांत लाकडें तोडतांना कित्येकांनीं पाहिलें होतें. आपल्या पुढच्या आयुष्यांत गुलामगिरीचा समूळ उच्छेद करणाराला लहानपणीं झाडें तोडायचें काम करावें लागलें होतें. घरीं अठराविश्वे दारिद्र्य ! घराच्या जमिनींना धड फरशी नाहीं. खिडक्यांना तावदानें नाहींत. संध्याकाळीं चुलीच्या प्रकाशांत त्यानें गणिताचा आणि व्याकरणाचा अभ्यास सुरू केला. त्या अंधारांतूनच त्यानें ज्ञानाचा प्रकाश उत्पन्न केला. ब्लॅकस्टोनचें एक पुस्तक वाचायचें होतें त्याला. चार मैल तो पायीं गेला. तो अमूल्य ग्रंथ आणला. रस्त्यानें येतां येतां शंभर पानें त्यानें वाचून टाकलीं. हाच अब्राहम लिंकन अमेरिकनांचा जीव कीं प्राण बनला. त्यांचा भाग्यविधाता बनला.

ओहियोचें घनदाट जंगल पसरलें आहे. एक लहानशी अनाथ झोपडी आहे. तींत एक विधवा आहे. काळजीनें तिचें हृदय व्यग्र आहे. १८ महिन्यांच्या मुलाचें लांडग्यांपासून रक्षण कसें करावें ? त्याला खायला प्यायला कसें घालावें हाच प्रश्न आहे तिच्यासमोर ! कसें तरी ती मुलाचें पालनपोषण करते. मुलगा मोठा होतो. झाडें तोडतो. शेतांत नांगर चालवितो. मोटा हांकतो. आपल्या आईला मदत करतो. आपल्या फुरसतीच्या वेळीं तो पुस्तकें वाची. अभ्यास करी. सोळाव्या वर्षीं तो गाढवें वळायचें काम करूं लागला. नंतर एक डॉलर आठवड्यानें तो धोबीकाम करतो. तो एका लायब्ररींत झाडायचें काम करतो.

लवकरच तो विल्यम कॉलेजांत जातो. दोनच वर्षांत सन्मान्य पदवी घेऊन पास होतो. २६ व्या वर्षीं कॉंग्रेसमध्यें प्रवेश करतो.

ह्याप्रमाणें हेरम कॉलेजांत टोल वाजविण्याचें काम करणारा जेम्स गारफील्ड केवळ सत्तावीस वर्षांचा होतांच अमेरिकेचा राष्ट्रपति होण्याची लायकी मिळवतो. राष्ट्रपति होऊन राष्ट्राचा गाडा यशस्वी रीतीनें चालवतो.

निःपक्षपाती न्यायदानाबद्दल प्रसिद्ध असलेल्या रामशास्त्र्यांची गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. पायांवर पाणी घालणारा एक दिवस न्यायाधीश होईल अशी कोणी कल्पनाही करूं शकत नाहीं. पण हा अभागी मुलगा न्यायाधीश झाला. त्यानें साऱ्यांच्या पुढें मार्गदर्शक उदाहरण उपस्थित केलें.

तुम्हांला त्या आनंदीबाई आहेत ठाऊक? साध्या एका पोस्ट-मास्तराची पत्नी. इंग्रजीचा गंधही नसलेली. दुर्भागीच तर काय? तिच्या मनांत का महत्त्वाकांक्षा नसेल? परंतु एक पोस्ट-मास्तर कशी करणार आपल्या पत्नीची महत्त्वाकांक्षा पूर्ण? त्याला पगार तो किती असणार? परंतु गोपाळराव कपाळाला हात लावून बसले नाहींत. आनंदीबाईंना त्यांनीं शिकविलें, उत्तेजन दिलें. इंग्रजीचा गंध नसलेल्या त्या बाई अमेरिकेला गेल्या. डॉक्टर झाल्या. आणि ॲनी बेझंटची गोष्ट आहे ठाऊक तुम्हांला? त्यांचे वडील वारले तेव्हां मुलीचें काय करावें हा त्यांच्या आईला प्रश्न पडला होता. खानावळ घालून तिनें मुलांना शिकविलें. भारताची सेवा करणाऱ्या स्त्रियांत बालपणच्या दुर्भागी ॲनी बेझंटचें केवढें स्थान आहे! आणि रेडियमचा शोध लावणारी ती मादाम क्यूरी. तिला तर बाळपणीं आपलें शिक्षण सोडून लोकांच्याकडे कामें करावीं लागलीं होतीं. पण आपलें ध्येय तिनें पुरें केलेंच.

एखाद्या पोस्टल रनरचा मुलगा जास्तींत जास्त कोण होईलसें वाटतें तुम्हांला? पोस्टल रनरच्या मुलाला म्हणाल तुम्ही भाग्यवान? परंतु

पोस्टल रनरचा मुलगा विद्वान् सॉलिसिटर होऊं शकतो. एका प्रांताचा मुख्य प्रधान होऊं शकतो हें बाळासाहेब खेरांनीं दाखविलें आहे.

एक गुजरातेंतलें छोटेंसें खेडें. इंग्रजी शाळा तेथें नाहीं. मुलगा आठवड्याचा शिधा घेऊन जातो आणि अभ्यास करतो. आपल्या दृढ परिश्रमानें वकील होतो. विलायतेला जाऊन आपल्यावर राज्य करणाऱ्यांचा देश तरी पाहावा अशी त्याची महत्त्वाकांक्षा. पण तें कसें साध्य व्हायचें ? तो आपल्या वडील भावाला घेऊन इंदूरकडे जातो आणि ऐन जायच्या वेळीं वडील भाऊ म्हणतो, मी आधीं जातों. नंतर हा धाकटा भाऊ जातो. विलायतेंत यश मिळवतो. तेथल्या प्रिन्सिपॉलनें सरकारी नौकरी देण्याबद्दल शिफारसपत्र दिलेलें असतें. पण तो सरकारी नोकरी करीत नाहीं आणि शेवटीं स्वतंत्र हिंदुस्थानचा तो उप-मुख्य प्रधान होतो. गृहमंत्री होतो. सरदार पटेलांच्या घरचीही बालपणीं गरिबीच होती.

आणि महाराष्ट्राच्या ज्ञानियांच्या राजाला कोण विसरेल ! किती अभागी तीं चार भावंडें. संन्याश्याचीं मुलें. समाजानें कोणता छळ त्यांचा करायचें बाकी ठेवलें होतें ? परंतु तीं चारी भावंडें ज्ञानविज्ञानसंपन्न झालीं आणि तींही इतकीं ज्या समाजानें त्यांना छळलें त्याच्याविषयीं मनांत यत्किंचितहि कटुता न ठेवतां त्यांना ज्ञान देण्यासाठीं आपलें शक्तिसर्वस्व त्यांनीं वेंचलें आणि वयाच्या सोळाव्या वर्षीं एका अद्वितीय ग्रंथाची रचना केली. ह्या थोरांचें स्मरण करा. तें महान् प्रेरणा तुम्हांला देईल. स्वतःला कमनशिबी, दुर्भागी कशाला म्हणवून घेतां ? त्या हिंदी कवीनें तर सांगितलें आहे —

अनाथ कौन है यहाँ
त्रिलोकनाथ साथ है ।

कोण अनाथ, कोण अभागी आहे ? परमेश्वराचीं लेकरें का अभागी असूं शकतात, कमनशिबी असूं शकतात ? उठा, पुढें व्हा.

तरुणांनो, सर्वांसाठीं जगांत जागा आहे. संधि आहे. उन्नतीचे मार्ग मोकळे आहेत. प्रसिद्ध आणि कीर्तिवान् व्हायला प्रत्येकाला जागा आहे. गरीब असूनही लोक जगद्विख्यात लेखक झाले, कवि झाले. त्यांनीं उज्ज्वल भविष्य असलेलीं राष्ट्रें निर्माण केलीं. ते धनवान् झाले. त्यांनीं उत्तम चित्रें रंगवलीं. तीं प्रत्यक्षांत उतरवलीं. तुम्ही उदास कां बनतां ? निराश कां होतां ? आपल्या भाग्याला बोल कां लावतां ? उठा. कार्य करायला लागा. त्यागाला तयार व्हा. दृढ तपश्चर्या करा. यशोमंदिराचा मार्ग तुम्हांला मोकळा आहे. विजयश्री तुमची वाट पाहात आहे.

★

## ३ : फुरसतीचा वेळ

तुम्हांला आपल्या जीवनाविषयीं प्रेम वाटतें का? मग वेळ व्यर्थ घालवूं नका. कारण थोड्या थोड्या वेळाचेंच जीवन बनलें आहे.

— फ्रँकलिन

मीं प्रथम काल नष्ट केला आणि काल आतां मला नष्ट करतो आहे.

— शेक्सपिअर

बेंजामिन फ्रँकलिनच्या दुकानासमोर एक मनुष्य बराच वेळ फिरत होता. शेवटीं त्यानें विचारलें, "ह्या पुस्तकाची काय किंमत?"

कारकून म्हणाला, "एक डॉलर पडेल ह्याला."

"एक डॉलर! त्याहून कमी नाहीं घेणार?"

"नाहीं."

जरा वेळ ग्राहक इकडे तिकडे फिरला. त्यानें विचार केला. शेवटीं मनाचा हिय्या करून त्यानें विचारलें, "मि. फ्रँकलिन आंत आहेत का?"

"होय, आहेत. ते एका कामांत व्यग्र आहेत."

"मी त्यांची भेट घेऊं इच्छितों."

मालकाला बोलावलें. तो आला. ग्राहकानें विचारलें, "मि. फ्रँकलीन, कमींत कमी केवढ्याला हें पुस्तक द्याल आपण मला?"

"सव्वा डॉलर."

"सव्वा डॉलर!! आतां इतक्यांतच तर आपल्या गुमास्त्यानें एक डॉलर किंमत सांगितली."

"बरोबर आहे. आपलें महत्त्वाचें काम सोडून येण्यांत माझाही वेळ खर्च झाला ना?"

ग्राहक आश्चर्यचकित झाला. आपलें भापण संपवायच्या उद्देशानें तो म्हणाला, " ठीक आहे. आतां ह्याची कमींत कमी किंमत सांगा. घेऊन टाकतां येईल म्हणजे मला तें. "

" दीड डॉलर."

" काय दीड डॉलर ? आतां इतक्यांत तर तुम्हींच त्याची किंमत सव्वा डॉलर सांगितली होती. "

" होय. ती किंमत त्या वेळीं सांगितली होती. परंतु आतां तर दीड डॉलर झाली आहे आणि जों जों आपण पुस्तकखरेदीला वेळ लावून फुकट माझा वेळ घ्याल, तों तों पुस्तकाच्या किंमतींत वाढ होत जाईल. माझा वेळ कांहीं बिनाकिंमती नाहीं कीं वाटेल त्यानें तो घ्यावा. "

तो तरुण समजला. उमजला. शहाणा झाला. त्याला आपली चूक कळली, वेळेचें महत्त्व कळलें. अर्धा डॉलर इतक्या स्वस्तांत त्याला एक धडा मिळाला. वेळ बहुमोल आहे. तो विनाकारण घालविणें म्हणजे दिलेलें जीवन व्यर्थ घालविणें. जीवन देणाऱ्या परमेश्वराचा, आयुष्य देणाऱ्याचा तो अपमान आहे.

एल्. हूबरीट म्हणतो, " मीं अनेक कामें केलीं. अनेक करण्याची उमेद माझ्यांत आहे. माझीं कामें मी धैर्यानें आणि मुंगीच्या चिकाटीनें करीत आलों. करीत राहीन. सतत उद्योग, तत्परता आणि किंचितही वेळ फुकट न घालविण्याची माझी प्रथा सतत माझ्या उपयोगी पडली. तिनेंच मला यश दिलें. कीर्ति दिली. संपत्ति दिली. एका विचारानंतर दुसरा विचार, एका कार्यानंतर दुसरें कार्य मीं हातीं घेतलें. ह्यांतून मला प्रगतीचा मार्ग सांपडला. माझी प्रगति झाली. मी महत्त्वाकांक्षी आहें. मला फार मोठी महत्त्वाकांक्षा आहे. तिच्याचसाठीं मीं हा महोद्योग आरंभिला आहे. तरुणांना एक उदाहरण घालून द्यायचें आहे मला. त्यांनीं आपला वेळ, प्रत्येक क्षण उद्योगांत घालवावा. कारण क्षणाक्षणांचें जीवन

बनतें, कणाकणांचें वाळवंट होतें आणि थेंबाथेंबांचा सागर होतो. कांहीं तुच्छ नसतें. लहान वस्तूचीच मोठी वस्तु बनत असते."

जगांत जे लोक मोठे झाले ते वेळेचें महत्त्व उमगले. हाच त्यांचा यशाचा सिद्धान्त. पैशांपेक्षांही त्यांनीं काटकसरीनें वेळ खर्च केला. जेव्हां सर्व लोक झोपीं गेलेले असत, तेव्हां हूबरोट आपल्या कामांत मग्न असे. जेव्हां सर्व लोक ऐषआरामांत व्यग्र असत, तेव्हां त्याला कार्याचा ध्यास लागलेला असे. पार्लमेंटमध्यें बर्कचें सर्वांना चकित करून सोडणारें भाषण झालें. भाषण ऐकून त्याचा भाऊ म्हणाला, "मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे कीं कुटुंबांतल्या सर्व प्रतिभेचा सांठाच नेडनें हस्तगत केला. मला नक्की आठवतें कीं पूर्वीं ज्या वेळीं आम्ही खेळ खेळत असूं, गप्पागोष्टी करीत असूं, त्या वेळीं तो आपल्या कामांत मग्न असे."

दिवस एखाद्या जिवलग मित्राप्रमाणें आम्हांला भेटायला येतात. आम्हांला निसर्गांतली अमूल्य भेट नजर करतात. ज्याप्रमाणें आलेली भेट, नजराणा किंवा प्रेमाची देणगी आम्हीं स्वीकारली नाहीं तर परत जाते, त्याचप्रमाणें आलेला वेळ सुद्धा आल्या पावलीं परत जातो.

प्रत्येक उज्ज्वल सकाळ उत्तम उत्तम जिनसा घेऊन येते. परंतु कालच्या आणि परवांच्या सकाळपासून जर आम्हीं कांहीं फायदा करून घेतला नाहीं, तर आजच्या आणि येणाऱ्या सकाळपासून लाभ घ्यायची आमची शक्ति क्षीण होते आणि अशीच संवय पडली, तर कांहीं दिवसांनीं सकाळचा आल्हाद, उत्साह, आनंद आम्ही कायम गमावून बसूं. एक विद्वान् म्हणतो, "गमावलेलें धन थोड्या काटकसरीनें आणि परिश्रमानें आम्ही मिळवूं शकूं, विसरलेलें ज्ञान पुनः अध्ययन केल्यानें प्राप्त होईल, गेलेलें आरोग्य औषध आणि संयम ह्यांच्या मदतीनें परत मिळेल, परंतु गमावलेला वेळ हा पुनः परत मिळवितां येत नाहीं."

" जेवायचं आहे. दहापांच मिनिटंच अवकाश आहे. आतां काम करणं शक्य नाहीं. " हे उद्गार प्रत्येक माणसाच्या तोंडून सदासर्वदा बाहेर पडतात. असा लोकांना विचार कधीं सुचत नाहीं कीं मोठे मोठे समजले जाणारे लोक ह्याच किरकोळ वेळाचा सदुपयोग करून मोठे झाले. आम्ही जर ह्याही पांच मिनिटांचा सदुपयोग करूं लागलों तर यश आमचें आहे. धन, कीर्ति हीं तर आमच्या पायींच्या दासी होतील. जगापुढें, आमच्या बंधूंपुढें आम्ही एक आदर्श उदाहरण उपस्थित करूं शकूं.

हेरेट वीचरस्टोव्ह एक प्रख्यात लेखक होऊन गेला. त्याचें प्रख्यात पुस्तक टॉमकाका. त्यानें तें घरच्या हजारों भानगडींतून लिहून पुरें केलें. त्यावर अमर कीर्ति मिळविली. लोकमान्यांनीं जनतेला प्रज्ज्वलित करणारे लेख, जनतेला मार्गदर्शन करणारे आपले लेख, राजकरणानें अस्वस्थ असतांनाच लिहिले. जेलमधलें सक्त मजुरीचें काम करून उरलेल्या वेळांतच साने गुरुजींनीं आईच्या प्रेमाचा आदर्श उपस्थित केला. " श्यामची आई " जेलमध्येंच प्रसूत झाली. साने गुरुजींच्या स्फूर्तिदायक कविता जेलमध्यें लिहिल्या गेल्या. जेलच्या बंदिस्त वातावरणांतच हिटलरचें " माईन काम्फ " बाहेर पडलें. जीवनासाठीं लढतां लढतां आणि शाळेच्या पोरांचा कोंडवाडा चालवितां चालवितांच दिवाकरांनीं नाट्यछटा लिहिल्या. अनमोल कीर्ति संपादन केली. मराठी वाङ्मयांत अद्वितीय स्थान मिळविलें. भोजन वाढण्याच्या रिकाम्या वेळांत वीचरस्टोव्हनें फ्राऊडचें " इंग्लंड " पुस्तक वाचून काढलें. जेवढा वेळ चहा उकळतांना लागे तेवढ्या वेळेचा उपयोग करून लॉंगफेलोनें " इनफरनो " नांवाच्या ग्रंथाचा अनुवाद करून टाकला.

कवि बर्न्स, शेती करतां करतां त्यानें मनाच्या शेताची मशागत केली. रिकाम्या वेळेचा त्यानें उपयोग केला.

एवढेंच नव्हे, तर त्याच्यामुळें साहित्याची शोभा वाढली. महत्त्व वाढलें. " पॅरडाईज् लॉस्ट " चा कवी मिल्टन ब्रिटिश कॉमनवेल्थ आणि प्रोटेक्टरचा प्रधान होता. आपल्या कामांत उरणाऱ्या वेळाचा उपयोग करून त्यानें ह्या अमर महाकाव्याची रचना केली. जॉन स्टुअर्टनें आपला सर्वोत्कृष्ट ग्रंथ ईस्ट इंडिया कंपनीची कारकुनी, खर्डेघाशी करतांनाच रचला. गॅलीलियो वैद्यकी करी. रिकाम्या वेळांत तो प्रयोग करी. ह्याच वेळेचा उपयोग करून त्यानें आपले जगद्विख्यात शोध लावले. ग्लॅडस्टन इंग्लंडचा मुख्य प्रधान होता. तो घरांतून बाहेर पडतांना आपल्या खिशांत नेहमीं एकादें छोटेंसें पुस्तक ठेवी. त्याला सारखी काळजी वाटे कीं एखादा क्षण फुकट जायचा. आपण सामान्य माणसें. आपल्याला मिळणारा प्रत्येक क्षण अमूल्य. तो वांचविण्यासाठीं आपण हरएक प्रकारें दक्ष राहिलें पाहिजे. काळजी घेतली पाहिजे. एक एका क्षणाचा उपयोग करणाऱ्या ह्या प्रसिद्ध व्यक्तींचें जीवन आमचा उधळेपणा पाहून आम्हांला हसतें आहे. आमची ही स्थिति पाहून त्यांना असंतोष वाटत आहे. आमच्या भविष्याबद्दल ते सचिंत आहेत. प्रतिभावान् मनुष्य आपल्या थोडक्या थोडक्या तुटक क्षणांचा उपयोग करून महान् बनतो. महान् होण्याचीं बीजें तुमच्यांत परमेश्वरानें पेरलीं आहेत. त्यांना योग्य खत पाणी द्या. त्यांची योग्य काळजी घ्या. तीं मोठीं होतील. तुम्हांला महत्ता प्राप्त करून देतील. जीवनांतल्या प्रत्येक क्षणाची किंमत ज्याला कळली तो मोठा होणारच.

मायकेल फॅरडे पुस्तकांचें बाइंडिंग करीत असे. आपल्या रिकाम्या वेळांत तो शास्त्रीय प्रयोग करी. एकदा त्यानें आपल्या मित्राला लिहिलें, " मला वेळेची मोठी आवश्यकता आहे. अपुरा पडतो मला काम करतांना दिवस. जर लोकांचा वेळ स्वस्त भावांत मला घेतां आला असता तर किती छान झालें असतें. मीं दिवसच्या दिवस खरेदी केले असते. "

हैदरखानाला आपल्या वेळेचें महत्त्व कळत असे. तो सकाळीं दांतवण करतां करतां निरनिराळ्या ठिकाणच्या गुप्तचरांचें म्हणणें ऐके. आपल्या पूर्वजांना वेळेचें महत्त्व कळलें होतें. ते शतपावलीच्या वेळीं पाठान्तर करीत. रामशास्त्र्यांना वेळेचें महत्त्व कळत होतें. तासन् तास पूजा करणाऱ्या पेशव्यांची त्यांनीं स्पष्टपणें कानउघाडणी केली होती.

दररोज फक्त एक तास काम शिकून अज्ञान व्यक्ति सज्ञान होऊं शकते. दररोज एक तास पैसे कमावण्याचा उद्योग करून मनुष्य दोन दैनिकें, दोन साप्ताहिकें, दोन मासिकें आणि एक डझन पुस्तकें खरेदी करूं शकेल इतका पैसा कमावूं शकतो. दररोज एक तास वाचन करणारा एका वर्षांत कित्येक हजार पानांचे अठरा ग्रंथराज वाचूं शकेल. रोज अर्धा घंटा सूत कातून मनुष्य वस्त्रस्वावलंबी होऊं शकतो. अशा प्रकारें दिवसाचा एक तास अप्रसिद्ध व्यक्तींना प्रसिद्ध आणि निरुपयोगी माणसांना आपल्या राष्ट्राला आणि देशाला उपयुक्त असें बनवूं शकतो. केवळ एका तासाचें हें माहात्म्य आहे. जर दररोज फुकट जाणाऱ्या सात आठ तासांचा आपण उपयोग केला, ते व्यर्थ घालविणें आपण बंद केलें तर नवयुवक आणि नवतरुणी ज़ीवनांत काय करून दाखवूं शकणार नाहींत ?

प्रत्येक नवयुवकानें आपल्या फुरसतीच्या वेळेचा सद्व्यय केला पाहिजे. त्या कंटाळवाण्या वेळाचें आनंदांत परिवर्तन केलें पाहिजे. त्याच्या मूळ कामाशीं ह्या फुरसतीच्या वेळाच्या कामाचा संबंध नसला तरी त्यानें पुऱ्या दिलानें हें काम करायाला हवें.

कांहीं मुलें इकडे तिकडे व्यर्थ जाणाऱ्या वेळेचा उपयोग करून उच्च शिक्षण मिळवितात, तर तीच वेळ फुकट घालवून इतर माशा मारीत बसतात. जीवनाचा अपव्यय करतात. जीवन देणाऱ्या त्या परमेश्वराचा अपमान करतात. असा कोण आहे, कीं जो आत्मोद्धारासाठीं दररोज एक तास सुद्धा देऊं शकणार नाहीं ! चार्ल्स

फ्रास्ट एक चांभार होता. अध्ययनाला तो दररोज एक तास देई. ह्या एका तासांत गणित शिकून तो अमेरिकेंतला सुप्रसिद्ध गणिताचार्य बनला. जॉन हंटर, नेपोलियन फक्त चार तास झोप घेत. टॉमस एडिसन फक्त २ तास झोप घेई. कामाचा रगाडा असेल तेव्हां गांधीजी अत्यंत कमी झोप घेत. मुंबईच्या सुप्रसिद्ध ऑ. इं. कॉं. कमिटीच्या वेळीं ते फक्त १॥, २ तास झोप घेत.

हंटरनें एकत्रित केलेल्या सामुग्रीला व्यवस्थित रूप द्यायला प्रा. ओव्हनला दहा वर्षं परिश्रम करावे लागले. ते रोज वीस तास काम करीत. हंटरनें आपल्या उद्योगप्रियतेनें हजारों नमुने एकत्र केले होते. उद्योगप्रियतेचें ह्यापेक्षां उज्ज्वल उदाहरण कोठून मिळणर ?

जॉन अॅडम्सचा जेव्हां कोणी व्यर्थ वेळ घेई, तेव्हां त्याला भयंकर राग येत असे.

मोठे लोक नेहमींच वेळेच्या बाबतींत चिक्कू असतात. सिसेरो म्हणे, " जो वेळ कांहीं लोक नुसत्या विसाव्यासाठीं आणि शारीरिक विश्रांती-साठीं सर्च करतात, त्याच वेळीं मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतों." चान्सेलरचें काम करून उरलेल्या वेळाचा उपयोग करून लॉर्ड बेकन सुप्रसिद्ध झाला. अमर आणि अलोट कीर्तीचा धनी झाला. एका मोठ्या राजकारणी पुरुषाशीं विचारविनिमय करीत असतां महाकवि गटेला एक उत्तम कल्पना सुचली. पाहुण्यापासून थोडा वेळ मागून त्यानें ती कल्पना लिहून काढली. सर हंप्रे डेव्हीनें आपल्या रिकाम्या वेळेचा उपयोग करून मोठमोठे शोध लावले. पोप नेहमीं रात्रीं उठे. दिवसाच्या धमकल्यांत जे विचार त्याला सुचत नसत ते रात्रीं सुचत. ते तो रात्रीं लिहून काढी. ग्रोटेनें आपलें अनमोल पुस्तक " ग्रीसचा इतिहास " आपल्या रिकाम्या वेळांत लिहिलें.

जॉर्ज स्टिफनसन आपल्या रिकाम्या वेळेला सोनें समजत असे. सोन्याबाबत आपण जितकी काळजी घेतों, तितकी तो आपल्या वेळेसंबंधीं घेई. तो वेळ बिलकूल फुकट घालवीत नसे. माजहं प्रत्ये मिनिटांत कांहीं ना कांहीं आत्मसुधार अवश्य करीत असे. तो खूप वेळ काम करी. कामांत तो इतका मग्न होई कीं झोपण्याचीही त्याला शुद्ध राहात नसे. आपलें काम संपविण्यासाठीं कधीं कधीं तो दोन दोन, तीन तीन दिवस आणि रात्री झोपेशिवाय काढी आणि सारखा लिहीत बसे. त्याच्या हातांतून जणूं हृदयांतला स्फूर्तीचा झरा वाहात असे. त्याचा हात सारखा चालू असे. आपलें प्रसिद्ध पुस्तक "रेक्यूयम" त्यानें मृत्युशय्येवर असतांना लिहिलें. राम गणेश गडकऱ्यांना शेवटीं वेळेचें इतकें महत्त्व पटलें होतें कीं मृत्यूच्या घटका मोजतांना अमर रचना करीत होते.

सीनर म्हणे, "मी शत्रूंनीं वेढलेला असें. आपल्या तंबूंत तशाही अवस्थेंत मला विचार करायला मिळत असे. मीं तशाही अवस्थेंत विचार केलेला आहे." एकदा त्याचें एक जहाज बुडालें. आपल्यावरोबर नेहमींप्रमाणें त्यानें एका हस्तलिखित ग्रंथाची प्रत घेतली होती. ज्या वेळीं जहाज बुडत होतें, त्या वेळीं तो पुस्तक वाचण्यांत मग्न झाला होता.

डॉक्टर मॉरसन गुड लंडनमध्यें एक रोगी पाहायला जात होता. रस्त्यानें येतांना तो स्वस्थपणें आला नाहीं. येतां येतां त्यानें रस्त्यांत "लुक्रेशियस" च्या ग्रंथाचा अनुवाद करून टाकला. डॉक्टर डरवाननें आपल्या बऱ्याचशा रचना कागदाचे लहान लहान तुकडे एकत्र करून लिहिल्या होत्या. विचार मनांत येतांच तो ते लिहून काढी. हेन्री कर्कव्हाईट ग्रीक भाषा ऑफिसमधून येण्याजाण्याच्या वेळांत शिकला. डॉक्टर बार इटालियन आणि फ्रेंच भाषा घोड्याच्या पाठीवर शिकला.

वर्तमान काळ एक कच्चा माल आहे. आम्हांला हवा असलेला पक्का माल योग्य त्या श्रमांनीं आम्ही त्यांतून निर्माण करूं शकतों. चुकून सुद्धा भूतकालीन आणि भविष्यकालीन गोष्टींचीं स्वप्नें पाहूं नये. वर्तमानाचा जास्तींत जास्त उपयोग करावा. आपल्या पुढचे तास पकडा. त्यांच्यापासून कांहीं ना कांहीं काम घ्या. धडा शिका. निष्कारण एक क्षणहि वायां घालवूं नका. तासाचें महत्त्व नाहीं अजून आपल्याला कळलें. ज्याला महत्त्व कळलें नाहीं तो त्याचा सदुपयोग तरी कसा करणार? अजून तासाचें खरें आणि योग्य महत्त्व जाणणारा मनुष्य निर्माण व्हायचा आहे. "परमेश्वर एका वेळीं एकच क्षण देतो. दुसरा क्षण देण्यापूर्वीं तो प्रथम दिलेला क्षण परत घेतो. म्हणून आपण क्षणाक्षणाचा उत्तम उपयोग केला पाहिजे. पैची काळजी घेतली, कीं रुपयांची काळजी आपोआपच घेतली जाईल."

प्रेसिडेंट क्वीनसे दररोज निघण्यापूर्वीं दुसऱ्या दिवशीं करावयाच्या कामांची एक यादी बनवीत. अशा प्रकारें वेळेबरहुकूम काम केलें, तर थोडा सुद्धा वेळ फुकट जात नाहीं. मनाला समाधान होतें. संध्याकाळीं केलेल्या कामांचा आढावा घेतांनाही खूप आनंद होतो. दुसऱ्या दिवशींचीं कामें करतांना आणि ठरवितांना उत्साह येतो. त्याच प्रकारें प्रत्येक विद्यार्थी, लेखक, समाजसेवक आणि पुढारी ह्यांनीं आपलें आचरण ठेवलें पाहिजे.

कामांत मग्न असलेल्या तरुणाची कोणी काळजी करीत नाहीं. तो कांहीं ना कांहीं करून दाखवितोच. तो कोणत्या ठिकाणीं आपलें दुपारचें जेवण करतो? आपलें घर सोडून तो रात्रीं कोठें जातो? संध्याकाळच्या जेवणानंतर तो काय करतो? रविवारचे आणि सुटीचे दिवस तो कोठें आणि कसे खर्च करतो? आपला रिकामा वेळ तो कसा घालवतो? ह्या प्रश्नांच्या उत्तरावरून त्याच्या चरित्राची कल्पना करतां येते.

पुष्कळसे तरुण आपला भोजनोत्तरचा वेळ झोपण्यांत खर्च करून आपल्या जीवनाचा दुरुपयोग करतात. ख्याति आणि कीर्तीच्या मार्गांचे पांथस्थ आपला संध्याकाळचा वेळ अध्ययनांत, मननांत, काम करण्यांत खर्च करतात. ते आपला संध्याकाळचा वेळ अशा व्यक्तींच्या सहवासांत घालवितात कीं ज्या त्यांच्या प्रगतीला साहाय्यक होऊं शकतील. प्रत्येक संध्याकाळ तरुणाला जीवन मरणाचा प्रश्न आहे.

व्हीटीयेच्या पुढील वाक्यांत एक मोठें रहस्य दडलेलें आहे. " आजच्या दिवशीं आम्ही आमचा भविष्यकाळ बनवीत असतों. आमच्या भाग्याची जाळी आम्ही विणतों. आम्ही पुढच्या साऱ्या आयुष्यासाठीं पाप आणि पुण्य ह्यांतली एक गोष्ट निवडीत असतों पुढच्या आयुष्यासाठीं चांगला किंवा वाईट मार्ग निवडीत असतों. आज दोन रस्ते फुटण्याचें ठिकाण आहे. "

Time is money. वेळ धन आहे. आमच्या हातून एक क्षण-सुद्धा व्यर्थ जातां कामा नये असें कांहीं लोक म्हणतात, परंतु धन गमावण्याची, वेळ गमावण्याशीं बरोबरी होऊंच शकत नाहीं. वेळ गमावणें म्हणजे शक्ति गमावणें, सामर्थ्य गमावणें आहे. हें आपलें पतन आहे. वेळ गमावणें म्हणजे आपल्या आयुष्यांतल्या सगळ्या संधि गमावणें, वेळ हा केवळ पैसा नाहीं, त्यापेक्षां जास्त कांहीं तो आहे.

एडवर्ड एवरीट लिहितो, " प्रत्येकाच्या हातांत आपल्याला उपयोगी, कीर्तिवान् आणि सुखी बनविण्याचीं साधनें आहेत. बुद्धिसुधार करून संधीची वाट पाहात राहाणें आणि संधि हस्तगत करणें, विकारांचा आणि इंद्रियजन्य सुखांचा त्याग करणें, त्यांच्याकडे लक्ष न देणें आणि आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा उपयोग करणें ह्याच यशस्वी होण्याला उपयुक्त गोष्टी होत. "

महात्माजींच्या इतके दृढ हितसंबंध दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांशीं फार थोड्या पुढाऱ्यांचे आहेत. ज्या वेळीं राऊंड टेबल कॉन्फरन्समध्यें शुष्क वादविवाद चालत, त्या वेळीं ते इंग्लंडमध्यें निरनिराळ्या व्यक्तींशीं संबंध प्रस्थापित करतांना आढळावयाचे. ज्या वेळीं सेवाग्रामला कंटाळवाणी चर्चा मोठमोठे राजकारणी पुरुष करीत असत, त्या वेळीं गांधीजी एखाद्या रोग्याची शुश्रूषा करतांना आढळत. प्रवासाच्या वेळीं खिडकींतून बाहेर पाहाण्यांत जो वेळ लोक दवडतात, जो वेळ त्यांना फुरसतीचा वाटतो, त्याच वेळीं गांधी लिहीत असत. कधीं हरिजन कार्यासाठीं फंड गोळा करीत. विनोबाजी भावे आपला प्रवासाचा वेळ, जो लोक फुरसतीचा, रिकामा, निरुपयोगी समजतात तोच उपयोगांत आणून सूत काततांना आढळतात. वेळ रिकामा घालविणारांची फुरसत नसल्याची तक्रार, काम करण्याला सवड नसल्याची तक्रार व्यर्थ आहे.

क्षणक्षणा जीवन बनतें ।
क्षण जातां जीवन जातें ॥

असें आपल्या एका कवीनें सांगितलें आहे. एक क्षणहि आपला रिकामा जातां कामा नये, व्यर्थ जातां कामा नये. त्यासाठीं आपल्याला एक नवें सूत्र शिकलें पाहिजे. आपल्या जीवनांत तें आणलें पाहिजे. तें सूत्र म्हणजे विभागणीचें सुवर्ण-सूत्र. आपण हें सूत्र शिकलें पाहिजे. अगदीं प्राचीन कालापासून ह्या सूत्राचा येथें उपयोग होत आला आहे. परंतु दुर्दैवानें मध्यंतरींच्या काळांत हें सूत्र आपण विसरलों. कोणत्याही गोष्टींत विजय मिळवावयाला ह्या सूत्रासारखें उपयोगी दुसरें सूत्र नाहीं. इंग्रजांनीं Divide and Rule ह्या तत्त्वाचा उपयोग केला असें आपण म्हणतों त्याचा अर्थही हाच. आपल्या पूर्वजांना जीवन यशस्वी व्हावें असें वाटे. म्हणून जीवनाची त्यांनीं व्यवस्थित विभागणी केली होती. जीवन चार आश्रमांत त्यांनीं विभागलें: ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास

असे चार आश्रम त्यांनीं केले. गांधीजींच्या जीवनाकडे पाहिलें कीं विभागणीच्या ह्या सुवर्णसूत्राचें माहात्म्य ध्यानांत येईल. गांधीजींच्या वेळेची व्यवस्थित विभागणी केलेली असल्यानें ते एवढें अफाट काम करूं शकत. पंडित जवाहरलाल गांधीजींना श्रद्धांजलि वाहतांना म्हणाले, "गांधीजींनीं आपल्या आयुष्यांत एखाद्या राक्षसाएवढें खूप काम केलें आहे." ठरलेल्या वेळीं त्यांचीं ठरलेलीं कामें चालत. मृत्युसमयींमही सरदार वल्लभभाईशीं चाललेली महत्त्वाची चर्चा एकदम त्यांनीं बंद केली. प्रार्थनाविचारांत मग्न होऊन प्रार्थनास्थानाकडे ते निघाले. नाहीं तर आमचें. आम्हांला इतिहासाच्या तासाला गणित आठवतें, गणिताच्या तासाला इंग्रजीची आठवण होते. आपल्या बुद्धीला एक अद्वितीय शक्ति मिळालेली आहे. कप्पा शक्ति म्हणूं आपण तिला. कप्पा शक्ति म्हणजे वेळ संपतांच कप्पा बंद करावयाचा. तो कप्पा पुन्हा तो विषय आला कीं उघडावयाचा. पण आमचे सारे कप्पे सदैव उघडे असतात. गांधीजींचें असें नसे. एखाद्या विषयासंबंधीं बोलतांना ते अगदीं तन्मयतेनें बोलत; पण एकदा तो विषय संपला कीं त्या विषयाचें त्यांचें चिंतन संपे. लगेच तितक्याच तन्मयतेनें ते दुसरा विषय हाताळीत. जर हें विभागणीचें सूत्र जीवनांत नसेल तर मग जीवनांत सामंजस्य, तोल राहात नाहीं. जीवन वाहावत जातें. गांधीजी आपल्या जीवनाच्या क्षणाक्षणाचा उपयोग करूं शकले ह्याला कारण त्यांनीं हें विभागणीचें सुवर्णसूत्र अत्यंत उत्तम रीतीनें अंमलांत आणलें होतें. मालिशच्या वेळीं गांधीजी बंगालमध्यें असतांना बंगालीचे धडे घेत. बंगालीबंधूंशीं बोलतांना चार वाक्यें तरी त्यांच्या भाषेंत बोलतां यावीं ही तळमळ त्यांना असे.

परंतु हें विभागणीचें सुवर्णसूत्र शिकण्यापूर्वीं दुसरी एक गोष्ट आपल्याला शिकली पाहिजे. 'नाहीं' म्हणण्याचें धैर्य आपल्यांत नसतें. मागें गांधीजी एकदा मुंबईच्या गव्हर्नरांना भेटावयास गेले होते. तेव्हां

ते गांधींना म्हणाले, "तुम्हां हिंदी लोकांत नाहीं म्हणण्याचें धैर्य नाहीं." हें धैर्य आपण मिळविलें पाहिजे. मला अभ्यास करणें आतां अत्यंत जरूर आहे परंतु मित्र गप्पा मारावयाला येऊन बसतो. त्याला आतां वेळ नाहीं कसें सांगूं असें आपल्याला वाटतें. परंतु जोंपर्यंत "मला आतां सवड नाहीं, अमूक वेळीं ये" असें सांगण्याचें धैर्य आमच्यांत येत नाहीं तोंपर्यंत वेळेचा सदुपयोग आम्ही नाहीं करूं शकणार. तोंपर्यंत आमचीं वेळापत्रकें, आमचे निश्चय सारे व्यर्थ जातील.

आज स्वातंत्र्योत्तर नवसमाजरचनेचा उद्घोष सर्व करीत आहेत. विद्यार्थीजीवनाची नवरचनाही ह्या विभागणीच्या सुवर्णसूत्रावर झाली पाहिजे; तरच स्वातंत्र्यकालांतील जबाबदाऱ्या पार पाडण्याइतके कार्यक्षम ते बनूं शकतील.

★

# ४ : प्रतिकूल परिस्थिति

" जीवनाचें सर्वांत मोठें बक्षीस, जीवनाची सर्वात मोठी संपत्ति म्हणजे एकाद्या विशिष्ट गोष्टीच्या पूर्ततेसाठीं जन्म घेणें. आपल्या नियत कार्यपूर्तींत मनुष्याला सुख मिळतें, आनंद मिळतो, प्रसन्नता मिळते. "

— *इमरसन*

" मला एक आवाज ऐकूं येतो, तो तुम्हांला ऐकूं येत नाहीं. तो आवाज मला सारखा बजावून सांगतो आहे, ' थांबूं नको. थांबला तो संपला. ' मला एक अदृश्य हात सारखा बोलावतो आहे, पण तो तुम्हांला दिसत नाहीं. "

— *टिकेल*

रॉबर्ट वॉटर्स म्हणतो, " एक दिवस प्रत्येकाच्या आयुष्यांत अवश्य येतो, ज्या वेळीं प्रतिभावान् मनुष्य आपल्या नियतकार्याकडे आकर्षिला जातो. संकटाचे घनघोर मेघ दिसत असोत, भविष्यकाळ निराशाजनक दिसत असो, तो मनःपूर्वक आणि आनंदानें फक्त तेवढेंच काम करीत राहील. जेव्हां त्याचे प्रयत्न अयशस्वी होतात, दारिद्र्याचा तो धनी होतो, आवश्यकता आ वासून पुढें उभ्या असतात, तो भुकेनें व्याकूळ होतो, लोक त्याचा तिरस्कार करतात, त्याला दूर लोटतात, अशा वेळीं त्याला सहजच वाटतें, ' घोडचूक केली ; जर ह्या कामाऐवजीं दुसरें काम केलें असतें तर बरें झालें असतें. ' तो दुःखाचे निश्वास सोडील. परंतु हे विचार एक क्षणभरच टिकतात. शेवटीं त्याच्या स्वाभाविक मनःप्रवृत्तींचाच विजय होतो आणि त्याला कर्तव्य केल्याचें समाधान वाटूं लागतें. "

पाळण्यांत पडलेल्या बालकाच्या भविष्यांत काय आहे, ब्रह्मदेवानें काय लेख लिहिला आहे, तो वाचण्याचें सामर्थ्य आपल्यांत नाहीं. आपल्याला होकायंत्रांत कुठें उत्तर ध्रुव दिसतो का ? तो फक्त

उत्तर ध्रुवाची दिशा दाखवितो. परमेश्वरानें आपल्या जीवनाची सुई अशी बनविली आहे, कीं तिचें आकर्षण आपल्या भाग्याच्या ताऱ्याकडेच असतें. आपण दुसऱ्या दिशेकडे चुंबक सुईनें आपलें टोंक करावें असा किती जरी प्रयत्न केला, तरी ती आपल्या मूळ स्थितींत पुन्हा सहज येते. तुम्ही कृत्रिम उपायांनीं, अयोग्य सल्ला देऊन किंवा जबरदस्तीनें एकाद्याला कला, कायदा, वैद्यकी वगैरे त्याच्या इच्छेविरुद्ध, पण आपल्या इच्छेप्रमाणें शिकवा. वाटेल तितके परिश्रम करा. आपण त्याचीं अमूल्य वर्षें नष्ट करा. परंतु जेव्हां त्याला स्वतंत्रता मिळेल. तेव्हां तो पुन्हा आपल्या आवडीच्या मार्गावर येईल. आपल्या भाग्याच्या ताऱ्याकडेच तो झुकेल. आपले गुण प्रकट करील.

ज्या वेळीं प्रत्येकजण आपल्याला उपयुक्त कार्य निवडील आणि तेंच करील, त्या वेळीं सभ्यता उच्चांक गाठील. जोंपर्यंत मनुष्य आपल्या आवडीचें काम करीत नाहीं, तोंपर्यंत त्याला तितकें यश मिळणार नाहीं.

आपल्याप्रमाणेंच आपल्या मुलाला बनवण्याचा प्रयत्न म्हणजे शुद्ध स्वार्थ. एकाच सारखे दोन प्राणी निसर्ग कधींच बनवीत नाहीं. प्रत्येक जन्माच्या वेळीं निसर्ग आपला सांगाडा बदलतो. तेंच जादूचें मिश्रण पुन्हा उपयोगांत आणलें जात नाहीं.

फ्रेडरिकला लोक शिव्या देत. वेडा ठरवीत. त्याला संगीताचें आणि कलेचें प्रेम होतें, हाच त्याचा दोष होता. त्याला सैनिक शिक्षणाचा तिरस्कार वाटे. त्याच्या वडिलांना त्याची कलाप्रियता पसंत नव्हती. त्याच्या कलाप्रियतेवर ते रागावत. पण ते वारले. २८ वर्षांच्या वयांत फ्रेडरिक राजा झाला. गादीवर बसला. याच संगीतप्रिय राजानें प्रशियाला यूरोपच्या राजकारणांत महत्त्वाचें स्थान मिळवून दिलें. प्रशिया तेजस्वी झाला. साऱ्या यूरोपचा गुरु बनला.

0303

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध राष्ट्रीय नाटककार, नवाकाळचे संपादक कै० कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचेंही असेंच आहे. एल्‌एल्‌. बी. पास होण्याचा त्यांनीं अनेकदा प्रयत्न केला, पण त्यांना यश आलें नाहीं. परंतु अखेर त्यांची वृत्ति जागृत झाली. तिला योग्य तो वाव मिळाला. ते नाटककार म्हणून नांवारूपास आले. परिस्थितीच पूर्वीं अशी होती कीं ज्या हुशार विद्यार्थ्यानें उठावें त्यानें आय्‌. सी. एस्‌. किंवा बॅरिस्टर व्हावें. सुभाषचंद्र बोस ह्या भोवऱ्यांत सांपडले. आय्‌. सी. एस्‌. झाले. परंतु देशसेवेकडे त्यांची प्रवृत्ति असल्यानें बंगल्यांतल्या सुखस्वप्नांऐवजीं स्वाभिमानामुळें त्यांना जेलच्या चार भिंतींत कोंडून घ्यावें लागलें. हद्दपार व्हावें लागलें. सोन्याचें घड्याळ मनगटावर दिसण्याऐवजीं लोखंडाच्या बेड्या त्यांना घालाव्या लागल्या. आपल्या मनःप्रवृत्तीच्या विरुद्ध असलेलें काम सोडून आपल्या चिरवांच्छेच्या लहानपणापासून मनांत बाळगलेल्या विचारांप्रमाणें त्यांनीं कामें केलीं. हिंदुस्थानचें पहिलें आझाद सरकार त्यांनीं स्थापलें.

गॅलीलियो शाळेंत शिकत होता. त्याच्या वडिलांना नेहमीं वाटे, त्यानें डॉक्टर व्हावें. त्याच्या इच्छेविरुद्ध त्याला वैद्यकीय शिक्षण दिलें गेलें. ज्या वेळीं बाप त्याला शरीरशास्त्राचीं पुस्तकें वाचावयास सांगे, त्या वेळीं तो गणिताचीं पुस्तकें त्या खालीं लपवी. तीं वाची. त्यांचा अभ्यास करी. चोरून तो गणिताचे अत्यंत बिकट प्रश्न सोडवी. वयाच्या अठराव्या वर्षींच त्यानें चर्चेमधला हलता दिवा तो काय पाहिला आणि त्यावरून लंबकाचा (पेंड्यूलमचा) शोध काय लावला. त्यानें दुर्बीण आणि सूक्ष्मदर्शक यंत्राचा शोध लावला. मनुष्याची शक्ति हजारों पटींनीं वाढविली.

मायकेल एंजेलोच्या वडिलांनीं घोषित केलें, कीं कलेसारख्या तुच्छ कामांत माझ्या घरांतल्या कोणींही पडूं नये. तें काम हलक्या लोकांचें

आहे. कमी प्रतीचें आहे. मायकेलनें एकदा भिंतीवर एक चित्र काढलें. वडिलांनीं तें पाहिलें. ते रागावले त्याच्यावर व त्याला शिक्षाही करायला त्यांनीं कमी केलें नाहीं. त्यांना वाटे, शिक्षा केल्यानें हा आपला नाद सोडील. परंतु ढग आडवे आले म्हणून सूर्यानें का कधीं आपला मार्ग बदलला आहे ? कितीही कृत्रिम विरोध निर्माण केले तरी चुंबक सुई का उत्तर-दक्षिण-दर्शक गुण सोडते ? त्याच्या हृदयांत चित्रकलेच्या प्रेमाची ज्योत होती. पित्याच्या विरोधानें ती जास्तच प्रखर झाली. त्याला रात्रीं नीट झोपसुद्धां येत नसे. जेव्हां सेण्टपीटर आणि सिसटाईनच्या चर्चमध्यें याचीं अमर चित्रें लागलीं, तेव्हांच त्याच्या मनाचें समाधान झालें.

हेण्डलची इच्छा होती, आपल्या मुलानें वकील व्हावें. तो त्याला संगीतापासून दूर ठेवायचा प्रयत्न करी. मुलाला कोठूनसा एक मोडका बाजा मिळाला. बापाच्या भीतीनें तो गवताच्या गंजींत लपून बसे. आपला बाजाचा अभ्यास तो लपून छपून करी. एक दिवस हेण्डल ड्यूक ऑफ वेसनफील्डच्या घरीं भोजनासाठीं गेला. मुलानें बाजा वाजवून सर्व निमंत्रितांस चकित केलें. त्याचें वाजविणें उत्तम होऊं लागलें. लोक त्याच्या गुणासाठीं एकत्र जमूं लागले. एक दिवस खुद्द ड्यूकनेंही त्याचें वाजविणें ऐकलें. त्याच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. ड्यूकनें मुलाला जवळ बोलावलें. त्याच्या गुणांचा गौरव केला. मुलाच्या वडिलांनाही मुलाला बंदी न करण्याविषयीं सांगितलें.

डॅनिल डिफोनें व्यापार केला, सेक्रेटरीचें काम त्यानें केलें, एका कारखान्यांत मॅनेजरचें काम केलें, कमिशनरचा हिशेबनीस राहिला, अनेक लहानमोठीं पुस्तकें त्यानें लिहिलीं. इतकें केलें, तेव्हां कुठें "रॉबिन्सन क्रूसो" त्यानें लिहिलें. एकाच रचनेनें तो जगद्विख्यात झाला. त्याचें हें पुस्तक जगाच्या कोनाकोपऱ्यांत वाचलें गेलें.

इरस्किननें चार वर्षें जहाजाच्या कामांत खर्च केलीं. आपली उन्नति व्हावी हा त्याचा हेतु. ह्या हेतूनें तो सैन्यांत भरती झाला. हें कामही त्यानें दोन वर्षें केलें. एक दिवस सहज तो कोर्टांत गेला. न्यायाधीश त्याच्या ओळखीचा होता. न्यायाधीशानें त्याला आपल्याजवळ बसविलें. न्यायालयांतल्या इतर लोकांना उद्देशून तो त्याला म्हणाला, "पहा, इंग्लंडमधले कायदे-तज्ज्ञ लोक आहेत हे !" इरस्किनच्या हृदयांतली ज्योत जागृत झाली. तो तेथेंच बसला. त्यानें प्रत्येकाचें व्याख्यान मोठ्या काळजीपूर्वक ऐकलें. शेवटीं त्यानें निश्चय केला. तो म्हणाला, "मी ह्या सर्वांहून पुढें निघून जाईन. मला हें सहज शक्य आहे." त्या दिवसापासून त्यानें कायद्याचा अभ्यास करायला सुरुवात केली. मनापासून त्यानें कायद्याचा अभ्यास केला. तो साऱ्या देशांत कायद्याचा प्रकाण्ड पंडित म्हणून प्रसिद्ध झाला.

जीं स्वप्नें पाहातो, त्यांच्याविषयीं ज्याला कार्य करायला अवधी मिळतो, तो तरुण सुखी. तो ज्या कार्यांचीं सुखस्वप्नें पाहातो तेंच काम जर त्याच्यानें नीट, धडपणें, यशस्वी झालें नाहीं, तर दुसरें काम तो काय करणार ? तो अयशस्वीच होणार. त्याचें जीवन व्यर्थ जाणार. मनुष्याला पुष्कळ वेळ आपलें विधिनिश्चित कार्य कळत नाहीं. निसर्गप्रकृति त्याचा पाठलाग करते. त्याला त्याच्या विधिनिश्चित कार्याला लावल्याशिवाय ती स्वस्थ बसत नाहीं, थांबत नाहीं. ती त्याला पुढें पुढें ढकलते. त्याला पुढें जाण्याची प्रेरणा करते. त्याला सारखी टोचणी देत राहाते. तो योग्य मार्गाला लागेपर्यंत हें सारें चालतें. लोक प्रयत्न करतील कदाचित्, कीं होकायंत्राच्या सुईनें गुरु किंवा शुक्राकडे आपलें टोंक ठेवावें. पण ती उत्तर ध्रुवतारा सोडावयाची नाहीं. इतर दिशा तिच्याकडून दाखवून घेणें म्हणजे कालाचा अपव्यय, शक्तीचा ऱ्हास आणि निसर्गाशीं युद्ध. त्यांत का यश येणार ? आईबापांनीं

प्रथमच मुलाचा कल पाहिला पाहिजे आणि आपल्यासारखीच जर त्याची आवड निवड असेल तर त्याला शिस्तीची कठोर धार लावावी हवी तर.

एक गाडी ओढणारा घोडा आहे. घोडदौडींत का तो भाग घेणार ? पण जर त्याला रेसमध्यें घातलें तर कशी मजा येईल ?—असेच विचार असतात आमच्या डोक्यांत आणि हृदयांत. हमालीच्या व ओझ्याच्या घोड्याला रेस पळायला लावण्यासारखेंच असतें आमचें वर्तन. आम्हांला वाटतें, वैद्यकशास्त्र, कायदेपांडित्य आणि दुसरें कांहींच न साधल्यास शिक्षकवृत्ति हे आमचे धंदे ! परकीय राजसत्तेमुळें अप्रामाणिकपणाशिवाय हे धंदे चालणें कठीण असतें. आम्ही त्यांना प्रतिष्ठित म्हणून कवटाळून बसतों. यांच्याशिवाय दुसरे धंदे आमच्या तरुणांना कां सुचत नाहींत ? का दुसरें कांहीं ते करूं शकत नाहींत ? एकाद्या देशाचे ८० टक्के पदवीधर कायद्याच्या क्षेत्रांत घुसणें किती हास्यास्पद आहे. कित्येक मुलें आपल्या आईबापांचे धंदे करतात. त्यांना आवड नसली तरी ते धंदे करतात. अयशस्वी डॉक्टर, अपेशी वकील बनतात. साऱ्या देशभर तरुणांची मुस्कटदाबी होत आहे. त्यांच्या मनःप्रवृत्ति दाबण्याचा, त्यांच्या आवडी-निवडी मारून टाकण्याचा प्रयत्न, पद्धतशीर प्रयत्न, होत आहे. आणि ते अयशस्वी झाले म्हणून त्यांना दोष देण्यांत येतो. तरुण व्याकूळ झाले आहेत, निराशेच्या घोर अंधकारानें त्यांच्या पुढचा मार्ग बिकट झाला आहे. त्यांचा प्रत्यहीं उत्साहभंग होत आहे.

आपल्या देशांत शिक्षण म्हणजे काय हें फार थोड्यांना समजलेलें आहे. शिक्षण म्हणजे नोकरीची पूर्व तयारी असेंच सारे मानतात. प्रतिकूल परिस्थिति निर्माण होण्याला शिक्षणाचा अर्थ न समजणें हेंच खरें कारण आहे. यामुळेंच जीवनभर असमाधानी असलेलीं माणसें येथें दिसतात. असमाधानी माणसें हीं देशाचें नांव उज्ज्वल करणारें कार्य तें काय करणार ?



अनुक्रम
विभाग
क्र.

देशाचा सर्वांगीण विकास करावयाचा आहे. ज्ञानविज्ञानाच्या सर्व शाखोपशाखांत आपल्या देशाचें नांव झालें पाहिजे. आपल्या देशाला जागतिक कीर्ति मिळवतील असे कवि, नाटककार, निबंधकार हवेत; कथाकार, कादंबरीकार हवेत. त्यांचीं पुस्तकें साऱ्या जगाच्या साहित्याचा एक अमोल ठेवा मानलीं जावींत. ज्याच्या अंगांत असा वक्तृत्व आहे, त्याला गणितशास्त्र शिकायला लावणें, रसायन घोकायला बसविणें हा देशद्रोहच गणला पाहिजे. ह्या देशाला रामन्‌सारखे शास्त्रज्ञ हवे आहेत, हॉकीपटु ध्यानचंदांच्या सारखे क्रीडापटु हवे आहेत. पालकांनीं यासाठीं शिक्षण म्हणजे काय तें समजून घेतलें पाहिजे. शिक्षणाच्या तीन व्याख्या आहेत. " शिक्षा है संस्कारसमुच्चय " म्हणजे शिक्षण म्हणजे संस्कारसमुच्चय. उत्कृष्ट संस्कार उमटविणारें शिक्षण असलें पाहिजे. आणि बालपणींचे संस्कार हे आजन्म टिकतात. म्हणून प्राथमिक शिक्षण आणि पूर्वप्राथमिक शिक्षण ह्यांना ही व्याख्या लागू झाली. पहिलीं ७।८ वर्षें हें संस्कारांचें शिक्षण द्यायचें. आज देश स्वतंत्र आहे. शिक्षणतज्ज्ञांची असें शिक्षण द्यावें अशी मनीषाही आहे. परंतु जे शिक्षण घेणार त्यांना ह्या गोष्टीची जाणीव पाहिजे आहे. संस्कृति संस्कृति म्हणजे तरी काय? संस्कृति म्हणजे संस्कारांचें जें गांठोडें राष्ट्रानें अनादिकालापासून जतन करून ठेविलें, वाढविलें तें. हें संस्कारांचें धन नव्या पिढीला द्यायचें असतें. ही जबाबदारी पालकांवर, शिक्षकांवर आहे. प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शिक्षण देणारांना ह्याची जाणीव पाहिजे. ह्या लोकांना ह्याही गोष्टीचें स्मरण हवें कीं मुलगा शिकतो त्याची शिक्षण ग्रहण करण्याची शक्ति ११॥ ला जागृत होते आणि ५॥ ला संपते; मग इतर वेळीं आपण वाटेल तसें वागलें तरी चालेल, असें नव्हे. विद्यार्थी संस्कार घेतो. त्याची ग्रहणशक्ति अखंड जागृत असते. तेव्हां ह्या लहानग्यांना शिक्षण देतांना—पण हें म्हणणें बरोबर नाहीं, हीं लहानगीं मुलें शिक्षण घेत असतांना, शिक्षकांनीं सतर्क

असलें पाहिजे. कारण राष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्याचें जतन करण्याचें थोर कार्य ते करीत असतात. ह्यानंतरचें तें माध्यमिक शिक्षण. ह्या शिक्षणाची व्याख्या, मानवाचा सर्वांगीण विकास करील तें शिक्षण. साधारणतः सर्व विषयांचें सामान्य ज्ञान प्रत्येकाला हवें. तें नसेल तर मनुष्य अगदींच कुचकामी ठरावयाचा. एक गोष्ट सांगतात. एकदा एका महाविद्यालयाचा गणिताचा प्राध्यापक रस्त्यानें चालला होता. एका नवख्या वाटसरूनें त्या प्राध्यापकमहाशयांना रस्त्यांत अडविलें. विचारलें, " महाराज, तकलीफ माफ करा. पण स्टेशनचा रस्ता कोणीकडे आहे?" ते गणिताचे प्राध्यापक म्हणाले, " मी गणिताचा प्राध्यापक आहें. तुमचा हा प्रश्न भूगोलाच्या अध्यापकांना विचारा. तो माझा विषय नाहीं." ही अशी स्थिति होऊं नये म्हणून जीवनाच्या सर्व अंगोपांगांचें सामान्य ज्ञान माणसाला हवें. माध्यमिक शिक्षणाची योजना ह्याचसाठीं आहे. आणि शिक्षणाची तिसरी व्याख्या आहे " सा विद्या या विमुक्तये " म्हणजे जी मुक्त करील ती विद्या. ही व्याख्या उच्च शिक्षणाची. मुक्त करील म्हणजे जीवनांतून सोडवील ती नव्हे. मुक्त म्हणजे भाररूप वाटत नाहीं ती. माणसाला भार कोणत्या गोष्टीचा वाटतो? मनुष्याच्या आवडीविरुद्ध एकादी गोष्ट त्याला करायची असली म्हणजे ती गोष्ट त्याला भाररूप वाटते, तिचा दचका मनांत असतो. परंतु आवडीची गोष्ट सहज होते. ती भाररूप नाहीं वाटत. तेव्हां उच्च शिक्षण हें मुक्त करणारें असलें पाहिजे. तें भाररूप वाटतां कामा नये. उच्च शिक्षण घेतांना विद्यार्थ्यानें आणि पालकानें हा विचार केला पाहिजे. माझी आवड काय? कोणती गोष्ट मी शिकलों तर मला भार वाटणार नाहीं, कोणत्या गोष्टीचें ज्ञान घेतांना मला आभार वाटेल? हा विचार त्यानें करावा. स्वतंत्र हिंदुस्थानांत सर्व प्रामाणिक परिश्रमांची समान प्रतिष्ठा होते असें नवें नीतिमूल्य रूढ करावयाचें आहे आणि हें रूढ करतांना आपल्याला आभाररूप वाटणारी विद्या आपण शिकली पाहिजे.

एक इंग्रजी सुभाषित आहे " There is always room at the top. " प्रत्येक क्षेत्रांत उत्कृष्ट व्यक्तींच्यासाठीं स्थान आहे. परंतु हें विसरलें जातें. हल्लीं एक नवा वाद रूढ झाला आहे. अर्थात हा वाद शिक्षणाच्या एका विशिष्ट अवस्थेंतच फोंफावतो. हा वाद म्हणजे 'स्कोपवाद.' हल्लीं सायन्सला म्हणे फार स्कोप आहे. " चला सायन्सकडे. " आपली आवडनिवड, आपल्या जवळची साधनसामग्री ह्या साऱ्या गोष्टी विसरून मग सर्वच विद्यार्थी सायन्सकडे लोटावयाचें पुण्यकर्म पालक करतात. वास्तविक सायन्सला स्कोप आहे तो कांहीं तृतीय दर्जाच्या लोकांना नव्हे. स्कोप जगांत जो आहे तो प्रथम श्रेणीच्या लोकांना. तेव्हां जीवनाच्या कोणत्या क्षेत्रांत आपण प्रथमश्रेणीचे होऊं शकतों तें प्रत्येकानें पाहावें. मग कष्ट आनंदरूप वाटतील. आई आजारी असली आणि रस्ता कांट्याकुट्यांचा असला तर आपली प्रेरणा आपल्याला तो रस्ता कष्टरूप भासूं देत नाहीं. तो रस्ता आहे म्हणून आपण जाऊं शकतों असें मग वाटतें. त्याप्रमाणें आपण जीवनाच्या कोणत्या क्षेत्रांत प्रथम श्रेणींत येऊं हें समजलें म्हणजे प्रतिकूल परिस्थिति आडवी येणार नाहीं, मार्गांत येणारे कष्ट आनंदरूप वाटतील. रामदासांनीं दासबोधांत म्हटलें आहे "उत्कट भव्य तें घ्यावें। मिळमिळीत अवघें सोडावें॥ " आणि ही उत्कटता जी निर्माण व्हावयाची ती आपल्या आवडीच्या क्षेत्रांतच होऊं शकते. तेव्हां 'स्कोपवादा'च्या आहारीं न जातां आणि आपल्याच हातानें प्रतिकूल परिस्थिति निर्माण न करतां आपलें जीवन यशस्वी होईल हें प्रत्येकानें पाहावें.

हरिभाऊ आपट्यांचें नांव आज साऱ्या महाराष्ट्रभर गाजत आहे. त्यांच्या स्फूर्तिदायक कादंबऱ्या वाचल्या नाहींत असा अभागी प्राणी या महाराष्ट्रांत कोणीतरी असेल का ? त्यांचें तें तेजस्वी वाङ्मय मराठी भाषेला ललामभूत आहे. परंतु त्याच हरिभाऊंच्या जीवनाची दिशा कोणाला कळली होती ? या कादंबरीकाराचा, महाराष्ट्रसाहित्याच्या ओजस्वी

ताऱ्याचा वेळ, थोडाथोडका नव्हे, वर्षानुवर्षे, गणिताचे नीरस सिद्धान्त पाठ करण्यांत गेला. त्यांना टक्केटोणपे खावे लागले. त्यांचा नि गणिताचा छत्तिसाचा आंकडा. छत्तिसाच्या आंकड्यापुरताच काय तो त्यांचा नि गणिताचा संबंध होता. गणिताच्या वैगुण्यामुळें त्यांना पदवीधर नाहीं होतां आलें. त्यांच्यावर सर्वांची सक्ति शिकण्याची. त्यांनीं वाङ्मय-क्षेत्रांत क्रांति केली. त्यांना सर्वोच्च पदवीपरीक्षेचे परीक्षकसुद्धां पुढें नेमलें. किती जीवन त्यांचें वायां गेलें ! अनेक हिंदी तरुण या परिस्थितीला बळी पडले असते, पण त्यांनीं प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढला. माझ्या तरुण मित्रांनो, आपण प्रतिकूल परिस्थितींतही न भितां काम केलें पाहिजे. आपल्या मातापित्यांच्या आज्ञा जर आपल्या स्वभावधर्माविरुद्ध असतील, तर त्यांचाही सविनय भंग करण्यास हरकत नाहीं. तसें शिक्षण पालकांनीं दिलें पाहिजे व विद्यार्थ्यांनीं घेतलें पाहिजे.

वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत फार थोड्यांना प्रतिभा असते. फार थोड्यांना एकाद्या विशेष कार्याची आवड असते. मुलांचें ज्ञान विस्तृत होतें तोंपर्यंत वयाचीं वीस वर्षें सहज होतात. ज्ञान विस्तृत झाल्यावर, थोडेंसें सुशिक्षण मिळाल्यावर, त्यांना कोठें आपल्या भाग्यलेखाचें वाचन करतां येतें. आपलें कामच, विधिनियत काम, जाणण्याची धडपड असते सारखी त्यांची. आपल्या मेंदूच्या दरवाजावर तो सारखे धक्के मारीत असतो. दार सारखें ठोठावतो. आपल्या नियतकामाचा दरवाजा कोणता हें जाणण्याचा प्रयत्न करतो. नाहीं ; एवढ्यानें काम भागत नाहीं. त्याला उत्तर मिळत नाहीं. उत्तर मिळालें नाहीं, आपल्यासाठीं रस्ता सांपडला नाहीं म्हणून सांपडेल त्या रस्त्यानें चालायला लागणें म्हणजे कांहीं बुद्धिमानूपणा नव्हे. हें कांहीं हुषारीचें, विद्वत्तेचें लक्षण नाहीं.

गारफील्ड अमेरिकन राष्ट्रपति झाला. तो उत्तम शिक्षक झाला. आपलें काम त्यानें व्यवस्थित केलें. राष्ट्राच्या तरुणांना त्यानें योग्य मार्गदर्शन

केलें. तो सैनिक झाला. ज़बाबदारी ओळखून काम केलें त्यानें. तो राजनीतिज्ञ झाला. जबाबदारी ओळखून त्यानें राष्ट्राला मार्ग दाखविला. तो उत्तम शिक्षक, सैनिक आणि राजकारणी न होता, तर राष्ट्रपतीहि झाला नसता. लिंकन ग्रॅन्ट आपल्या लहानपणापासूनच राजकारणी व्हायचा प्रयत्न करीत होता. मनुष्य कोणत्याही परिस्थितींत असो, वाटेल तें काम मिळो, त्याला मिळालेलें काम जर तो नीट मन लावून आणि पद्धतशीरपणें करील, आपलें शक्तिसर्वस्व कामांत खर्च करील, आपलेंच तें काम अशा भावनेनें करील आणि संधि सांपडतांच आपलें नियतकार्य हातीं घेईल तर यश ठेवलेलेंच. विजयलक्ष्मी त्याला खात्रीनें वरील.

> कर्तव्य अगदीं मनापासून, सर्वशक्ति एकवटून करीत राहणें हाच आपल्या जीवननौकेचा उत्तर ध्रुव, दिशा दाखविणारी वस्तु बनवा, योग्य मार्गानें आणि दृढपणें आपलें काम नेहमीं चालू ठेवा, यश तुमच्या प्रयत्नांच्या आणि त्यांच्या उत्कटतेच्या प्रमाणांत तुम्हांला खात्रीनें मिळेल.

गांधीजींची गोष्ट आहे. एकदां वर्किंग कमिटीची बैठक चालू होती आणि गांधीजी दुसरीकडे एका रोग्यासाठीं कापसाच्या ऐवजीं मध्यें कागद घालून रजई तयार करीत होते. एक पत्रकार तेथें गेला. गांधीजी इतक्या तन्मयतेनें साधी रजई तयार करण्याचें काम करतात हें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें गांधींना विचारलें तेव्हां गांधीजी म्हणाले, "I can not be insincere." म्हणजे मी तन्मय झाल्यावांचून कोणतीही गोष्ट करूं शकत नाहीं. प्रत्येक गोष्ट गांधीजी मनःपूर्वक करीत. गांधीजींची गति सर्व विषयांत अप्रतिहतपणें चाले. गांधीजींच्या यशाचें मर्म त्यांची ही वृत्ति हेंच आहे. आपल्या जीवनांत गांधीजींच्या इतकी प्रतिकूल परिस्थिति कोणाच्याच वाट्याला आली नसेल. परंतु इतक्या प्रतिकूल परिस्थितींत गांधीजींनीं जें यश मिळविलें त्याला कारण त्यांची तन्मयतेची

वृत्ति. हा तन्मयतेचा गुण आपण अंगीं बाणवला पाहिजे. त्याच्या साहाय्यानें प्रतिकूल परिस्थितींतून मार्ग काढतां येतो.

तुमच्या मनाचा कल सुतारी करण्याकडे आहे का ? असेल तर सुतार बना. जनमताची पर्वा करूं नका. अयशस्वी झालां तर लोकच तुमचा उपहास करतील. यशस्वी झालांत तर गुण गातील.

हृदयांतल्या परमेश्वराच्या संदेशाप्रमाणें वागा. मग इतरांची पर्वा करूं नका. तुमच्या हृदयांतल्या उत्कटतेचे पडसाद जनतेच्या, इतरांच्या हृदयांत आपोआपच उठतील.

ज्यांना आरंभीं लोक गाढव, आळशी आणि मूर्ख म्हणत तेच पुढें यशस्वी झाले, जगद्विख्यात झाले, अमर कीर्तीचे धनी झाले. त्यांना सर्वांनीं मान दिला. जग त्यांच्याशीं मागून सौजन्यानें वागलें. जगानें प्रथम त्यांची छीः थू केली. त्यांच्या मार्गांत कांटे पसरले. त्यांच्या डोक्यावर शिव्या-शापांचा वर्षाव केला. त्यांना मार्गच्युत करायचा प्रयत्न केला. त्यांना विकास होण्यापूर्वींच गळा दाबून मारण्याचा जगानें प्रयत्न केला. विषारी वल्ली म्हणून त्यांचा निःपात करायचा जगानें प्रयत्न केला.

प्रत्येक तरूणाला संधि द्या, योग्य आणि पुरेसा उत्साह द्या, पाठिंबा द्या. त्याच्या चुकांमुळें एकदम त्याच्यावर रागावूं नका. त्याचा तिरस्कार करून त्याच्या मनांतल्या आशा आकांक्षा मारूं नका. फुटूं द्या त्याला पालवी. त्याचा वृक्ष होऊं द्या. त्याच्या आश्रयानें अनेक पांथस्थांना आश्रय मिळूं द्या. रस्त्यांत मित्र मिळूं द्या. तुम्हांला तो मूर्ख वाटतो ? ठीक आहे. परंतु पुष्कळसे मूर्ख आणि बेवकूफ समजले जाणारेच जगाला हालवून सोडणारे क्रांतिकारी ठरले, वीर ठरले, यशस्वी झाले. नालायक आणि मूर्ख मुलगा म्हणजे अनुकूल परिस्थिति नसलेला मुलगा समजा !

तुम्हांला ठोंब्या समजला जाणारा डार्विन ठाऊक नाहीं वाटतें? साऱ्या जगानें आणि पालकांनींही वायां गेलेला मुलगा असें समजून त्याचा नाद सोडला होता. शाळेंत तो ठोंब्या ठरला. बापानें त्याला वैद्य करायचें ठरविलें. परंतु तेथेंही त्याची गति नव्हती. शेवटीं कंटाळून त्याला धर्मोपदेशक करावें म्हणून ठरविलें. पण हा ठोंब्या वनस्पति आणि प्राणिशास्त्र वाचीत बसे. शेवटीं साऱ्यांनीं हात टेकले त्याच्यापुढें. परंतु त्याला संधि चालून आली. तो जगप्रवासाला निघाला. आणि साऱ्या जगाला हालवून सोडणारा 'मानवाच्या उत्क्रान्तीचा' नवा सिद्धान्त त्यानें शोधून काढला.

गोल्डस्मिथ लहानपणीं आपल्या शिक्षकांच्या चेष्टेचा विषय होता त्याला लोक 'लाकडी चमचा' म्हणत, चिडवीत, अगदीं रंजीस आणीत. त्याला साहित्याची आवड होती. त्याला डॉक्टरीचें काम आवडत नसे. भावनांची डॉक्टरी आवडे त्याला. तो जर वैद्यकशास्त्रांतच रमून जाता तर 'व्हिकार ऑफ वेकफिल्ड' ( मराठींत "वांईकर भटजी" ह्या नांवानें ह्याचा सुरस अनुवाद झाला आहे ) आणि 'डेझर्टेड व्हिलेज' ह्यांची अमर रचना कोणीं केली असती? डॉक्टर जॉन्सनला कळलें, कीं गोल्डस्मिथ मोठ्या आर्थिक संकटांत आहे. कर्ज फार वाढल्यानें जेलमध्यें जाण्याचा प्रसंग त्याच्यावर बेतला आहे. त्यानें 'व्हिकार ऑफ वेकफील्ड' ची हस्तलिखित प्रत एका प्रकाशकाला विकली. त्याचें कर्ज चुकविलें. ह्याच पुस्तकामुळें गोल्डस्मिथ जगद्विख्यात झाला. साऱ्या जगभर त्याचें नांव झालें, सर्वतोमुखीं झालें.

सर वाल्टर स्कॉट शाळेंत जाई. शिक्षक त्याला 'मूढ' म्हणत. पण त्याच सर वाल्टर स्कॉटनें कादंबऱ्या लिहिल्या. तो जगत्प्रसिद्ध लेखक झाला. हजारों शिक्षकांचा शिक्षक बनला.

पेशवाईच्या काळांतले निःस्पृह न्यायाधीश रामशास्त्री होते. सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितींत ते होते. श्रीमंतांच्या पायांवर पाणी घालतांना त्यांच्या कानांतल्या भिकबाळीकडे नजर गेली रामशास्त्र्यांची. श्रीमंतांनीं त्यांची ह्याबद्दल कानउघाडणी केली. त्यांचा स्वाभिमान दुखावला. त्यांना प्रतिभेची जाणीव झाली. काशीला जाऊन ते विद्वान झाले. पेशव्यांकडे तेच न्यायाधीश झाले ना पुढें ?

घाबरण्याचें कारण नाहीं. थोडीशी विवेकबुद्धि ठेवा. जगांत जीवित-यात्रा यशस्वी करणें म्हणजे कांहीं कठीण काम नाहीं. प्रयत्न मनापासून करणाराला सर्व साध्य आहे.

मुलाला दगड आहेस, धोंडा आहेस, असें म्हणतात सारखें. हें वाईट आहे. नसेल येत गणित, नसेल येत इतिहास, पण हे विषय म्हणजेच कांहीं सर्वस्व नव्हे. इतर बाबतींत त्याचें डोकें असेल चालत. तिकडे लक्ष द्या. जपान, इंग्लंडमध्यें मुलाची प्रवृत्ति पाहून शिक्षण देतात. आपल्याकडे तसें हवें. साऱ्यांनाच सारखें शिक्षण. तुम्ही तरी नका त्यांची स्फूर्ति मारूं, उत्साह डावलूं. कधीं कधीं फार भयंकर परिणाम होतो याचा. थॉमस हार्डी इंग्रजी साहित्याचा सम्राट होता. अत्यंत भावनाप्रधान होता तो. एका अशाच नासमज माणसानें त्याच्यावर टीका केली आणि त्यानें लिहिणेंच बंद केलें. चेस्टरटन असाच एक इंग्रजी भाषेचा सुप्रसिद्ध कवि. त्याचेंही असेंच झालें. टीकेमुळें बिचाऱ्यानें आत्महत्या केली. आपण ह्यांच्यासारखे नका कोणाच्या मार्गांत आड येऊं. परिस्थिति सुसह्य करतां येत नसेल तर निदान ती असह्य तरी नका करूं. परमेश्वरानें प्रत्येकाला कांहीं ना कांहीं कार्य नियुक्त करून दिलें आहे. त्यांत साह्यभूत व्हा. प्रतिकूल परिस्थिति कायमची कोणाच्याच आड येऊं शकणार नाहीं.

★

# ५.: जीवनाचा उद्देश

* जगाचें काम, सर्व काम करायला मी बांधला गेलों नाहीं. ईश्वरानें माझ्यासाठीं काम नेमून दिलें आहे. ईश्वरानेंच नेमलेलें काम तें. तें करायला, सर्व शक्ति एकवटून, करायला, मन लावून करायला मात्र मी बांधला गेलों आहें. तेंच माझें कर्तव्य, तोच माझा मार्ग. मी तो यशस्वी करणारच.

*—जीन एंजेलो*

* ज्या विषयाची तुम्हांला आवड असेल तो सोडूं नका. आपल्या ठरविलेल्या कामापासून एक तसूभरही ढळूं नका. आपल्या बुद्धीला पटलेला मार्ग सोडून बुद्धीचा, परमेश्वरानें दिलेल्या या दिव्य शक्तीचा, अपमान नका करूं. निसर्ग तुम्हांला जे बनवूं इच्छितो तेच बना. तेंच तुमचें काम. तेंच तुमच्या जीवनाचें ध्येय. तोच तुमचा राम. तुम्हांला सफलता मिळेल, विजय मिळेल, सर्व कांहीं मिळेल. मात्र जर तुम्ही ह्याच्या विरुद्ध वागायचा प्रयत्न कराल तर तें अशक्य आहे.

*—सिडने स्मिथ*

प्रत्येक मनुष्य जन्मतःच आपल्यासाठीं कांहीं ना कांहीं काम घेऊन येतो. परमेश्वरानें तें काम त्याच्यासाठीं नेमलेलें असतें. जें काम तुम्हांला आवडतें, जें करतांना तुम्हांला हुरूप वाटतो, उत्साह वाटतो, तेंच तुमचें नियत काम. तुमचें भाग्य, तुमचें भविष्य तुमच्या आचरणावर, तुमच्या प्रयत्न करण्याच्या तळमळीवर, कळकळीवर अवलंबून असतें. कर्तव्याचरणाच्या मार्गावरून उज्ज्वल भविष्याचें सहज दर्शन होतें. तुम्हांला

प्रयत्नानें योग्य मार्ग सांपडेल. एकदां तुमचा निश्चित मार्ग सांपडला, कीं सारी मानसिक आणि शारीरिक शक्ति तो यशस्वी करण्यांत खर्च करा. यश ठेवलेलेंच. दोन माणसें दुकानें उघडतात. एक यशाचा धनी होतो, दुसरा अपयशाचा. कां बरें असें होतें ? जो यशस्वी झाला त्याच्या मनाचा कल दुकानदारीकडेच होता. त्याची योग्यता दुकानदार बनायचीच होती. दुसऱ्यानें दुकानदारींत होणारा फायदा पाहिला. एकाचे दोन रुपये करणें हाच होता उद्देश.

तुमचा अनुभव, तुमच्या चित्तवृत्ति केंद्रीभूत करतां येतील असा मार्ग निवडा. असेंच काम अंगावर घ्या. तुम्हांला ह्यानें आनंदच मिळेल असें नव्हे, तर त्यांत तुम्ही आपले जास्तींत जास्त श्रम, जास्तींत जास्त योग्यता खर्च कराल. थोड्या श्रमानें ह्यांत तुम्हांला जास्त यश मिळत जाईल. तुमचा अनुभव तुम्हांला हातभार लावील. मन सारे श्रम उत्साहानें करील. हेंच कोणत्याही धंद्याला लागणारें महत्त्वाचें भांडवल आहे.

तुम्हांला जी गोष्ट आवडते तीच करा. आड येणाऱ्या संकटांशीं तुम्ही खूप यशस्वीपणें लढाल. परंतु महत्त्वाकांक्षेशीं लढणें अशक्य. तुम्ही का आपल्या आत्म्याशीं लढणार ? आपल्याशींच आपण लढतों का कधीं ? आपल्यांतच लढण्यांत शक्ति खर्च कराल तर येणाऱ्या संकटांशीं तोंड देण्याला शक्ति राहाणार नाहीं. त्यांच्यापुढें तुम्हांला लोटांगण घालावें लागेल. संकटांनाच यश मिळायचा संभव आहे. तींच एकाद्या वेळीं तुम्हांला नामोहरम करायचीं. तुमचे आईबाप तुम्हांला लालूच दाखवितील, मित्र आशा दाखवितील, पत्नी गोड गोड स्वप्नें रंगवील, दुर्भाग्य तुम्हांला आवडीच्या विरुद्ध काम करायची बुद्धि देईल. तुमच्या आशा आकांक्षा दाबण्याचा अनेक लोक प्रयत्न करतील. कोणी रागावून करतील, तर कोणी लोभावून करतील. तुमच्या मनाविरुद्ध बंड करावयाला प्रोत्साहन देतील. जिवन्त ज्वालामुखी कितीही आवरणें घातलीं, तरी का दडपला

जाईल ? तो भडकल्याशिवाय का राहाणार आहे ? तो भडकणारच नि जगाला आपलें स्वरूप दाखविणारच. तुमच्या हृदयांत आशाआकांक्षांचा ज्वालामुखी धगधगतो आहे. बाह्य उपकरणांनीं तो शांत होणार नाहीं. तो एक दिवस उसळी मारणारच. त्याचा स्फोट हा नक्की होणारच. आपल्या आवडी-निवडीच्या कामांतच तुम्ही चमकाल. तुमची चमक लोकांवर आनंदाचा आणि चैतन्याचा वर्षाव करील. जें काम तुम्हांला आवडत नाहीं तें काम तुम्ही मनापासून करणार नाहीं. अंतर्द्वंद्वांत तुमची शक्ति खर्च होईल. पुऱ्या शक्तीशिवाय प्रयत्नांत पूर्ण यश कोठचें ? निसर्ग अर्धवट काम करणाऱ्याला शाप देतो. त्याला अपेशाच्या, दुष्कीर्तीच्या गर्तेत सडत पडावें लागतें. मनाविरुद्ध गोष्ट म्हणजे हृदयस्थ परमेश्वराविरुद्ध गोष्ट. त्याचा अपमान तो. ती त्याची अवज्ञा. ह्या गैर वर्तनाचें प्रायश्चित्त त्याला अपयशाच्या स्वरूपांत मिळतें.

फ्रँकलिन म्हणतो, " ज्याला करायला व्यवसाय आहे, काम आहे, त्याला एक मोठें राज्य आहे, कार्यक्षेत्र आहे मोठें थोरलें. ज्याला करायला धंदा आहे, त्याच्याजवळ सन्मान आहे, मान्यता आहे. रांगणारा-पेक्षां, स्वतःच्या पायांवर पांगुळगाड्याच्या साहाय्यानें चालणारापेक्षां बाहेरच्या साहाय्यावांचून चालणारा केव्हांही श्रेष्ठच." ह्यांत सत्य ओत-प्रोत भरलें आहे. आपल्याला हीन-दीन अवस्था आली असें समजून नोकरीसाठीं तडफडण्यापेक्षां धंदा करणें, मग तो हलका कां असेना, प्रतिष्ठेचें आहे. धंदा करणाराला कार्यक्षेत्र मोकळें आहे. सेवाभावनेनें केलेल्या कामाला कोण आडवें येईल ? पण नोकरी मर्यादित आहे. आवडणारा, ज्याच्याबद्दल हृदयांतून प्रेमप्रवाह वाहात आहे असा धंदा, असा सेवामार्ग पत्करा. जीवन सुखी, यशस्वी आणि इतरांना मार्गदर्शक झाल्यावांचून राहाणार नाहीं.

कोणाही व्यक्तींत मनुष्यपण आणायला दुसऱ्या कोणत्याही गोष्टींपेक्षां त्याचा व्यवसायच जास्त उपयोगी पडतो. ह्यामुळें त्याच्या पाठीचे मणके मजबूत होतात, शरीर सशक्त बनतें, त्याच्या अंगांत रक्ताबरोबरच उत्साहाचा आणि स्फूर्तीचा अखंड झरा वाहात असतो. मनाला समाधान मिळतें. मेंदूला चालना मिळते. त्याला विवेक येतो, त्याची न्यायबुद्धि जागृत होते. शोधकबुद्धीला चालना मिळते, ती तीव्र होते, त्याला आपल्या पुढचा मार्ग दिसूं लागतो. आपल्या कर्तव्याची त्याला जाणीव होते. आपल्यांतलें मनुष्यपण त्याला दिसतें. त्याला जाणीव होते, कीं आपण मनुष्य आहोंत, माणुसकीच्या मार्गानें जायचें आहे. मनुष्योचित कार्य करणाराला आपल्या मनुष्यत्वाची जाणीव असते. त्याला मग इतरांनीं केलेला अपमान नाहीं सहन होत. गुलामीचा कलंक नाहीं त्याला मग आवडत. तो उठतो, पेटतो. पण नोकरी हा ज्याच्या जीवनाचा उद्देश, तो काय उठणार, काय उठवणार ? कार्य न करणारा मनुष्य मनुष्य नव्हे. १५० पौंड हाडें आणि मांस म्हणजे कांहीं मनुष्य नव्हे. हाडें, मांस, मेंदू, मन ह्यांचा सुंदर मिलाफ म्हणजे मनुष्य. माणुसकी कशाला म्हणतात तें तो ओळखतो. कार्य करणें, उद्योगशक्ति असणें हा मनुष्यजीवनाचा हेतु. आत्म्याची व्याख्या आपल्या संस्कृत आचार्यांनीं अशी केली आहे—

'अत् सातत्यागमने' सतत परिश्रम करणें हा आत्म्याचा धर्म आहे. सारखें उद्योग करीत असलें पाहिजे आपण. सतत उद्योग केला तर आपण आत्मवान्, नाहींतर शव.

कांहीं लोकांना वाटतें, मनुष्याला जर उद्देश नसता, करायला काम नसतें, तर जीवन आनंदांत, सुखांत गेलें असतें. बेकार, कामाशिवाय बसणें कांहीं दिवस कदाचित् गोड वाटेल. परंतु कायम आनंद देणारी ती वस्तु नव्हे. तुम्ही चूप बसलांत म्हणून परमेश्वरानें दिलेला मेंदू का

चूप बसेल ? विचार करीत राहणें हें ईश्वरीय काम तो करीत राहील. चांगल्यावाईटाचा धिंगाणा त्यांत चालू होईल. रिकामा मेंदू म्हणजे सैतानाचें घर. मेंदू म्हणजे सदैव चालू राहाणारी एक चक्की. सूर्य जसा सदैव प्रकाशत राहातो, तसा मेंदू सारखा विचार करीत असतो. चक्कींत, पिठाच्या गिरणींत जें कांहीं टाकलें जाईल त्याचें ती पीठ करील, पण कांहींच न टाकलें तर ती स्वतःचेंच पीठ करून घेईल. मेंदू म्हणजे अशीच सदैव चालणारी चक्की. अमीर–फकीर, गरीब–श्रीमंत, लहान–मोठे, सर्वांच्या जीवनाला एक निश्चित मार्ग आहे, निसर्गानें नियमघालून दिला आहे आणि तो म्हणजे सतत काम करीत राहाणें.

जीवनसंग्रामांत विजय मिळविण्यासाठीं कार्याचा कारखाना अखंड चालू असला पाहिजे. कामाशीं लढायची वृत्ति तर आपल्यांत हवीच, पण ती वाढली पाहिजे. तुम्हीं आकाशाकडे डोळे लावलेत आणि निष्क्रियपणें परमेश्वराची करुणा भाकलीत तर आकाशांतून कांहीं मिळायचें नाहीं. तुम्ही तुमच्या कष्टाचें थोडेंसें मिळवा. परमेश्वर तें हजारों पट करील. भारतीयांत म्हणतात, कीं रिक्त हस्तानें देवळांत जाऊं नये. आपल्या कमाईचें फूल ना फुलाची पाकळी आपण घेऊन जावें. परमेश्वर आपल्यावर कृपा करील. मदत करील आपल्याला. रिक्त हस्त म्हणजे निष्क्रिय हात, आळशी हात. तो का परमेश्वराला आवडेल ? उद्योगी हात म्हणजे परमेश्वर. अशाच हाताचें वर्णन "कराग्रे वसते लक्ष्मीः" असें केलें आहे. उद्योगी हात म्हणजे लक्ष्मी-सरस्वतीचें स्थान. उद्योगी शरीर म्हणजे परमेश्वराचें निवासस्थान. एकच काम आपण एकाग्रतेनें करीत राहायला हवें. फुलपांखरासारखें जीवन नसावें. आज इकडे ह्या फुलावर, उद्यां तिकडे त्या फुलावर. सुतार पक्ष्यासारखें असावें तें. एकदां एका झाडाला तो भोंक पाडायला लागला म्हणजे सबंध काम संपेपर्यंत थांबत नाहीं.

आज एक काम, उद्यां दुसरें; अशानें जीवनाची हानि होते. मनुष्य-जीवन म्हणजे स्थिर जीवन. मार्गदर्शक आणि क्रियात्मक बुद्धि असेल तर यश खात्रीनें मिळतें. यशाची इमारत ह्याच पायावर उभी राहाते.

कांहीं लोक मोठी नोकरी मिळायच्या आशेवर लहान कामें लाथाडतात. लहान सहान कामें करीत मोठें होणें त्यांना आवडत नाहीं. ज्या जागेवर असाल तेथून वाढायला सुरुवात करा. पहिल्या मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर एकदम कसे जाणार? मधल्या पायऱ्या सोडून एकदम वर चढणारा पडायचाच. कोणतेंही काम हातीं घ्या पण तें नवीन तऱ्हेनें करा. तें करतांना, आपली प्रतिभा, आपली कल्पनाशक्ति दाखवा. स्फूर्ति दाखवा. कधीं कोणीं दाखविली नसेल अशी निपुणता दाखवा. आपल्या बरोबरच्या कार्यकर्त्यांपेक्षां अधिक उत्साही, अधिक दृढ, अधिक धैर्यवान बना; साहसी बना, नम्र बना.

तुम्हांला कोणतेंही काम करायचें असो, त्याचा बारकाईनें अभ्यास करा. काम करायचे नवे मार्ग, नव्या पद्धति शोधा. आपलें काम आपण कल्पनेबाहेर यशस्वी केलें पाहिजे.

आपल्या पुढाऱ्यांचीं जीवनचरित्रें डोळ्यांपुढें ठेवा. महात्माजींनीं आपल्या आयुष्याची सुरुवात कशी केली? आपलीं गाऱ्हाणीं कशीं दूर करावीं ह्याचा त्यांनीं अभ्यास केला. आफ्रिकेंत अनेक ठिकाणीं अपमान सहन करून निरीक्षण केलें. मार खाल्ला. त्यांनीं अहिंसक प्रतिकाराचा मार्ग काढला. त्यांनीं आपल्या हक्कांचें रक्षण केलें एवढेंच नव्हे तर जगांत आपल्याविषयीं सहानुभूति, प्रेम निर्माण केलें. त्यांनीं आपल्या जीवनाचा उद्देश ओळखला. त्याप्रमाणें ते वागले व साऱ्या जगाला एक आदर्श उदाहरण घालून दिलें.

जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद, सुभाषचंद्र बोस, कॉंग्रेसमध्यें प्रथम स्वयंसेवक, नंतर सेनापति, नंतर चिटणीस आणि शेवटीं अध्यक्ष झाले. ते कांहीं एकदम राष्ट्रपति नाहीं झाले. जिन्याच्या प्रत्येक पायरीवरून ते चढले. त्यांना मधल्या पायऱ्या ह्या अडचणीच्या वाटल्या नाहींत. महादेवभाई देसाई प्रथम आश्रमांत साधे आश्रमवासी म्हणूनच आले. आपल्या गुणांनीं ते गांधीजींशीं अभेद भाव प्रस्थापित करूं शकले. विनोबा भाव्यांनीं इंटरमध्यें कॉलेजला रामराम ठोकला. ते आश्रमांत आले. ते एक वर्ष संस्कृत शिकले. अरबी, फारशी शिकले. कुराण शिकले. आज ते जीवन-धर्माचे आचार्य बनले आहेत. हे सारे पायरी पायरीनें गेले. पायऱ्या गाळण्याच्या नादांत त्यांनीं आपले गुडघे फोडून घेतले नाहींत. ते वरच्या टोंकापर्यंत जाऊन पोहोंचले. एकदम वर जायचा हट्ट घेतला, अट्टाहास केला, ते पडले. अपयशाच्या गर्तेत लुप्त होऊन गेले.

कांहीं तरुण म्हणतात, अमुकच काम मिळालें तर तें मी करीन, नाहीं तर करणारच नाहीं. घरीं बसेन. तूप मिळत नाहीं म्हणून मिळणारी भाकरी आणि चटणी लाथाडण्यासारखें आहे हें. घरबसल्या व्यर्थ वेळ दवडण्यापासून काय फायदा ? वेळ म्हणजे पैसाच नाहीं तर तो जीवन आहे. लवकर जें काम मिळेल, जें काम सहजप्राप्त असेल तें हातीं घ्यायला हवें. पाण्यांत दगड टाकला म्हणजे एका वलयांतून दुसरें मोठें वलय निघतें. यशाचें तसेंच आहे. एका कामांत तुम्हांला यश मिळालें, कीं तुम्ही त्याहून मोठें काम हातीं घ्याल ; तें तडीसही न्याल. कामाची वाट पाहात राहाणें हें पतनाचें लक्षण आहे. आम्ही सारे श्रम जर त्या कामांत लावूं, तर त्या कामालाही महत्त्व चढेल. सूत काढायला काय महत्त्व होतें पूर्वीं? हातचें कापड कितीजण वापरीत होते. परंतु महात्माजींनीं तें काम हातीं

घेतलें. तुच्छ म्हणून तें सोडून दिलें नाहीं. आज त्या कामाला किती महत्त्व आलें आहे !

ग्लॅडस्टन म्हणे, " मनुष्याच्या शारीरिक आणि मानसिक शक्तीला सीमा आहे. आपल्या जीवनकार्यांत जो आपली सारी शक्ति एकवटून खर्च करतो तोच यशस्वी होतो." नदीचें पाणी असतें. तें जितकें एकाग्र होईल, त्याची रुंदी जितकी कमी असेल तितकी त्यांत शक्ति जास्त ; पण जागा वाढली, कीं शक्ति विभागली जाते. माणसाचेंही तसेंच आहे.

कार्लाईल म्हणतो, " ज्याला काम मिळतें तो भाग्यवान्. कर्तव्यसुखापुढें सारीं सुखें तुच्छ. जें काम आपल्याला मिळेल तें ईश्वराची आज्ञा समजून करावें."

कामाची निवड करतांना, कोणता धंदा केला असतां मला कमी श्रमांत धन, कीर्ति, प्रसिद्धि मिळेल ह्याचा नका विचार करूं. तुमच्या आवडीचेंच काम करा. सारी शक्ति एकवटून करा तें काम. कामाला महत्त्व प्राप्त करून द्या. धन, कीर्ति, प्रसिद्धि ह्यांचा विचार आरंभीं करूं नका. विचार करण्यांत आपला अमोल समय नका घालवूं. विचार करा आपल्या शक्तीचा—सामर्थ्याचा. आपली सगळी शक्ति, बौद्धिक आणि शारीरिक, कशी कामांत लावतां येईल ह्याचाच विचार करा. मनुष्यत्व कार्य करण्यांत आहे. प्रत्येक इंद्रियाला तयार करा. कानांनीं त्याच उद्योगाचें ऐकावें. डोळ्यांनीं तेंच वाचावें, पाहावें. जिभेनें त्याचबद्दल बोलावें. मेंदूनें तोच विचार करावा. हें नच झालें तर तुमचें काम अपुरें राहील. हातांना सुंदर, मेहनती, मजबूत, कार्यक्षम करा. डोळ्यांना सूक्ष्म निरीक्षणाचा अभ्यास घडवा. स्मरणशक्तीला प्रत्येक गोष्ट वेळेवर स्मरण्याचें शिक्षण देऊं या. हृदयाला सत्यनिष्ठ, कोमल, सहानुभूतिपूर्ण बनवूं या. आपण कोणीही बनलों तरी हरकत नाहीं. आपण काय बनावें ह्याबद्दल जगाचा

आग्रह नाहीं. जग म्हणतें, तुम्ही कांहींही काम करा, पण जें हातीं घ्याल तें तडीस न्या. यशस्वी झालांत तर जग तुमची प्रशंसा करील. तुमचे उपकार मानील. मनांत आदर ठेवील. परंतु काम करतांना आपण हेंही लक्षांत ठेवूं या, कीं असफल माणसाचा जग धिःकार करतें, त्याला जगणेंही मुष्कील करतें.

रूसो, फ्रान्सचा महान् क्रान्तिकारी लेखक. त्यानें पुस्तकें लिहिलीं. त्यानें वाङ्मयांतच नव्हे, तर देशांतही क्रांति करून सोडली. फ्रान्समधील राजेशाही नष्ट झाली. लोकांचें, शेतकरी-कामकऱ्यांचें राज्य आलें. तो म्हणतो, " प्रत्येकानें आपलें कर्तव्यकर्म योग्य मार्गानें करावयाला हवें. ज्याला एक काम व्यवस्थित करायचें शिक्षण मिळालें, तो जीवनाचीं सारींच कामें व्यवस्थितपणें करील. मला माझे शिष्य सैन्य, न्याय, धर्म ह्यांपैकीं कशासाठीं तयार झालेत ह्याची किंचितही काळजी नाहीं. मानवजीवनाचीं कार्यें करण्याची निसर्गानें पहिली आज्ञा केली आहे. माझे शिष्यांना हेंच सांगणें, कीं कोणतेंही काम करा, पण तें पूर्ण सेवाभावानें स्वतःला विसरून करा. स्वतःला विसरण्यांतच श्रेष्ठत्व आहे."

कामाला आपण आपल्यापेक्षां मोठें केलें, कीं कामही आपल्याला मोठेपणा दिल्याशिवाय राहाणार नाहीं. स्वतःला विसरून, अहंकार सोडून आपण सारीं कामें करूं या.

"आपण वकील, डॉक्टर, धर्मोपदेशक होण्याआधीं प्रथम मनुष्य होऊं या. आपल्या कामांतच रामाचें दर्शन करूं या. अगोदर मनुष्यता यायला हवी; मग सारें कांहीं येईल."

ज्या उद्देशाबद्दल आम्हांला यत्किंचितही शंका आहे, संशय आहे तें त्याज्य समजलें पाहिजे. तें सोडून द्यायला हवें. हल्लीं चुका होऊं

नयेत असा प्रयत्न नाहीं करीत आपण. उलट त्यांना सजवून गुणांचें गोंडस नांव द्यायचा आपण प्रयत्न करतों. खुशामतीला आपण श्रद्धेचें, भक्तीचें गोंडस नांव दिलें आहे. आपला स्वभाव असा कांहीं तर्कट बनतो, कीं आपण चुका सुधारण्याऐवजीं त्यांना पाठिंबाच देतों. [ We justify our mistakes, our errors. ] ज्या उद्देशांत दुराचाराचा किंचितही संबंध आहे तो असफल होणारच. दुराचार आणि विजय एके ठिकाणीं कधींच नांदत नाहींत.

प्रत्येकाची प्रतिभा आपल्या आवडीच्या कामांत दिसून येते. ही बालवयांतही दिसून येते. प्रतिभेची चमक म्हणजे विजची चमक. ती का लोकांचें मन आकर्षिल्याशिवाय राहील ? पण डोळेच ज्यानें झाकून घेतले, त्याला आपण काय करणार ? डोळे उघडून कोणत्या विषयांत आपली प्रतिभा चमकते तें पाहा व आपल्या जीवनाचा उद्देश निश्चित करा.

" ज्या गोष्टींचें स्मरण करतांच तुम्ही सजग होतां, तुमचीं सारीं इंद्रियें पुलकित होतात, उत्साहानें—आनंदानें नाचूं लागतात, निसर्गतः जी प्रवृत्ति तुम्हांला आवडते, जिच्या स्मरणानें उत्साह ओसंडूं लागतो तेंच आपलें काम, तोच जीवनाचा उद्देश आहे हें ओळखा. जर दुर्दैवानें तुम्हीं दुसऱ्या कामांत गुरफटलां असाल तर त्यांतून तत्काल सुटका करून घ्या आपली. मुक्ति मिळवा. "

तुमच्या आवडीचें काम जर हलक्या दर्जाचें असेल तर तुमचें मनुष्यत्व जरा जास्त खर्च करून वरचा दर्जा मिळवून द्या त्याला. तुमच्या कामाचा नवीन प्रकारांनीं विस्तार करा. आपल्या प्रयत्नानें त्याला मोठेपणा प्राप्त करून द्या. कामाचें नीट अध्ययन करा. कोणत्याही गोष्टीकडे दुर्लक्ष नका करूं. जे एकाच उद्देशाला,

ध्येयाला कवटाळून बसतात, तेच महान यशाचे धनी होतात. साने गुरुजी म्हणतात —

" ध्येयाला जो कवटाळील
निर्मळ प्रेमा मिठी मारील
दुःखी भारत जो हसवील
निज बलिदानें, त्या अनंत माझीं नमनें "

ध्येयाला कवटाळणाऱ्याला साने गुरुजींसारखे अनंत प्रणाम करतात. मग जग करील तर नवल काय ?

दुसऱ्याला खालीं ओढून त्याची जागा आपण घेऊं नये. त्यापेक्षां आपण आपलें अढळपद निर्माण करूं. त्यांतच आपल्या मनुष्यत्वाचा खरा विकास आहे.

आपल्या कामाचें जर शिखर आपल्याला गांठायचें असेल व त्यावर कायम टिकायचें असेल तर पायरी पायरीनें आपण जाऊं या. आपल्या कामाशीं संबंध असलेली कोणतीही गोष्ट निरुपयोगी म्हणून टाकूं नये. प्रत्येक गोष्टीचें पुरें ज्ञान मिळवून आपण कामाला आरंभ करूं या.

आपल्या भावना संक्रामक असतात. आपल्या उज्ज्वलतेनें अनेक उज्ज्वल होतात. आपल्या यशानें अनेक यशस्वी होतात. सडा रांगोळी केलेल्या जागेवर आपण थुंकत नाहीं, घाण करीत नाहीं. पवित्र सारें पवित्रच करतें. आपण जीवनोद्देश ठरवून यशस्वी झालों तर इतरही यशस्वी होतील. आपण अयशस्वी होणें हा समाजाच्या दृष्टीनें गुन्हा आहे. आपल्याला त्यापासून तोटा नाहीं तर साऱ्या समाजाला त्यामुळें आघात बसेल.

जीवन सुखी होण्यासाठीं, जीवनांतल्या कठोरतेचा आघात सहन करण्यासाठीं निर्मळ, अलोट प्रेमाची आवश्यकता असते. कोणत्याही

व्यवसायांत यशस्वी होण्यासाठीं उत्कट कार्यप्रेम हवें; त्याशिवाय मार्गांत येणारीं संकटें, अडचणी यांच्याशीं आपण टक्कर देऊं शकत नाहीं. त्यांच्यावर विजय मिळवूं शकत नाहीं. ज्या वस्तूबद्दल आम्हांला प्रेम वाटतें, आदर वाटतो तिच्यासाठीं बलिदानाला आम्ही सहजच तयार होतों. आईला मुलाबद्दल प्रेम वाटतें म्हणून ती त्याच्यासाठीं प्राण द्यायला तयार होते. जेव्हां आपण कार्याला प्राणांपेक्षां जास्त किंमत देऊं, तेव्हां संकटांच्या कांट्यांचीं फुलें होतील. मार्ग सुकर होईल आणि कार्यांत खात्रीनें यश मिळेल. प्रयत्नांच्या यज्ञांत प्राणआहुति देतांच चिलया बाळाप्रमाणें प्राण तर परत मिळतातच, पण यशही सहजच पदरांत पडतें.

ज्यांना मित्रांची मदत नाहीं, कोणाकडून शिफारस-पत्र नाहीं, अशांनाही रसेल जीवन यशस्वी करण्याचा मार्ग दाखवितात. ते म्हणतात —

"प्रथम काम करा. आपल्या तोंडून स्वतःबद्दल किंवा कामाबद्दल अवाक्षरही काढूं नका. होणाऱ्या साऱ्या गोष्टींचें बारकाईनें निरीक्षण करा. सर्वांना विश्वासपात्र बना. जगाला दाखवून द्या, कीं तुमच्याशिवाय तें काम होणें अशक्य आहे. नेहमीं नम्रपणें वागा. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रांत तुम्ही असा; त्या मार्गानें वागल्यास यश तुमचें आहे. तुमच्या विचारांना सदैव आचाराची जोड द्या. सत्यनिष्ठ माणसाला आपले प्राण पणाला लावून व क्वचित् देऊनही सत्याची आपल्या कामाची पुष्टी करावी लागते. तसेंच करायची तुम्हीही तयारी ठेवा."

मानवी जीवनाचा उद्देश अखंड आनंदप्राप्ती, कायम शांति आणि समाधान लाभणें. हा उद्देश जर ध्यानांत ठेवाल तर आपल्या जीवनाची

रचना त्याला अनुकूल अशी आपण केल्यावांचून राहाणार नाहीं. आनंदही अनेक प्रकारचे असूं शकतात. एक म्हणजे क्षणिक आनंद व दुसरा चिरानंद. कांहीं आनंद एक क्षणभरच टिकतात मग ओसरतात. ह्या उलट कांहीं आनंद हे टिकाऊ असतात. गवताचें बीं सहज उडत येतें, सहज उगवतें व सहज उगवलेलें गवत नाहींसें होतें. ह्याउलट कांहीं आनंद हे वडाच्या बीप्रमाणें सूक्ष्म दिसतात. प्रयत्नपूर्वक त्याचें जतन व वाढ करावी लागते. बरेच दिवस मातींत तें बीं पुरून घेतें. त्यांतून मग हळूच कोंब डोकावतो. पण मग तो विकास पावतो. त्याच्या छायेंत इतरांनाही आनंद मिळतो. हा चिरानंद. मनुष्यजीवनाचा उद्देश असा चिरानंद मिळविणें हा आहे. हा आनंद म्हणजे हास्य नव्हे. त्यापेक्षां ही वेगळी वस्तु आहे. हा आनंद कष्टांतूनही मिळतो. आई मुलांसाठीं खस्ता खाते त्यांत तिला शारीरिक कष्ट होऊनही आनंदप्राप्ती होत असते. विद्यार्थी अभ्यास करतो. त्याला कष्ट होत नाहींत असें नाहीं. ते कष्टही आनंदरूप होऊन जातात. असा हा आनंद आहे. मनुष्य आपल्या आयुष्यांत एकच गोष्ट मिळवूं शकतो आणि ती म्हणजे आनंद. दिवस चांगला गेला तर झोपतांना मनुष्य जितक्या समाधानांत झोंपतो तितक्या सहज समाधानानें मृत्यु आला पाहिजे. जीवनांत जर अखंड आनंदच मिळविला तर मनुष्याचें जीवन सफल झालें असें म्हणतां येईल. मानवी जीवनाचा उद्देश ही आनंदप्राप्ती हाच आहे. आपल्या आवडीच्या कामांत माणसाला ही आनंदप्राप्ति सहजीं होऊन जाते. म्हणून आपल्या आवडीचें काम करीत आनंद मिळवीत गेलें पाहिजे. मनावर ज्या कामाचें दडपण पडत नाहीं तें काम करीत राहिलें पाहिजे. दडपण पडलें कीं आनंद कमी झाला. म्हणून मनुष्यानें आपल्याला कोणत्या कामांत आनंद वाटतो तें पाहून तेंच काम करावें. आनंदाशिवाय आयुष्यांत मनुष्य दुसरें कांहींच मिळवूं शकत नाहीं.

# ६ : एकाग्रता

* जीवन म्हणजे बुद्धिमत्ता. त्यांत बुद्धिमत्तेची एकच गोष्ट आहे. ती म्हणजे एकाग्रता. आपल्या वृत्ति इतस्तत: पसरून ठेवणें म्हणजे जीवनाचा नाश. मनापासून आणि एकाग्रतेनें काम केलें, कीं जीवन यशस्वी होतें.

— *इमरसन*

* जीवनांत जो फक्त एकच गोष्ट मिळवावयाचा प्रयत्न करतो, एकाच गोष्टींत आपलें जीवनसर्वस्व खर्च करतो, त्यालाच ती गोष्ट मिळण्याचा संभव आहे.

— *मेरेडिथ*

सर्व जगाला विसरून मनाची शक्ति दृढपणें स्थिर करणें यालाच एकाग्रता म्हणतात. जगांत सोपीं आणि अवघड कामें आहेत पण मन एकाग्र केल्यावर अशक्य असें एकही काम नाहीं.

सफल आणि असफल माणसांत काय अंतर? एकानें आपल्या सर्व शक्ति एकवटून काम केलें, पुऱ्या दिलानें काम केलें तर दुसऱ्यानें तसें केलें नाहीं. दोघांनीं परिश्रम केले; पण एकानें एकाग्रतेनें केले; दुसऱ्यानें विस्कळीतपणें केले. हमाल मोठी वजनदार वस्तु उचलतात पण एकेक जण नाहीं उचलीत; शब्द झाल्यावर तत्काल सारे शक्ति लावतात, मोठमोठीं ओझीं उचलतात. कामाचेंही तसेंच आहे. साऱ्या शक्ति एकवटल्या म्हणजे कामाचें नाहीं ओझें वाटत. तें सोपें वाटतें.

आपला जीवनोद्देश आपल्याला सांगतां येत नाहीं. आपण सारीं कामेंच एकदम करायचा प्रयत्न करतों नि अयशस्वी होतों. आपण

म्हणतों, "माझें काम कोणतें हें मला समजत नाहीं. परिश्रमानें यश मिळतें यावर माझा विश्वास आहे. आजीवन कठीण परिश्रम, घोर तपस्या करावयाचा मीं निश्चय केला आहे, कांहीं ना कांहीं फल मला मिळेलच. परिश्रम का कधीं फुकट जातात ?" सोन्याचांदीच्या खाणी सांपडाव्या म्हणून सारें बेट का कोणी खोदीत बसतें ? कोणतीही गोष्ट करायची म्हणजे एकाग्र व्हायला हवें. परिश्रम केले म्हणज योग्य फळ हातीं येईलच असें नव्हे. स्वामी रामतीर्थांना मिळालेलें यश आपल्याला दिसतें त्यावर जातों आपण लोभावून. पण रामतीर्थ २४ तास एकाच गोष्टीचा ध्यास घेत. गणिताचे तर गणिताचेच सिद्धान्त चोवीस तास असत त्यांच्या डोक्यांत. झोपेंतसुद्धां गणितच दिसे त्यांना. ही एकाग्रता जगांत यशस्वी करते.

द्रोणाचार्यांनीं साऱ्या शिष्यांना एकदां एकत्र केलें. झाडावर एक पक्षी टांगला होता. त्याच्या डोळ्याचा वेध करायचा होता. त्यांनीं प्रत्येकाला जवळ बोलावून विचारलें, "तुला काय काय दिसतें ?" अर्जुन सोडून सगळे म्हणाले, "झाड दिसतें, पानें दिसतात, पक्षी दिसतो." अर्जुनालाही विचारलें गुरुजींनीं. तो म्हणाला, "फक्त डोळा दिसतो आहे मला." अर्जुनालाच शाबासकी दिली. अर्जुनावरच होती द्रोणाचार्यांची बहाल मर्जी. जीवनाच्या परीक्षेंत उत्तीर्ण व्हायचें असेल तर तुम्हांलाही असेंच ध्येयाशिवाय दुसरें कांहीं दिसूं नये. अर्जुन सव्यसाची उगीच नाहीं झाला. आपणही असेंच एकाग्र व्हायला शिकूं या.

एका गोष्टींत ज्याला एकाग्र व्हायची संवय झाली तो साऱ्याच गोष्टींत एकाग्र होऊं शकेल. गणितांत जो एकाग्र होईल तो ईश्वराच्या ध्यानांत कां एकाग्र नाहीं होणार ?

विवेकानंदांच्या एकाग्रतेची कमाल होती. ते परिच्छेदच्या परिच्छेद एकदम वाचीत आणि एकदां वाचलेलें त्यांच्या लक्षांत राही.

एक म्हण आहे, ज्या नाविकाला आपल्याला कोणतें बंदर गांठावयाचें हें ठाऊक नसतें त्याला अनुकूल वारा कधींच सांपडत नाहीं.

कार्लाईल म्हणतो, "जगांतला अत्यंत दुर्बल प्राणीसुद्धां आपली सर्व शक्ति एकवटून आपलें इच्छित काम सहज करूं शकतो. या उलट जो अत्यंत शक्तिमान आहे, पण ज्याचें चित्त विभागलें गेलें आहे, तो कांहींच करूं शकत नाहीं. एकसारख्या पडणाऱ्या पाण्याच्या थेंबाच्या धारेनें दगडाला घरे पडतात, छेद पडतात. त्याच पाण्याचा मोठा प्रवाह मात्र धो धो करीत निघून जातो. त्याचें कांहीं चिन्हही मागें राहात नाहीं. लहान मुंग्या नाहीं का आपलें काम करीत? ससा-कासवाची गोष्ट तर सगळ्यांना ठाऊक आहे. कासव एकाग्र होतें, तें जिंकलें. सशाचें चित्त होतें द्विधा. झोंपेंतही तो रमला आणि म्हणून हरला.

सर्व शक्ति एकवटून काम केलें म्हणजे जीवन नीरस वाटत नाहीं. वेळ कसा जातो हें कळत देखील नाहीं. सिडने स्मिथ म्हणतो, "आपल्या अध्ययनांत असे मग्न व्हा, कीं जेवणाचें बोलावणें येतांच वाटावें किती लवकर आलें तें. आपल्या पाठ्य विषयांत साऱ्या जगाला आपण विसरलें पाहिजे. तेंच खरें अध्ययन. कर्तव्य-मग्नतेंत साऱ्या जगाचा विसर पडणें म्हणजेच एकाग्रता."

पुस्तक वाचतांना वाचनीय विषयाचें चित्र डोळ्यापुढें उभें करा. जगाच्या साऱ्या कोलाहलापासून दूर राहा. तुमचा मित्र तुमच्या जवळ येऊन उभा राहिला तरी तें कळूं नये. एकदां नेपोलियनला बिनसाखरेचा चहा दिला. त्यानें तो पिऊन टाकला. त्याला कळलें देखील नाहीं. आपल्या विषयाशीं तो इतका तन्मय झाला होता.

प्रसिद्ध कादंबरीकार चार्लस् डिकन्स म्हणे, "ध्यान, एकाग्रता ही एक सदैव सज्ज असणारी, उपयोगी आणि संकटमुक्त करणारी फायदेशीर संचय आहे. एकाग्रता आपल्या जीवनांतला एक परमावश्यक गुण आहे. साध्य करण्यायोग्य गुण आहे. मी खात्रीपूर्वक सांगतों, जर माझ्यांत नम्रपणें आणि एकाग्रतेनें जगाकडे पाहावयाची दृष्टि नसती, तर माझ्या प्रयत्नांचा आणि शोधक दृष्टीचा कांहींच उपयोग मला झाला नसता. पूर्ण मनुष्य बनायचा संकल्प ठेवा. संकल्पाप्रमाणें कृति ठेवा, आचरण ठेवा. उत्तम लेखक बना. देशाच्या आणि जगाच्या विचारांत क्रांति करून सोडा. कोणतेंही काम् करा. गायक, नट व्हा. कामाशीं एकरूप व्हा. कार्याशीं एकतान व्हा. आपल्या चित्तवृत्ति द्विधा करून कामाचा खेळखंडोबा नका करूं." आपण आपल्या चित्तवृत्ति एकाग्र करतों म्हणजे काय? आपले प्राण ओततों आपण त्यांत. बंकिमचंद्र आपल्या कादंबऱ्या लिहितांना तल्लीन होऊन जात, आपले प्राण ते आपल्या वाङ्मयांत ओतीत. ज्या दिवशीं ते एकतान होत त्या दिवशीं त्यांना दुप्पट चौपट भूक लागे. ही एकाग्रता हवी. आपल्या एकाग्रतेनें आपण जें कांहीं करूं तें सजीव करूं. आपले प्राण त्यांत ओतूं या.

चार्लस् किंग्स्ले म्हणतो, "मी काम करतों. खूप एकाग्रतेनें करतों. कामांत इतका एकाग्र होतों, कीं सारें जग जातों विसरून. सांसारिकतेंतून मुक्त होतों. अलग जग होतें माझें. त्या जगांत दोनच वस्तु असतात. एक मी आणि दुसरें माझें काम. मी विश्वरूप होऊन जातों. यशाची ही गुरुकिल्ली आहे."

"माझें कर्तव्यमय जीवन लोकांना दिसतें. त्यांना आश्चर्य वाटतें. ते विचारतात, तुम्ही इतकीं पुस्तकें लिहिलींत, वेळ तरी कसा मिळाला? आमचें एवढेंसेंच कार्यक्षेत्र, पण तुमचीं सारीं पुस्तकें वाचायलाही नाहीं

वेळ मिळत मग ध्यानांत ठेवणें तर दूरच राहिलें. मी उत्तर दिलें. माझें उत्तर ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें. मी कोणतेंच काम एकसारखें कंटाळा येईपर्यंत, चित्त द्विधा होईपर्यंत करीत नाहीं आणि म्हणूनच एवढें करूं शकतों. मनुष्याला जर कांहीं करायचें असेल तर त्याला कामांत कंटाळा नाहीं येतां कामा. आज एकाच दिवशीं जर तो फार काम करील तर उद्यां कंटाळेल, तितकं काम करूं शकणार नाहीं. थकवा येईपर्यंत सारखें काम करूंच नये. मी कॉलेज सोडल्यावर खऱ्या अध्ययनाला लागलों. आजपर्यंत मीं अनेक ग्रंथ वाचले, त्यांचें अध्ययन केलें. मीं वाचलेले सारे ग्रंथ आत्मसात केले आहेत. आजपर्यंत मीं भरपूर प्रवास केला, निरीक्षण केलें. जीवनाच्या सर्व विभागांत मीं काम केलें आणि याशिवाय ६० ग्रंथांची मीं रचना केली. हे ग्रंथ कांहीं मीं हातांत लेखणी आणि समोर कागद आहे म्हणून नाहीं लिहून काढले. ग्रंथ लिहिण्यापूर्वीं मीं त्यांचें संपूर्ण अध्ययन केलें होतें. लिहिण्या-वाचण्यांत फक्त रोज नियमानें ३ तास खर्च करून मी हें सारें करूं शकलों. मी माझें काम मोठ्या एकाग्रतेनें करीं म्हणून हें सारें होऊं शकलें." सर एडवर्ड कुलव्हर लिटनच्या मोठेपणाचें हें सार आहे. त्याच्या आयुष्याचें हें रहस्य आहे.

एस्० डी० कोलरीज मोठा विद्वान, पण एकाग्रता नसल्यानें तो असफल झाला. जीवन दुःखमय झालें त्याचें. द्विधा मनोवृत्तीनें त्याच्या साऱ्या शक्ति क्षीण केल्या. रात्रंदिवस त्याच्या नव्या नव्या योजना चालत. योजना करतां करतांच मृत्यु समीप येऊन ठेपला. दररोज नवे नवे निश्चय. दररोज कांहींतरी काम करायचा तो निश्चय करी आणि नवें काम रोज जुन्याची जागा घेई. त्याच्या हातून कांहींच झालें नाहीं. विचार करतां करतांच त्याचें जीवन संपलें. मेल्यानंतर त्याच्या खोलींतल्या कागदांची शोधाशोध केली.

मानसशास्त्र आणि अध्यात्म यांवर त्यानें ४०,००० निबंध लिहिले होते, परंतु त्यांच्यांतला एकही निबंध त्यानें पूर्ण केला नव्हता. एक लिहायला तो सुरुवात करी, थोड्याच वेळानें त्याला कंटाळा येई, विषय नीरस वाटे. पुन्हा दुसऱ्याचें तसेंच. एकसारखी धरसोड चाले त्याची. त्याला एकाग्रतेची महती कळली नाहीं. एवढा मोठा विद्वान पण व्यर्थ गेला. कांहीं कार्य न करतांच जीवन संपलें. त्याच्या विद्वत्तेचा जगाला कवडीइतकाही उपयोग झाला नाहीं.

ॲडॅम्स म्हणतो, " लॉर्ड ब्रूम, कॅनिंगप्रमाणेंच प्रतिभावान होते. त्यांच्या शोधानें त्यांना ख्याति मिळाली तरीही त्यांचें जीवन सफल म्हणतां येणार नाहीं. त्यांचें चिरस्थायी स्मारक होईल अशी एकही गोष्ट त्यांच्या हातून घडली नाहीं. त्यांच्याच जीवनाबरोबर त्यांची कीर्ति समाप्त होत होती. "

कु० मारटीनोही असाच एक प्रसंग त्याच्याबद्दल सांगते. " लॉर्ड ब्रूमच्या घरीं एक फोटोग्राफर आला. गृह-सभासदांसह त्यांचें चित्र घ्यायची इच्छा त्यानें दाखविली. ब्रूमसाहेब तयार झाले परंतु त्यांची एकाग्रता पांच सेकंदही टिकूं शकली नाहीं. त्यांच्या चित्रावर डाग पडले, चेहरा डागळला त्यांचा. "

वरच्या गोष्टींत एक महान रहस्य आहे. त्यांच्या काळीं ते एक महान व्यक्ति होते. परंतु त्यांच्यांत स्थिरता नव्हती. जिथें जात तिथें त्यांचें काम डागाळे. अनेकांचें असें होतें. एकाग्रतेच्या अभावामुळें त्यांचें जीवन कलंकित होतें.

शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे, कीं फक्त एका एकर जमिनींत जो घास उगवतो, त्याच्यांत इतकी शक्ति आहे, कीं जगांतलीं सारीं एंजिनें त्यावर चालूं शकतील. पण त्या शक्तीचें केन्द्रीकरण एका " पिस्टन रॉड " वर व्हायला हवें. परंतु घासाची शक्ति सगळीकडे

विखुरलेली. तिचा काय उपयोग? शास्त्रीय दृष्टीनें तो शक्ति असून नसून सारखीच. हजारों लोक आज असेच आहेत. त्यांच्यांत ज्ञान आहे, अलोट शक्ति आहे. पण ती ते एकत्रित करून एकच कामांत खर्च करीत नाहींत. आमची शक्ति विखुरलेली आहे आणि विखुरलेली शक्ति म्हणजे शक्तीच नव्हे.

सूर्याचे किरण साऱ्या पृथ्वीवर पडतात पण त्यांचा प्रभाव नाहीं फारसा पडत. पण तेच जर भिंगांतून केन्द्रित केले तर त्यांतून अग्नि निर्माण होतो. ध्येयाच्या भिंगांतून आपणही आपली शक्ति-बुद्धि केन्द्रित करूं या. अग्नि पेटवूं या. तेज दाखवूं या.

नुसत्या कल्पना आणि कामाचें शाब्दिक प्रेम यानें कामें यशस्वी होत नाहींत. करावयाच्या कामाचें अंदाजपत्रक आपण तयार करायला हवें. केलेल्या अंदाजानुसार आपण जावें. आपलीं पावलें धैर्यानें पडलीं पाहिजेत. आपलीं पावलें दृढनिश्चयानें प्रगतिपथावरच पडत राहिलीं पाहिजेत. एकदा पुढें टाकलेलें पाऊल आपण मागें घ्यायला नको. एकाग्रतेनें आपण कामें केलीं तर कामाला जीवन पुरतें. जो एकाग्रतेनें पुस्तक वाचीत नाहीं त्याला तेंच तेंच पुन्हा वाचावें लागतें. त्याला जीवन पुरत नाहीं! विचारांत वेळ जातो. कामाला कधींच आरंभ होत नाहीं.

ईश्वरचंद्र विद्यासागरांचें नांव आज सर्वतोमुखीं आहे. ते बालपणापासून एकाग्रचित्तानें कामें करीत. एकदा त्यांचे वडील त्यांना रस्त्यानें कलकत्त्याला आणीत होते. रस्त्यांत मैलाचे दगड असतात. ईश्वरचंद्रांनीं आपल्या पित्याला विचारून आंकडे ९ पर्यंत समजून घेतले. मग त्यांनीं सांगितलें, "बाबा, मला आंकडे येतात आतां." वडिलांना वाटलें, तत्काळ विचारलें. तर बरं — सांगेल. पुढें विसरेल. म्हणून २ तासांनंतर त्यांनीं ईश्वर-

चंद्रांना प्रश्न विचारले. ईश्वरचंद्रांनीं सारें कांहीं बरोबर सांगितलें. ही एकाग्रता हवी. एकदा वाचलें, तें आपलेंसें झालें पाहिजे.

धनुष्यांतून सुटलेला बाण इतस्ततः नाहीं फिरत. तो आपल्या चारी बाजूंना नाहीं पाहात. सरळ जातो. लक्ष्याचा वेध करतो. आपण ध्येया-शिवाय दुसरीकडे पाहूं नये. सारखा एकच ध्येयाचा ध्यास आपल्याला लागावा. आपले संत असेच एकाग्र असत. सर्व दूर त्यांना परमेश्वराचीं साजरीं गोजरीं रूपें दिसत. ते म्हणतात—

जेथें तेथें देखें तुझींच पाऊलें। सर्वत्र संचरलें तुझें रूप ॥

सगळीकडे तुझेंच रूप दिसावें. तुझाच ध्यास लागावा. परमेश्वर अशानें मिळतो. ध्येय-देवाचें दर्शन करावयाचें असेल तर असाच ध्यास आपल्याला लागो.

होकायंत्राचा कांटा फिरत असतो. पण तो स्थिर एकाच दिशेला होतो. त्याचें ध्येय निश्चित असतें. इतरांच्याकडे ढुंकूनही पाहात नाहीं. त्याचें टोक नेहमीं उत्तर ध्रुवाकडे. अनेक तारे प्रकाशून ध्येयच्युत करायचा प्रयत्न करतील. अनेक प्रलोभनें दाखवितील. चमकून ते सांगतील, पहा आमचा हा मार्ग कसा उज्ज्वल आहे, पवित्र, उच्च आहे. सोपा आहे. पण आपण सोडतां नाहीं कामा आपला मार्ग. आपल्या ध्येयाला चिकटून राहायला हवें. तुफानें उठतात, मुसळधार पाऊस येतो, वादळें उठतात. त्या इवल्याश्या सुईला भिवविण्याचा प्रयत्न करतात. ती ना तुफानाला भिते ना इतरांनीं दाखविलेल्या प्रलोभनांना भाळते. तिचा आपला मार्ग निश्चित ठरलेला आहे. तिचें ध्येयप्रेम अलौकिक आहे.

आपण एकाग्रचित्त व्हायला हवें. आपण एकाग्रचित्तानें दुःखें विसरून जातों. आपल्या ऋषिमुनींनीं आपल्याला योग्य तें दर्शन घडविलें आहे. ते हजारों वर्षें एकाग्रचित्तानें राहात. त्यांना ना खायची शुद्ध ना प्यायकडे ते एकदा ध्यानस्थ बसले म्हणजे दुनियेशीं बेखबर होत

ऋषींच्या अंगावर वारूळ चढलें तरी एकाग्रता भंगली नाहीं त्यांची. आपल्याला मोठें काम करायचें असेल तर एकाग्रताही मोठी हवी. तपश्चर्या म्हणजे एकाग्रता, सगळें विसरून जाणें.

आपल्या बोटांत करंगळी अशक्त समजली जाते. पण तिच्याच ठिकाणीं जर साऱ्या शक्ति एकवटल्या तर तीही मोठमोठीं कामें सहज करूं शकते. गोवर्धन पर्वत केवढा मोठा होता. पण श्रीकृष्णानें तो करंगळीवर सहज उचलून धरला. एकाग्र झालों, कीं जगांत अशक्य कोणतीच गोष्ट नाहीं. गोवर्धनासारखे पर्वत आपण बोटावर खेळवूं.

अण्णासाहेब पटवर्धन एकदम डॉक्टर, वकील आणि इंजिनियर झाले आणि तेही डॉक्टर व वकील सर्व पहिले येऊन आणि इंजिनियर पहिल्या वर्गांत येऊन. ते किती एकाग्रतेनें कामें करीत असतील, कल्पना करा. तेही आपल्यासारखेच मनुष्य होते.

केरूनाना छत्रे अनेकांना ऐकून ठाऊक असतील. कलियुगाचे ऋषीच ते. गणिताची त्यांनीं एकाग्रचित्तानें उपासना केली. गणितच त्यांचा देव. त्याच्या उपासनेंत ते साऱ्या जगाला विसरत. एकदा त्यांचें ऑपरेशन होतें. डॉक्टर त्यांना क्लोरोफार्म देऊं लागले. ते म्हणाले, “डॉक्टर, कशाला देतां मला क्लोरोफार्म ? मला नको तो.” त्यांचें ऑपरेशन संपलें तें देखील त्यांना कळलें नाहीं. ते म्हणाले, “कठीणसें उदाहरण मीं डोळ्यांपुढें ठेवलें नि तें सोडविण्यांत गर्क झालों. सुखदुःख सारें विसरलों. तोच माझा मोक्ष होता.”

एकाग्रचित्त होणें कांहीं फार कठीण नाहीं. अभ्यासानें आपल्याला होतां येतें एकाग्र. आपलें एक निश्चित कार्य ठरवावें आणि पहाटे शांततेच्या वेळीं उठून त्याचें ध्यान करावयाला लागावें. इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करावें. पुढें पुढें आपल्याला अभ्यास झाला म्हणजे आपण कोठेंही तर [illegible] शकूं. प्रयत्नानें साध्य होणारी ही गोष्ट आहे.

नवयुवकांनो ! तुमच्यापुढें कार्य ठेवा व त्यांत एकाग्र होऊन साऱ्या जगाला विसरा. आपल्याला अशक्य कांहीं नाहीं. एकाग्र होणें ही यशाची पहिली पायरी आहे. परमेश्वर एकाग्र होणाऱ्याच्या पाठीशीं उभा आहे. आपल्या साऱ्या संतांचीं चरित्रें आपल्याला संदेश देत आहेत पाहा. पुढें व्हा, कार्याला आरंभ करा.

महात्माजींची एकाग्रता अजब होती. गांधीजींना जें यश मिळालें तें त्यांच्या एकाग्रतेमुळेंच. गांधीजींचा मृत्यूच एकाग्रतेचें एक महान उदाहरण आहे. त्यांच्यावर गोळ्या झाडल्या परंतु त्यांचें चित्त यत्किंचितही चलायमान झालें नाहीं. भगवद्भक्तींत तें रंगून गेलें होतें. तोंडांतून फक्त 'हेराम' हा उद्गारच निघाला. कोणत्याही परिस्थितींत किंवा बाह्य आवरणांत चित्त दोलायमान न होणें ही एकाग्रतेची अंतिम अवस्था. ती प्राप्त झाली कीं मनुष्याला अशक्य असें कांहीं राहात नाहीं. सर्व सिद्धींची प्राप्ती एकाग्रतेमधून होत असते.

परंतु ही एकाग्रता मिळवायची कशी ? त्यासाठीं अगोदर ध्येय निश्चित हवें. कर्तव्यनिश्चय झाला कीं एकाग्रता येते. कर्तव्याचें दर्शन जितकें स्पष्ट होईल तितकी कार्याची प्रेरणा जोरकस असते. ह्या प्रेरणेवरच एकाग्रता अवलंबून असते. साधनेची तन्मयता त्यानंतरच येऊं शकते. ही एकाग्रता फलनिरपेक्ष झाली पाहिजे. फलाचा विचार करण्यांतही वेळ जाऊं नये इतकी एकाग्रता साधली पाहिजे. कांहीं लोकांना एकाग्रतेसाठीं बाह्य गोष्टींची जरुरी असते. पुष्कळसे लोक नखें कुरतडतांना अति एकाग्र होतात, कांहींची एकाग्रता विडीचा धूर सोडतांना होते. एकाग्रता साधण्यासाठीं असलीं बाह्य उपकरणें लागतात, कारण कर्तव्यनिश्चयावांचून एकाग्रता हवी असते. परंतु जर कर्तव्यनिश्चय झाला असेल तर बाह्य साधनांची एकाग्रतेसाठीं जरुरी राहात नाहीं.

विद्यार्थी अभ्यास करतात. त्यांना एकाग्रतेची गरज असते. ह्या एकाग्रतेनें काय मिळवायचें? त्या त्या प्रत्येक विषयाचा एकेक दृष्टिकोन असतो. तो दृष्टिकोन मिळविणें हा अभ्यासाचा हेतु. वाचलेलें सर्वच कांहीं ध्यानांत राहात नाहीं. परंतु दृष्टिकोन येत असतो. वाचलेलें सर्व ध्यानांत ठेवायचें म्हटलें तर स्मरणशक्तीवर फारच मोठा भार पडेल. परंतु त्या त्या विषयाचा दृष्टिकोन आला म्हणजे ही भानगड राहाणार नाहीं. शिक्षणांतील प्रत्येक विषयाचा हा विवक्षित दृष्टिकोन जर आला नाहीं तर त्या विषयाचें भाराभर वाचन भारभूत होईल. गणिताचा एक दृष्टिकोन असतो. तो दृष्टिकोन आला कीं मग प्रत्येक गोष्टीकडे त्या दृष्टींतून पाहाण्याची संवय होते. सायन्सचा एक दृष्टिकोन असतो. आपल्याकडे हे विविध विषय शिकविले जात असूनही आपल्या जीवनांत, रोजच्या गरजांत त्यांचें कोठें दर्शन होत नाहीं. चित्रकलेंत रंगसामंजस्य शिकणाऱ्याच्या घराच्या भिंती अरसिकपणें कोऱ्याच ठेवलेल्या असतात आणि संगीताचें शिक्षण घेणाऱ्यांच्या जीवनांत बेतालपणाच भरलेला आढळतो याचें कारण एकच. हें सर्व शिक्षण आपण कशासाठीं घेतों हें समजलेलें नसतें. त्यामुळें एकाग्रता नाहीं आणि एकाग्रतेवांचून त्या त्या विषयामुळें जीवनाकडे पाहाण्याचा जो दृष्टिकोन यावा तोही येत नाहीं. शालेय अभ्यास करतांना या गोष्टीचें भान शिक्षक व विद्यार्थ्यांनीं राखलें पाहिजे.

हल्लींचें ज्ञान, विशेषतः शालेय ज्ञान हें 'कचज्ञान' असतें. कचज्ञान म्हणजे कामाच्या वेळीं जें उपयोगी पडत नाहीं तें. एकाग्रतेनें जर ज्ञानोपासना केली तर आपलें ज्ञान हें कचज्ञान राहाणार नाहीं. दैनंदिन जीवनांत ज्ञानाचा उपयोग होत असला तर त्याचा परिपोष चांगला होतो व त्यांतून प्रेरणा मिळाल्यामुळें एकाग्रता सुलभ होते.

एकाग्रतेशिवाय जीवनांत यश अशक्य म्हणून एकाग्रतेची उपासना बाळपणापासूनच लावून घेतली पाहिजे.

तर ७

★

## ७ : वेळेचें महत्त्व

* अगोदर उशीरा जागें व्हायचें. उशीरा कामाला आरंभ करायचा आणि मागून धावपळ करायची. या धावपळीचा उपयोग नाहीं. ही धावपळ यश मिळवून देत नाहीं. यश मिळविणाराला धावपळ निरुपयोगी आहे. मुख्य गोष्ट, वेळींच जागें होऊन कामाला सुरुवात करणें ही आहे.

— *लॅफान्टेन्*

* आपल्या भाग्याचें सूत्र आपणांस नेहमींच दिसत नाहीं. एकच क्षण आपल्या भाग्याचा येतो. आम्ही जर गाफील असलों तर मात्र आमचें भाग्य कधींच उदयाला येणार नाहीं. आमच्या तपश्चर्येचें फळ एकाच क्षणावर अवलंबून असतें. एका क्षणाच्या विलंबानें आम्ही धुळीला मिळतों. तपश्चर्येचीं आमचीं वर्षेंच्या वर्षें धुळीला मिळतात.

"हळुहळू" च्या मार्गानें जाणारा मनुष्य "अशक्यता, अपयश" यांच्याच मुक्कामाला जाऊन पोहोंचतो. जीवनांत सगळीं कामें संपविणें त्याला अशक्य होतें. अपयश हाच त्याचा कायमचा मित्र बनतो.

— *कारलाईल*

* आजचा दिवस काम टाळण्यांत, फिरण्यांत घालवा, झोपेंत घालवा. उद्यांही हेंच होईल आणि दिवसेंदिवस तुमचा आळशीपणा वाढेल, तुमची सुस्ती वाढेल आणि नियोजित काम कधींच पार पडणार नाहीं.

— *शेक्स्पीयर*

प्राचीन काळीं आजच्याइतक्या सुधारणा नव्हत्या, यंत्रें नव्हतीं, इतक्या सुखसोयी नव्हत्या आणि मनुष्यजीवन मातीमोलही न-

आजच्यासारखें. प्रत्येकाला आपल्या जीवनाचें फार महत्त्व वाटे. आपलें जीवन संपण्यापूर्वीं म्हणूनच ते मोठमोठीं कामें करून जात. एक क्षणही ते व्यर्थ घालवीत नसत. जीवनाच्या सुखसोयींमुळें वेळेची किंमत कमी झाली आहे. जीवनही कमी महत्त्वाचें झालें आहे. रेल्वे, पोस्ट व तारखातें येण्यापूर्वीं निरोप आणि पत्रें घोडेस्वार, सांडणीस्वार पोहोंचवीत. त्यांना वेळ ठरवून दिलेला असे. उशीर होतांच त्यांना प्राणदंड दिला जाई. इकडे तिकडे भटकण्याबद्दल, वेळ व्यर्थ खर्च केल्याबद्दल त्यांना प्राणांचें मोल द्यावें लागे. ते वेळेला प्राणांपेक्षां जपत असले तर नवल तें काय?

पूर्वींच्या काळीं कामें करणें कठीण होतें. वेळही खूप लागे. आज तींच कामें थोडक्या वेळांत होतात. आज जीं कामें एका तासांत होतात त्यासाठीं आमच्या पूर्वजांना आठवडे, पंधरवडे पुरत नसत. आम्हांला त्यांच्यापेक्षां मुबलक वेळ आहे, परंतु त्याचा काय उपयोग करतों आम्ही? आम्ही पैन पैचा हिशेब ठेवतों, पण वेळेचा कुठें ठेवतों हिशेब? वेळेच्या क्षणाक्षणांचें जीवन बनतें. वेळ फुकट घालविणें म्हणजे जीवन फुकट घालविणें. गेलेला पैसा परत मिळेल, पण गेलेला वेळ हजारों खटपटी करूनही नाहीं परत मिळत. आमचा कारभार आज बेहिशेबी बनला आहे. आम्ही आज उन्नतीऐवजीं अवनतीकडे जातों आहोंत. परमेश्वरानें आम्हांला काम करायला वेळ मिळावा म्हणून सुखसोयी दिल्या, परंतु आम्ही सुखसोयींत रमून जातों. वेळेकडे दुर्लक्ष करतों आम्ही. काय झाला या सुधारणांपासून फायदा आम्हांला? एकाद्या चिक्कू माणसाला दोन रुपये काय नि हजार रुपये काय? ते फक्त सडतच पडणार. आम्हांला कितीही आयुष्य मिळालें तरी काय उपयोग? तें निष्क्रियच पणार. जी वस्तु उपयोगांत येत नाहीं, ती नष्ट झालीच समजा. तर बरोबर वेळेचेंही तसेंच आहे.

परमेश्वरानें आपल्याला दिलेल्या संपत्तीचा उपयोग न करणें म्हणजे त्याचा अपमानच नाहीं का ? परमेश्वरानें आम्हांला वेळेचें सदैव स्मरण राहावें म्हणून सूर्य निर्माण केला. आम्हांला तो जागवावयाचा प्रयत्न करतो, तर आम्ही त्याच्यापासून दूर पळतों. परमेश्वरानें जगांतली प्रत्येक वस्तु उपयोगासाठीं, सेवेसाठीं उत्पन्न केली आहे. तिचा उपयोग झालाच पाहिजे. एखादी गोष्ट वेळेवर न करणें म्हणजे विस्तवाशीं खेळ आहे, प्राणांशीं खेळ आहे. आपल्या प्राणांशीं का कोणी खेळतें ? प्राण जर आपल्याला प्रिय असेल आणि प्रत्येक जीवित व्यक्तीला तो तसा असतो, तर आपण वक्तशीर बनायला हवें. क्षणाक्षणावर आपण प्रेम करायला हवें. Take care of the pence and pounds will take care of themselves. पैशाची काळजी घ्या म्हणजे रुपये आपली स्वतःची काळजी घेतील. क्षणाक्षणांची काळजी घ्या म्हणजे जीवन आपली काळजी घेईल. परमश्वरानें या दुनियेंत काम करायला आपल्याला मुदत ठरवून दिली आहे. वेळेवर काम न करणें म्हणजे आपल्या आयुष्याचा नाश. सीझर वेळेवर राजसभेंत गेला नाहीं. बातमी पोहोंचवायला वेळ झाला. थोड्याशा क्षणांसाठीं त्याला आपलें आयुष्य गमवावें लागलें. कर्नल राहल पत्ते खेळत होता. एक नोकर आला. वॉशिंग्टनची सेना रवाना झाल्याचें सूचनापत्र त्यानें आणलें होतें. तें त्यानें कर्नलला दिलें. तें कर्नलनें खिशांत कोंबलें. त्या पत्राची त्यानें यत्किंचितही क्षिती बाळगली नाहीं. पत्र वाचलेंसुद्धां नाहीं त्यानें. पत्ते खेळण्यांतच तो मग्न होऊन राहिला. खेळ संपल्यावर त्यानें लढाईसाठीं सेना तयार केली. वेळ निघून गेला होता. शत्रुसेनेनें त्याला कैद केलें. मृत्युदंड दिला. अकालीं खेळ खेळण्याबद्दल आपलें जीवित गमवावें लागलें त्याला. त्यानें वेळेचें महत्त्वें ओळखलें असतें, तर जीवित वांचलें असतें त्याचें. केवळ थोड्याशा मिनिटांसाठीं त्यानें आपलें जीवन, तपश्चर्या, मान आणि स्वातंत्र्यही गमावलें.

जीवनांत एकादा असा प्रसंग येतो, कीं ज्यावर आमचें नशीब उजाडणें किंवा कायमचें दुर्भाग्य वांट्याला येणें अवलंबून असतें. मनांत जर या वेळीं शंका निर्माण झाली, भीति वाटली, नैराश्य आलें तर सारें जीवन अंधकारमय होऊन जातें. आमचें जीवन हें जीवनच होऊं शकत नाहीं मग.

आमच्या भाषेंत पाण्याला जीवन शब्द आहे. कलकल नाद करीत वाहाणारें, शुद्ध, स्वच्छ व आर्तांची तहान नाहींशी करणारें पाणी म्हणजे जीवन. गटाराचें पाणी वाहतें असून तें जीवन नव्हे, तर समुद्राचें पाणी निर्मळ असूनही जीवन नव्हे, जीवन प्रतिक्षणीं प्रगतिपर असलें पाहिजे. तें निर्मळ, पवित्र असलें पाहिजे आणि तें दुसऱ्याच्या सेवेला सदा तत्पर हवें. प्रगति करणें, सेवाभाव, पवित्रता ह्या गोष्टी जीवनाला आवश्यक आहेत. मनुष्याच्या आयुष्यालाही जीवनच म्हणतात. तें जर सेवातत्पर असून प्रगतिपर नसेल तर तें जीवन नव्हे. सेवातत्पर, प्रगतिपर असून पवित्र व शुद्ध नसेल तरीही तें जीवन असूं शकणार नाहीं. आज हिंदुस्थानांत जगणारे लोक फार, पण जीवन जगणारे कितीक निघतील ? आपण सारे आपल्या आयुष्याचें जीवन करण्याचा प्रयत्न करूं या. भारताला आज त्याचीच आवश्यकता आहे. सेवातत्पर, प्रतिक्षणीं प्रगतिपर, पवित्र व स्वच्छ आयुष्य घालविण्याचा प्रयत्न करूं या आपण.

मनुष्यानें एक काम करावें. पहिलें काम संपतांच स्वस्थ बसूं नये. दुसरें काम हातीं घ्यावें. एक काम संपतांच लोक आपल्याला कृतकृत्य समजतात. हा विश्राम म्हणजे विश्राम नव्हे. तो विषाचा पेला आहे. काळाचा जबडा आहे. तो आळसपूर्ण दारूचा पेला आहे. हा पेला घेतला, कीं पूर्वींच्या पुण्याईवर, श्रमांवर पाणी पडतें. ह्या असल्या विश्रामांत अंधुक परंतु आशादायक असा जो भविष्यकाळच्या यशाचा प्रकाश तो

लुप्त होतो. निसर्गतः आवश्यक असलेल्या विश्रांतिशिवाय इतर वेळची विश्रांति म्हणजेच काळाचा अपव्यय.

इंग्रजींत म्हण आहे, Resting is rusting, विश्रांति म्हणजे गंजणें. विश्रांति दिल्यानें लोखंडावर गंज चढतो. एंजिनचें चाक पाहा. तें सदा कर्तव्यमग्न असतें. तें आपल्या गतीनें दुसऱ्याला गतिमान करतें. तें चकाकत असतें. कामाची उज्ज्वलता तें सारखें जगाला दाखवितें. कामाचा बदल म्हणजे खरोखर विश्रांति आहे.

रस्किन म्हणतो, " तारुण्याचा काळ म्हणजे जीवनाचा रचनाकाल. भविष्यजीवन याच काळांत बनत असतें. उद्यांचा भविष्यकाळ आजच्या त्यागांतून निर्मावा लागतो, आजच्या कर्मांतून निर्मावा लागतो. त्याच काळांत जीवनाचें परीक्षण आणि परिष्करण होत असतें. ह्या काळांतला प्रत्येक तास, प्रत्येक मिनिट भविष्यकाळांत उपयोगीं पडतें. तारुण्यांतला प्रत्येक तास भाग्य बनवीत असतो. परमेश्वर एका वेळीं एकच क्षण देतो आणि दुसरा देण्यापूर्वी पहिला परत घेतो. एकदां मागें राहिलेलें काम जास्त वेळ खर्च केल्याशिवाय कधींच पुरें होत नाहीं. लोखंड गरम असेपर्यंतच त्यावर घण मारून उपयोग. एकदां वेळ निघून गेला आणि तें थंड झालें, कीं त्यावर घण मारून का कधीं फायदा होतो ? योग्य आकार त्याला नाहींच येऊं शकत. मूळ आकाराचें विडम्बन मात्र होतें. वेळ गेल्यावर प्रयत्न करणें असेंच असतें. "

नेपोलियन आपल्या वेळेबाबत फार काटेकोर असे. वेळेवर गोष्ट न झाली तर तो भयंकर रागावे. तो स्वतः मोठा वक्तशीरपणें वागत असे. तो वेळेवर कामें करी. तो म्हणे, " जो वेळेवर जय मिळवील तो अगा-वरही जय मिळवील. जो एकही क्षण त्यापासून जकात वसूल केल्या-शिवाय जाऊं देणार नाहीं, तो साऱ्या जगापासून जकात वसूल करूं

शकेल." ऑस्ट्रेलियन सैन्याला पांच मिनिटांची किंमत कळली नाहीं म्हणून त्याचा पराभव झाला. वॉटर्लूची लढाई हरण्याचें कारणही तो पांच मिनिटांचा उशीरच दाखवितो. पराजयाचें कारण कामें वेळेवर न होणें हेंच तो सांगे. नेपोलियनचा साहाय्यक ग्रूशी वेळेवर आला नाहीं. नेपोलियनला त्याच्यासाठीं थांबावें लागलें आणि तो कैदी झाला. आपल्या आयुष्यांतले शेवटचे दिवस त्याला सेंट हेलेनांत सडत पडून काढावे लागले.

काम एकदां टाळलें, कीं तें कधींच पुरें होत नाहीं. जें काम आतां होईल तेंच होईल. आजचें काम उद्यांवर टाकण्यास आपल्याला कांहीं शक्ति जरूर खर्च करावी लागते. तेवढीच शक्ति काम करण्यांत खर्च करा. आजचें काम आजच होईल. उद्याच्या कामांत त्यामुळें अडचण येणार नाहीं. आज जें काम करण्यांत आपल्याला अडचणी आहेत, आळस आहे, तोच उद्यांही होण्याची शक्यता जास्त असते. आज काम करायचें टाळलें म्हणजे मनावर दडपण, मनाला त्रास, जिवाला काळजी नि हुरहुर लागून राहते. कामाचा मग त्रास वाटतो. तें मग भाररूप वाटतें. आजच काम करा, तें आनंदानें आणि उत्साहानें पार पडूं शकेल. सुखानें तें काम पार पडेल. आपल्याला लोकांचीं पत्रें येतात. पत्र येतांच आपण तें वाचतों, पत्रांतील भावनांशीं समरस होऊन आपण तें वाचतों. पत्रलेखकाशीं तादात्म्य पावतों. त्याच वृत्तींत पत्राचें उत्तर द्यावें. पत्रलेखकाला समाधान-कारक उत्तर याच वेळीं दिलें जातें. पत्र येतांच जितक्या उत्तम रीतीनें त्याचें उत्तर जाईल तितकें तें उद्यां दिलें जाणार नाहीं. मोठमोठ्या पेढ्यांचे, कारखान्यांचे मालक आजच्या पत्राचें उत्तर द्यायचें उद्यांवर कधींच टाकीत नाहींत.

अहल्याबाई होळकरांना आपण देवी म्हणतों. त्या वेळेचें महत्त्व ओळखीत असत. आपलीं सारीं कामें अगदीं वेळच्यावेळीं करण्याबद्दल त्यांची प्रसिद्धि आहे. पहाटे उठूनच त्या कामाला लागत. त्यांनीं आपलें

जीवन यशस्वी केलें. जगाला एक आदर्श उदाहरण घालून दिलें. एकादा मनुष्य काम सांगतो. आपण त्याकडे दुर्लक्ष करतों. तत्काळ उठत नाहीं,—काम करीत नाहीं. तो मनुष्य मग उठतो. आपल्याला मग लाज वाटते. आपण म्हणतों, "मी कधीं नाहीं करीत म्हटलें?" आपण उशीरा उठतों. दोघांचाही वेळ व्यर्थ जातो. आपण असें करूं नये. तत्काळ काम करावें नाहीं तर 'नाहीं' सांगावें. उशीरा काम केल्यानें कामाचें श्रेय मिळत नाहीं. "नाहीं करीत काम" म्हणून जितका राग यायचा त्यापेक्षां अशानें जास्त राग येतो.

मारुतीनें जन्मतःच सूर्यावर झडप घातली, ती कां? मारुतीला आपण सर्वांत श्रेष्ठ सामर्थ्यवान समजतों. सूर्य म्हणजे पूर्वीचें वेळाचें माप. वेळदर्शक. त्याला मारुतीनें गिळलें, त्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. वेळेवर जो आपली सत्ता प्रस्थापित करील तो साऱ्या जगांत सामर्थ्यवान म्हणून गाजला तर आश्चर्य कसलें!

ह्या भूमीवरचे जे सैनिक, त्यांनासुद्धां वेळेवर कामें न केल्यास जय मिळत नाहीं. आपला आदर्श तो नाहीं. आपल्याला विश्वाचे सैनिक व्हायचें आहे. सेवासैनिक व्हायचें आहे. आपण हुकमत गाजवून नाहीं वक्तशीरपणा शिकवूं शकत. आपल्याला आपला प्रत्येक क्षण सेवेंत घालवावा लागेल. आपला देश केवढा मोठा, किती मागासलेला, आपल्या पुढें केवढें महत्कार्य पसरलें आहे! एकट्या दुकट्याचें जीवनसुद्धां पुरणार नाहीं. मग त्याच एकट्यादुकट्यांतले जर आपलीं कामें वेळेवर न करून वेळ गमावतील तर काय अवस्था होईल? ह्या भारताचा उद्धार होण्याची मग आपल्याला आशा तरी आहे का? आपण आपलीं कामें वेळेवर करायला हवींत. वक्तशीरपणा आपल्या रोमरोमांत भिनला पाहिजे.

तुमचें शरीर आरोग्यसंपन्न असूं द्या. मनांत स्फूर्तीचा अखंड झरा वाहूं द्या. उत्साहाचें वारें साऱ्या शरीरभर खेळूं द्या. आळस मग तुमच्या

जवळ फटकणारसुद्धां नाहीं. आळस तुम्हांला भिऊन दूर पळेल. तुम्हांला नवीं नवीं कामें करायला उत्साह येईल. एक काम वेळेवर केलेंत, कीं तें यशस्वी होईल. मग दुसरें काम अंगावर घ्यायला आपण सहजच होतों तयार. एकादें काम टाळणें, काल्पनिक अडचणींचा डोंगर डोळ्यांपुढें उभा करणें, हें काम करणें सोडण्यासारखेंच आहे. शेंकडा ९९ वेळां टाळलेलीं कामें सोडूनच दिलीं जातात. हें तर मी मग करीनच अशी भावना मनांत ठेवूंच नका. असले विषय म्हणजे विषवृक्ष. पापवृक्ष. त्या वृक्षाला "मी करूं शकत नाहीं" चींच फळें यायचीं. एक म्हण आहे, "आषाढांत काम करायला चुकलेला शेतकरी व झाडाची फांदी हातून सुटलेलें माकड जगाच्या बाजारांत मातीस मिळणार, नाहींसें होणार." कामाचा विचार करणें म्हणजे जमीन नांगरणें, काम करणें म्हणजे शेतांत बीं पेरणें. बीं योग्य वेळीं, योग्य स्थितींत मशागत केलेल्या जमिनींत पेरायला हवें. तें तसें पेरलें गेलें नाहीं तर वसंत त्याला अंकुरित, पुष्पित, पल्लवित कसा करूं शकेल ?

मेरीया एझवर्थचें म्हणणें आहे, "चालू तासाइतकी महत्त्वाची गोष्ट जगांत दुसरी कोणतीच नाहीं. चालू काळ म्हणजे शक्ति. चालू काळाचा उपयोग करणें म्हणजे शक्तिसंचय करणें, आपलीं दारूगोळ्याचीं कोठारें भरून ठेवणें. तत्काल केलेले निश्चय जो अंमलांत आणूं शकत नाहीं त्याचे निश्चय कधींच अंमलांत येत नाहींत, येणार नाहींत. त्याच्या निश्चयाचे तुकडे तुकडे होतील. मातींत मिळून जातील ते. जगाच्या कोलाहलांत ते विलीन होतील. आळसाच्या चिखलांत रुतून ते निष्फळ होतील." लेनिन एका सभेंत उपस्थित होता क्रांतीपूर्वीं. एकजण म्हणाला, "कोण या वेळीं रशियाचीं सूत्रें घ्यायला तयार आहे ?" त्याची अपेक्षा होती, कोणी पुढें येणार नाहीं आणि आपण क्रांतीच्या घोषणांवरच आपलें स्थान टिकवूं शकूं. पण लेनिन आवेशानें उठला.

थरथरत तो म्हणाला, "मी आहें तयार. वेळ येईल तेव्हां साधली पाहिजे. तयार नेहमींच आम्ही असायला हवें. जर आम्ही संधि आल्यावर नसलों तयार व तयारी होईपर्यंत थांबलों तर संधि नंतर येईलच कशावरून ? आतां वेळ आली आहे ती आपण साधूं या. मी तयार आहें सगळीं सूत्रें घ्यायला." आपण आपला प्रत्येक क्षण सामर्थ्यसंग्रह करण्यांत घालविला पाहिजे; म्हणजे वेळ येतांच आपण तिचा उपयोग करून घेऊं शकूं.

कॉन्हेट लिहितो, "नुसते कठोर परिश्रम केले म्हणून मला यश मिळालें असें नव्हे. मी प्रत्येक कार्य करायला सदा तत्पर असें. सदातत्परतेमुळेंच मला जीवनांत यश मिळालें. मी यशस्वी झालों. सेनाविभागांतही तत्परतेनें आणि वक्तशीरपणानें मी वरच्या पदावर गेलों. दहा वाजतां जें काम करावयाचें असे, तें काम करायला मी कधींच वेळ केला नाहीं. पुढच्या बारीक सारीक गोष्टींचाही मी अगोदरच विचार करून ठेवीत असें. माझ्या उभ्या आयुष्यांत माझ्यासाठीं कधींच कोणाला थांबावें लागलें नाहीं आणि मग मलाही यशासाठीं थांबावें लागलें नाहीं; प्रतीक्षा करावी लागली नाहीं. मी माझ्या किरकोळ कामासाठीं दुसऱ्याचे अमोल क्षण कधींही घेतले नाहींत, मी दुसऱ्यांच्या जीवनाच्या कधींही आड आलों नाहीं. माझ्याही जीवनाची किंमत लोकांनीं ओळखली. माझा एकही क्षण कोणीं व्यर्थ घेतला नाहीं."

सर वॉल्टर रॅले आहे साऱ्यांना ठाऊक. इंग्लंडच्या या संशोधक नाविकाला सारें जग ओळखतें. एक व्यक्ति त्याच्याकडे गेली. तिनें विचारलें, "इतकें काम तुम्ही करतां तरी कसें ? इतक्या थोड्या वेळांत तरी कसें करतां ?" रॅले म्हणाला, "मला पुष्कळ कामें करायचीं असतात पण प्रत्येक काम ठराविक वेळेवर आणि ठराविक वेळेंतच मी पुरें करतों म्हणून हें सारें शक्य होतें."

तत्काल काम करण्यांत कदाचित् सांगोपांग विचार नाहीं होणार. परंतु नुसत्या विचारांत मशगुल राहाणारापेक्षां त्याला हजारों पट यश येईल. आपल्यांत म्हण आहे,

## कर्मणा शुद्धिः

कर्म करतां करतां शुद्धि येते आणि काम चांगलें होऊं लागतें. म्हणून वेळ न गमावतां आपण काम करायला लागावें हें उत्तम.

फ्रान्समधला एक राजनीतिज्ञ होता. त्याला विचारलें, "तुम्ही इतकें काम करतां आणि शिवाय समाजांतल्या इतर कार्यांत कसा एवढा मोठा वाटा उचलतां ?"

तो म्हणाला, "मी आजचें काम आजच नव्हे, तर आतांच करूं लागतों !"

पुष्कळशा लोकांना अपयश मिळालें याला कारण त्यांनीं आजचें काम उद्यांवर टाकलें. फक्त पांचच मिनिटें उशीर झाल्यानें अनेक पराजित झाले. युद्धांत हरले. पांच मिनिटांच्या वेळेनें कित्येकांस मोठें केलें, तर कित्येकांना धुळीस मिळविलें. जीवनाची दौड कठीण आहे. दुराराध्य आहे. काळजीपूर्वक आणि वेळेवर कामें केल्यानेंच तिच्यांत यश मिळतें.

एक विद्यार्थी आहे. विचारी आहे. तो विचार करतो, आज रात्रीं दहा वाजेपर्यंत मी जागेन. अभ्यास करीन. दिसायला गोष्ट अगदीं सामान्य आहे. संध्याकाळ होते. अंधार राज्यसूत्रें हातांत घेतो. दिवा आपल्या साऱ्या शक्ति एकवटून त्याला टक्कर देतो. जणूं धुळीस मिळालेल्या प्रकाशसम्राटाचा एकनिष्ठ सेवक. तो विद्यार्थी जेवतो. हळुहळू आळस त्याच्यावर हल्ला चढवतो. त्याच्यावर विजय मिळवतो. त्याच्या निश्चयाचे मनोरे डळमळूं लागतात. नवनवे विचार आळसाच्या बाजूनें पुढें येतात. आपलें म्हणणें खुलवून सांगतात. त्याला तें पटवून देण्याचा प्रयत्न

करतात. मग तो विचार करतो, आजच जागत कशाला बसा! परीक्षेला अजून खूप अवधि आहे. इतकी घाई करायची काय जरूर? होईल सावकाश पुरा. आज एवढेंच पुरे. उद्यांपासून मात्र नक्की जागायचें! तर्कवितर्कांच्या भानगडींत अभ्यास बाजूलाच राहातो. वास्तविक हाच तास त्याच्या विजयाचा तास असतो. त्याच्या कानांवर तो धोक्याची घंटा वाजवतो व आळस त्याचे कान बहिरे करतो. आपलें जीवन तयार करणारा, यशोमार्गाला लावणारा तो तास तो गमावतो. विजयाला तो लाथाडतो. गेलेला वेळ त्याला परत मिळत नाहींच, पण अपयश मात्र पदरीं पडतें. विद्यार्थीच काय, पण जो कोणी एखादें काम करायचा निश्चय करतो, त्याच्याविरुद्ध आळस आपली चतुरंग सेना घेऊन उभा राहातो. आळसाच्या सेनेला जो जिंकतो, आळसाच्या सेनेला पिटाळून लावतो, निश्चयाचा झेंडा जीवनाच्या मैदानांत गांठतो, तोच झेंडा विजयाचा बनतो. निश्चयी भिकारी अनिश्चयी सम्राटापेक्षां कितीतरी चांगला, श्रेष्ठ असतो.

वेळेवर काम न करणें म्हणजे वेळेशीं व्यभिचार. तो आपण थांबविला पाहिजे. वेळेशीं व्यभिचार अत्यंत असह्य गोष्ट व्हायला हवी.

आळस हा भयंकर प्रबळ शत्रु आहे, हुशार शत्रु आहे. माणसाच्या मनाच्या किल्ल्याला नेहमींच त्याचा वेढा असतो. अचानक केव्हां हल्ला होईल ह्याचा नेम नाहीं. हल्ला सुरू झाला म्हणजे तो थांबत नाहीं. मग आळशीपणाची संवय लागते, आळशी राहाण्यांत आनंद वाटतो, प्रेमही वाटतें. हीं सगळीं लक्षणें ज्ञानशून्यतेचींच. आळसामधून ज्ञानशून्यतेपेक्षां दुसरें काय निर्माण होणार? भोजनोत्तर हा माणसाला घेऊन घेरतो. सायंकाळच्या जेवणानंतरही येतो. प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत रोज एकदा तरी हा माणसाला पराजित करतो. जर तो मनुष्य वेळेचें महत्त्व ओळखीत असेल, क्षणाक्षणाचा हिशेब ठेवीत असेल, क्षण व्यर्थ घालविणें

म्हणजे जीवनाचा अपव्यय, जीवन देणाऱ्या त्या परमेश्वराचा अपमान हें जर त्याला कळत असेल, तर तो आळसाला सहज पराभूत करील. कित्येक वेळीं आळसाचा हल्ला व भाग्यपथाचें दर्शन दोन्ही एकदमच होतें आळसाच्या स्वाधीन जो झाला त्याचा सर्वनाश झाला. त्याचें सर्व आयुष्य फुकट गेलें.

मेन एक साहसी मनुष्य होता. इंग्लंडचा राजा हेन्री ह्याच्यासमोर एक मनुष्य त्याची स्तुती करीत होता. हेन्री शांत राहिला. आपल्या मनःप्रवृत्तींत किंचितही फरक न होऊं देतां तो म्हणाला, "ठीक आहे... तुमचें म्हणणें, तो चांगला सेनापती आहे. मी मात्र नेहमीं त्याच्यापुढें पांच तास असतों." हेन्री रोज चार वाजतां उठे, मेन नऊ वाजतां, दोहोंत हाच फरक होता.

> अनिश्चितता एक रोग आहे. भविष्य पाहाण्याची संवय तिला पुढें करते. या रोगावर एकच मारा आहे. एकच औषध आहे आणि तें म्हणजे ताबडतोब निर्णय घेणें. हा रोग असफलतेचा मित्र आणि विजयाचा कट्टा शत्रु आहे. जो 'हो' 'ना' च्या झगड्यांत पडतो तो काळाच्या काळसागरांत गडप होऊन जातो, बेपत्ता होतो.

पहाटे उठावें, आपलें प्रिय काम, आपल्याला आनंद देणारें काम करण्यांत वेळ घालवावा हें सगळ्याच लेखकांनीं सांगितलें. सगळ्या उपदेशकांनीं सांगितलें. जगांत आज जे थोर म्हणून नामवंत आहेत ते सर्वच्या सर्व पहाटे ब्राह्म मुहूर्तावर कामांत व्यग्र असत. जगाच्या हलकल्लोळा-पासून दूर असत. रशियाचा महान् बादशाह पिटर हा पहाटेच्या अंधारांत उठे, कामाला लागे. तो म्हणे, "मला माझ्या जीवनाचा जास्तींत ज़ास्त फायदा घ्यायचा आहे." म्हणूनच तो पहाटेच्या अंधारांत उठे. पहाटेच्या अंधारांत ज्ञानदीप पेटवी. पहाटेच्या गंभीर व शांत वातावरणांत तो

सारे मनसुबे करी आणि दिवसभर त्याची अंमलबजावणी करण्यांत घालवी. पहाटेच्या मंगल वेळेला कोलंबसनें आपला अमेरिकेचा प्रवास निश्चित केला. आल्फ्रेड दि ग्रेट पहाटेच उठे. नेपोलियनच्या मोठमोठ्या चढायांची आणि विजयांची तयारी पहाटेच्या काळोखांतच झाली. कोपरनिकस किंवा ज्योतिषशास्त्राचे विद्वान बहुधा पहाटेच्या काळोखांतच कामें करीत. वेब्स्टर अमेरिकेचा धुरंधर विद्वान होता. न्याहारीपूर्वी तो वीस पंचवीस पत्रांचीं उत्तरें सहज लिहून काढी. महात्माजी पहांटे उठून आपलीं कामें करीत. साने गुरुजींची " श्यामची आई " त्यांना पहाटेच जेलमध्यें प्रेमाचा प्रकाश दाखवी. सारे महर्षि आपला पहाटेचा वेळ उपयोगांत आणतात. सेनापति बापटांच्या कविता याच वेळीं लिहिल्या गेल्या. विद्वद्रत्न दप्तरी पहाटे उठतात. बुद्धीला पीळ पडेल असें कांहीं अध्ययन केल्यावांचून त्यांना बरें वाटत नाहीं.

वॉल्टर स्कॉट, इंग्लंडचा सुप्रसिद्ध कादंबरीकार, तो नियमाप्रमाणें कामें करी. त्याच्या अवाढव्य व्यापाराची हीच गुरुकिल्ली. तो पांच वाजतां उठे. दिवसा न्याहारीपूर्वींच तो दिवसाचें बरेंचसें काम संपवी. एका तरुणानें त्याला सल्ला विचारला. तो देतांना तो म्हणाला, " वेळेवर कामें करायची संवय ठेवा. कांहीं करायचें असेल तें तत्काळ करा, ' शुभस्य शीघ्रं ', कामानंतर विश्रांति घ्या. अगोदर विश्रांति घ्यायचा विचारसुद्धां करूं नका. "

आपल्या प्रतिज्ञांचें शेवटपर्यंत पालन करणें आणि तिचें पावित्र्य रक्षण करणें हें प्रत्येकाचें काम आहे. कर्तव्यकर्म आहे. जो मनुष्य कारणाशिवाय प्रतिज्ञाभंग करतो तो असत्याचरण करतो. आपल्या आत्म्याचा तो अपमान करतो. दुसरा प्रतिज्ञापालन करो किंवा न करो आपण प्रतिज्ञेचें पालन करूं. जो प्रतिज्ञा मोडतो त्याच्याकडे जग संशयाच्या दृष्टीनें पाहातें.

होरेसे ग्रीले म्हणतो, “ जो वेळेची पर्वा करीत नाहीं तो पैशांची काय पर्वा करणार ? जीवनाचीच ज्याला पर्वा नाहीं त्याला इतर वस्तूंची पर्वा कशी असेल ? एका व्यक्तीचा एक तास व्यर्थ घेणें म्हणजे पांच डॉलर त्याच्या देखत चोरणें. जगांत अनेक माणसें अशीं आहेत, कीं ज्यांच्या वेळेची यापेक्षां जास्त किंमत आहे. ” वास्तविक वेळेची पैशाशीं तुलना करणें चूक आहे. वेळ म्हणजे जीवन आहे. पैसा जाईल आणि येईलही ; पण जीवन जाईलच ; येणार नाहीं. म्हणून पैशापेक्षांही आपण वेळेला जपूं या.

अमेरिकेचे पहिले राष्ट्रपति जॉर्ज वॉशिंग्टन चार वाजतां भोजन करीत. काँग्रेसमध्यें नवीनच निवडून आलेल्या कांहीं उमेदवारांना त्यांनीं जेवणाचें निमंत्रण दिलें. पाहुणे वॉशिंग्टनकडे उशिरा पोहोंचले. पाहातात, तों जॉर्ज वॉशिंग्टन भोजनास बसलाही होता. त्यांना याचा भयंकर राग झाला. कोणालाही आला असता. त्यांना यांत आपला अपमान वाटला. वॉशिंग्टन म्हणाला, “ माझा आचारी पाहुणे आले किंवा नाहीं, हें नाहीं विचारीत. तो भोजनाची वेळ झाली कीं नाहीं हें विचारतो. ” त्यांच्या सेक्रेटरीला एकदा उशीर झाला. त्यानें क्षमा मागितली. घड्याळ मागें पडल्यानें उशीर झाल्याचें त्यानें सांगितलें. यावर वॉशिंग्टन म्हणाला, “ महाशय, एकतर आपण दुसरें घड्याळ घ्या, नाहींतर मलाच दुसरा सेक्रेटरी ठेवावा लागेल. ”

जो मनुष्य वेळेवर काम करीत नाहीं आणि माफी मागायला नेहमीं तयार असतो, तो काय कामाचा ! जगांत मोठीं कामें तो कशीं काय करणार ? नेहमीं उशीर करण्यानें त्याचें काम का यशस्वी होईल ? त्याचें हें माफी मागणें म्हणजे खड्डयांत पडून पाय मोडूं नये असेंच वाटणें. नेपोलियननें एकदा आपल्या सेनापतींना जेवायला बोलाविलें. त्याले

वाटलें, जेवतां जेवतां चर्चा करतां येईल आपल्याला. इतर कामांना वेळ शिल्लक राहील. सेनापती योग्य वेळीं पोहोंचले नाहींत. त्यांना पोहोंचायला थोडासा उशीर झाला. नेपोलियननें जेवून घेतलें. त्याचें जेवण संपलें आणि सेनापती येऊन पोहोंचले. नेपोलियन म्हणाला "भोजनाची वेळ टळली. चला आतां आपण आपल्या कामास लागूं या."

कुठें हा नेपोलियनचा वक्तशीरपणा आणि कुठें आम्ही. आमच्या जेवणें काय, सभा काय नि काम काय कधीं वेळेवर सुरू झाल्यास आश्चर्य. जेवणाला स्वतः वेळेवर जायचे नाहींत, शंभर आमंत्रणें घेतील. याच्यांत आम्हांला सन्मान वाटतो. याची आम्हांला वास्तविक पाहतां लाज वाटायला हवी. आदर्शाच्या बरोबर विरुद्ध वर्तन करण्यांत प्रतिष्ठा निर्माण झाली. कोणी 'रावसाहेब' नाहीं आले, थांबली जेवणावळ. एकासाठीं हजारों लोकांनीं थांबायचें. अशानें आम्ही त्यांच्या वर्तनाला पुष्टी देतों. वेळेवर नाहीं ना आला, मग 'रावसाहेब' असो कीं 'रावबहादूर' असो, त्याच्याकरितां थांबूं नये. जे लवकर येतात, वेळेवर येतात त्यांचा अशानें आपण अपमान करतों. वेळेवर आलेल्यांना वेळेवर आल्याबद्दल आपण कांहींच बदला देत नाहीं. वास्तविक वेळेवर कामें करणें, खरें बोलणें, शीलवान् असणें हे गुण नाहींत; आवश्यकता आहे. हें नसणें म्हणजे माणुसकी नसणें. पण आज त्याला आपण गुण म्हणतों कारण ते बोटावर मोजण्याइतक्यांच्या अंगीं असतात आणि बोटावर मोजण्याइतकेच लोक जिथें चांगले आहेत, मनुष्य आहेत, तिथें 'स्वराज्य' कसें राहील? स्वराज्य पाहिजे असेल तर हें सारें अंगीं आलें पाहिजे. जितके जास्त लोक याचें पालन करणारे राष्ट्रांत असतात, तें राष्ट्र उज्ज्वल होणारच. आपण हे गुण अमलांत आणूं या. याचा प्रसार म्हणजेच खऱ्या धर्माचा प्रसार.

आपल्या राष्ट्रांतही असले लोक कमी नाहींत. न्या० मंडलीक फार वक्तशीर असत. लोक त्यांना चालतें बोलतें घड्याळ समजत. त्यांच्या जाण्यायेण्यावर घड्याळें लावीत. त्यांना एकदा परगांवीं जायचें होतें. ते स्टेशनवर आले, तों गाडी गेली होती. त्यांनीं रेल्वेवर फिर्याद केली. [illegible]डी कांहीं मिनिटें अगोदर सुटली होती. त्यांना नुकसानभरपाई [illegible]ली. त्यांनीं सरकारलासुद्धां नमविलें. आपणही वेळेवर गोष्टी केल्या [illegible]पल्यांतही हें सामर्थ्य निश्चित रीतीनें येईल. तें आपण मिळवूं या.

महात्माजीही वेळेबद्दल असेच कांटेकोर. त्यांना कोणीही वेळ घालवीत बसलेलें आवडत नसे. ते गोलमेज परिषदेला इंग्लंडमध्यें गेले होते. त्यांना भयंकर काम पडे. त्यांनीं आपले झोंपेचे तास कमी केले. ते दिवसांतून फक्त दोनच तास झोंप घेत. उजवा हात लिहितां लिहितां थकून जाई; ते डाव्या हातानें सुरुवात करीत. डाव्या हातानें लिहिणें शिकावें लागलें. ते सव्यसाचि बनले. महात्माजींना दिवसाचे चोवीस तास पुरत नसत. ते सगळयांशीं बसल्या बसल्या कांहीं चर्चा करीत, फिरायलाही घेऊन जात कांहींना. तेथेंही त्यांच्याशीं चर्चा करीत. जेवतां जेवतांही त्यांना काम आटोपावें लागे. एकदा वृत्तपत्रकार त्यांच्या भेटीस आले. गांधी–आयर्विन पॅक्टचा तो काल होता. कांहीं पत्रकारांना यायला १५।२० मिनिटें अवकाश होता. महात्माजी म्हणाले, “कृपया आपण मला झोंपायची परवानगी द्या.” पत्रकार म्हणाले, “फक्त १५ च मिनिटें अवधि आहे. त्यांत आपणाला झोंप कितीशी मिळणार. तरीही आमची हरकत नाहीं. मात्र पंधराच मिनिटें फक्त हं.”

महात्माजी जाऊन खाटेवर पडले आणि क्षणांतच घोरूं लागले. बरोबर १५ मिनिटांनीं ते जागेही झाले. लोकांना याचें फार आश्चर्य वाटलें. तेव्हां ते म्हणाले, “जोंपर्यंत माझ्या झोंपेवर अशा तऱ्हेनें ताबा आहे तोंपर्यंतच माझें जीवन आहे.” महात्माजींना एवढेंही करून वेळ

पुरत नसे, म्हणून ते सोमवारीं मौन धरीत आणि आठवड्यांतलीं शिल्लक राहिलेलीं सारीं कामें पुरीं करून टाकीत. आपण महात्माजींच्या मौनांतला हा महान अर्थ ओळखला नाहीं.

नियमानें आणि वेळेवर कामें केल्यानें यशाची खात्री येते, आत्मविश्वास वाढतो. कोणत्याही प्रकारची व्यग्रता राहात नाहीं. वेळेवर काम केलें म्हणजे तें सहजच पूर्ण होतें. ठरविलेल्या वेळीं काम न केलें तर दुप्पट वेळ खर्च होतो. यशाबद्दल साशंकता राहाते. अवेळीं काम केल्यानें अडचणी वाढतात, गडबड उडते आणि दुसरीं कामेंही बिघडतात.

प्रत्येकानें वक्तशीरपणाची संवय लावून घेतली पाहिजे. ही गोष्ट सहज आणि प्रयत्नसाध्य आहे. चांगलें चालणारें एक घड्याळ आपल्याजवळ अवश्य असूं द्यावें. जें घड्याळ जवळ जवळ बरोबर वेळ दाखवितें, तें अचूक रीतीनें यशाचा मार्ग कधींच दाखवीत नाहीं.

स्फूर्तीनें आपण कामें करूं या, म्हणजे आत्मविश्वास वाढेल. कामें व्यवस्थित चालत असल्याचा हा पुरावा आहे. जो मनुष्य वक्तशीर आहे, तो कर्तव्यदक्ष असेलच. तो विश्वासास पात्र असेलच.

रेल्वेच्या ड्रायव्हरचें घड्याळ मागें पडतें, दोन गाड्यांची टक्कर होते. असंख्य माणसें प्राणांस मुकतात. वित्तहानीचें तर विचारूंच नका. एक एजंट वेळेवर पैसे पाठवीत नाहीं आणि व्यापाऱ्याचें दिवाळें निघतें. एक दूत पत्र वेळेवर पोहोंचवीत नाहीं आणि एक निरपराधी मनुष्य फांसावर लटकतो.

थोडक्याच मिनिटांच्या उशीरानें अनेकांच्या आशालता भस्म होऊन जातात. अनेक सुहास्य वदनें रडवीं होतात. अनेकांचें जीवन दुःखमय होतें. कित्येक राष्ट्रं गुलामींत पडतात. इतकें असूनही त्या थोड्या मिनिटांचें महत्त्व आपल्याला कळत नाहीं. यशाच्या मार्गावरच्या ह्या पाट्या, अनुभवानें रंगविलेल्या, पाहूनही का आपण त्यांच्यावर विश्वास नाहीं

ठेवणार आणि ज्या ठोकरा अनुभवाच्या अभावानें त्यांना खाव्या लागल्या त्याच खाऊन त्यांच्याइतकीच प्रगति करणार? त्यांनीं अनुभवानें रस्ता तयार केला आहे. आपली प्रगति व्हावी म्हणून त्यांनीं पुरून घेतलें आहे. आपण त्याचा फायदा घेऊं या.

आपल्या शास्त्रानें संकल्पपूर्वक, म्हणजे अगोदर ठरवून कामें करायला सांगितलें आहे. आपण सगळीं कामें मुहूर्तावर करतों. धार्मिक कामें मुहूर्तावरच करावीं. आपण तीं तशीं करतों, पण इतर कामांत लक्ष देत नाहीं. धर्म हा आपलें जीवन व्यापून राहायला हवा. धर्माचीं कामें मुहूर्तावर करणें म्हणजे जीवन, सारें जीवन वेळेवर घालविणें. धर्माची जेव्हां जीवनापासून फारकत होते तेव्हां जीवन नष्ट होतें; धर्माचा अधःपात होतो. आपण आपल्या पूर्वजांना मूर्ख, गाढव ठरवूं पाहातों, पण हें योग्य नाहीं. त्यांनीं संकल्पपूर्वक मुहूर्तावर कामें करायला सांगितलें तें आपण विसरलों आणि त्यांनीं आपला नाश केला असें आपण म्हणतों. त्यांनाही वेळेचें महत्त्व कळलें होतें; आपणही समजून घेऊं या आणि त्यांच्या काळीं हा भारतवर्ष जसा जगाला अंधारांत मार्गदर्शन करीत होता तसाच उज्ज्वल त्याला प्रयत्नांनीं करूं या.

विद्यार्थ्यांना तर वेळेचें महत्त्व सर्वांत अधिक. राष्ट्राचे ते आधारस्तंभ तर आहेतच. परंतु त्यांना विद्या मिळवायची असते. आपल्या प्राचीन सुभाषितकारांनीं म्हटलें आहे —

क्षणशः कणशः चैव विद्यामर्थंच साधयेत् ।
क्षणः त्यागे कुतो विद्या कणः त्यागे कुतो धनम् ॥

एकेक क्षण गांठीं बांधून विद्या मिळवावी. एकही क्षण वांया गेला तर कोठली विद्या असें तो सुभाषितकार सांगत आहे. जर विद्या मिळवायची असेल तर एकही क्षण फुकट जातां कामा नये. रामदासांनींही याचसाठीं ' प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें ' असें सांगून ठेवलें आहे.

महात्माजींना वेळेचें किती भान असे. एकदा प्रार्थनेला जायला त्यांना कांहीं मिनिटें उशीर झाला. प्रार्थना झाल्यावर ते म्हणाले, "माझ्या हातून आज एक फार मोठी चूक झाली. येथें येऊन बसलों तरी मी थरथर कांपत होतों. वेळेवर येऊं शकलों नाहीं हा फार मोठा गुन्हा माझ्या हातून घडला." वेळेबद्दल महात्माजी इतके दक्ष असत आणि इकडे आमचे कॉलेजांतले प्राध्यापक. वेळेवर येत नाहींत आणि पुष्कळ वेळां तर ऐन वेळीं तास घेणार नसल्याची नोटीस लावून देतात. ४०।५० विद्यार्थ्यांचा एकेक तास म्हणजे त्यांना कांहींच वाटत नाहीं. समाजाला नवा आदर्श घालून देण्याची ज्यांच्यावर जबाबदारी ते असे वागतात. पैसे चोरणारा हा गुन्हेगार, तर दुसऱ्यांना वाट पाहायला लावून त्यांच्या जीवनांतले क्षण चोरणारा केवढा गुन्हेगार म्हटला पाहिजे. ही गुन्हेगारी वृत्ति सुशिक्षितांतही येथें दिसते. त्यांत प्रतिष्ठा वाटते. माझ्यासाठीं किती लोकांना मी तिष्ठत ठेवूं शकतों यावर ज्या समाजांत प्रतिष्ठा मोजली जाते तो समाज विनाशाच्या वाटेला लागला असें समजावें. नवें नीतिमूल्य या बाबतींत समाजांत रूढ करण्याची जबाबदारी जनतेवर आहे, तरुणांच्यावर आहे.

जगांत आज नवे विचार देणारांची गरज नाहीं. आतां नवे विचार कांहीं निघणार नाहींत. गरज आहे आचरणानें ते नवे विचार रुजविणारांची. आपल्या संतांनीं नवे विचार देतों असें कधींच म्हटलें नाहीं. ते म्हणत —

आम्ही वैकुंठवासी, आलों याच कारणासीं
बोलिले जे ऋषी, साच तेंच वर्ताया ॥

ऋषीमुनींनीं सांगितलेले थोर विचार आम्ही आचरून दाखवायला आलों असें ते म्हणत. आजही अशा संतांची, नवीं नीतिमूल्यें समाजांत रूढ करण्यासाठीं गरज आहे.

★

# ८ : शिष्टाचार

* तुम्हांला काय हवें ? जें काय हवें असेल तें हसतमुखानें मिळवा. तलवारीच्या जोरावर तें मिळवायचा प्रयत्न करूं नका. तलवारीच्या जोरावर मिळविलेलें तलवार असेपर्यंतच टिकतें.

—*शेक्स्पीयर*

* जीवनाच्या यशस्वितेचा तीन चतुर्थांश आधार चांगली वागणूक आहे. चांगली वागणूक हा यशोमार्गाचा पहिला टप्पा आहे.

—*मॅथ्यू अ‍ॅर्नाल्ड*

" तुला माझ्यासारखी शक्ति कां नको ? " तुफान आपल्या धाकट्या भावाला, मंदवायूला म्हणालें. मंदवायूनें कांहींच उत्तर नाहीं दिलें. तुफान म्हणालें, " मी उठतों तेव्हां लांब लांबचे लोक जागृत होतात. माझ्या आगमनाची सूचना अगोदर दिली जाते. जहाजांच्या डोलकाठ्या माझ्यापुढें कःपदार्थ आहेत, गवताच्या एका काडीप्रमाणें आहेत. समुद्राच्या लाटांशीं असा मी खेळतों, कीं त्यांना मी बोटावर खेळवतों. लहान मोठ्या सर्व जहाजांना मी मातीच्या कणांप्रमाणें उडवतों. साऱ्या समुद्रभर माझ्या यशाचीं गीतें ते जहाजांचे राई राईएवढे तुकडे गात असतात. मला पाहून माणसें घरांत घुसतात. प्राणीमात्र आपला जीव घेऊन दूर दूर पळतात. मोठमोठ्या हवेल्यांना मी गद्‌गदा हलवतों. गरिबांच्या घरांचीं छपरें मी लाथेनें तुडवितों. माझ्या एका श्वासाबरोबर राष्ट्रांच्या राष्ट्रें धुळीस मिळतात. तुला माझ्यासारखें सामर्थ्यवान् व्हावेंसें नाहीं का वाटत ? "

मंदवायूनें हें ऐकलें. त्यानें उत्तर दिलें नाहीं. आपलें काम मात्र त्यानें चालूच ठेवलें. त्याला हेंच का सांगायचें होतें, कीं दुर्जनाशीं मौन ह्याच

उपाय? आपल्या ध्येयमार्गावर तो चालूं लागला. हें सारें ऐकायला त्याला वेळ कुठें होता? नद्या-नाले-फुलें-वेलीं, झाडें-झुडपें, पक्षी, गरिबांच्या झोंपड्या सारें कांहीं त्याची उत्सुकतेनें वाट पाहात होते. त्याला येतांना पाहून साऱ्यांचीं मुखें टवटवीत झालीं. आनंदानें तीं डोलूं लागलीं. मंदवायूनें आपलें हास्यच जणुं साऱ्यांना वाटून दिलें. बागेंतलीं निरनिराळ्या प्रकारचीं फुलें उमललीं, आपल्या प्राणांचे गालिचे त्यांनीं अंथरले. त्या मंदवायूच्या पायांची धूळ घेण्यासाठीं सारे धडपडत होते. मंदवायूचें गुणग्राहकत्व होतें त्यांना ठाऊक. त्यांना माहीत होतें, आपल्या सद्गुणांचा परिमल तो सर्वत्र नेईल, सर्वांसर्वांपर्यंत पोहोंचवील, आपलें जीवन कृतकृत्य करील. भुंगे त्याच्या स्वागताचीं गाणीं गाऊं लागले. पक्ष्यांनीं त्याला खडी ताजीम दिली. एका सुहास्य वदनानें साऱ्यांचीं मुखें खुलविलीं, हसविलीं. दुःख कुठंच्या कुठं दूर पळालें. अशा प्रकारें मंदवायूनें न बोलतां आपल्या कामाचा परिचयच तुफानाला करून दिला.

नम्रता व हास्यवदन हा मोठा गुण आहे. नम्रता म्हणजे वर उठण्याची बुद्धि. आपल्यापेक्षां जे श्रेष्ठ आहेत त्यांची जाणीव. आपणही तसाच वर उठण्याचा प्रयत्न करूं. नम्रतेनें आपला प्रभाव लोकांवर सहजच पडतो. हसतमुखानें लोकांच्या हृदयांत आपल्याला जागा सहजच मिळते. आपल्या सुहास्यवदनाचे पडसाद दुसऱ्याच्याही हृदयांत उमटल्याशिवाय कसे राहातील? आपल्या हृदयांत ज्या तारा छेडल्या जातात त्यांचेंच स्पंदन दुसऱ्यांच्या हृदयांत होतें. कित्येकांना उद्धटपणा म्हणजे स्वाभिमान वाटतो, पण तसें नाहीं. कित्येकांना वाटतें, उद्धटपणें वागणारेच एकाद्या गोष्टीचा इन्कार करूं शकतात. पण नम्रतेनेंही आपण इन्कार करूं शकतों. नम्रतेचा इन्कार म्हणजे कामाबद्दल नापसंती, पण माणसा-बद्दलचें प्रेम. माणसाबद्दल प्रेम म्हणजे परमेश्वराबद्दल प्रेम. नम्रता हा

शिष्टाचाराचा आत्मा आहे. नम्रतेच्या मदतीनें न होणाऱ्या गोष्टी सहज होऊं शकतात. नम्रता म्हणजे खरा स्वाभिमान. स्वाभिमान म्हणजेच दुसऱ्यांच्या स्वाभिमानाकडेही लक्ष देणें. नम्रता म्हणजे दुसऱ्यांच्या क्षुद्र विचारांचा निषेध, पण त्यांच्या आत्म्यासंबंधींचें प्रेम. नम्रता म्हणजे उन्नतीचा, महान् होण्याचा मार्ग.

जो दुसऱ्यांशीं शिष्टाचारानें वागतो तो सर्वंगामी होऊं शकतो. त्याला कुठेंही मज्जाव नाहीं. एक राजा किंवा मुख्य प्रधान ज्या प्रेमानें त्याचें स्वागत करील तेंच त्याला गरीबाच्या झोपडींतसुद्धां मिळेल. परदेशांत आपल्या मायभूमीचा मान वाढविणारे प्रसिद्ध पत्रकार द. वि. ताम्हनकर लहानपणीं अत्यंत गरीब होते. शिष्टाचाराच्या जोरावर ते पुढें आले. इंग्लंडचा राजा–प्रधानापासून हिंदुस्थानच्या महात्माजींच्या झोपड्या-पर्यंत त्यांना कोठेंही प्रवेश आहे. औंधच्या अन्नछत्रांत जेवणारा हा विद्यार्थी, मुंबईच्या रस्त्यांतून ग्रॅज्युएट झाल्यावरही स्वदेशी वस्तु खांद्या-वर टाकून विकणारा हा तरुण, राजप्रासादापर्यंत जाईल असें कोणाला वाटलें होतें ? औंधच्या राजवाड्यांत प्रवेश मिळायलाही ज्याला अडचण पडावी, तो इंग्लंडच्या, अर्ध्या जगावर हक्क गाजविणाऱ्या मुख्य प्रधाना-बरोबर बोलेल, कोणाला ठाऊक होतें ? Indians & Dogs are not allowed अशा पाट्या लावणाऱ्या त्या इंग्लंडच्या मुख्य प्रधानांची ते गांठ घेऊं शकले, याचें एकमेव कारण म्हणजे शिष्टाचारा-नुरूप वर्तन ! त्यांना भेटलों असतां 'काळा–गोरा' भेदाबद्दल प्रश्न विचारतां ते म्हणाले, "वाटतो किंवा दाखविला जातो तितका हा भेद नाहीं आणि आहे त्यालाही सर्वस्वीं तेच जबाबदार धरतां येणार नाहींत. आपल्यांत शिष्टचाराचा अभाव आहे, म्हणूनच आपल्याला पदोपदीं अपमान सहन करावा लागतो."

ज्यूलियन रॉल्फपुढें कामाचा खच पडला होता. तो कामांत इतका मग्न झाला, कीं वेळेचीही त्याला शुद्ध राहिली नाहीं. दोनचे ठोके पडल्यावर त्याला शुद्ध आली. दोन वाजतां घरीं येऊन त्यानें दार ठोठावलें. थोड्या वेळानें दार उघडलें. त्याला दिसलें अमेरिकेच्या राष्ट्रपतींनीं स्वतः दार उघडलें आहे. त्यांनीं त्याला कुशल समाचार विचारला. ज्यूलियन शर्मिंदा झाला. त्यानें क्षमा मागितली. राष्ट्रपति म्हणाले, "मी जर दार उघडायला आलों नसतों तर रात्रभर तुम्हांला बाहेरच राहावें लागलें असतें. माझ्याशिवाय घरांत दुसरें कोणीच नाहीं. नोकरलाही पाठवूं शकलों असतों, परंतु तो झोपला आहे. त्याला उठवणें मला योग्य वाटलें नाहीं."

शिष्टाचार म्हणजे आत्मिक सौंदर्य. मनुष्याचें शरीर सुंदर वा कुरूप असणें त्याच्या हातांत नाहीं. खरें सौंदर्य तें नाहीं. आत्मिक सौंदर्य हेंच खरें सौंदर्य, कारण त्यांत मनुष्याच्या प्रयत्नांनाही वाव आहे. शिष्टाचार-हीन जीवन म्हणजे विजेवांचून इलेक्ट्रिक दिवा; काय कामाचा तो? शिष्टाचाराशिवाय जीवन सुखी होऊं शकत नाहीं, सौंदर्यापाशीं जर शिष्टाचार, प्रेम, दया आणि संतोष नसेल, तर तें काय कामाचें? अनेकांना तें अधोगतीला लावील, अनेकांच्या अधःपाताला तें कारणीभूत होईल. जीवनांत शिष्टाचाररहित सौंदर्याचा काय उपयोग?

कुत्र्यासमोर एक भाकरीचा तुकडा फेका. भाकरीचा तुकडा घेऊन कुत्रा निघून जाईल. याच्या उलट कुत्र्याला जवळ बोलवा. त्याला पाठीवर थोपटा. डोक्यावरून प्रेमानें हात फिरवा. त्याला हातानें भाकरीचा तुकडा द्या. तो प्रेमानें भातर खाईल. कृतज्ञतेनें आपल्याकडे पाहील. आपल्या पायांत घोटाळेल. पाय चाटील. आपल्यापुढें येऊन शेपूट हालवील. आपल्या शिष्टाचाराची किंमत एक पशूसुद्धां ओळखूं शकतो. कुत्र्यासमोर आपण भाकरी फेकतों तशाच प्रकारें आपण आपलीं

परोपकाराचीं सत्कृत्यें फेकून देऊं लागलों, तर त्याचा फायदा घेणाऱ्याच्या तोंडावर कृतज्ञतेची एक रेखाही दिसून येणार नाहीं.

सुशीलता मेरपर्यंत कधींही नष्ट न होणारी संपत्ति आहे. हिंदुशास्त्राप्रमाणें तर ह्या जन्मींचे संस्कार पुढील जन्मींही राहतात. म्हणजे ही संपत्ति कधींही न संपणारी आहे. धनानें मनुष्याला मद येतो, तर सुशीलतेनें मनुष्य नम्र बनतो. सदाचार आणि शिष्टाचार यांवांचून जीवनयात्रा म्हणजे होकायंत्रावांचून जहाजाचा प्रवास. ज्यांच्याजवळ हें आहे त्यांची जीवनयात्रा सुखकर होते. त्यांचें जहाज ध्येयाच्या बंदराला लागतें. त्या अमूल्य वस्तु आहेत. त्या आणायला आपल्याला कांहीं खर्चावेंसुद्धां लागत नाहीं. परंतु याची किंमत न मोजण्याइतकी आहे. अनमोल आहे.

शिष्टाचारयुक्त मनुष्याचें सर्वदूर स्वागत होतें. सूर्यप्रकाशाच्या स्वागताला सारे तयार असतात, तसें स्वागत त्यांचें होतें. तो प्रत्येक ठिकाणीं प्रकाश, आनंद व उत्साह घेऊन जातो. सर्वांचें चांगलें व्हावें हीच त्याची इच्छा असते. त्याच्या मनांत कोणाबद्दल इर्षा नसते, द्वेष नसतो. ते रागद्वेषाच्या पलीकडे जातात. दुसऱ्यांच्या उन्नतीचा त्यांना द्वेष वाटत नाहीं. ते त्या गुणांचा गौरव करायला सदैव तयार असतात. दुसऱ्यांच्या गुणांना ते घ्यायचा, आपलेसे करायचा प्रयत्न करतात. दुसऱ्याला मागें ओढून आपलें श्रेष्ठत्व दाखवायचा त्यांचा प्रयत्न नसतो. 'दुसरा मूर्ख म्हणून मी शहाणा' हा प्रकार जो हिंदुस्थानांत प्रत्यहीं दिसतो तसें त्यांचें वर्तन नसतें.

ते स्वतः तर पुढें जातातच, पण आपल्याबरोबर अनेकांना पुढें नेतात. आपल्या विकासाबरोबर अनेकांना विकासमार्ग दाखवितात. तुम्हांला ठाऊक आहे ना, मधानें ज्याचें शरीर माखलें त्याला मधमाश्याही चावत नाहींत.

आपण भांडणांत तर सारा शिष्टाचार विसरून जातों. दुसऱ्याला समजून घेण्याचा आपण प्रयत्न करीत नाहीं. एकमेकांचीं व्यंगें काढणें हेंच त्या वेळीं आपलें शस्त्र होतें. आपण त्या वेळीं माणुसकी विसरतों. शिष्टाचार म्हणजेच माणुसकी आहे. आणि माणुसकी म्हणजे दुसऱ्याचेंही समजून घेणें.

सभ्य माणसें दुसऱ्याच्या मार्गांत कधींच विघ्नें उत्पन्न करीत नाहींत. शिष्टाचार म्हणजे हृदयाची विशालता, मनाचा उदारपणा, विचारांची प्रगल्भता ! दुसऱ्याच्या चांगल्यांत चांगलें दिसणें, दुसऱ्याच्या कल्याणांत कल्याण दिसणें.

एक दिवस जॉनसन आणि गोल्डस्मिथ एकाच ठिकाणीं गेले होते. जेवायलाही शेजारींच बसले होते. गोल्डस्मिथला अमेरिकेंतल्या इंडियनांविषयीं सहानुभूति वाटे. त्यानें तसा प्रश्न विचारला, तर जॉनसनला राग आला. तो खेकसून म्हणाला, " साऱ्या उत्तर अमेरिकेंत असा एकही महामूर्ख नसेल, कीं जो असा प्रश्न विचारील ! "

गोल्डस्मिथला ह्या उत्तरानें धक्का बसला. दुःखही झालें. तो अत्यंत नम्रपणें म्हणाला, " साऱ्या जगांत असा एकही मनुष्य नसेल, जो दुसऱ्या चांगल्या माणसांशीं असें बोलेल. साध्या एका प्रश्नानें इतका रागावेल, दुरुत्तरें करील. "

आज आपल्याला हिंदुस्थानांत काय दिसतें ? साध्या साध्या बाबतींत एका पक्षाचीं माणसें दुसऱ्या पक्षावर वाटेल तशीं आग पाखडतात. असभ्यपणाची टीका करतात. हें शिष्टाचाराच्या विरुद्ध आहे. अशानें दोन पक्षांतले मतभेद मिटण्याऐवजीं ते वाढतच जातात. तरुण पिढीनें तरी असें होऊं नये.

ॲरिस्टॉटलनें २२–२३ शें वर्षांपूर्वी सभ्य माणसाची व्याख्या लिहिली. तो म्हणतो—

सज्जन मनुष्य सखोल असतो. तो चांगल्या नि वाईट दोन्हींशीं साधेपणानें वागतो. तो इतरांपेक्षां स्वतःला फार शहाणा समजत नाहीं किंवा स्वतःला वाजवीपेक्षां नीचही समजत नाहीं. सफलतेचा त्याला आनंद वाटत नाहीं, कीं अपयशाचा विषाद. तो मुद्दाम भयानक गोष्टी शोधीत नाहीं किंवा भयानक गोष्ट समोर आली तर घाबरून जात नाहीं. त्याचा उत्साहभंग कधींच होत नाहीं. तो आपल्या किंवा दुसऱ्याच्या बाबत वायफळ गप्पा कधींच मारीत नाहीं. दुसरे आपली प्रशंसा करतात कीं नाहीं याबद्दल तो काळजी करीत नाहीं. लोकांनीं केवळ प्रशंसा करावी म्हणून तो कोणतेंच काम करीत नाहीं. जें काम योग्य म्हणून त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला पटतें, तें काम तो संकटांची पर्वा न करतां करतो.

सभ्य मनुष्य सदा सर्वकाळ सभ्यतेचें वर्तन ठेवतो. आंत बाहेर त्याचें चित्त गंगाजळासारखेंच शुद्ध असतें. तो म्हणजे चमकणारा हिरा. कितीही त्याच्या आंत शिरा, त्याचें तेज कधींच कमी होत नाहीं. तो दुसऱ्याला बोंचतील असे शब्द कधींच बोलत नाहीं. शरीराची जखम भरून येते, पण हृदयाला पडलेले घरे बुजत नाहींत. हृदय म्हणजे परमेश्वराचें निवासस्थान हें तो जाणतो. मनुष्य म्हणजे परमेश्वराचा अंश, त्याला दुखवूं नये हें तो जाणतो. आपल्या विचारांवर तो अंकुश ठेवतो. आपले विचार सुसंस्कृत माणसासारखे असावे अशी तो खटपट करतो. तो संयमी असतो. आपल्याप्रमाणेंच साऱ्यांना भद्रपुरुष समजतो.

चौदावा क्लेमेंट पोप झाला. सारे प्रतिनिधि एकत्र जमले व त्यांनीं त्याला अभिवादन केलें. क्लेमेंटनेंही उत्तरादाखल अभिवादन

केलें. कार्यसंचालक म्हणाला, "आपण उलट अभिवादन करायला नको होतें." पोप म्हणाला, "माफ करा. आतांच मी पोप झालों. सारा शिष्टाचार विसरणें मला शक्य नाहीं."

मॅगून म्हणाले, "शिष्टाचारासारखी दुसरी नीति नाहीं. शिष्टाचारासारखा दुसरा राजमार्ग नाहीं. ज्या ठिकाणीं सारे प्रयत्न हात टेकतात त्या ठिकाणीं शिष्टाचार यशस्वी होतो."

नेपोलियनला सेंट हेलेनांत कैदेंत ठेवलें होतें. आपल्या मित्राबरोबर तो एकदां फिरायला निघाला होता. समोरून एक मजूर येत होता. पाठीवरच्या ओझ्याखालीं तो अगदीं दमून गेला होता. नेपोलियनच्या मित्राची त्याला वाट करून द्यावयाची इच्छा नव्हती. नेपोलियननें हें पाहिलें. तो मित्राला म्हणाला, "त्या मजुराचा व त्याच्या बोजाचा, त्याच्या प्रामाणिक परिश्रमाचा आपण मान ठेवला पाहिजे. रस्त्यांतून एका बाजूला व्हा, हीच त्याला सलामी."

एक व्यापारी होता. नेहमींच्या वेळीं त्यानें दुकान बंद केलें. तो घरीं जायला निघाला. त्याच वेळीं एक मुलगी आली. तिला एक पैशाचा दोरा हवा होता. तो परतला. दुकान उघडून त्यानें तिला दोरा दिला. एक क्षिरकोळ गोष्ट. पण त्याच्या वागणुकीचा साऱ्या गांवभर गवगवा झाला. लोकांना त्याच्याबद्दल आकर्षण वाटूं लागलें. एक पैशाचा दोरा तो काय, पण त्यानेंच त्याला महशूर केलें. त्याचें गिऱ्हाईक वाढलें.

अशिष्ट व्यवहारानें चांगल्या चांगल्या गुणांवर पाणी पडतें. उद्योगप्रियता, विश्वासूपणा सारें निरुपयोगी ठरतें. शिष्टाचारामुळें याच्या उलट समाज अनेक दोषांची माफी करतो.

एक गरीब मुलगी होती. एका दुकानदाराकडून तिनें थोडासा माल खरेदी केला. गरीबच होती ती. कितीकसा माल घेणार? दुकानदार

सभ्य होता. शिष्टाचाराचें सामर्थ्य त्याला ठाऊक होतें. तो म्हणाला, "बाळ, तूं माझ्याकडून सामान घेतलेंस, आभारी आहें मी तुझा. अशीच वरचेवर येत जा, बरं का." त्या गरीब मुलीवर याचा फार परिणाम झाला. ती सर्वांना सांगे, "दुकानदार फार चांगला माणूस आहे." शिष्टाचाराच्या साध्या वागणुकीनें त्याला एक अवैतनिक प्रचारक मिळाला. थोडक्याच दिवसांत दुकानदाराची खूप प्रसिद्धि झाली. ज्यांना संघटना करायची असते त्यांनीं तर आपली वर्तणूक शिष्टाचाराला अनुसरूनच ठेवायला हवी. संघटना याशिवाय होणें शक्यच नाहीं.

पुष्कळ लोक लढण्यांत पटाईत असतात. शूर असतात. मोठमोठ्या संकटांनाही ते तोंड देतात. परंतु सभेंत त्यांना एक अक्षरही बोलतां येत नाहीं. आपलीं मतें ते मांडूं शकत नाहींत. शिष्टाचार म्हणजे चार माणसांशीं वागावें कसें, बोलावें कसें, बसावें कसें ह्याचें ज्ञान. लहानपणापासून याचें शिक्षण द्यायला हवें. सार्वजनिक कामाचें शिक्षण द्यायला हवें. पण परतंत्र हिंदुस्थानांत हें होत नसे! स्वतंत्र देशांत हें शिक्षण दिलें जातें. परदेशांत आपल्या राष्ट्राचा अपमान होऊं नये म्हणून ते कष्ट करतात. ज्या भारताचा आत्मा शिष्टाचारमय होता, तेथेंच आतां शिष्टाचाराचें नांवनिशाण दिसत नाहीं. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव, चे उदात्त पाठ म्हणजेच शिष्टाचार.

अंतःकरणांतली सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा हे शिष्टाचारांतले सर्वोच्च गुण आहेत.

शिष्टाचारपूर्ण व्यवहारानें तुम्ही आपलीं कामें यशस्वी करूं शकाल. पुढील सूचना लक्षांत घ्या.

१. दोषदृष्टि सोडून गुणग्रहण करीत चला. दुसऱ्याच्या चित्तवृत्ति समजण्याचा प्रयत्न करा म्हणजे त्याचा तुम्हांला क्रोध येणार

नाहीं. परिस्थितीनें पडणाऱ्या मर्यादा समजून घेऊन त्याबाबत उदारता दाखवा.

२. प्रत्येकाला प्रतिष्ठेची भावना असते. लहान मुलांनासुद्धां. म्हणून कोणाच्याही प्रतिष्ठेला धक्का बसेल असें वर्तन करूं नका.

३. दुसऱ्याला व्यर्थ उपदेश करूं नका. जमीन तापली असतांना पाणी पडलें, तर ती पाणीग्रहण करते; नाहीं तर पडलेलें सारें पाणी वाहून जातें व बरोबर असलेला गाळही नेतें. प्रथम दुसऱ्याला आवश्यकता निर्माण करा व मग ती पुरी करा.

४. दुसऱ्याच्या विषयांत रस घेत चला. यामुळें त्याला उत्तेजन मिळेल. आपल्याला जास्त ज्ञान मिळेल.

५. नेहमीं चेहऱ्यावर स्मित ठेवा. रडक्या चेहऱ्याचें कोणीच स्वागत करीत नाहीं.

६. प्रत्येकाला आपलें नांव वेदवाक्याइतकेंच प्रिय असतें; तेव्हां तें डावलूं नका किंवा त्यावर टीका करूं नका.

७. दुसऱ्याचें म्हणणें सदैव ऐकून घ्या. त्याचें म्हणणें ऐकण्यापूर्वींच उत्तर देऊं नका. त्याला बोलण्याला उत्तेजित करा. तुम्हीच बोलत राहिल्यानें ज्ञान वृद्धिंगत होत नाहीं, तें ऐकल्यानें होतें.

८. नेहमीं आपल्याच हिताचें बोलूं नका. दुसऱ्याचें हितही पाहात जा.

९. चांगले कपडे वापरा.

१०. नेहमीं 'सत्या' ला धरूनच वागा. यानेंच खरी प्रतिष्ठा वाढेल.

११. आपल्या विशिष्ट ध्येयाशीं विसंगत असें वर्तन ठेवूं नका.

१२. नम्रता कधींही ढळूं देऊं नका.

१३. आपलेंच गुणगान कदापिही करूं नका.

१४. तोंडानें गुणाची जाहिरात करण्यापेक्षां कृतीनेंच तें दाखवा.

१५. क्रोध, ईर्ष्या, मत्सर, हे शिष्टाचाराचे कट्टे शत्रु आहेत.

१६. दुसऱ्याला टोंचून बोलूं नका.

वरचे सोळा नियम म्हणजे प्रत्यक्ष शिष्टाचाराची अंमलबजावणी कशी करावी याचें दिग्दर्शन. समाजांतले सभ्य लोक जसे वागतात तसेंच आपण वागून आपल्या राष्ट्राचा सन्मान वाढवूं या !

परंतु आज शिष्टाचाराचा अर्थ सामान्यतः वेगळा केला जातो. विनोबाजी म्हणतात, "आज शिष्टाचाराच्या नांवाखालीं जीवन दंभवेष्टित होत आहे. मानापमानाच्या कल्पनेवरच सगळें नीतिशास्त्र, समाजशास्त्र रचलें जात आहे. सहजतेनें, उघडेपणानें सहसा कधींच कोणी वागत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं कृत्रिमता आणि दंभ शिरला आहे." शिष्टाचाराच्या बाह्य आचरणानें केवळ दांभिकपणाच येतो. शिष्टाचारमय वागणुकीच्या मागें आत्मीयता असली पाहिजे. आत्मीयता नसेल तर शिष्टाचाराला दांभिकपणाचें स्वरूप येतें. आज आपल्यांत कोठें आहे ही आत्मीयता, हा आपलेपणा? ना देशाबद्दल आत्मीयता ; ना घराबद्दल. शाळेंतील शिक्षकाबद्दल, शाळेबद्दलही आत्मीयता नाहीं. आठ-दहा वर्षांचें चिमुरडें पोर सांगतें कीं आमच्या मास्तरांना कांहीं येत नाहीं. जगाच्या ज्ञानसागराच्या मानानें शिक्षकाचें ज्ञान कणभरच असेल परंतु विद्यार्थ्यांच्या मानानें तें पुष्कळ असतें. आणि आज आपलें कुटुंबजीवन तरी कसें झालें आहे? भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य म्हणजे येथलें पारिवारिक जीवन. पारिवारिक जीवनाचा सुगंध येथें सर्वत्र दरवळत असे. पण आज तें पारिवारिक जीवनच

नष्टभ्रष्ट झालें आहे. मर्यादांचें भान कुटुंबांतील व्यक्तींनीं सोडलें कीं असामंजस्य तेथें निर्माण होतें, गोडी नाहींशी होते. शिष्टाचाराचें सुवर्णसूक्त, शिष्टाचाराची कसोटी म्हणजे मर्यादांचें भान राखणें ! मर्यादांचें भान गेलें त्याचा तोल सुटला, त्याचा शिष्टाचार संपला.

ॐ नमो भगवत्यै मर्यादायै ॥

☆

# ९ : उत्साह

* ज्या परिश्रमानें आम्हांला आनंद होतो, जें काम करतांना आम्हांला उत्साह वाटतो, स्फूर्ति येते, तें काम, ते परिश्रम आम्हांला सर्व व्याधींपासून मुक्त करतात. आमच्या व्याधींचें तेंच एक औषध, तेंच एक अमृत. आमच्या वेदनांतून निवृत्त होण्याचा तोच एकमेव उपाय !

— *शेक्सपीअर*

* मनुष्याच्या ध्येयावरील निष्ठेचें, त्याच्या सत्याचरणाचें एकमात्र निर्णयात्मक प्रमाण म्हणजे त्यासाठीं तो किती त्याग करतो. उत्साही मनुष्य आपल्या ध्येयासाठीं सर्वस्वाची आहुति द्यायला तयार होतो.

— *लाव्हेल*

उत्साह म्हणजे कार्याचा प्राण. उत्साहहीन मनुष्य कोणतेंच काम करूं शकत नाहीं. उत्साहाशिवाय सर्व शक्ति एकवटून मनुष्य काम करीत नाहीं. कार्यांत मानसिक शक्तींचा समावेश उत्साहामुळें होतो. मानसिक आणि शारीरिक शक्तींतच निरुत्साही माणसाच्या मनांत युद्ध सुरू असतें. या अंतर्गत यादवींतच त्याची बरीचशी शक्ति खर्च होते. येणाऱ्या संकटांना तोंड द्यायला त्याच्याजवळ शक्ति राहतच नाहीं. एका तासाच्या कामाला अनेक तास खर्च होऊनही काम व्हावें तसें व्यवस्थित होत नाहीं. उत्साह म्हणजे आग. कार्याचें इंजिन व्यवस्थित चालावयाला लागणारी वाफ तयार करणारा अग्नि. ह्या आगीवरच कामाचें यश अवलंबून असतें. ध्येयसिद्धीच्या स्टेशनाला पोहोंचायला ह्या अग्नीचा सांठा खूपच हवा.

हेन्री म्हणतो, " जेव्हां मी एखाद्या महत्त्वाच्या विषयांत गढून जातों, तेव्हां साऱ्या बाहेरच्या जगाला विसरतों. मला वेळेची आणि स्थळाची आठवण होत नाहीं."

प्रत्येक तरुणांत कार्यस्फूर्तीची ज्योत तेवत असते. आपण कांहींतरी विशेष चांगलें काम करावें ही त्याची आकांक्षा असते. तो विद्वान असो कीं गांवढळ, त्याच्या मनांत त्याच्या मगदुराप्रमाणें हे विचार येतात. जे विद्वान आहेत, हुषार आहेत त्यांची तर गोष्टच सोडा; पण सुस्त, आळशी आणि अल्लड लोकांची इच्छाशक्ति जर जागृत केली, त्यांना जर योग्य मार्ग दाखवला, त्यांना कार्यक्षम आणि प्रयत्नशील बनविलें, तर जगांतून आळसाला रामराम ठोकावा लागेल. अपयशाचें नांवच राहणार नाहीं. सर्वदूर सत्शक्ति आणि उत्साह यांचा प्रकाश भरून राहील. सर्वांनाच तो मार्गदर्शक होईल.

नेपोलियनचें अंतःकरण सदा उत्साहानें ओसंडत असे. तो स्वतःच नुसता उत्साही नव्हता, तर तो इतरांच्या हृदयांतले उत्साहदीपही पेटवी. तो असा उत्साह निर्माण करी, कीं आपल्या कार्यासाठीं मग लोकांना प्राणांचीही पर्वा वाटत नसे. फक्त एकाच पंधरवड्यांत त्यानें असें कार करून दाखविलें, कीं एक वर्षांत जेमतेम इतरांनीं तें कसेंतरी पुरें के असतें. त्याची कार्यशक्ति पाहून जग आश्चर्यानें थक्क झालें. ऑस्ट्रियनां त्याचें हाडवैर, पण तेही म्हणाले, "हे फ्रान्सचे लोक माणसेंच आ का, याबद्दल शंका येते. यंत्रापेक्षां उत्तम रीतीनें होतात यांचीं क यंत्राचीं कामें नीरस, तर त्यांच्या कामांतून त्यांचें कार्यप्रेम जणूं झळक यंत्रांत उत्साह नसतो तो यांच्यांत आहे. याबाबत त्यांनीं यंत्राला म केलें आहे." नेपोलियनचा पराभव झाला असें आपण समजतों, प त्याच्या शत्रूंनीं सुद्धां त्याला विजयाचें प्रशस्तिपत्र दिलें आहे.

उत्साहानें मन लावून काम करण्यांत आणि अंगावर पडलें म्हणून काम करण्यांत विजय आणि पराजय इतकेंच अंतर असतें.

सरळ मनाच्या आरलेन्सची मुलगी जोन; तिची ती पवित्र तलवार, तिचा तो मोठा आणि सतत यशोगिरीवर फडकणारा झेंडा,

महत्त्वाकांक्षी मन, मोठें काम करून दाखवावयाची इच्छा आणि तयारी होती तिच्यांत. एवढ्या थोडक्या गोष्टींनीं फ्रान्सच्या सैन्यांत उत्साहाचें वारें खेळूं लागलें. प्रत्येक सैनिकाच्या हृदयांतून उत्साह जणूं वाहात होता. राजांत हें सामर्थ्य नव्हतें. मोठमोठ्या राजनीतिज्ञानांही हें अशक्य होतें. साऱ्यांत उत्साह आला, स्फूर्ति आली, जोर आला, विजयानें त्यांनीं सारें आकाश दणाणून सोडलें. प्रत्येकाला आपल्या शक्तीची जाणीव व्हायला हवी. प्रत्येकाला ही झाली, तो आपलें सामर्थ्य ओळखूं लागला, तर भयंकर दिव्यें करून दाखवितो. साऱ्या जगाला दिपवितो तो. परंतु तेथें "उत्साहाचें अधिष्ठान पाहिजे." उत्साहमूर्तीच्या प्रसादानें सारें शक्य होतें. परमेश्वर म्हणजेच उत्साहाची मूर्ति. आपले सारे सण पाहा. वर्षभर विखुरलेले आहेत. चैत्रांत पाडवा, रामनवमी आणि हनुमानजयंति; वैशाखांत रसपानें ेतात, तसेंच शंकराचार्यजयंति ह्याच महिन्यांत; ज्येष्ठांत शिवजयंति, श व्याचीं दानें; आषाढांत एकादशी; श्रावण म्हणजे तर सणांचा राजा, नाह प्रेमाचें निदर्शन करणारी राखी-पौर्णिमा, श्रीकृष्णाचें पुण्यस्मरण आणि उत्साहाचें दिग्दर्शन करणारी कृष्णाष्टमी, कर्मप्रतिष्ठा करणारा या ; भाद्रपदांत गौरी–गणपतींचें आगमन; आश्विनही तसाच सणांचा संक पति, विजयादशमी, दिवाळी ह्याच महिन्यांत; कार्तिकांतली कार्तिकी एकादशी कोण विसरेल? मार्गशीर्षांतली जगाला कर्मयोग उ कविणारी गीताजयंति, चौवीस गुरु करून आदर्श ज्ञानाचा धडा णाऱ्या दत्ताची जयंति; पौषांत तिळासारखा स्नेह आणि गुळासारखी गोडी शिकविणारी मकरसंक्रांत; शिवरात्र माघांतली, "समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळीं कोण आहे?" ची गर्जना करणाऱ्या रामदासांची दासनवमी; फाल्गुनांतली ती शिवजयंति आणि उत्साहाची आग धगधगवणारी होळी. आमच्या सणांची रचनाच

अशी आहे, कीं आम्हांला बारा महिने उत्साह मिळावा. पण त्या सणांच्याकडे आतां आपण निराळ्या दृष्टीनें पाहायला मात्र हवें. त्यांतून आपण राष्ट्रीय स्फूर्ति निर्माण करायला हवी. याच्याच जोडीला स्थानिक यात्रा वगैरे असतातच. आमच्या पूर्वजांनीं उत्साहाचें महत्त्व ओळखूनच आमच्या जीवनांत उत्साहाची सृष्टि केली आहे.

वेस्ट मिन्स्टर ॲबे साऱ्यांना ठाऊक आहे. इंग्लंडमधलें सर्वोत्कृष्ट आणि भव्य चर्च आहे. तिथल्या एका थडग्यावर लिहिलें आहे, "या खालीं लंडन नगरीची व या चर्चची रचना करणारा अमर कलावान ख्रिस्तोफर चिरनिद्रा घेतो आहे. परमेश्वरानें त्याला जनसेवा करण्यासाठीं ९० वर्षं आयुष्य दिलें. त्याचें स्मारक का तुम्हांला पहायचें आहे? चारी दिशांना नजर फिरवा. हीं दिसतात हीं सारीं त्याचींच स्मारकें."

साऱ्या लंडनभर ख्रिस्तोफर रेनची कला पसरली आहे. त्याच्या कलेची मधुर मोहिनी साऱ्या लंडनभर आहे. त्याला बालपणीं शिक्षण मिळालें नव्हतें. एक फक्त उत्साहाचेंच भांडवल होतें त्याच्याजवळ. साऱ्या लंडनभर त्याच्याच अमर कलाकृतीचे नमुने. आपलें सारें जीवन त्यानें उद्योगीपणें खर्च केलें. त्यानें आपले सगळे उद्योग उत्साहानें केले. ५५ येशूचीं मंदिरें व ३६ मोठमोठालीं सार्वजनिक सभागृहें तयार केलीं त्यानें. त्याचें कौशल्य हॅम्पटन कॅसीग्टनच्या महालच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून दृग्गोचर होतें. टेम्पलकॉर, डेरलेन रॉयल एक्सचेंजमधून त्याचें कौशल्य जणूं ओसंडतें. ह्या इमारतींचा प्रत्येक भाग, पाहणाराला आपल्या कर्त्याचें गुणवर्णन करायला जणूं हाका मारतो. पस्तीस वर्षं तो राबला, न कंटाळतां, न थकतां त्यानें परिश्रम केले. सेंट पॉल चर्च ही त्याची सर्वोत्कृष्ट रचना. प्रत्येक काम करतांना उत्साहाचें वारें त्याच्या नसानसांतून वहातेंसें वाटे. त्याचा एकच मित्र होता. मरेपर्यंत

त्यानें त्याला सोडलें नाहीं. संकटाच्या व वैभवाच्या वेळींही तो त्याला सोडून गेला नाहीं आणि तो म्हणजे उत्साह. हा मित्र त्याच्यापासून एक क्षणही दूर झाला नाहीं. जणूं रामाचा हनुमान! सदा कामाला सिद्ध.

बेपर्वाई ही विजयी सेनेचें कधींच संचलन करीत नाहीं. जिथें बेपर्वा वृत्ति आहे, तिथें विजय कसा राहणार? जगाला जीवन, स्फूर्ति देणाऱ्या मूर्ति बेपर्वाईनें तयार होत नाहींत. जगाला कार्यप्रवण करणाऱ्या मूर्ति बेपर्वाईनें कशा बनणार? बेपर्वा वृत्तीनें निसर्गावर ताबा मिळवितां येत नाहीं. बेपर्वाई म्हणजे मृत्यु. बेपर्वा मनुष्याला कसली जाणीव असणार?

उत्साहाच्या पायांवरच जगांतले मोठमोठे शोध लागले आहेत. जगांतील सारीं मोठमोठीं कामें उत्साहाच्याच जोरावर झालीं. उत्साहानेंच होकायंत्राचा शोध लावला. छापखाना कोणीं काढला? गॅलीलिओच्या दुर्बिणीच्या नळ्या कोणीं बनवल्या? जगाला नवीन नवीन गोष्टींचें दर्शन देणाऱ्या दुर्बिणीची रचना उत्साहानें केली. कोलंबसाला बहामांत कोणीं पोहोंचविलें? देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शिर घेऊन लढायला स्वातंत्र्यवीरांना कोणीं उद्युक्त केलें? आपल्या रक्तानें मायभूमीला सिंचून तिच्यांत प्राण पेरून जीवनाचें पीक कोणीं काढलें? आफ्रिकेच्या घोर जंगलांत सेवा करायला हातांत कुऱ्हाड घेऊन लोकांना कोणीं पाठविलें? महात्माजींच्या हातून एवढीं राष्ट्रसंवर्धक कामें कोणीं घडविलीं? 'तळहातावर शिर घेऊन लढायला तयार असलेलीं ५०० माणसें मला द्या, मी सशस्त्र बंड उभारतों, असें म्हणायला विवेकानंदांना कोणीं शिकविलें? आपला मायदेश सोडून भारताच्या थोर संस्कृतीचा प्रचार करण्यासाठीं मार्गारेट इ. नोबलला भगिनी निवेदिता कोणीं बनविलें? भारताच्या स्वातंत्र्ययुद्धांत पूर्णाहुति देणारे सैनिक कोणीं तयार केले? वयाच्या ३५ व्या वर्षीं ईश्वरचंद्र विद्यासागरांना इंग्रजीचे धडे घ्यायला

कोणीं तयार केलें ? आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं मोठीं कामें केलीं, त्यांना उत्साहानेंच कार्यप्रवण केलें होतें. उत्साहमूर्ति झाल्याशिवाय त्यागमूर्ति, ध्येयमूर्ति कसें होतां येणार ? उत्साह ही जननी आहे.

व्हिक्टर ह्यूगोनें " नॉट्र डॅम " पुस्तक लिहिलें. पुस्तक लिहितांना जणुं उत्साहाचे पूर भावनेच्या गंगेशीं मिसळून त्याच्या कागदावर उमटत. साऱ्या जगाला तो विसरे. त्याला जेवणाची शुद्ध नसे, कीं कपड्यांची शुद्धि नसे. फक्त उत्साहाच्या जोरावर तो सारें सुखदुःख विसरूं शके. उत्साहवीर अशक्य गोष्टी शक्य करून दाखवितो. उत्साहानें सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीवर जगाचा विश्वास बसतो. उत्साहानें आत्मविश्वास निर्माण होतो. निरुत्साही माणसाजवळ आत्मविश्वास नसतो. दुसऱ्याची उन्नति त्याला सहन होत नाहीं. तो दुसऱ्याचा सदैव द्वेष करतो आणि जग त्याचा तिरस्कार करतें. उत्साही मनुष्य निरुद्योगी, आळशी असूंच शकत नाहीं. उत्साहानें उच्चारलेला प्रत्येक शब्द ऐकणारांच्या हृदयांत क्रांति करून सोडतो. रडव्या माणसाला जगांत स्थान नाहीं. उत्साह संक्रामक आहे. एकाचा उत्साह पाहून दुसऱ्याला काम करायला स्फुरण चढतें. एक काम उत्साहानें करणारा दुसरीं कामेंही उत्साहानेंच करूं लागतो.

उत्साही मनुष्य म्हणजे तरुण मनुष्य. मग त्याचें वय कितीही असो. त्याच्या तोंडांत दांत आहेत कीं नाहीं, त्याच्या गालावर लाली आहे कीं नाहीं, त्याच्या शरीरावर मांस असो कीं नसो, तो तरुणच. उलट नवीन शिकण्याचा ज्याचा उत्साह मावळला, तो वयानें तरुण असूनही म्हाताराच. काम करण्याची टाळाटाळ म्हणजे म्हातारपण.

ज्या वेळीं आपल्या देशांतच फिरणें कठीण होतें, त्या वेळीं चीनचा यात्रेकरू तो ह्युएनत्संग कशाच्या जोरावर हिमालय ओलांडून आला ? त्याला तर इकडली भाषासुद्धां ठाऊक नव्हती. फक्त एक उत्साहाचें भांडवल त्याच्यापाशीं होतें आणि त्याच्याच आधारावर त्यानें हिमालय

ओलांडला आणि भारताची ग्रंथसंपत्ति तिकडे नेली. साऱ्या चीनचा उत्कर्ष झाला. परमेश्वर उत्साहमूर्ति आहे. उत्साहाची ज्याच्यावर कृपा झाली, तो लंगडा असला तरीही पर्वत ओलांडील. मुका असला तरीही बोलूं लागेल. आंधळा असला तरी तो जगाकडे पाहूं शकेल. बंगालमध्यें विधानचंद्र रॉय प्रोफेसर आहेत. ते आंधळे आहेत जन्मापासून, पण उत्साहाच्या जोरावर ते प्रोफेसर होऊं शकले. सूरदास आंधळा होता, पण साऱ्या जगाचे व्यापार जणूं त्याला दिसत. नाशिकचे राष्ट्रीय कवि शाहीर गोविंद लंगडे होते. त्यांचा जन्महीं एका गवंड्याच्या कुळांतला, पण उत्साहाच्या जोरावर ते द्रष्टे झाले. आणि ते प्रसिद्ध कादंबरीकार नाथमाधव. ते पांगळे होते परंतु ते रडत बसले नाहींत. त्यांचा केवढा वाग्विलास. मराठीचे ते भूषण आहेत. उत्साहरूपी परमेश्वराच्या भक्ताला अशक्य काय आहे ?

फ्रान्सिस पार्कमननें प्रशंसनीय कार्य केलें. त्याच्यासारखे उत्साही जगांत थोडेच. हॉवर्डमध्यें विद्यार्थी असतांनाच त्यानें अमेरिकेंतल्या इंग्रज नि फ्रेंचांचा इतिहास लिहिण्याचें निश्चित केलें होतें. त्यानें आपलें सारें आयुष्य एकाच कामांत खर्च केलें. त्याचाच ध्यास होता त्याला. इतिहासाची सामुग्री जमा करतां करतां त्याचें आरोग्य बिघडलें, डोळे खराब झाले, त्याची शक्ति कमी झाली ; पण त्याचा उत्साह कमी झाला नव्हता. तो काम करीतच राहिला. जगाला त्यानें अमोल ग्रंथरत्न बहाल केलं. त्याची कीर्ति अजरामर झाली. उत्साहाच्या अविरत भांडवलावरच त्यानें हा धंदा केला. यशस्वी धंदा उत्साहाच्याच भांडवलावर होतो. " तुझ्यापुढचीं संकटें पळतील, पण तूं पळूं नकोस. संकटें हटतील, तूं हटूं नकोस. फक्त उत्साहाची शिदोरी तुजजवळ असली म्हणजे पुरे. "

लिंकन उत्साही होता. एक व्याकरण वाचायचें होतें त्याला. सहा मैलांची रपेट केली त्यानें. व्याकरण आणलें. घरीं गेला तर दिवा नाहीं.

तेल नाहीं. एकामागें एक मेणबत्त्या जाळून त्यानें रात्र जागवली. रात्रभर अभ्यास केला. उत्साह त्याच्याजवळ होता; त्याला कष्ट जाणवलेसुद्धां नाहींत.

युवकावस्था म्हणजे काय? माणसांतला परमेश्वरी अंश, परमेश्वरी ज्योत कोणती? तारुण्याची महती काय? युवकावस्था म्हणजे उत्साहावस्था. युवक म्हणजे उत्साहमूर्ति. उत्साहमूर्तीला भविष्यकाळांत अंधार दिसत नाहीं. मांजराला अंधारांत दिसतें, तर उत्साहाची दिव्य दृष्टि प्राप्त झालेल्याला भविष्यकाळच्या अंधारांतही दिसतें. त्याच्यापुढें संकटें उभीं राहात नाहींत, अपयश दिसत नाहीं. तो समजतो, माझ्या जातीचा आणि राष्ट्राचा उद्धार करण्यासाठींच माझा जन्म आहे. हे कांहीं त्याचे वायफळ शब्द नसतात; हा त्याचा आत्मविश्वास असतो. जगाला सन्मार्गाला लावायचें काम माझें आहे हें तो ओळखतो. त्याच्या ह्या सुंदर आशा, उत्साहाच्या उपवनांत, परमेश्वराच्या कृपाछत्राखालीं कधींच कोमेजून जात नाहींत. वयावर युवावस्था अवलंबून नाहीं. ती आहे आपल्याजवळच्या उत्साहाच्या खजिन्यावर अवलंबून.

उत्साहानें प्रेरित व्यक्ति सूर्याशीं बरोबरी करूं शकते. पवनसुत हनुमान उत्साहाचा पुतळा आहे. भारतीयांचा तोच आदर्श आहे. त्याला तालमींतले हिंदु भजतात, मुसलमानही भजतात. त्याच्या रोमरोमांतून जणूं उत्साह ओसंडतो. जन्मल्याबरोबर उत्साहाच्या भरांत तो सूर्याला गिळायला गेला. एवढा मोठा सूर्य, पण तो त्याला बेलफळाप्रमाणें वाटला. उत्साहापुढें मोठालीं कामें सहज शक्य होऊन जातात, किरकोळ बनतात.

शिकंदर तरुण होता. उत्साहाचा जणूं पुतळा. तो जगज्जेता झाला. शिवाजीमहाराज म्हणजे उत्साह. याच उत्साहाच्या जोरावर त्यांनीं पाशवी

राज्य नष्ट केलें. स्वराज्याचीं स्थापना केली. एका सामान्य सरदाराच्या मुलानें भारतावर प्रभुत्व गाजविलें. नेपोलियन फक्त २५ वर्षांचा होता; त्यानें रोमन साम्राज्यावर विजय मिळविला. रोम्यूलस फक्त २० वर्षांचा असतांना त्यानें रोमच्या साम्राज्याची स्थापना केली. न्यूटन तरुण असतांनाच त्यानें मोठमोठे शोध लावले. २१ वर्षें वयाचा होण्यापूर्वींच त्यानें आपला सर्वांत महत्त्वाचा शोध लावला. मार्टिन ल्यूथर, जर्मनींतला सुधारक; वयाच्या २१ वर्षांपूर्वीं त्यानें ढोंगाविरुद्ध बंड पुकारलें. संत ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीची रचना तरुणपणींच संपविली. तारुण्यांत सर्व शक्ति शाबूत असतात. या शक्तींना उत्साहाची जोड मिळाली तर जगांत अशक्य असें कांहीं नाहीं. चेस्टरटनची बरोबरी वयाच्या २१ व्या वर्षींही कोणताच कवि करूं शकत नव्हता. व्हिक्टर ह्यूगोनें वयाच्या २१ व्या वर्षीं एक दुःखान्त कादंबरी लिहिली, तर वि. स. खांडेकरांनीं वयाच्या १२ व्या वर्षीं नाटक लिहिलें. आगरकरांनीं लिखाणाला बालपणींच सुरुवात केली होती. आणि मौलाना आझाद; त्या बाललेखकाला पाहून आणि त्याचें स्फूर्तिदायक लिखाण पाहून लोकांना आश्चर्य वाटे.

पाश्चात्य देशांचें हवामान त्यांच्यांत सतत उत्साह टिकवील असें आहे. आपल्याकडलें तसें नाहीं. आपल्या वातावरणानेंच कित्येक वेळीं कामाचा कंटाळा येतो. पण आपलें वैशिष्ट्यही त्यांतच आहे. अनुकूल वातावरणांतून मार्ग काढण्यापेक्षां परिस्थितीचे गुलाम न होतां ती प्रतिकूल असतां तिच्यावर मात करणें हें श्रेष्ठत्वाचें द्योतक आहे. आपण उत्साही बनलों तर खरें श्रेष्ठत्व आहे. ज्यांच्यामध्यें उत्साह नसतो ते दुसऱ्याची उन्नति सहन करूं शकत नाहींत. ते दुसऱ्याचा द्वेष करूं लागतात आणि मग जनता त्यांचा तिरस्कार करूं लागते. ते आपल्यापेक्षां मोठ्यांची कल्पनाही करूं शकत नाहींत, इतकें त्यांचें मन क्षुद्र बनतें. आपल्या मनांतले भाव आपण आपल्या जवळच्या वातावरणांत पसरवीत असतों. आपण

मुर्दादिल, निरुत्साही असणें, आपला चेहरा रडवा ठेवणें हा सामाजिक दृष्टीनें गुन्हा आहे. आपण नेहमीं उत्साही असलें पाहिजे. आपल्यासाठीं नव्हे, तर समाजासाठीं.

उत्साह आपल्यासमोर येणाऱ्या संकटकंटकांना पायानें तुडवितो. हाच उत्साह जर म्हातारपणापर्यंत टिकला, तर तो सारें जग हालवूं शकतो. उत्साहाला अनुभवाची जोड मिळते, त्यांत विवेक येतो. प्रयत्नांना ज्ञानाची जोड मिळते. भारताचे प्राण महात्माजी. मरेपर्यंत तरुणांनाही लाजवील असा त्यांचा उत्साह होता. त्यांच्यापुढें कार्यक्रमाचे ढिगारे असत पण त्यांना कंटाळा असा ठाऊकच नाहीं. जवाहरलाल नेहरू साठींत आहेत, पण हृदयांतून जणूं उत्साह ओसंडत असतो. जवाहरलालजींना आपण सारेच तरुण समजतों. सरहद्द गांधी अब्दुल गफारखान उत्साहाची जणूं मूर्ति. मैलोगगती पायीं फिरतात. उत्साहानें गणवेश घालून अजूनही कवाइत करतात. सेवादलाचे आद्य प्रणेते डॉ. हर्डीकर म्हणजे उत्साह. अजूनही सेवादलाचा जोमानें प्रचार करायची उमेद त्यांच्यांत आहे. लोकमान्य टिळक मरेपर्यंत उत्साहीच होते. तरुणच होते ते. इंग्लंडचे मुख्य प्रधान विन्स्टन चर्चिल ऐशींत आहेत, पण एकाद्या तरुणाच्या उत्साहानें युद्धकार्याचें संचालन त्यांनीं केलें. आणि महाराष्ट्रांतल्या त्या दोन महर्षींना कसें विसरतां येईल. ते अण्णासाहेब कर्वे. वयाची शंभरी असूनही केवढा त्यांचा उत्साह. अजून नवरचना करीन अशी केवढी उमेद त्यांना वाटते. अजूनही आपल्या संस्थेसाठीं पै पैसा जमवीत ते फिरत असतात. आणि ते सेनापती बापट. इंद्रियेंसुद्धां असहकार करूं लागलीं तरी त्यांचा उत्साह त्यांना दाद देत नाहीं; साने गुरुजींच्या मंदिरप्रवेश दौऱ्याच्या वेळीं वृद्धावस्थेंत ते सारखे महाराष्ट्रभर फिरत. आजही संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला त्यांची तयारी आहे. ह्या वृद्धांचा उत्साह तरुणांना चेतना देणारा झाला पाहिजे. सरदारजी आणि

राजाजी यांना तरी कोण विसरेल. इतक्या वृद्धापकाळीं राष्ट्राचीं सूत्रें ते सांभाळीत आहेत आज.

ऐशीं वर्षांच्या ग्लॅडस्टनमध्यें जी शक्ति होती, जो उत्साह होता, जें तेज होतें, तें आजच्या २५ वर्षांच्या तरुणांतही नसतें. पांढऱ्या केसांना द्यायचा मान म्हणजे त्यांच्या उत्साही परंतु अनुभवीपणाला द्यायचा मान! नुसतें काम करणें म्हणजे उत्साह नव्हे; आनंदानें काम करणें म्हणजे उत्साह. कामाचा बोजा वाटतां कामा नये. तें आनंदरूप वाटलें पाहिजे.

डॉ. जॉनसन एक खंदा लेखक होता. त्यानें अनेक उत्तम ग्रंथ लिहिले, परंतु त्याचें "कवींचें जीवनचरित्र" हें सर्वोत्कृष्ट आहे. वयाच्या ७८ व्या वर्षी तें त्यानें लिहिलें. डॅनियल डेफोनें वयाच्या ५८ व्या वर्षी "रॉबिन्सन क्रूसो" लिहिलें. न्यूटन वयाच्या ८३ व्या वर्षांपर्यंत उत्साही होता, कर्तव्यनिष्ठ होता. एक्यांशीं वर्षांपर्यंत प्लेटो लिहीत असे. वयाच्या ८६ व्या वर्षी स्टॉम स्कॉटनें हिब्रू भाषा शिकायला सुरुवात केली. 'गति नियम' तयार करतांना गॅलिलियोचें वय ७० वर्षांचें होतें. वयाच्या ८५ व्या वर्षी जेम्स वॅट जर्मन शिकला. आपल्या "कॉसमॉस" ची समाप्ति हॅम्होल्टनें ९० व्या वर्षी केली. ह्या म्हाताऱ्यांचा उत्साह पाहूनही का आपल्याला उत्साह नाहीं येणार? लाजेनें नाहीं का आपल्या माना खालीं लवत? आपल्या इंद्रियांच्या शक्ति कमी झाल्या, तरीही ते उत्साही होते; मग आपल्या इंद्रियशक्ति कायम असतांना आपण निरुत्साही कां? निराश कां? उठूं, तेजानें उठूं या; उत्साहानें कामाला लागूं या. उत्साहाच्या भांडवलावर केलेला धंदा, मग तो कोणताही असला तरी यशस्वी होणारच. उत्साही माणसाला अपयशाची भीति नसते. यशाविषयीं तो साशंक नसतो. संकटें त्याला कार्यपराङ्मुख करूं शकत नाहींत. उत्साह म्हणजे जिवंतपणा, उत्साह म्हणजे जीवनाचा महामंत्र; उत्साहानें काम करतो तो जिवंत. निरुत्साही, निराश म्हणजे का जिवंत? जर्मनीचा भाग्यविधाता बिस्मार्क

८० वर्षांचा होता. केवढी शक्ति आणि उत्साह होता त्याच्यांत! महाकवि लॉंगफेलो, टेनिसन यांनीं आपल्या सर्वोत्तम रचना सत्तरींत केल्या. विश्वकवि रवींद्रनाथ टागोरांचा उत्साह मरेपर्यंत होता. स्वर्गीय रामानंद चतर्जी मरेपर्यंत मॉडर्न रिव्ह्यूंत लिहीत.

उत्साहाची ज्योत मंद होऊं देऊं नका. जिवंत असेपर्यंत ती तेवत ठेवा. उत्साहाच्या प्रकाशांत आपलीं कामें करा. निरुत्साहाच्या अंधारांत तीं नका करूं. अंधारांतलीं कामें का कोठें यशस्वी होतात? उत्साह म्हणजे प्रकाश; उत्साह म्हणजे मंगल प्रभात. मंगल प्रभातकाळीं काम करतांना का कोणी थकेल? उत्साहाचे किरण यशोमार्गच दाखवितात. उत्साह म्हणजे दिव्य जीवन.

जगांत तुम्ही एकच जिवलग मित्र करा, कीं जो संकटकाळींही तुम्हांला सोडून जाणार नाहीं. संकटांत जो तुम्हांला मदत करील, असा एकच मित्र आहे. अदृश्य रूपानें तो तुमचें रक्षण करील. परमेश्वराप्रमाणें तो तुमची पाठराखणी करील. हा मित्र म्हणजे उत्साह. तुम्हीं त्याला आपल्या हृदयाशीं धरा. आपलासा करा. उत्साही माणसाला जगांत अशक्य कांहीं नाहीं.

## उत्साह म्हणजे काय?

पुढें मिळणाऱ्या आनंदाच्या कल्पनेनें जें सुख मिळतें त्याचेंच नांव उत्साह. उत्साह आपल्याला निर्माण करतां येतो. आपण जें काम हातांत घेतलें असतें, तें पूर्ण यशस्वी होईल ही मनांत खात्री असली म्हणजे उत्साह निर्माण होतो. उत्साह हा स्वस्थ बसूं देत नाहीं. तो आपल्याला कार्यप्रवण करतो. उत्साह म्हणजे साहस. उत्साहांत आनंद हवा. आनंदाशिवाय केलेलें काम म्हणजे उत्साहानें केलेलें काम नव्हे. शुभ

परिणामावर लक्ष ठेवून, दूरवर्ति पण चिरसुखाकडे दृष्टि ठेवून तात्कालिक दुःख, अपमान यांची पर्वा न करतां नेहमीं आनंदी वृत्ति ठेवणारे म्हणजे उत्साही. मग त्यांना कारागृह राजमहालाप्रमाणें व शृंखला पुष्पहाराप्रमाणें वाटतात. उत्साह नेहमीं चांगल्या कामाबद्दलच असतो. उत्साह क्रियाशील आणि आनंदपूर्ण आहे. उत्साही वाचिवीर, बुद्धिवीर नसतो, तर तो कर्मवीर असतो.

उत्साह तीन गोष्टींनीं निर्माण होतो —

१ कर्मभावनेनें उत्पन्न

२ फलभावनेनें उत्पन्न

३ संक्रांत उत्साह.

कर्मभावनाप्रेरित उत्साहच खरा उत्साह असतो. कर्म सुरू करतांना तो जितका आनंदी असतो तितकाच तो शेवटपर्यंत असतो. कर्म आणि फल एकमेकांस चिकटलेलें आहे असा त्याचा विश्वास असतो. कामांत येणाऱ्या अडचणींनीं फल लांबलें तरीही त्याचा उत्साह कमी होत नाहीं.

फलभावनेनें उत्पन्न झालेला उत्साह फलप्राप्तींतील आशा-निराशांच्या झोक्याबरोबर कमीजास्त होतो. कर्मभावनाप्रधान आनंद सुरुवातीपासून शेवटपर्यंत तितकाच असतो. फलभावनाप्रसूत आनंद लोभाचेंच एक रूप असल्यानें त्याज्य आहे. थोडेंसें काम करतांच जर त्याला थोडेंही फळ दिसलें नाहीं, तर तो काम सोडून देतो. फळापर्यंत नेऊन पोहोंचविणारा कर्मपथ जोंपर्यंत चांगला वाटत नाहीं, तोंपर्यंत फल चांगलें वाटून काय उपयोग ? फलभावनेनें आलेल्या उत्साहांत उतावीळपणा येतो आणि फल दूरच पळतें. फलभावनेनें आलेल्या उत्साहामुळें जुगारी वृत्ति होते. कर्मीत कमी श्रमांत जास्तींत जास्त श्रेय मिळावें अशी माणसांत इच्छा

निर्माण होते. हें वाईट आहे. गीतेनें म्हणूनच फलासक्तीचा निषेध केला आहे. क्रियेच्या आरंभापासून अंतापर्यंत टिकून राहील तोच खरा उत्साह. आपलीं कामेंच इतकीं उत्तम असावींत, कीं कामांतच फलप्राप्तीचा आनंद मिळावा.

कधीं कधीं एका कामांत निर्माण झालेला उत्साह दुसऱ्या कामांतही उपयोगी पडतो. हाच संक्रांत उत्साह. दुसऱ्या कामावर अवलंबून असल्यानें हा तितकासा श्रेयस्कर नाहीं.

हिंदुस्थानांत उत्साहाचें दर्शन होत नाहीं असें नाहीं. परंतु आपल्याकडे असलेला उत्साह हा बहुधा प्रसंगनिष्ठ असतो. प्रसंग आला कीं उत्साहाला पूर येतो आणि प्रसंग संपला कीं झालें! सगळीकडे मग आळीमिळी गुपचिळी. हें असें कां होतें ? काय याला कारण ? गांधीजयंती आली, गांधीजी व्हावेंसें वाटतें. जयप्रकाशांचें व्याख्यान ऐकलें, जयप्रकाश व्हावेंसें वाटतें. केतकरांची पुण्यतिथि आली, समाजाच्या रूढ कल्पनांना धक्के देणारा क्रांतिकारी लेखक व्हावेंसें वाटतें. कशावसुतांची पुण्यतिथि आली, कीं कवी व्हावेंसें वाटतें. लिंगेडसाठीं जाणारे खेळाडू पाहिले, कीं भारतीय व्यायामांत प्रावीण्य मिळवावेंसें वाटतें आणि क्रिकेटियरचा सन्मान झाला, कीं हातीं बॅट घ्यावीशी वाटते. काय होऊं नि काय नको असें तरुणांना होऊन जातें. गणपति पाहिला कीं त्याची उपासना, मारुति पाहिला कीं त्याचें भजन — हें असें कां ? याला कारण म्हणजे जीवितध्येयाचा साक्षात्कार झालेला नसतो. मी कोण उत्कृष्ट होऊं शकेन याचा विचार नसतो. आपल्या जीवनध्येयाचा साक्षात्कार होणें हें मानवाला मिळणारें सर्वोच्च भाग्य आहे. हें भाग्य जितक्या लवकर आपल्या वांट्याला येईल तितकें आपलें जीवन सुखी, समाधानी आणि उत्साहानें परिपूर्ण होऊं शकतें. यशस्वी होऊं शकतें. आपल्या जीवितध्येयाचा साक्षात्कार करून घेणें हें मानवी-जीवनाचें सर्वोच्च भाग्य आहे, यश आहे. जीवितध्येयाचा

साक्षात्कार झाला कीं मग बाह्य परिस्थितीवर मनुष्याचें मन हेलकावे खात नाहीं. मनांत क्षोभतरंग निर्माण होत नाहींत. मग फक्त उत्साहतरंगच तेवढे निर्माण होतात.

उत्साह हा जीवनव्यापी असला पाहिजे. उत्साह म्हणजे आनंद. आनंदाचे सागर मनांत अखंड हेलावत असले पाहिजेत. मागें एकदा अच्युतराव पटवर्धनांनीं बेचाळीसच्या क्रांतीमधील आपले अनुभव सांगितले. म्हणाले, " आमचें वर्तन कसें असतें ? एक शेर आहे. कवी म्हणतो —

हम सूलीपे चढ सकते हैं
लेकिन साइकलपर नहीं।

म्हणजे आम्ही देशासाठीं सुळावर जायला तयार आहोंत, पण तुम्ही जर म्हणाल कीं सायकलवर जाऊन एवढें पत्र पोस्टांत टाकून या, तर तें आमच्यानें होणार नाहीं. सुळावर चढायची तयारी आहे, त्यांतही आनंद मानण्याची उमेद आहे, तर तीच उमेद, तोच उत्साह सर्वत्र संचरूं द्या. सर्व कामांत तुमच्या उत्साहाचें दर्शन होऊं द्या.

हल्लीं असा समज सर्वत्र आहे कीं हिंदुस्थान फार गरीब आहे. अमरिका किती संपन्न ! परंतु संपन्नता-विपन्नता, श्रीमंती-गरिबी कशाला म्हणतात ? आपण उत्साहदरिद्री, कल्पनादरिद्री. अमेरिकेंतले लोक उत्साहसंपन्न, कल्पनासंपन्न. आज इंग्लंड तर आर्थिक दृष्टीनें कर्जबाजारी आहे. परंतु त्यांना का गरीब म्हणतां येईल ? नाहीं. त्यांच्याजवळ अपार उत्साहधन असतांना त्यांना गरीब कसें म्हणणार. राष्ट्रभावनेंतून त्यांचा उत्साह उत्स्फूर्त झालेला आहे. किती त्यांचा राष्ट्राभिमान ! राष्ट्राची किती जाणीव त्यांच्या एकेका कृतींतून व्यक्त होते. प्रत्येक मनुष्य समजतो कीं मी माझ्या राष्ट्राचा प्रतिनिधि, माझ्या हातांत सारी राष्ट्राची अब्रू. आणि आमच्याकडे काय

दिसतें ! एवढें स्वातंत्र्य मिळालें पण कुठें उत्साहाचें चिन्ह तरी दिसतें आहे का? इवलाही उत्साहाचा किरण कोठें नाहीं; सारी जनता उदासीन, प्रेतकळा आलेली. देशाबद्दलसुद्धां इतकी अजब उदासीनता जगांतल्या दुसऱ्या कोठल्याही देशांत आढळणार नाहीं. देशापुढें किती सवाल आहेत! उत्पादन वाढलें पाहिजे, साक्षरताप्रचार हवा, दारूबंदी झाली पाहिजे, रस्ते तयार झाले पाहिजेत, तलाव खोदले पाहिजेत, वृक्षारोपण झालें पाहिजे. पण एवढें कार्य असूनही उत्साह नाहीं. एवढ्या मोठ्या कार्यांतूनही ज्या राष्ट्रांत चेतना निर्माण होत नाहीं, उत्साह संचरत नाहीं, त्या राष्ट्राच्या भवितव्याबद्दल साशंकता निर्माण होते. तें राष्ट्र तरणार कीं बुडणार असें वाटतें. आमची सर्व शक्ति इतरांचा उत्साह मारण्यांतच खर्च होत आहे. साऱ्या वृत्तपत्रांचें हेंच कार्य चालू आहे. त्यांची प्रतिज्ञाच अशी आहे कीं कोणाही हिंदी पुढाऱ्याबद्दल देशांत आदर राहूं देणार नाहीं! कशी श्रद्धा निर्माण व्हावी? मांगल्यनिष्ठेशिवाय टिकावू उत्साह येणारच नाहीं. मांगल्यनिष्ठा नसेल तर उदासीनताच सर्वत्र येणार. आज ह्या देशाला उत्साहाची जरूरी आहे, उदासीनता झडझडून टाकण्याची जरूरी आहे. बेफिकिरी निवारण करण्याची जरूर आहे. ज्यांच्यामध्यें भवितव्याबद्दल बेफिकिरी आहे त्यांच्यांत, कोणतेंही भव्य, उदात्त काम समोर उभें राहिलें तरी, उत्साहाचा संचार अशक्य आहे. तरुणांनो, मांगल्यनिष्ठा सोडूं नका, भवितव्याबद्दल बेफिकीर बनूं नका. ज्याच्याजवळ उत्साह आहे, जो उत्साहसंपन्न आहे, तो दरिद्री कधींच राहूं शकत नाहीं, होऊं शकत नाहीं. आपल्या मौंजीच्या मंत्रांतून सुद्धा "आम्हांला सदैव उत्साह असूं दे" अशी प्रार्थना केलेली आहे. तीच आपली प्रार्थना होवो. आपण सारे उत्साही बनलों तर राष्ट्राचें भवितव्य चिंता करण्यासारखें राहणार नाहीं.

# १० : व्यवहारकुशलता

योग्यता सामान्य असली तरी हरकत नाहीं; तीच योग्यता जर कौशल्यपूर्वक खर्च केली तर अलोट कीर्ति मिळते. खूप प्रशंसा होते.

—रोशे कोकाल

चालू युग चतुरांचें आहे. व्यवहारकुशलांचें आहे. चातुर्यापुढें हुशारी, सामर्थ्य सारें कांहीं फिकें पडतें. नुसत्या बुद्धीला चारही दिशांना केवळ अपयशांचे खड्डेच दिसतात, तर व्यवहारकुशल दृष्टीला तींतून पार पडण्याचा मार्ग दिसतो. कौशल्य म्हणजे सगळीकडेच बारकाईनें निरीक्षण करणारे उघडे डोळे, अगदीं सूक्ष्म आवाजाचेंही ज्ञान देणारा संवेदनाक्षम कांन, तत्काळ रसज्ञान करून देणारी व योग्य वेळीं योग्य शब्द बोलणारी जीभ! कौशल्य म्हणजे कार्यक्षम इंद्रियें, हित-अनहिताचें स्पष्ट ज्ञान करून देणारीं कार्यक्षम इंद्रियें. कौशल्यापुढें अडचणींचा उभा पर्वत क्षणांत नाहींसा होतो. व्यवहारकुशलता असलेला मनुष्य कधींही धोका न देणाऱ्या नावेंत बसलेला मनुष्यच होय.

व्यावहारिक कार्यापासून अलिप्त असलेले दोन प्रकारचे लोक आपल्याला आढळतात.आपल्या योग्यतेचा आसुरी विकास करणारे एक. हे लोक आपल्या शक्तींचा आसुरी विकास करतात. यांच्या मोठेपणाचें स्थान भयावर टिकून असतें. जगांत आतंक फैलावून हे आपलें स्थान टिकवितात. कांहीं लोक एका विशिष्ट बाबतींत आपलें जीवनसर्वस्व देतात. कोणी संगीताला कवटाळून नादब्रह्मांत जगाला विसरतात, कोणी नृत्यांत. त्यांच्यांत व्यवहारकुशलता नसते. समाजांत कसें वागावें याचें त्यांना ज्ञान नसतें. जग त्यांना अवलिया मानतें. त्यांच्या कलेचा व्हावा तसा सद्व्यय होत नाहीं. बालगंधर्वांत हीच व्यवहारकुशलता

कमी असल्यानें त्यांना आपले म्हातारपणचे दिवस अत्यंत कष्टांत काढावे लागत आहेत. दुसरे ज्यांना आपण अव्यवहारी किंवा व्यवहारकुशल नाहीं असें समजतों, पण जे वास्तविक अत्यंत व्यवहारकुशल असतात ते आपले साधुसंत. त्यांना आपण अव्यवहारी समजतों, पण त्यांचा व्यवहार म्हणजे जगाचा व्यवहार. त्यांना जगाचा संसार चालवावयाचा असतो. त्यांचें व्यावहारिक कौशल्य उदात्त असतें, भव्य असतें. त्यांची व्यावहारिकता उच्च दर्जाची. पण साध्या व्यवहारांत जो कौशल्य दाखवील तोच इतर बाबतींतही दाखवील. स्वामी रामकृष्ण परमहंस हिंदुस्थानचे थोर संत. त्यांच्याकडे अनेक शिष्य असत. एका शिष्याला त्यांनीं चार आणे देऊन बाजारांत भाजी आणायला पाठविलें. शिष्यानें दोन पैशांच्या भाजीला चार आणे दिले व तो परत आला. रामकृष्ण रागावले. म्हणाले, " अरे तुला धड भाजी आणायचा सौदा नाहीं करतां आला, तर हा मृण्मय देह देऊन सच्चिदानंद मिळवायचा सौदा तूं कसा करणार ? " रामकृष्ण अत्यंत व्यवहारी होते. आमचे सारे संतही व्यवहारीच. रामदासांनीं जगाचा संसार केला परंतु त्यांनीं सांगितलें —

" आधीं प्रपंच करावा नेटका ! "

आपला प्रपंच अगोदर नीट करायला हवा. ही जबाबदारी योग्य प्रकारें पार पडली, कीं मग व्यापक क्षेत्रांत हाच प्रयोग सहज करतां येईल. आपण संतांना अव्यवहारी समजतों, पण संतांनीं आम्हांला व्यवहारकुशल बनविलें. ऋषींनीं म्हटलें आहे —

" योगः कर्मसु कौशलम् "

आपापलें कर्म कुशलतेनें करणें हें योगापेक्षां कमी प्रतीचें नाहीं. आपलें कर्म सोडून समाज चालेल कसा ? आपलें जें कांहीं कर्म असेल

त्यांतच आपल्याला परब्रह्म दिसायला हवें. गोऱ्या कुंभाराला मडकें घ्यायला येणारा परमेश्वर दिसे. माझें मडकें वंशपरंपरा चालावें ही त्याची इच्छा. कबीर शेले विणी. त्या तारांमध्यें त्याला परमेश्वर दिसे. सुजन कसाई गुरें मारी, तरी कर्मीत कमी त्रास होईल हें पाही. चोखा मेळा महार, सावता माळी, सारे आपल्या कामांत कुशल होते. विवेकानंदांसारखे अनेक तत्त्वज्ञ ह्या हिंदुस्थानांत झाले, पण त्यांच्यांत व्यवहारकुशलता नव्हती; विवेकानंदांत ती होती म्हणून साऱ्या जगभर त्यांनीं हिंदु धर्माची ध्वजा फडकावली. ते महंमद पैगंबराच्या जन्मदिवशीं उपास करीत, येशूला मानीत. त्यांच्यांत किती व्यवहारकुशलता होती!

आज आमचे सारे व्यवहार अकुशलतेनें होतात. आम्ही आमचे व्यवहार अजागळाप्रमाणें करतों आणि आपला अजागळपणा लपविण्यासाठीं संतपणाचें पांघरूण घेतों. संत म्हणजे व्यवहारकुशलता. आजचे आमचे पुढारीही व्यवहारकुशल आहेत. महात्माजी अत्यंत व्यवहारकुशल होते. सुतळीचा तोडाही ते फुकट घालवीत नसत. येणाऱ्या तारांचे पाठकोरे कागदही फुकट घालवीत नसत. त्यांच्या ग्रामोद्योगाला आम्ही हसतों, त्याला अव्यवहारिक ठरवितों; पण ते तसे नव्हते. आम्ही चतकोर कागदावर लिहूं, तर एक कागद कोराच पाठवूं. कार्डावर काम भागत असलें, तरी पाकीट खर्च करूं. मग आम्हांला ग्रामोद्योग महाग कां पडणार नाहीं? गरिबांच्या आशेचा किरण, ती खादी आम्हांला महाग वाटते. पण खादी म्हणजे साधेपणा. चार कपड्यांचें काम दोन कपड्यांत भागविणें. ही व्यावहारिकता महात्माजींत असे. त्यांचा व्यवहार वैयक्तिक नसे. साऱ्या राष्ट्राचा व्यवहार चालवायचा, त्यांत सारें कौशल्य त्यांनीं ओतलें. श्रीमंतांना औषधें मिळतात, महागाईचीं विलायती. पण गांधींची दृष्टि व्यावहारिक. त्यांनीं त्यासाठीं प्राकृतिक चिकित्सेचे प्रयोग केले. हवा, पाणी, माती यांच्या औषधानें प्रयोग करायचें तंत्र त्यांनीं

काढलें. ही त्यांची व्यावहारिकता. एकदा हरिजन फंडाची एक थैली महात्माजींना सभेंत मिळाली. महात्माजींनीं ती स्व. महादेवभाईंच्या हवालीं केली. महात्माजींच्या व्याख्यानांत महादेवभाई थैली विसरले. महात्माजींनीं विचारल्यावर त्यांना थैलीची आठवण झाली, पण उपयोग काय ! महात्माजी म्हणाले, " महादेव, हे पैसे जनतेचे. आपण ते असे हरवून कसें चालेल ? तूं एवढे पैसे मिळवून द्यायला हवेत." महादेवभाई आपलीं दिवसाचीं कामें सांभाळून रात्रीं लेख लिहीत. त्यांनीं ते पैसे मिळविले व गांधींना दिले. ही व्यावहारिकता, हें कौशल्य हवें. हें यश देतें.

आज आमचें जीवन कलाकौशल्यविहीन झालें आहे. कलाकौशल्य आज प्रदर्शनांत दिसतें. तें व्यवहारांत नाहीं. पूर्वी कला जीवन व्यापून राहात असे. आमच्या प्रत्येक कामांत कौशल्य होतें. प्रदर्शनांत मसाले लावून मेलेले प्राणी जसे ठेवतात तसें आम्हीं आज कौशल्याचें केलें आहे. कौशल्य व्यवहारांत राहिलेंच नाहीं. आज दुकानांवर सुंदर, आकर्षक पाट्या दिसतात, पण आमचीं अक्षरें मात्र वाईट. कौशल्य व्यवहारांत दिसायला हवें. आमच्यांत समजूत आहे, सगळ्या मोठ्या लोकांचीं अक्षरें वाईट ! पण हें खोटें आहे. बाळासाहेब खेर, अणे, वगैरेंचीं अक्षरें चांगलीं आहेत. शिवाय ज्यांचीं अक्षरें वाईट आहेत, ते सारे कांहीं पुढारी नाहींत. महात्माजींचें अक्षर वाईट होतें. त्यांना त्याबद्दल फार वाईट वाटे. त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे, " वाईट अक्षर असणें हें अपुऱ्या शिक्षणाचें द्योतक होय." गांधींजींना सारें कौशल्य, कला जीवनांत ओतलेली, व्यावहारिक हवी असे. हें नुसत्या अक्षराचें झालें. इतर व्यवहारांतही हेंच आहे. पूर्वी स्वतःच्या कलेला, कौशल्याला महत्त्व होतें; आज बाजारची कला आणून आम्ही आपलें जीवन नटवितों. कला व्यावहारिक नसेल तर तिचा काय उपयोग ? आमचें जीवन आज

कौशल्यविहीन झालें आहे. जीवनांत, व्यवहारांत कौशल्य आणायला हवें. जपानांत रोजच्या व्यवहारांतल्या साध्या वस्तू, भांडींकुंडीं, भिंती ते कलामय करण्याचा प्रयत्न करतात.

डॅनियल मोठा कायदेपंडित. त्यानें चालविलेल्या खटल्यांत त्याला हटकून यश मिळे. असाच एक मोठा खटला त्यानें चालविला. फी म्हणून हजारोंच्या नोटा त्याला मिळाल्या. पैसे मिळाले तेव्हां तो एक पुस्तक वाचीत होता. कांहीं दिवसांनीं त्याला रकमेची आवश्यकता वाटली, परंतु त्याला नोटा सांपडत ना. नंतर एक दिवस आपल्या कायद्याच्या एका पुस्तकाचीं पानें चाळतांना त्याला एक नोट सांपडली. कांहीं पानें उलटल्यावर त्याला दुसरी सांपडली. हरवलेले सारे पैसे त्याला परत मिळाले. वाचनाच्या नादांत खुणेसाठीं त्यानें नोटाच ठेवल्या होत्या पानांत. व्यावहारिक कौशल्याच्या अभावीं त्याला तें धन योग्य वेळीं उपयोगीं पडलें नाहीं. जें धन योग्य समयीं उपयोगीं पडत नाहीं तें व्यर्थ होय. आमच्या पत्रांचेंही असेंच होतें. आम्ही पत्रांसाठीं निश्चित जागा ठरवीत नाहीं. उत्तर द्यायच्या वेळीं पत्राची आठवण होते, पण पत्र सांपडत नाहीं. आमच्या साऱ्याच व्यवहारांत कुशलता यायला हवी.

कित्येक लोक विचारांत इतके मग्न होऊन जातात, कीं त्यांच्यांत विवेक नसल्यासारखें वाटतें. प्रोफेसर लेसिंग एक दिवस विचारमग्न अवस्थेंत घरीं गेले. संध्याकाळची वेळ, साधारण अंधुक अंधुक दिसत होतें. त्यांनीं आपल्या घराचें दार ठोठावलें. नोकरानें वरूनच बघितलें. अंधारांत त्याला प्रोफेसरांचा चेहरा ओळखूं आला नाहीं. तो त्यांना दुसरेच कोणीतरी समजला व म्हणाला, " प्रोफेसरसाहेब घरीं नाहींत. " " अच्छा " म्हणून प्रोफेसरसाहेब निघून गेले. व्यवहाराचा सुद्धा त्यांना विसर पडला. अशा लोकांच्या हातून कोणतेंच काम कुशलतेनें होत नाहीं.

सीझरनें ब्रिटिश भूमीवर पदार्पण केलें. त्याला ठोकर लागली. तो खालीं पडणारच होता. त्याच वांकलेल्या स्थितींत त्यानें मूठभर वाळू हातांत घेतली. तो म्हणाला, " हें पाहा आपल्या विजयाचें चिन्ह ! इंग्लंड माझ्या मुठींत आहे आतां. " अपशकुनाचा त्यानें शुभशकुनांत बदल केला.

नेपोलियन असाच व्यवहारकुशल. त्याला कैद करून एल्बाबेटांत ठेवलें होतें. तेथून तो निसटला आणि फ्रान्समध्यें येऊन दाखल झाला. त्याला पुन्हां कैद करावें म्हणून फ्रेंच सैन्य पाठविलें. नेपोलियन सिंहासारखा धाडसी वीर, तो डगमगला नाहीं. त्यानें आपल्या कोटाचीं बटनें उघडलीं. तो सैन्यापुढें छाती उघडी करून उभा ठाकला. ओरडून तो म्हणाला, " सैनिक मित्रहो ! तुम्ही का आपल्या मायभूमीच्या प्याऱ्या मुलावर गोळी झाडणार ? तुम्हीच तुमच्या हितकर्त्यांवर गोळ्या झाडणार का ? तुमच्या स्वाभिमानाचें रक्षण करणाऱ्या व तुमच्या शौर्याच्या गगनभेदी भेरी जगभर वाजविणाऱ्या त्या नेपोलियनला का तुम्ही मारणार ? हा पहा मी तुमच्या समोर छाती उघडी करून उभा आहें. " शिपायांचे विचार बदलले. नेपोलियनला कैद करायला आलेल्या सैन्यानें त्याच्या जयघोषानें दिगंत व्यापून टाकलें.

चतुरताहीन तोफेच्या अग्निवर्षावापेक्षां नेमबाज लहान गोळीचा उपयोग जास्त होतो.

नेपोलियन लढाईला निघाला होता. एका नदीच्या किनाऱ्यावर तो आपल्या सेनेसह येऊन पोहोंचला. त्यानें आपल्या मुख्य इंजीनियरला बोलावलें. त्यानें विचारलें, " नदीच्या पात्राची रुंदी किती असेल ? " इंजीनियर म्हणाला, " महाराज, सांगतां येणार नाहीं. माझी सारी सामग्री मागें राहिली आहे. आपण त्यापुढें १० मैल आलों आहोंत. "

" नदीची रुंदी तावडतोब मोजा. " नेपोलियननें फर्मावलें.

" साहेब ... "

" नदीची रुंदी तावडतोब सांगा, नाहीं तर तुम्हांला काढून टाकावें लागेल. "

इंजीनियरला उपाय सुचला. त्यानें आपलें हेलमेट ( शिरस्त्राण ) काढलें. गणिताच्या नियमांचा उपयोग करून त्यानें रुंदी सांगितली. त्याचें म्हणणें नेपोलियनला पटलें. त्याला वरचें पद मिळालें. ह्याला व्यावहारिक कुशलता म्हणतात. हीच नेहमीं उपयोगीं पडते.

जी अडचण पाहून एक मनुष्य कार्यनिवृत्त व्हायची इच्छा करतो, कर्तव्यच्युत होतो, तीच अडचण दुसरा आपल्या व्यवहारकुशलतेनें सोडवितो. अगदीं हसतां खेळतां सोडवून टाकतो. सहजासहजीं त्याला विजय मिळतो.

आज व्यावहारिक शिक्षण नाहीं. सारेंच अव्यावहारिक. स्वयंपाकाचें आतां शास्त्र झालें आहे. प्रत्येक गोष्ट मोजून मापून; अंदाज नाहींतच. हळद २ गुंजा, मोहऱ्या अर्धा छटाक, तेल ५ तोळे, सारें मोजून घ्यायचें. व्यवहारी स्वरूप नाहीं. आम्हांला खोलीची लांबी-रुंदी नाहीं सांगतां येत. कॅलीपर्सचा उपयोग करायला शिकवितात, पण हें शिक्षण नाहीं दिलें जात. साध्या साध्या गोष्टींत परावलंबन. खेड्यावरचे लोक सूर्याकडे पाहून वेळ सांगूं शकतात. पण आम्हांला घड्याळ लागतें. दिशासुद्धां ताऱ्यांवरून नाहीं सांगतां येत. होकायंत्रच हवें. आमचें सारेंच शिक्षण अव्यावहारिक झालें आहे. व्यावहारिक शिक्षणच जर नाहीं, तर व्यावहारिक कौशल्य कोठून येणार ?

साध्या साध्या गोष्टीसाठीं कित्येक लोक रागावतात. रागावून ते आपली विवेकशून्यताच प्रकट करतात. कांहीं माणसें पूर्णपणें कोणतीही गोष्ट ऐकल्याशिवायच आपला अभिप्राय देऊन टाकतात. मागून अशांना

पश्चात्तापाची पाळी येते. जो व्यवहारकुशल आहे, तो प्रत्येक गोष्ट नीट समजून घेतो. त्यावर सर्व दृष्टींनीं विचार करतो आणि मग उत्तर देतो.

कित्येक लोकांची अशी कल्पना असते, कीं व्यवहारकुशलता म्हणजे असत्य, अप्रामाणिकपणा, लबाडी. पण ही समजूत चुकीची आहे. आफ्रिकेंतले एक सुप्रसिद्ध व्यापारी दादा अबदुल्ला शेठ. महात्मा गांधी त्यांचीच वकिली करण्यासाठीं आफ्रिकेंत गेले होते. त्यांनीं जकात चुकवून कांहीं माल आणला होता. गांधीजींनीं त्यांना आपला अपराध कबूल करावयास सांगितलें. अपराध कबूल करण्यानें त्यांचें कांहींच नुकसान झालें नाहीं; उलट फायदाच झाला. आपले दोष, आपल्या चुका कबूल न करण्यांत व्यावहारिक कुशलता नसून ते कबूल करण्यांतच व्यवहारकुशलता आहे.

पुढें वेगळे मार्ग फुटणार म्हणून आतांपासून अंतर ठेवून चालणें मूर्खपणाचें आहे. आज हें आपल्याला रोज दिसतें. समाजवाद्यांचा चांगला कार्यक्रम असला तरी कांहीं नासमज काँग्रेसवाले त्यापासून दूर राहतील, तर काँग्रेसच्या उत्तमांतल्या उत्तम कार्यक्रमालाही तो काँग्रेसचा म्हणूनच केवळ इतर लोक विरोध करतील. आपल्या देशांत कोणतेंच काम यशस्वी होत नाहीं, त्याच्या बुडाशीं हीच भावना असते.

अहिंसेचा संदेश जगाला देणाऱ्या या देशांत सहिष्णुता नाहींच. सहिष्णुता हा तर व्यवहारकुशलतेचा पाया आहे. असत्य म्हणजे व्यवहारकुशलता नव्हे. सहिष्णुतेशिवाय शक्तिसंचय करून एकाद्या महान कामांत तो लावतां येणार नाहीं! सहिष्णुवृत्ति ही खरी व्यावहारिकता आहे हें आपण समजून घेतलें पाहिजे. जेवढ्या कार्यक्रमांत मिळतें घेणें शक्य असेल तेवढ्यांत मिळून मिसळून काम करणें हें आपण शिकायला हवें. ही व्यावहारिक कुशलताच आहे. महात्माजींच्या व्यावहारिक कौशल्याचें एक उदाहरण देऊन हें संपवूं या.

कलकत्त्याला एकदां मोठी सभा होती. लोकमान्य टिळक, महात्माजी वगैरे पुढारी जमलेले, मग लोकांची खूप गर्दी न होईल तरच नवल! लोकमान्यांनीं नेहमींप्रमाणें आपलें स्फूर्तिदायक भाषण केलें, पण ते इंग्रजींत बोलले. महात्माजी व्यासपीठावरच हजर होते. ते उभे राहिले. लोकमान्यांची परवानगी घेऊन त्यांनीं विचारलें, " किती लोकांना लोकमान्यांचें भाषण समजलें, त्यांनीं हात वर करावे. " थोड्याच लोकांनीं वर हात केले. न समजणाऱ्या लोकांचीच संख्या जास्त होती. महात्माजी विनम्रपणें म्हणाले, " आज जर लोकमान्यांनीं हिंदींत भाषण केलें असतें तर तें साऱ्यांनाच समजलें असतें. " लोकमान्यांनीं तिथेंच दोन महिन्यांनीं राष्ट्रभाषा शिकण्याची प्रतिज्ञा केली. महात्माजींच्या जवळ ही व्यवहारकुशलता होती. हजारों वेळां चर्चेनें कदाचित् लोकमान्यांना जी गोष्ट पटली नसती, ती एकाच प्रसंगानें सहजासहजीं पटून गेली.

व्यवहारकुशलता म्हणजे काय हें जर थोडक्यांत सांगावयाचें असेल तर त्याचा अर्थ तत्त्वांचा प्रयोग कसा करावा हें सांगणें. (Application of the Principles) जोंपर्यंत तत्त्वांच्या प्रयोगाचें ज्ञान होत नाहीं तोंपर्यंत मोठमोठीं तत्त्वें काय कामाचीं? न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला परंतु त्याचा व्यावहारिक, प्रायोगिक उपयोग नसता तर तें तत्त्व पुष्कळ मोठें महत्त्वाचें असूनही निरुपयोगी ठरलें असतें. गवंड्याच्या ओळंब्यापासून सूर्याच्या गतीपर्यंत त्याच्या त्या तत्त्वाचा प्रयोग कसा होतो हें समजतें तेव्हां त्या तत्त्वाचें महत्त्व. अणुशक्ति असते व ती फार मोठी असते हें गेलीं कित्येक वर्षें लोकांना ठाऊक होतें, परंतु प्रत्यक्ष तिचा उपयोग जेव्हां होऊं लागला तेव्हां तिचें महत्त्व समजलें. जगांतल्या नीतितत्त्वांचेंही असेंच आहे. हिंदुस्थानांत सारीं नीतितत्त्वें प्रसृत झालेलीं आहेत; परंतु त्यांची अंमलबजावणी करण्याची व्यवहारकुशलता कोठें आहे? उगीच नाहीं विवेकानंद म्हणाले, " हिंदु धर्माइतका उदात्त तत्त्वें सांगणारा

दुसरा धर्म नाहीं आणि हिंदूंच्या इतके नादान लोकही जगांत कुठें आढळणार नाहींत." प्रायः प्रत्येक नीतिविचार येथल्या शास्त्रग्रंथांतून येऊन गेला आहे. परंतु तरीही हिंदुस्थान अवनत दशेला कां? त्याचें कारण म्हणजे तत्त्वें अंमलांत आणण्याचें शास्त्र आमच्याकडे नाहीं. व्यावहारिक स्वरूप आमच्या नीतितत्त्वांना दिलेलें नव्हतें. तत्त्वज्ञानाचा सामाजिक विनियोग कसा करावयाचा याचें ज्ञान नसल्यानें अद्वैतापर्यंत उडी मारणारें येथलें तत्त्वज्ञान हरिजनांना, मुसलमानांना आपल्यांत सामावून घेऊं शकलें नाहीं. तत्त्वांचा सामाजिक विनियोग करण्याची बुद्धि नसणें म्हणजे व्यावहारिक कुशलता नसणें. म्हणून आज नवीं तत्त्वें सांगणारांची देशाला जरूर नाहीं. तत्त्वांचा स्वतःच्या आचरणानें विनियोग शिकविणारे लोक या देशाला हवे आहेत. सामाजिक विनियोगाच्या ज्ञानावांचून सारें तत्त्वज्ञान हें लंगडें आहे. नुसतें विंनियोगाचेंच ज्ञान हें तत्त्वज्ञानावांचून आंधळें राहील म्हणून दोन्ही हवींत! तत्त्वज्ञान आहे त्याला सामाजिक विनियोगाची जोड द्यायची.

दुसरी गोष्ट दिसत नाहीं ती म्हणजे येथें कोठेंहि योजनाबद्धता नाहीं. सर्व कामें होतात याचें कारण तीं थांबत नाहींत एवढेंच. याउलट रशियानें, अमेरिकेनें आपला कायापालट करून घेतला तो पंचवार्षिक, दशवार्षिक योजना आंखून केला. योजनापूर्वकता म्हणजे व्यावहारिक कौशल्यच. व्यवस्थापक शक्तीही आपल्याकडे फार कमी. आग लागली, कीं हजारों बघे जमतील. विझवूं लागले तरी त्यांत व्यवस्था नाहीं, योजना नाहीं. याउलट फायरब्रिगेडचे लोक, लष्कर यांच्याकडे पाहावें. किती त्यांची व्यवस्थापक शक्ति!

आपण असे व्यवहारकुशल, व्यवस्थाकुशल, योजनाबद्ध बनण्याचा प्रयत्न करूं या.

# ११ : आत्मसन्मान आणि आत्मविश्वास

* आत्मसन्मान म्हणजे दुर्गुणांच्यावर ताबा ठेवणारा लगाम. आत्मसन्मानाशिवाय मनुष्य म्हणजे गव्हर्नरशिवाय एंजिन.

— बेकन

* अपयशाचीं अनेक कारणें आहेत. परंतु कमी आत्मविश्वास म्हणजेच खरें अपयश. आपल्या सामर्थ्यावर विश्वास असावा. हीच मोठी शक्ति आहे. ज्यांना आत्मविश्वास नाहीं, ते बाह्यतः कितीही शक्तिशाली असले तरी उपयोग नाहीं. त्यांची ती शक्ति पार्थिव, ती नाहींशी होईल. ती निरुपयोगी ठरूं शकेल.

— बॉवी

स्कॉटलंडमध्यें एक गरीब विणकर होता. देवाची अनन्यभावें तो रोज प्रार्थना करी. म्हणे, " देवा, माझे विचार चांगले होऊं देत, निर्मळ होऊं देत. त्यांना स्वार्थाचा बिलकूल गंध नको रे येऊं देऊं. माझ्या हातून विचाराप्रमाणें आचार घडूं दे. जोंपर्यंत मनुष्य आपला चांगुलपणा आपल्या आचरणानें दाखवीत नाहीं, जोंपर्यंत हातून समाजोपयोगी कामें घडत नाहींत, तोंपर्यंत जनतेकडून चांगल्या व्यवहाराची अपेक्षा तो कशी करणार ?

आपला मान आपण ठेवला पाहिजे. त्याचे दोनच राजमार्ग जगांत आहेत. आपण आपल्या शब्दाप्रमाणें कृति करून, आपल्या प्रतिज्ञांचें पालन करून आपला मान ठेवतों. आपल्या प्रतिज्ञा, दिलेला शब्द मोडणें म्हणजे आपल्या आत्म्याचा अपमान आपण करतों आणि उगाच जगाच्या नांवानें ओरडतों. दुसऱ्याचा योग्य सन्मान ठेवणें हाही आत्मसन्मानाचा दुसरा मार्ग आहे. स्वतःचा मान ठेवायचा हा मार्ग

अनेकांना पटत नाहीं. ज्या पायावर दुसऱ्याच्या सन्मानाची इमारत उभी आहे त्याच पायावर आत्मसन्मानाचाही आधार असतो. संत लोक असेच वागतात. ते स्वतः अत्यंत लीन – नम्र असतात आणि त्यावरूनच आपली श्रेष्ठता प्रकट करतात. ते दुसऱ्यांच्या गुणांचें भजन करून आपले गुण व गुणग्राहकता प्रकट करतात. दुसऱ्यासाठीं प्रयत्न करतात व उच्च स्वार्थ साधतात. दुर्गुणी व दुसऱ्यांच्या दोषांचें गायन गाणाऱ्याला शांत राहून मुक्यानें ते उत्तर देतात. तद्वतच दुसऱ्याचा मान ठेवून ते आत्मसन्मान प्रस्थापित करतात.

लिंकन म्हणे, "थोड्या वेळासाठीं फसवणूक करणें शक्य आहे. परंतु सर्वकाळ सर्वांना फसवितां येणें अशक्यच आहे. आपण आपल्या स्वतःची प्रतारणा कधींच करूं शकत नाहीं. आपला सन्मान वाढावा असें वाटत असेल तर कोणत्याही कामांत गुप्तता नका ठेवूं. गुप्तता म्हणजे दुसऱ्यास संशय येण्यास जागा. तुम्ही हें सिद्ध करून दाखवा, कीं जें काम तुम्हीं अंगावर घेतलें आहे तें सर्वस्वीं योग्य तर आहेच, पण तें तुम्हींच करणें आवश्यकही आहे. आपल्या प्रामाणिकपणानें आपण आत्मसन्मान वाढवितों. प्रामाणिकपणा म्हणजे दुसऱ्याचा आदर करणें. दुसऱ्याच्या हृदयस्थ परमेश्वराचा सन्मान आणि तोच परमेश्वर आपल्याही हृदयांत निवास करतो, म्हणजे त्या आपल्या हृदयस्थ परमेश्वराचाही तो सन्मानच." महात्माजी दुसऱ्याचा कधींही अपमान करीत नसत. त्यांनीं आपलें आचरण नेहमीं प्रामाणिकपणाचें ठेवलें. पूर्वीं परदेशांत हिंदुस्थानला काय मान होता ? जनावरांपेक्षांही भारतीयांना हीन-दीन समजण्यांत येई. परंतु तरीही महात्माजींनीं दुसऱ्याचा अपमान केला नाहीं. त्यांनीं मनुष्य म्हणून सारे समान असल्याचें तत्त्व प्रस्थापित केलें. त्यांनीं हरिजनांची देशांतली स्थिति पाहिली व हरिजनांसाठीं प्राण पणाला लावले. विवेकानंदांचेंही असेंच. ते येशूला श्रेष्ठ मानीत, महंमद पैगंबराला श्रेष्ठ

मानीत. त्यांनीं आपली विशालहृदयता प्रकट केली. व्यापक हिंदुधर्माचें भव्य दर्शन घडविलें व त्यांनीं आपल्या धर्माचाही सन्मान केला. दुसऱ्याचा सन्मान करणें हें कमी प्रतीचें समजणें मूर्खपणाचें लक्षण आहे. संतांत आणि दुर्जनांत असाच फरक आहे. दुर्जन दुसऱ्याची अपकीर्ति करून आपला श्रेष्ठपणा प्रस्थापित करूं पाहतो. दुसरा मूर्ख, म्हणून मी शहाणा असें सिद्ध करूं पाहतो. दुसरा मूर्ख असेलही, पण त्यावरून आपण शहाणे असल्याचें कसें सिद्ध होणार ? सालोमालो तुकारामाला कमी प्रतीचा दाखवून स्वतः मोठा बनूं पाही. तुकारामानें त्याचाही सन्मान राखून आत्मसन्मान वाढविला. परसन्मानाच्या उच्च मनोभूमींत आत्मसन्मानाचीं बीजें रुजतात, फुलतात आणि फळतात. परगुण-परमाणूला पर्वताचें स्वरूप देऊन संत आपला विकास करतात. दुसऱ्याला मागें खेचून आपण पुढें गेलोंसें ते दाखवीत नाहींत. दुसरा पुढें जावो वा न जावो, मी पुढें जातों आहें हेंच ते दाखवितात.

कॅलोनाच्या स्टीफनला शत्रूंनीं कैद केलें. त्याला दरडावून विचारलें, "कोठें आहे तुमचा किल्ला आणि तुमचे साथीदार ?" स्टीफन शांत राहिला. त्यानें आपल्या हृदयावर हात ठेवला. तो म्हणाला, "हा पहा माझा अजिंक्य किल्ला. त्यांतच माझे आत्मविश्वासाचे जिवास जीव देणारे सैनिक आहेत. हा किल्ला अजिंक्य आहे. लाख प्रयत्न करूनही तो नाहीं हस्तगत करतां येणार तुम्हांला."

टेरेन्स मॅक्स्विनीनेंही हेंच सांगितलें. तो म्हणाला, "स्वातंत्र्याचा पवित्र झेंडा जोंपर्यंत माझ्या हृदयांत फडकत आहे, तोंपर्यंत त्याचा कोण अपमान करणार ? कोण त्याचें उच्चाटण करणार ?" महात्माजींचा सत्याग्रह-लढाही असाच. ते म्हणतात, "साऱ्यांचा विजय हा सत्याग्रहीचा विजय होय. पण सारे तत्त्वच्युत झाले तरीही जोंपर्यंत त्याचा आत्मविश्वास नष्ट झाला

नाहीं, तोंपर्यंत त्याचा पराजय होत नाहीं. त्याच्या एकट्याच्या जिवांत जीव असेपर्यंत तो विजयीच."

अत्याचाराच्या पुढें मान वाकविणाराच त्याचा सर्वांत मोठा पुजारी आहे. आपल्या आत्म्यावर पूर्ण विश्वास असलेला मनुष्य जुलमापुढें मान वाकविणार नाहीं. तेथेंही तो आपला आत्मसन्मान ठेवील.

वॉशिंग्टन आयरव्हिंग म्हणतो, कीं " आत्मसन्मान आणि आत्मविश्वास यांच्या अभावीं अनेक योग्य माणसेंही मागें पडलीं आहेत. आत्मविश्वासाच्या अभावीं त्यांचीं कामें यशस्वी होऊं शकत नाहींत."

जॉन् कोलहॅम रात्रंदिवस अभ्यासांत मग्न असे. कॉलेज विद्यार्थी त्याची टिंगल करीत, त्याला हसत. कोलहॅम म्हणे, " मला असें करणें भाग आहे. कॉंग्रेसद्वारा देशसेवा माझ्या हातून घडावी, ही माझी आत्यंतिक इच्छा आहे." त्याच्या ह्या म्हणण्यावरही सारे हसले. तो पुन्हा आत्मविश्वासानें म्हणाला, " तुम्हांला कां हें खोटें वाटतें ? अशक्य कां वाटतें ? परंतु मी तुम्हांला खात्रीनें सांगतों, कीं तीन वर्षांत कॉंग्रेसमध्यें जाण्याची जर माझी खात्री नसती तर आतांपर्यंत मी कॉलेजांत दिसलोंच नसतों."

कोणत्याही माणसाचे असे उद्गार ऐकून आपण त्याला अहंकारी म्हटलें असतें. परंतु मोठ्या व्यक्तींत अहंकार नसतो ; तो त्याचा आत्मविश्वास असतो. वर्किंग कमिटीनें ' पूना ऑफर ' केली. लोकांना वाटलें, झालें, महात्माजींचें सारें राजकारण संपलें. पण गांधीजी म्हणाले, " कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें जरी आज मला दूर केलेंसें वाटलें, तरी वर्किंग कमिटीला मजकडे यावेंच लागेल." महात्माजींकडे वर्किंग कमिटीला पुन्हा जावेंच लागलें. समाजांतल्या बहुतेक लोकांना आत्मविश्वास नसतो, ते आपल्या अहंकाराचेंच आत्मविश्वास म्हणून प्रदर्शन करतात. थोर व्यक्तींचें असें नसतें. थोरांचे असले शब्द म्हणजे आत्मविश्वास. गोपाळराव आगरकर

शाळेंत होते. त्यांनीं आपला अभ्यास एक दिवस केला नव्हता. मास्तरांनीं त्यांना डिवचलें तेव्हां ते म्हणाले, " अगदीं तुमच्यासारखा एम्. ए. झालों तरच नांवाचा आगरकर ! " लोकांना हा त्यांचा अहंकार वाटला, दर्पोक्ति वाटली. परंतु हे त्यांच्या आत्मविश्वासाचे शब्द होते. परिस्थिति प्रतिकूल होती. त्यांची जणुं सत्त्वपरीक्षाच परिस्थितीनें पाहिली. पण त्यांच्या आत्मविश्वासापुढें परिस्थिति नमली. अनेक अडचणी सोसूनही ते एम्. ए. झालेच. कवि वर्डस्वर्थला इतका आत्मविश्वास असे, कीं तो जें बोले तें खरें होई. जणुं त्याला भविष्याचें सम्यक् ज्ञान होतें. जर्मनीचा महाकवि गटे, तोही असाच आत्मविश्वासी. भवभूतीला किती आत्मविश्वास होता ? त्याच्या आत्मविश्वासाला तोड नाहीं. ' मालतीमाधव ' नाटकाच्या आरंभींच त्यानें लिहिलें आहे —

" उत्पत्स्यतेऽस्ति ममकोऽपि समानधर्मा
कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी । "

काल हा अनंत आहे, जग विस्तृत आहे. आज जरी माझ्या नाटकाचा सन्मान करणारा कोणी निघाला नाहीं, तरीही मला विश्वास आहे, कीं माझ्या स्वभावाच्या सारख्या स्वभावाचा कोणीतरी निश्चित जन्मास येईल. हा आत्मविश्वास अमरता देतो. आज शेकडों वर्षें झालीं तरीही ' मालतीमाधव ' आणि भवभूति कालाच्या तडाख्यांतून वांचले आहेत. समुद्रांत एकदा भयंकर वादळ उठलें. जहाज हेलकावे खाऊं लागलें. सारे खलाशी घाबरून गेले. त्यांचा धीर सुटला. सीझर त्याच जहाजांत होता. तो म्हणाला, " घाबरू नका. तुमच्या नौकेंत सीझर आणि त्याचें भविष्य आहे. त्याचें भविष्य उज्ज्वल आहे. " सीझरच्या ह्या आत्मविश्वासानें साऱ्या खलाश्यांना धीर आला. त्यांनीं आपलें काम व्यवस्थितपणें केलें. आत्मविश्वास म्हणजे आपल्या शक्तीवर भरंवसा. आपल्या शक्तीवर भरंवसा असल्याशिवाय कामें यशस्वी कशीं होणार ?

ज्याला स्वतःचा संपूर्ण विश्वास आहे त्याच्यावर विश्वास ठेवणेंच नैतिक दृष्टीनें योग्य आहे. ज्याला आपल्या प्रामाणिकपणाचा, इमानदारीचा विश्वास आहे तोच विश्वासपात्र आहे. नैतिक पतनाचा आरंभ नेहमीं स्वतःपासूनच सुरू होतो.

आत्मसन्मान आणि आत्मविश्वासाची आमची भावना जणूं मेली. आम्ही प्रथम स्वतःला हीन लेखतों आणि मग जगही आम्हांला हीन लेखतें. आत्मसन्मानाच्या रक्षणासाठीं शिवाजीला औरंगजेबाच्या दरबारीं कैद व्हावें लागलें. आत्मसन्मानासाठीं महात्माजींना आफ्रिकेचा दिव्य लढा लढवावा लागला. आत्मसन्मानासाठीं चाणक्यानें नंदाला धुळीला मिळविलें. आत्मसन्मानासाठीं मनुष्य किती त्याग करायला तयार आहे, यावरच त्याचा सन्मान अवलंबून असतो. आम्हीच स्वतःला माणसापेक्षां हीन समजतों, मग जगही आम्हांला उंदीर म्हणवें. मिस् मेयोनेंही आमची निंदा केली. आमची आत्मविश्वासाची भावना जागृत झाली पाहिजे. आत्मविश्वासाच्या अभावीं मोठ्या योग्यतेचीं माणसेंही मागें पडतात. जगाच्या सफरी मारणारा तो वॉल्टर रॅले, आत्मविश्वासाच्या अभावीं तो जगाचें किती नुकसान करून बसला. त्यानें मोठ्या परिश्रमानें जगाचा इतिहास लिहिला होता, परंतु आत्मविश्वासाच्या अभावीं तो त्यानें जाळून टाकला. सारें जग एका अमोल ग्रंथाला मुकलें.

नम्रता म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव नव्हे. तो दुसऱ्याच्या आणि आपल्या हृदयस्थ परमेश्वराचा सन्मान. फ्राईड व कोसूथ यांचेंही हेंच मत आहे. फ्राइड म्हणतो, " फळाफुलांनीं झाड लवावें म्हणून झाडाच्या मुळाला खूप नम्र व्हावें लागतें. रजःकणापेक्षांही तें नम्र बनतें. जितकें मूळ नम्र तितकें त्याला जीवन जास्त मिळतें. नम्रता म्हणजे जीवन.

याच पायावर शिक्षणाची आणि सुधारणेची इमारत उभी राहते. नवयुवकांत अशाच प्रकारच्या आत्मविश्वासाची आवश्यकता आहे."

कारान एक खटला चालवीत होता. तो म्हणाला, "मीं कायद्याच्या पुस्तकांचें अध्ययन केलें, परंतु विपक्षाचें म्हणणें मानलें गेलें आहे असें एकही उदाहरण मला सांपडलें नाहीं."

कोर्टाचे जज्ज रॉबिनसन म्हणाले, "कायद्याच्या पुस्तकांचें आपलें पुस्तकालय अगदींच संकुचित दिसतें आहे."

काराननें, त्या नवयुवक बॅरिस्टरनें, एकवार जज्जकडे दृष्टिक्षेप केला आणि तो म्हणाला, "महाराज, हें बरिक खरें, कीं मी गरीब आहें. माझें पुस्तकालय लहान आहे. माझ्याकडे पुस्तकें थोडीं कमी आहेत. पण जीं आहेत तीं अगदीं निवडक आणि प्रमाणभूत अशीं आहेत. मीं त्यांचें योग्य अध्ययन केलें आहे, असाही मला विश्वास आहे. गरीब असल्याची मला बिलकूल लाज नाहीं. मीं भाराभर पुस्तकें जवळ ठेवण्याऐवजीं थोड्यांवरच प्रभुत्व ठेवलें आहे. कुमार्गानें पैसे मिळवून मला मोठी लायब्ररी ठेवतां आली असती, पण तें जास्त लाजिरवाणें आहे."

स्वाभिमानानें, आत्मविश्वासानें हे त्याचे शब्द भरले होते. त्या न्यायाधीशानें पुन्हा व्यंग करायचें सोडून दिलें.

मायकेल रेनॉल्डस म्हणतो, "आत्मनिर्भरता चरित्राचें आणि चारित्र्याचें महान तत्त्व आहे."

महाकवि शेक्सपिअर एके ठिकाणीं लिहितो, "जो काम करतांना मागें पुढें पाहतो, जो परावलंबी आहे, कमजोर आहे, त्याला आत्मनिर्भर, स्वावलंबी लोकांचा आत्मसन्मान आणि आत्मविश्वास समजणें शक्य नाहीं. आत्मनिर्भर मनुष्याला आपल्याला राजमुकुट

मिळाला म्हणून आनंद होत नाहीं, तर आपल्यांत राजमुकुट मिळविण्याचें सामर्थ्य आहे याबद्दल आनंद होतो. " तो पुढें म्हणतो, " तुम्ही स्वतःशीं प्रतारणा करूं नका. स्वतःशींच जर तुम्ही प्रामाणिकपणें वागाल तर रात्रीनंतर दिवस येणें जितकें निश्चित आहे, तद्वतच तुमचें भाग्य उदयाला येणेंही निश्चित आहे. दुसऱ्याला फसविण्याचा प्रसंग तुमच्यावर येणारच नाहीं, कारण आत्मनिर्भर, आत्मविश्वासी आणि आत्मसन्मानी माणसावर तसा प्रसंग चुकूनही येत नाहीं. "

आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, आत्मसन्मान हेच तीन गुण मनुष्याला पुढें आणणारे, त्याचा उत्कर्ष करणारे आहेत. या गुणांचें संवर्धन म्हणजेच बलसंवर्धन.

आत्मविश्वासी माणसाला दुसऱ्याची उन्नति पाहून ईर्ष्या वाटत नाहीं. ईर्ष्या दुरभिमान, आळस, नैराश्य यांच्या पोटीं जन्म घेते. स्वाभिमान, आत्मविश्वास आणि गर्व यांत फरक आहे. ज्याला गर्व वाटतो त्याची उन्नति कधींच होत नाहीं. तो आपल्यापेक्षां श्रेष्ठ माणसाकडे पाहत नाहीं. नेहमीं आपल्यापेक्षां नीच माणसाच्याच सहवासांत तो राहतो. आत्मविश्वासी मनुष्य नेहमींच उन्नति करीत असतो.

शिकंदर आणि पौरसाची गोष्ट प्रसिद्धच आहे. पौरसाचा दैवयोगानें पराभव झाला. त्याला शिकंदरानें पकडलें व विचारलें, " मी आपणांशीं कशा प्रकारें वागूं ? " पौरस स्वाभिमानी होता. तो म्हणाला, " मीही राजाच आहें. दैवयोगानें माझा पराभव झाला. एक राजा दुसऱ्या राजाशीं जसें वर्तन करतो किंवा आपण ज्या वागणुकीची मजकडून अपेक्षा केली असती, तसेंच मला वागवा. " शिकंदरनें पौरसाचा सन्मान करून आपलाही सन्मान केला.

वास्तविक संस्थेच्या बाबतींत निरभिमानता हेंच खरें स्वाभिमानाचें लक्षण आहे. पण आम्ही आत्मसन्मानाच्या खोट्या कल्पनेला

बळी पडतों, खोटा स्वाभिमान धरतों व संस्थेला विसरतों. संस्थेंत आपल्याला विसरणें हा खरा आत्मसन्मान. आमच्या देशांत संस्था पुष्कळ निघतात, पण त्या टिकत नाहींत. आम्ही संस्थेशीं थोडा फार मतभेद होतांच ज्या संस्थेवर प्राणांपलीकडे प्रेम करतों तिच्यावरच उलटतों. आमची ही मनोवृत्ति. ब्रिटिशांची ही मनोवृत्ति नाहीं. त्यांचें व्यक्तिपेक्षांही तत्त्वावर जास्त प्रेम असतें. इंग्लंडचें साम्राज्य वाढलेलें पाहून आम्हांला आश्चर्य वाटतें, पण तें त्यांच्या मनोवृत्तीचें फळ आहे. जे कांहीं चोर, दरोडेखोर होते त्यांनीं केलेली ही देशसेवा आहे. त्यांचें आपल्या मातृभूमीवर आत्यंतिक प्रेम म्हणून सारे भेदभाव विसरून ते तिच्यासाठीं झटले. ऑस्ट्रेलिया–न्यूझिलंडच्या वसाहती कोणीं स्थापल्या ? ज्यांना सरकारनें निर्वासित केलें त्यांनीं ही देशसेवा केली आहे. आमच्याकडे आम्ही संस्थेपेक्षां स्वतःला, व्यक्तीला जास्त महत्त्व देतों, म्हणूनच आमच्या संस्था टिकत नाहींत. आम्ही संस्थेपुढें निरभिमान व्हायला शिकूं, संस्थेच्या सन्मानांतच जेव्हां आम्हांला स्वतःचा सन्मान वाटेल तोच सुदिन. आपल्या देशाच्या आपणा तरुणांवर ही जबाबदारी आहे.

> सर्वे महत्त्वमिच्छन्ति कुलं तत्रावसीदति
> सर्वे यत्र विनेतारः राष्ट्रं तत् नाशमाप्नुयात् ।

म्हणजे ज्या कुळांत आपलें महत्त्व वाढावें म्हणून सर्व प्रयत्न करतात तें कूळ आणि ज्या राष्ट्रांत सर्वच नेते बनूं पाहतात तें राष्ट्र विनाशाच्या गर्तेंत जाऊन पडतें.

आत्मविश्वास कसा निर्माण होतो ? हा प्रश्न अगदीं योग्य आहे. आत्मविश्वास नसेल तर काय करावें हें सांगणें जरूर आहे, नाहीं तर पैसे असले म्हणजे कशीं सुखें उपभोगतां येतात हें सांगून पैसे मिळविण्याचा मार्ग

न सांगण्यासारखें होईल. आत्मविश्वास निर्माण होण्यासाठीं दोन गोष्टींची जरूरी आहे. पहिली म्हणजे आपण जें काम हातीं घेत आहोंत तें मंगल आहे याची खात्री असली पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे विश्वाच्या मांगल्यशक्तीबद्दल श्रद्धा असली पाहिजे. विश्वमांगल्यावरची श्रद्धा म्हणजे जगांत नेहमीं मंगलाचाच विजय होतो असें वाटणें. ही श्रद्धा नसेल आणि हातीं घेतलेलें काम मंगल आहे अशी खात्री नसेल तर आत्मविश्वास कधींच निर्माण होऊं शकणार नाहीं. आपल्याला आत्मविश्वास हवा असेल तर ही मांगल्यनिष्ठा आपल्याजवळ असली पाहिजे.

आपल्या राष्ट्राच्या उद्धारार्थ आपण खरा आत्मसन्मान आणि खरा आत्मविश्वास ठेवायला शिकूं या. स्वतःला विसरून आपल्या संस्थांचें काम करायला शिकूं या.

★

# १२ : वास्तविकता

* वास्तविकता आणि प्रामाणिकपणा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. — इमरसन

* मला अर्धवट कामें आवडत नाहींत. जें काम तुम्हांला पटेल तें मन लावून करा. अनुचित काम असेल तर तें सोडून द्या. कोणतेंही काम आपली वास्तविक योग्यता पूर्णपणें त्यांत खर्च करून करा. — गिलपीन

* जर एकादा मनुष्य आपली सर्व शक्ति एकवटून काम करील, तर तो जंगलांत जाऊन राहिला तरी लोक त्याच्या दारापर्यंत रस्ता तयार करतील. आपण होऊन त्याच्याकडे चालत येतील. — इमरसन

टाइमपियन अत्युत्कृष्ट घड्याळजी. त्याचें नांव म्हणजेच घड्याळाचें प्रमाणपत्र समजलें जाई. एक दिवस एक मनुष्य त्याच्याकडे घड्याळ-दुरुस्तीला आला. घड्याळ नकली होतें. त्याच्यावर टाइमपियनचें नांव फक्त होतें. घड्याळ पाहून टाइमपियनला भयंकर राग आला. जवळचा हातोडा उचलला त्यानें. घड्याळाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून टाकल्या. नवें घड्याळ त्याला देतांना तो म्हणाला, “ घ्या महाराज, हें अस्सल माझ्या बनावटीचें घड्याळ ! ”

ग्रेहॅम टाइमपियनचा शिष्य. ग्रीनिचला एक वेधशाळा आहे. तींत ग्रेहॅमनें बनविलेलें घड्याळ लावलें आहे. दोनशें वर्षें घड्याळ बनवून झालीं पण अजून तें उत्तम काम देतें. वेस्टमिन्स्टर ॲबेमध्यें इंग्लंड-मधील प्रसिद्ध पुरुषांना पुरतात. परंतु आपल्या वास्तविकतेमुळें टाइमपियन आणि ग्रेहॅम यांनाही तेथें जागा मिळाली.

एक सुतार एका लोहाराकडे आला. त्याला म्हणाला, " माझ्यासाठीं एक उत्तम हातोडा द्या. माझा हातोडा चुकून घरीं राहिला आहे." लोहार म्हणाला, " देईन मी बनवून."

कांहीं दिवसांनीं त्या सुताराला हातोडा त्यानें बनवून दिला. फारच आवडला साऱ्यांना तो. त्या लोहाराकडे हातोड्याची मागणी वाढूं लागली. एका व्यापाऱ्यानें त्याला हातोड्यांची ऑर्डर दिली व सांगितलें, " जरा यापेक्षां चांगले बनवा हातोडे."

लोहार म्हणाला, " सध्यां बनवितों त्याहून चांगले मी नाहीं बनवूं शकणार. मी कोणतीही वस्तु बनवितों तेव्हांच ती उत्कृष्ट होईल अशी खबरदारी घेतों. कामांत मी कुचराई कधींच करीत नाहीं." थोडक्याच दिवसांत त्याची कीर्ति पसरली. तो हातोड्यांचा कारखानदार बनला. त्यानें पैशांत उन्नति करण्याऐवजीं आपल्या कामांत उन्नति केली. त्याच्या नांवाची वस्तु तत्काल विकली जात असे. वास्तविकता आणि खरेपणा ह्या जगांतल्या मोठ्या शक्ति आहेत. मनुष्याची सर्वांत उत्तम जाहिरात त्याचा प्रामाणिकपणा आणि वास्तविकता. त्याचा प्रत्येक ग्राहक त्याच्या मालाचा प्रचारक बनतो प्रामाणिकपणामुळें.

एका चित्रकारानें क्रॉमवेलचें चित्र काढलें. क्रॉमवेलला खूष करावें म्हणून त्याच्या चेहऱ्यावरचें एक मस त्यानें काढलें नाहीं. क्रॉमवेलनें तें चित्र पाहिलें. त्याला तें आवडलें नाहीं. तो म्हणाला, " मी जसा आहें तसाच जगांत दिसावें ही माझी इच्छा आहे. मी सुंदर दिसावा असें जर मला वाटत असतें तर मीं माझ्या फोटोऐवजीं दुसऱ्याच एकाद्या सुंदर माणसाचें चित्र काढवून त्याखालीं माझें नांव देवविलें असतें."

हा प्रामाणिकपणा आपल्यांत कमी. आपण जसें समजलें जावें असें आपल्याला वाटतें तसें बनायचा आपण प्रयत्न करीत नाहीं. आपण तसें

न होतांच जनतेनें आपल्याला तसें समजावें अशी आपली इच्छा असते. आपण खरें बोलत नाहीं. पण जगानें आपल्याला सत्यवक्ता समजावें अशी आपली इच्छा असते. आपण चांगलें बनायचा प्रयत्न करीत नाहीं, पण चांगलें समजलें जावें असा प्रयत्न करतों, तशी बतावणीही आपण करतों. आज कोणीच कोणावर विश्वास ठेवीत नाहीं. सगळेच बतावणी करणारे. प्रत्येक आपल्यावरून जगाची परीक्षा करतो. आपण आहोंत तसेच जर समजले गेलों, तर सत्य बाहेर येईल आणि मग आपली किंमत कमी होईल अशी धास्ती बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. आपण अगोदर अवास्तविक कल्पना करून देतों, नंतर सत्य बाहेर आलें तरीही अहंकाराला बळी पडून असत्याची तरफदारी करूं लागतों. आपल्या चुकांबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजीं, त्या सुधारण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं आपण त्यांनाच चिकटून राहतों व आपल्या चुकांचें समर्थन करतों. अशानें उन्नति होत नाहीं. आपल्याला उन्नतीचे मार्ग मोकळे राहत नाहींत.

आपल्याला आपल्या गुणांची जाणीव नसावी. आपल्या दोषांची मात्र जाणीव असावी. दोषांचेंच ओझें आपल्या पाठीवर आहे असें आपल्याला कळूं लागलें व दोष ही निरुपयोगी वस्तु आहे हें कळलें, कीं आपण ती काढून टाकूं. गुणांचीच आपल्याला जाणीव झाली, कीं त्यांच्या ओझ्यामुळें आपली प्रगति खुंटते. आपल्याला का आपल्या श्वासोच्छ्वासांची जाणीव असते ? तो जीवनाला अत्यंत आवश्यक असतांही आपल्याला त्याची जाणीव नसते. आपल्या गुणांचेंही तसेंच असावें. आपल्या गुणांमुळें आपण जिवंत राहत असलों तरी त्याची जाणीव नसावी. श्वासोच्छ्वासांत बिघाड झाला, कीं तें आपल्याला कळतें. आपल्या गुणांत बिघाड झाला, कीं तें आपल्याला कळावें. आपल्या प्रत्येकाच्या

शरीरावर १५ पौंड हवेचा दाब असतो, पण आपल्याला कुठें त्याची जाणीव असते ? जाणीव नसते म्हणून आपल्याला त्याचें कांहींच वाटत नाहीं. आपल्या गुणांची आपल्याला जाणीव नसावी. आपल्या गुणांची आपल्याला जाणीव झाली, कीं आपल्यांत अहंकार येतो. अहंकारांत निष्क्रियता असते व मग आपण जसे नाहीं तसेही दिसायचा प्रयत्न करतों. आपल्या वास्तविक योग्यतेपेक्षां आपण श्रेष्ठ दिसायचा खोटा प्रयत्न करतों. हें वाईट आहे.

वेलिंग्टनला आपल्या बहिरेपणाबद्दल फार वाईट वाटे. एका हुषार समजल्या जाणाऱ्या डॉक्टरचा त्यानें सल्ला घेतला. डॉक्टरनें एक भयंकर तीक्ष्ण औषध त्याच्या कानांत टाकलें. त्याचे कान बरे होण्याऐवजीं आणखीच बिघडले. डॉक्टर खूप भ्यायला. तो म्हणाला, "माझें जीवन यामुळें नष्ट होईल."

वेलिंग्टन म्हणाले, "मी स्वतः होऊन या विषयाबद्दल कोणाजवळ बोलणार नाहीं."

डॉक्टर — तुम्ही मला रोज तुमच्याकडे येऊं देत जा. लोकांचा मजवरचा विश्वास कायम राहावयाला हवा.

वेलिंग्टन — हें मान्य नाहीं करूं शकत. असें करणें म्हणजे असत्याला उत्तेजन.

एक मुलगा आपल्या बापाला म्हणाला, "बाबा, मीं पुष्कळ कुत्रे पाहिले. पांचशें असतील ते बहुतेक. काल रात्रीं मीं ते पाहिले."

"इतके असणें शक्य नाहीं."

"शंभर तर नक्कीच असतील."

"खोटें. साऱ्या गांवचे मिळून दहाच्यावर कुत्रे नाहींत."

" दहापेक्षां कमी तर नक्कीच नव्हते. "

" यावरही माझा विश्वास नाहीं. ज्या दृढतेनें तूं पांचशें कुत्र्यांची गोष्ट सांगत होतास, त्याच दृढतेनें तूं हें सांगत आहेस. "

" मी आपल्या कुत्र्याला दुसऱ्या एका कुत्र्याबरोबर नक्की पाहिलें. "

मुलाच्या ह्या अतिशयोक्तीच्या बोलण्याला आपण हसतों. आपणही हाच मार्ग चोखाळीत असतों. आपण म्हणतों, " असा पाऊस कधींच पडला नव्हता, साऱ्या जगांत असें मांजर नाहीं, सगळ्यांत भयंकर कडकडून आजच पडलें. " कोणत्याही वस्तूला तिची वास्तविक योग्यता न पाहातां आपण सर्वोत्कृष्टता देऊन टाकतों. अतिशयोक्ति व्यवहारांत असत्याचीच जागा घेते.

मानव समाज सत्याचा आदर करतो. दुसऱ्याला आवडणार नाहीं म्हणून खऱ्या गोष्टी न सांगणें; जरूरीप्रमाणें त्यांत बदल करून सांगणें; दोन अर्थ प्रकट करणारी शब्दरचना करणें, नुसतें दर्शविण्यापुरतें दुसऱ्याशीं सहमत होणें; डोळ्यांतले, चेहेऱ्यावरचे भाव बदलणें किंवा लपविणें; एकादी गोष्ट न समजतां ती समजल्याची बतावणी करणें; असत्याचींच हीं निरनिराळीं रूपें.

हल्लीं सत्य म्हटलें, कीं खरें बोलणें हाच अर्थ आपण समजतों, अर्थात् समजूनही त्याप्रमाणें आपण वागत नाहींच. वास्तविक सत्य म्हणजे सत्य वाणी, सत्य विचार, सत्याचें आचरण आणि सत्याचा आग्रह. जी गोष्ट एकदा खरी म्हणून पटली तीच मुखावाटे निघावी. जी गोष्ट सत्य नाहीं तिचा विचारसुद्धां मनांत येऊं नये. खरी म्हणून पटलेल्या गोष्टीप्रमाणेंच वागावें व खऱ्या गोष्टीसाठींच आग्रह धरावा. सत्य आणि वास्तविकता यांच्यांत फरक नाहीं. सत्य म्हणजेच वास्तविकता. आपण संपूर्ण सत्याप्रमाणें आचरण करायचा प्रयत्न करूं या.

निसर्ग म्हणजे वास्तविकता. निसर्गांत कोठेंही अवास्तविकता नाहीं. गुलाब ज्या रीतीनें पूर्वीं फुलत त्याच प्रकारें आज ते फुलतात; त्यांत यत्किंचितही फरक नाहीं. राणीच्या बागेची शोभा वाढविणारा गुलाब तोच सुगंध, तीच शोभा देतो, जी तो एकान्तांत असतांना देई. निसर्गांत चूक दिसत नाहीं. दर सेकंदाला हजारों मैल प्रवास करणारे ग्रह, तारे किती सावधानपणें फिरतात. थोडीशी चूक, थोडासा गैरसावधपणा झाला, कीं एका ताऱ्याशीं दुसऱ्याची टक्कर होईल. आपण करतों का आपलीं कामें इतक्या सावधानतेनें ? ग्रहणें योग्य वेळीं लागतात, ऋतु यथाकाल येतात, जातात. दिवस रात्री अगदीं ठरल्या वेळींच होतात. ईश्वराच्या कामांतली वास्तविकता, यथार्थताच दिसते यावरून.

तीन फूट व्यासाची एक काच तयार करायला सुमारें दोन लाख रुपये पूर्वीं खर्च येत असे. अशा काचेला अत्यंत कुशल मनुष्यच पॉलिश करूं शकतो. थोडासा जरी हात जास्त फिरला, कीं लेन्स बिघडून जाई. एल्वन क्लार्क अशा प्रकारच्या काचा तयार करण्यांत मोठा प्रवीण. एकदां परीक्षा करणारानें लेन्स हातानें थोडीशी सरकवली. क्लार्कनें हें पाहिलें आणि तो म्हणाला, " परीक्षा घेण्यापूर्वीं काच थंड होऊं द्या. ती काच इतकी नाजूक आहे, कीं हाताच्या उष्णतेनेंही तिच्यावर परिणाम घडेल. "

असल्या प्रकारच्या सूक्ष्मपणाच्या सावधगिरीमुळें क्लार्कचें नांव साऱ्या जगभर झालें. आपल्या कामाच्या जबाबदारीचें वास्तविक ज्ञान असलें म्हणजे माणसांत हें कौशल्य येतें.

एक सुप्रसिद्ध लेखक म्हणतो, " जें कांहीं तुम्हांला चांगलें वाटतें आणि पटतें तें सावधपणें, पूर्ण विश्वासानें आणि सर्व शक्ति एकवटून करायला हवें. तसें करणें म्हणजे विशेष गोष्ट नसून तें आपलें कर्तव्यच

आहे. तसें न करणें म्हणजे कर्तव्यपथावरून घसरणें. प्रत्येक गोष्ट महत्त्वाचीच समजून आपण करावी. जी गोष्ट आपल्याला मामुली, कमी महत्त्वाची वाटते, ती महत्त्वपूर्ण असण्याचा संभव आहे. कदाचित् जीवनमरणाचा प्रश्नही तीवर अवलंबून असेल. "

एकदां एक मनुष्य एकनाथमहाराजांच्याकडे आला. महाराजांच्या जवळ तो पश्चात्ताप व्यक्त करूं लागला. महाराज म्हणाले, " तूं एका आठवड्यानें मरणार आहेस. " त्याला धास्ती वाटली. तो म्हणाला, " आतां तरी मला नीट वागलें पाहिजे. " ज्यांना ज्यांना तो वाईट बोलला होता, ज्यांचा ज्यांचा त्यानें अपमान केला होता, त्यांची त्यानें क्षमा मागितली. त्याच्या वर्तनांत फारच फरक पडला. त्याचें जीवन जणूं प्रेममय झालें. ८ दिवस झाले, पण तो मेला नाहीं. ८ दिवसांनंतर महाराजांच्याकडे तो आला. महाराज म्हणाले, "कां रे, ८ दिवस कसा काय वागलास ? " तो म्हणाला, " महाराज, जीवनांत क्रांति झाली. साऱ्या आयुष्यभर वागलों नसेन इतकी चांगली माझी वर्तणूक झाल्याचें सारे बोलतात. " एकनाथमहाराज म्हणाले, " प्रत्येक क्षणाला मृत्यु जवळ उभा आहे असें समजून मी आपलीं कृत्यें करतों. प्रत्येक क्षणाला आमचा विकास होतो. तुझा आतां पुनर्जन्म झाला आहे ; तुझ्यांतला देव आतां जागृत झाला आहे. " आपल्या हातून चांगलीं कामें घडायचीं असतील तर पुन्हा काम करायची संधि आपल्याला मिळणार नाहीं असें आपण समजलें पाहिजे. ही वास्तविकता. ही जाणीव असली म्हणजे आपलें जीवन पवित्र, उज्ज्वल होईल.

आपल्या कामाची वास्तविकता ओळखून तिच्यांत तल्लीन न होणें हाच खरा पराजय असें कॅनन फेयर म्हणतो.

लेओनारडो एक प्रसिद्ध चित्रकार. तो आपल्या चित्रांत नुसत्या कल्पकतेवर भार देत नसे. त्याचें सर्वोत्तम चित्र आहे " लास्ट सपर. "

चित्राला रंग भरायच्या अगोदर तो तास दोन तास गांवांतून फिरून येई व मग चित्रास रंग देई. पोप आपल्या कवितेची प्रत्येक ओळ दोन वेळां लिही. गिबननें आपल्या आठवणी ९ वेळां लिहिल्या. आपल्या सुप्रसिद्ध इतिहासाचा पहिला पाठ त्यानें १८ वेळां लिहिला. मॅाँटेस्क्यू एक सुप्रसिद्ध लेखक. आपल्या लेखनाविषयीं तो म्हणतो, "तुम्ही कांहीं तासांतच हें वाचून संपवाल, परंतु हें लिहिण्यांत माझे केस काळ्याचे पांढरे झाले आहेत." आपल्या विषयाचें इतकें सखोल व वास्तविक ज्ञान असल्यावांचून लेखन जीवनदायी नाहीं होऊं शकत. त्यांचें लेखन त्यांच्या चिर-अभ्यासाचें फल असतें. ती त्यांची तपस्या असते. लोकमान्य टिळकांनीं आपलें "गीतारहस्य" मंडालेच्या कारावासांत लिहिलें. इतकें उत्तम पुस्तक वाचून एकानें त्यांना प्रश्न विचारला, "लोकमान्य, सरकारनें तुमचें लिखाण बाहेर येऊं दिलें नसतें तर?" लोकमान्य म्हणाले, "माझें लेखन म्हणजे माझी तपस्या. सरकारनें माझें लिखाण बाहेर येऊं दिलें नसतें तर ८ दिवस विश्रांति म्हणून सिंहगडावर जाऊन मीं सारें लिहून काढलें असतें." बॅ. सावरकरांचें अंदमानी काव्यही असेंच त्यांच्या चिरतपस्येचें फल आहे. हें ज्ञान म्हणजे वास्तविक ज्ञान. परीक्षेसाठीं तयार केलेलें ज्ञान, जें परीक्षेनंतर तत्काळ विसरून जातें तें वास्तविक ज्ञान नव्हे. आम्ही ज्ञानासाठीं अभ्यास करीत नाहीं. प्रमाणपत्रासाठीं अभ्यास करतों. आजची खरोखरच ही स्थिति आहे. आम्हांला प्रमाणपत्र हवें असतें, ज्ञान नाहीं. पोहोणाराला कधीं प्रमाणपत्र लागतें का? तो पोहूनच दाखवितो. प्रमाणपत्र असून जो पोहोणारा पाण्याला भितो त्याला पोहोणें येतच नाहीं. आम्हांला जर खरें ज्ञान असेल तर प्रमाणपत्र असून नसूनही सारखेंच. वास्तविक ज्ञान म्हणजे खरें ज्ञान. तसेंच ज्ञान मिळवावयाचा आपण प्रयत्न करूं या.

एक प्राणिशास्त्रज्ञ होता. त्याला वाटलें, जर कांहीं दिवस ॲगॉसीसजवळ मी राहिलों तर फार उत्तम होईल. तो ॲगॉसीसकडे गेला. ॲगॉसीसनें त्याला एक मासा दिला आणि सांगितलें, याचें निरीक्षण कर. दोन तासांनीं त्यांनीं त्या विद्यार्थ्याची परीक्षा घेतली. ते म्हणाले, "तूं अजून माशाचें निरीक्षण केलेंच नाहींस. पुन्हा नीट बारकाईनें निरीक्षण कर." पुन्हा दुसऱ्यांदा त्याची परीक्षा झाली. पुन्हा त्यांनीं शेरा दिला, "मला वाटतें, अजून तुला डोळ्यांचा उपयोग करतां येत नाहीं."

या शेऱ्यानें त्या विद्यार्थ्याची प्रतिभा जागृत झाली. तो आपलें काम मन लावून करावयाला लागला. स्वतःला तो कामांत विसरला. प्रोफेसर-साहेब केव्हां खोलींत आले हें त्याला कळलेंसुद्धां नाहीं. ते खूष झाले. म्हणाले, "डोळ्यांचा उपयोग कसा करावा हें आतां तुला नीट कळलें."

सन १८०५. नेपोलियनचें युद्ध सुरू होतें. ब्रिटिश चॅनलपासचा कॅंप मोडून डॅन्यूब नदीकडे कूच करावयाचा त्यानें सेनेला हुकूम केला. त्याच्या डोक्यांत योजनांचा सारखा विचार चालू होता. साऱ्या लहानसहान गोष्टींकडे त्यानें जातीनें लक्ष पुरविलें. ज्या गोष्टी इतर लोकांना कमी महत्त्वाच्या वाटत, त्यांकडे तो बारकाईनें पाही. चढाईपूर्वीं तो सेनेचे मार्ग व पोहोंचण्याच्या वेळासुद्धां निश्चित करून देत असे. आपल्या हुकमांचें अक्षरशः पालन करावें अशी त्याची आज्ञा असे. त्याच्या ह्या कडक शिस्तीमुळें त्याला ऑस्टरलिंगचा विजय मिळाला.

शिवाजीचेंही असेंच बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष असे. त्यानें एक किल्ला बांधला. एकादी जागा शत्रूंना वर येण्यासारखी असेल असा त्यास संशय आला. त्यानें किल्ल्यावरील सर्व कामगारांस एकत्र बोलाविलें व सांगितलें, किल्ल्याच्या मुख्य दरवाजाशिवाय इतर मार्गानें जो किल्ल्यावर येऊन दाखवील त्याला इनाम दिलें जाईल. किल्ल्यावरचा एक महार एका दिशेनें वर चढून आला. शिवाजीनें त्याला इनाम दिलें व त्या

भागाची दुरुस्ती करून त्यावर कोणी येऊं शकणार नाहीं अशी व्यवस्था केली. वास्तविक परिस्थितीच्या ज्ञानानें असा फायदा होतो व मनुष्य संकटमुक्त होतो.

जीवनांत अयशस्वी होणाऱ्याच्या थडग्यावर तीन शब्द लिहिले जातात. "बेसावध, बेपर्वा आणि आळशी." अनेक लोक यथार्थतेच्या अज्ञानानें आपली प्रतिष्ठा गमावून बसतात.

जोसेफ टर्नरच्या वडिलांची इच्छा होती, कीं त्यानें न्हाव्याचा धंदा करावा. परंतु त्याला चित्रकला फार आवडे. रमून जाई त्यांत तो. वडिलांशीं तो याबाबत झगडे. नाइलाजानें वडलांनीं त्याला एकदांची परवानगी दिली. प्रथम त्याच्याजवळ साधनसामुग्री अगदीं थोडी होती. त्याला गाईड्स आणि कॅलेंडरवरचीं चित्रें काढावीं लागत. त्याला हलकें काम मिळे. पण तेंही काम तो मन लावून करी. आपल्या वेतनापेक्षां तो जास्त काम करी. पुढें त्याची प्रसिद्धि वाढली. त्याचीं चित्रें वास्तविकतेवर आधारलेलीं असल्यानें लोकांना फार आवडत. त्यांचीं चित्रें म्हणजे जणूं सजीव निसर्ग. जगांतल्या मोठमोठ्या चित्रकारांना त्यानें मागें टाकलें. साहित्यक्षेत्रांत जें महत्त्व शेक्स्पियरला, तेंच चित्रकलाक्षेत्रांत टर्नरला मिळालें आहे.

हिंदी भाषेच्या लेखकांत सर्वोच्च स्थान प्रेमचंदजींना आहे. त्यांच्या वाङ्मयामुळें हिंदी साहित्याची योग्यता वाढली. त्यांचें साहित्य यथार्थावर आधारलेलें असे. आदर्शोन्मुख यथार्थवादी लेखनामुळेंच त्यांना अद्वितीय स्थान प्राप्त झालें आहे.

कोणतेंही काम करतांना तें सावधपणें आणि यथार्थतेनें करायला हवें. आपल्या इंद्रियांच्या हें अंगवळणीं पडायला हवें. यथार्थता, वास्तविकता, म्हणजेच सत्य. सत्यावर कितीही अभ्रें आलीं तरीही सत्य मरत नाहीं. सत्य अमर आहे. वास्तविकता चिरायु आहे.

# १३ : प्रसन्नता

गीताई वाचनालय

* प्रसन्नतेपुढें सर्व, दुःखें जातीं झडोनियां ।
प्रसन्नतेनें बुद्धीची स्थिरता शीघ्र होतसे ॥

* मनःप्रसाद चाहिए केवल,
क्या कुटीर फिर क्या प्रासाद ?

—पंचवटी

* प्रसन्नता म्हणजे समाधान आणि समाधान हीच सर्वश्रेष्ठ संपत्ति.

भारताच्या सर्वोच्च पवित्र ग्रंथांत प्रसन्नतेची महती गाइलेली आहे. सूर्य आल्यावर जसा अंधकार पळावा, धैर्य आल्यावर भीति पळावी, परमेश्वरापुढें सैतानानें नांगी टाकावी, त्याचप्रमाणें प्रसन्नता येतांच दुःखें, संकटें, क्लेश पार कोठल्या कोठें विलुप्त होतात. यशस्वी जीवन होण्यासाठीं आपल्या कामांत एकाग्रता हवी, बुद्धि स्थिर व्हायला हवी आणि ही स्थिरता, एकाग्रता प्राप्त करून घ्यायचें एकमेव साधन म्हणजे प्रसन्नता. अर्जुनाच्या निमित्तानें साऱ्या जगाला उपदेश करतांना परमेश्वरानें हें गीतेंत सांगितलें आहे. गीता म्हणजे अनुभवाचे मार्गदर्शक बोल. आपण त्यांपासून शिकलें पाहिजे.

गीतेनें १७ व्या अध्यायांत तपःश्चर्येचा संदेश दिला आहे. रानावनांत न जातां बसल्या जागीं तप कसें करतां येतें तें गीतेनें सांगितलें आहे. ही तपःश्चर्या तीन प्रकारची. शारीरिक, मानसिक, वाचिक. त्यांपैकीं मनाचें तप कसें करतात हें सांगतांना प्रथम गीतेनें प्रसन्नतेचें आवाहन केलें आहे.

प्रसन्नवृत्ति, सौम्यत्व, आत्मज्ञानी सुनिश्चय ।
भावना राखणें शुद्ध मनाचें तप बोलिलें ॥

तप म्हणजे सामर्थ्यसंग्रह. मनाचें सामर्थ्य मिळवावयाचें असेल तर मनाचें तप केलें पाहिजे आणि मनाचें तप करावयाचें म्हणजे अगोदर प्रसन्नता मिळविली पाहिजे.

•

एक राजा होता. राजाच तो, त्याला काय कमी असणार? सारीं सुखें त्याला होतीं. गाद्या-गिर्द्या, नोकर-चाकर, पंचपक्वान्नें, हसविण्यासाठीं जी-सरकार आणि खुशमस्कऱ्यांचे तांडे होते. पण राजाला सुख म्हणून नव्हतें. सुखी माणसाच्या शोधार्थ तो निघाला. मोठमोठे लोक त्यानें पाहिले, धनवान् पाहिले, पण सुखी कोणीच सांपडेना. प्रत्येकाला कांहीं ना कांहीं दुःख होतेंच. शेवटीं राजा निराश झाला. रानांत एका बाजूला येऊन बसला तो. त्याला वेणूचे मधुर स्वर ऐकूं येऊं लागले. राजा इकडे तिकडे पाहूं लागला. दगडाची उशी करून, कांबळ्याची गादी हंथरून, बाभळीच्या झाडाच्या सांवलींत एक गुराख्याचा मुलगा वेणू वाजविण्यांत तल्लीन झालेला त्याला दिसला. शरीरानें धडधाकट आणि आनंदी होता तो. राजा त्याच्याजवळ गेला. अंगावर फाटकीं लत्तरें, खायला कोरडी भाकर असूनही तो आनंदी होता. राजा परत फिरला. वाटेंत त्याला एक संन्यासी भेटला. राजानें त्या मुलाच्या आनंदीपणाचें कारण विचारलें. संन्यासी म्हणाला, " राजा, त्याचें चित्त प्रसन्न आहे. सारी सृष्टि त्याला प्रसन्नतेचा धडा देतांना दिसते. जसें वातावरण तशी वृत्ति. सकाळचा प्रसन्न मंद वारा त्याला जागवितो. मधुर फुलें फुलतात, त्याला सुगंध पोहोंचतो. पूर्वेकडचा सूर्योदय त्याची वृत्ति आनंदी करतो. जिकडे तिकडे प्रसन्नता. राजा, प्रसन्नता म्हणजे सर्व सुख. मन प्रसन्न हवें, मग झोपडी काय नि राजवाडा काय? सारखेंच सारें. "

प्रसन्न माणसें भूतकाळचा शोक करीत नाहींत, भविष्यकाळची काळजी ते करीत नाहींत. भविष्य-भूत यांच्या चिंतेंत ते आपला वर्तमानकाळ घालवीत नाहींत. वर्तमानांत ते प्रसन्नतेनें आपल्या कामांत मग्न होतात; मग त्यांना भविष्याची चिंता करावी लागत नाहीं, कीं भूतकाळाचा शोक करावा लागत नाहीं. शुद्ध वर्तमानकाळ प्रसन्नतेनें घालविणारा नेहमींच सुखी, संपन्न राहील. सुख आणि संपन्नता ही बाह्य उपकरणांवर अवलंबून नसते. सुख-संपन्नता मनावर अवलंबून असते आणि वर्तमान प्रसन्नतेनें घालविणाराला त्यांचा लाभ होतोच. आज आमची प्रवृत्ति अशी झाली आहे, कीं काम म्हणजे आम्हांला संकट वाटतें. वास्तविक, कर्मांत आनंद घ्यायला हवा. आनंदपूर्वक काम करण्यानें मनाला प्रसन्नता वाटते आणि प्रसन्नतेमुळें कामांत उत्साह येतो. एका कामांत उत्साह वाटूं लागला, कीं सारींच कामें उत्साहानें पार पडतात. एका प्रसन्नतेमुळें जीवन लोकोपयोगी होऊन मनुष्याला कीर्ति मिळते.

चेहऱ्यावरचे भाव म्हणजे हृदयांतील भावनांचा फोटो. आपलें हृदय उत्साही असेल, प्रसन्न असेल तर चेहऱ्यावरही तेच भाव खेळतांना दिसतील. फूल प्रसन्न असतें, तें आपलें हृदय फुलवतें, उत्साह देतें. आरशांत माणसाचें प्रतिबिंब पडतें, तसेंच त्याचें समाजांतही पडतें. एका मनुष्याला दुःखी, कष्टी पाहून साऱ्यांनाच दुःख वाटूं लागतें. एका माणसाला प्रसन्न, हसतमुख पाहून सारे प्रसन्न होतात. आपण आपल्या भावना दुसऱ्यांच्याही हृदयांत स्पंदित करीत असतों. समाजाच्या दृष्टीनें अप्रसन्नचित्त असणें गुन्हा आहे. "संकटें आलीं तरी स्काउट आपली आनंदी वृत्ति सोडीत नाहीं." हा स्काउटिंगचा नियम आहे. आपण दिवाणखाने सजवितों, विवेकानंद, रामदासस्वामी, वगैरेंचे तेजःपुंज प्रसन्न फोटो लावतों, आपल्या टेबलक्लॉथवर फुलेंपांखरें काढतों. कशाला? सारा निसर्ग प्रसन्न आहे. त्याचें स्मरण करून प्रसन्न व्हावें म्हणूनच हें सारें

असतें. फुलदाणींत फुलें कशाला? तीं कोमेजतात. पण कोमेजतां, कोमेजतां तीं शिकवितात. प्रसन्नता म्हणजे जीवन. कोमेजणें म्हणजे मृत्यु. प्रसन्नतेचा एक क्षण अनेक वर्षांबरोबर आहे. तो परमेश्वरी, दिव्य, दैवी, अमर क्षण असतो. प्रसन्नतेनें घालविलेलीं वर्षेंच्या वर्षें क्षणांप्रमाणें वाटूं लागतात. ज्याला एक क्षण वर्षावर्षासारखा वाटतो त्याला जीवन म्हणजे ओझें वाटतें. परंतु ज्याचें चित्त प्रसन्न आहे त्याला वर्षेंच्या वर्षें क्षणाप्रमाणें वाटतात. ही प्रसन्नतेची जादू आहे. निसर्ग हा प्रसन्नतेनें भरलेला आहे. आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे, यात्रा करा, पायीं यात्रा करा, हिंदुस्थानच्या चार कोपऱ्यांना असलेल्या चारी धामांची यात्रा करा, १२ ज्योतिर्लिंगांची यात्रा करा. हें कशासाठीं? निसर्गाच्या दर्शनासाठीं. आपण आजही निसर्गाला सोडीत नाहीं आणि निसर्गही आपल्याला सोडीत नाहीं. घरांत आपण निसर्गचित्रें लावतों, तुळशीचें रोपटें लावतों, पोपट पाळतों. निसर्गापासून प्रसन्नता मिळावी म्हणून हे आपले श्रम. आजचे कांहीं लोक निसर्गापासून दूरदूर पळतात पण निसर्ग यांना सोडीत नाहीं. ते शहरांत येऊन राहतात. घरें चुनेगच्चीचीं बांधतात, पण पाऊस पडतो. एक दिवस हळूच एक गवताची काडी वाऱ्याबरोबर डोलूं लागते, कुठें पिंपळाचीच एकादी फांदी चुन्यांतून डोकें वर काढते. सूर्य तर नेहमींच प्रसन्नतेचा पाठ शिकवितो. वाराही नेहमीं सुगंध घेऊन येतोच. निसर्ग आपल्याला सोडीत नाहीं. तो प्रसन्नता घेऊन आपला पाठलाग करतो. नामदेवमहाराज कुत्र्याला नुसतीच रोटी बाधेल म्हणून तुपाची वाटी घेऊन धावत होते ना त्याच्यामागें, तसाच निसर्ग जगाचें दुःख आपल्याला बाधूं नये म्हणून प्रसन्नता घेऊन आपल्यामागें येतो.

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित संयुक्त प्रांताच्या मंत्री झाल्या. आपल्या कचेरींतील फाइलींच्या आणि फर्निचरच्या खालीं त्यांचा जीव जायला

लागला दडपून. त्यांनीं फर्निचर कमी केलें आणि टेबलावर फाइलींच्यावर फुलदाणींत फुलें ठेवायला सुरुवात केली. त्या मंत्र्याच्या कामांतही नेहमीं प्रसन्न राहत. आपल्या शिक्षणसंस्थांना आतां मोठमोठ्या इमारती लागतात. पुस्तकांच्या आणि इमारतींच्या बोजाखालीं विद्यार्थी दबून जातात. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमींच दुःखी भाव. शाळेंतून परत येतांना त्यांचे चेहरे कोमेजून जातात. पूर्वीं आपलीं गुरुकुलें शहरापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यांत असत. प्रसन्न वातावरणांत गुरुजी विद्या देत. त्यांच्या जीवनाचा विकास करीत. आज स्व. रवींद्रांच्या शांतिनिकेतनमध्यें असें शिक्षण दिलें जातें. झाडाखालीं शाळा. आजूबाजूला फुलें, मध्यें फुलें. आज सृष्टिनिरीक्षणाचा तासही शाळेंतच घेतात. जणूं निसर्गापासून आमची फारकत करण्याचा विडा आजच्या शिक्षणपद्धतीनें उचलला आहे. अभ्यासाच्या ओझ्याखालीं आज जीवनें कोमेजलीं जात आहेत. कोमेजलेलीं जीवनें काय सत्कार्यांचा सुगंध पसरविणार जगांत ?

हसरा मुलगा साऱ्यांनाच प्रिय होतो. त्याच मुलाच्या हास्यांत अनुभव, गंभीरता मिळवून प्रसन्नता होते तयार. लहान मुलांना देव समजतों आपण...कां ? प्रसन्नता हा दैवी गुण आहे हाच याचा अर्थ. चेहऱ्यावरचें स्मित म्हणजे हृदयांतल्या प्रसन्नतेचेंच प्रतिबिंब.

डेल कार्नेजी आपल्या ग्रंथांत हास्याचे फायदे सांगतांना म्हणतो—

( १ ) एक पैसाही खर्च न करतां आपल्याला अमूल्य गोष्टी मिळतात.

( २ ) हास्य पाहाणारा धनी होतो, परंतु देणाराचें कांहींच नुकसान यांत होत नाहीं. हास्य हीच एक अशी वस्तु आहे, कीं जी स्वतःची हानि न होतां दुसऱ्याला दिली जाऊं शकते.

( ३ ) हास्यामुळें आपली आठवण दुसऱ्यांना आयुष्यभर राहते.

( ४ ) हसतमुख गरीब कुबेर आहे आणि याच्या अभावानें कुबेर भिकारी आहे.

( ५ ) स्मितामुळें घरांत सुख, समाधान नांदतें. धंदेवाईकांच्याकडे गिऱ्हाइकें जास्त आकर्षित होतात.

( ६ ) थकलेल्यास स्मितानें विश्रांति मिळते, निराश झालेल्यांना आशा मिळते, दुःखी लोकांचें दुःख नाहींसें होतें. आजाऱ्याला फुलें याचसाठीं देतात. केलेल्या परिश्रमांचें ओझें मग वाटत नाहीं.

( ७ ) आम्ही स्मितामुळें श्रीमंत झालों तरी हें उधार दिलें जात नाहीं, चोरीचीही भीति याला नाहीं.

( ८ ) गरीब असूनही आपण सुहास्यवदनानें दुसऱ्याची सेवा करून त्याची सर्वोत्कृष्ट सेवा साधतों.

( ९ ) नेहमीं हसतमुख असणारा समाजांत प्रिय होतो.

( १० ) एका दिव्यावरून दुसरा दिवा जसा पेटविला जातो तसेंच दुसऱ्याच्या चेहऱ्यावरही स्मित झळकतें.

नेपोलियन नेहमीं राजकारणांत मग्न असे. राजकारणाच्या झोक्याबरोबरच आशा निराशेंत त्यांचें मन हेलकावे खात असे. कधीं कधीं काळजींत तो चूर होऊन जाई. त्याची पत्नी जोसेफाइन नेहमीं प्रसन्न असे. त्या प्रसन्नवदनेच्या दर्शनानें नेपोलियन सारें विसरून जाई. त्याला नव्यानव्या युक्त्या सुचत. निराशेचीं, काळजीचीं अभ्रें दूर होत. नव्या दमानें आणि विजयाच्या आत्मविश्वासानें नेपोलियन बाहेर पडे. त्याचा उत्साह पाहून, त्याची प्रसन्नता पाहून सारे सैनिक उत्साहानें वेडावून जात.

लोकमान्यांच्या केसरीचा जामीन मागितला, पण लोकमान्यांच्या चित्ताची प्रसन्नता ढळली नाहीं. " सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ " अशी त्यांची प्रसन्नता होती. प्रसन्नतेनें ते माणसें आपलीशीं

करीत. प्रसन्नता म्हणजे अनेक मित्र जोडणारा दुवा. प्रसन्नता आहे त्या ठिकाणीं मित्रांचें जाळें असायचेंच. तानाजी, बाजी, यांसारखे प्राणांस प्राण देणारे मित्र शिवाजीनें याच गुणावर मिळविले. लोहचुंबक जसा इतरांना आकर्षित करतो, तसेंच प्रसन्नताही करते. कुटुंबांतलीं माणसें प्रसन्न माणसाकडे आपोआपच आकर्षिलीं जातात. लोहचुंबकाची शक्ति आदळआपटीनें आणि तापविण्यानें नष्ट होते. घरांत आदळआपट सुरू झाली, भांडणाचा ताप होऊं लागला, कीं प्रसन्नतेचा लोहचुंबकही असाच आकर्षणरहित होऊन जातो.

मनुष्यजीवन निष्कंटक नाहीं. विजयाजवळ कंटक असणारच. गुलाबाजवळ नसतात का कांटे? मनुष्यांना संकटें येणारच. संकटें मनुष्याकडे येतात. मनुष्य संकटांना घाबरला, तर संकटें त्याचा नायनाट करतात. संकटें एकटींच येत नाहींत. एकामागें एक येतात. एका संकटाला घाबरला, त्याला इतर संकटें सळो कीं पळो करून सोडतात. पण संकटांचेंही जो प्रसन्नतेनें स्वागत करतो त्याचीं संकटें त्याच्या यशोमालेंत यशाचें एक फूल जोडतात. संकटांचीं फुलें होतात. संकटें त्याला आडवीं येत नाहींत. चाफेकरबंधूंना फांशीं दिलें, ते हातांत गीता घेऊन, चेहऱ्यावर गीताप्रणित प्रसन्नता ठेवून फांशीला गेले. त्यांचें मरण म्हणजे जीवनच होतें. प्रसन्नतेनें बुद्धि तीक्ष्ण होते. येणाऱ्या संकटांचा ती नायनाट करते.

फुलें आणि मुलें परमेश्वरी अंश, आनंदाचीं स्थळें. दोन्ही प्रसन्न असतात. साऱ्यांना प्रसन्न करतात. महात्माजींची प्रसन्नता बालकासारखी असे. २१ दिवसांचा उपवास असो, शक्ति क्षीण होत असो, मृत्यु दाराशीं उभा असो, महात्माजींची प्रसन्नता ढळत नसे. मृत्यूचें स्वागतही त्यांनीं हसतमुखानें केलें!

दुसऱ्याच्या हृदयांत शिरायला प्रसन्नतेसारखें साधन नाहीं. प्रसन्नतेमुळें दुसरे आपलेसे होऊन जातात. बंगालचा क्रांतिवीर दत्त फांशी

जातांजातांही त्याची प्रसन्नता ढळली नाहीं. त्याचें वजन फांशीची शिक्षा झाल्यावरही वाढलें. शरीर स्वस्थ, आरोग्यसंपन्न ठेवायला प्रसन्नतेसारखें औषध नाहीं. शरीर हें धर्माचें आद्य साधन आहे. आणि तें शरीर प्रसन्नतेनें उत्तम राहतें. परमेश्वराच्या कृपेनें हा मनुष्यदेह आपल्याला मिळाला. त्याच्या कृपेची आठवण ठेवून आपण नेहमीं प्रसन्न राहायला हवें. संतांना सारखें घोर युद्ध करावें लागतें. तुकाराममहाराज म्हणतात,

रात्रंदिन आम्हां, युद्धाचा प्रसंग ।
अंतर्बाह्य मन आणि जन ॥

नित्य युद्ध सुरू असतांनाही त्यांची प्रसन्नता ढळत नाहीं. संत प्रसन्न असतात, त्याचें रहस्यही तुकाराममहाराजांनीं सांगितलें आहे;

ऐसें भाग्य कधीं लाहता होईन
अवघें देखें जन ब्रह्मरूप ।
मग तया सुखा अंत नाहीं पार
आनंदें सागर हेलावती ॥

दुसऱ्याच्या उन्नतीनें त्यांना दुःख वाटत नाहीं. दुसऱ्याच्या उन्नतीला ते स्वतःचीच म्हणजे ब्रह्माचीच गति समजतात आणि मग त्यांच्या सुखाला पारावार राहत नाहीं.

अप्रसन्न चित्तानें जेवूं नये. चित्त अप्रसन्न असतां खाल्लेलें अन्न म्हणजे विष. प्रसन्नतेशिवाय कोणतेंही काम करूं नये. प्रसन्नतेशिवाय केलेल्या कामाला अपयश ठेवलेलेंच. चित्ताची प्रसन्नता म्हणजेच यश. दुर्मुखलेला मनुष्य कोणालाच आवडत नाहीं. आपल्या एका कवीनें म्हणूनच "दुर्मुखलेला असूं नको" असा संदेश आपल्याला दिला. प्रसन्नचित्त म्हणजे धंदा यशस्वी करण्यासाठीं परमेश्वरानें मोफत लुटावयास दिलेलें भांडवल. इंग्लिशमध्यें–Sportsman spirit किंवा मराठींत खिलाडू वृत्ति म्हणतात ती आपण आपलीशी केली पाहिजे. शत्रूचा विजय झाला तरी

त्याचें वैषम्य वाटूं न देतां त्याच्या गुणांचें ग्रहण करणें म्हणजेच खिलाडू वृत्ति. हिटलरनें स्टॅलिन त्याचा शत्रु असूनही नाहीं का त्याला शाबासकी दिली? आपलीच पाठ थोपटण्यापेक्षां दुसऱ्याची पाठ थोपटण्यांत केव्हांही श्रेष्ठता आहे.

भारतीय संस्कृतीचें चिन्ह आहे कमल. कमल म्हणजे प्रसन्नतेचा विजय; चिखलांतून, प्रतिकूल परिस्थितींतून वर येणें, पाणी वरून खालीं दाबीत असतां वर येणें. त्याच पाण्यावर आपलें प्रसन्नतेचें साम्राज्य स्थापणें. साऱ्या संकटांशीं झुंजूनही कमळ थकलें नाहीं. तें प्रसन्नचित्तानें विहार करतें. जगांत प्रसन्नता पसरविणें हेंच भारतीय संस्कृतीचें जीवन. निराशेच्या अंधकारावर विजय मिळविणारा तो चंद्र इस्लामी संस्कृतीचें चिन्ह व फांशीं जातांनाही प्रसन्नतेनें अपराध्यांना क्षमा करणाऱ्या भगवान् येशूचा तो क्रूस. साऱ्या धर्मांचीं चिन्हें प्रसन्नतेचेंच प्रदर्शन करतात.

परमेश्वरानें सृष्टीची रचनाच अशी केली आहे, कीं सर्वांनाच, गरीब–श्रीमंतांना, हिंदु–मुसलमानांना प्रसन्नतेचा मेवा लुटतां यावा. श्रीमंतांना कृत्रिम चैनीच्या वस्तु मिळतात, म्हणून निसर्गाच्या सुखापासून ते वंचित राहतात; तर गरीब म्हणजे निसर्गाचींच लेंकरें. निसर्गाच्या मांडीवरच त्यांचें पालन पोषण होतें. आमचे ऋषी-मुनी वनांत तपस्येला जात होते; कारण प्रसन्नता त्या ठिकाणीं सहजसाध्य आहे. प्रसन्नता ही एकाग्रतेची पहिली पायरी आहे. शेतकऱ्यांचीं शरीरें धष्टपुष्ट असतात. निसर्गांतील प्रसन्नता उपभोगणारांचीं तीं शरीरें! परमेश्वरानें त्यांना दुःख दिलें, पण त्याबरोबरच त्यावरच रामबाण इलाजही दिला.

ज्याला जीवनांत यशस्वी व्हायचें आहे, आपली ध्येयसिद्धि व्हावी असें ज्याला वाटतें, त्यानें नेहमींच प्रसन्न असलें पाहिजे. प्रसन्नता ही यशाची गुरुकिल्ली आहे.

आपल्या एका देवीची आरति आहे—

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां।
क्लेशांपासुनि सोडी, तोडी भवपाशा।
अंबे, तुजवांचून कोण पुरविल आशा।
नरहरि तल्लीन झाला, पदपंकजलेशा॥

देवी प्रसन्नवदना आहे. भक्ताच्या मनांत हेच भाव ती जागृत करते. भक्ताला ती प्रसन्नचित्त करते आणि मग त्याचे क्लेश दूर होतात, भवबंधनें तुटून जातात आणि तो ध्येयदेवाच्या भक्तींत तल्लीन होऊन जातो. आरतीच्या ह्या एकाच कडव्यांत प्रसन्नतेचें सारें सार सांठविलें आहे.

प्रसन्नता देवीचा जयजयकार!!

## प्रसन्नतेची साधना

प्रसन्नतेची साधना कशी करावी हा प्रश्न फक्त शिल्लक राहतो. आपण प्रसन्न असावें असें वाटणें साहजिक आहे. पुढील पांच कारणांनीं आपल्या जीवनांत प्रसन्नता आणतां येते.

मनाचें औदार्य ज्याच्याजवळ आहे तो नेहमींच प्रसन्न असणार. लहानसहान गोष्टींत मनाचें औदार्य न दाखविल्यानें व्यर्थ मनाला त्रास होऊन वृत्ति अप्रसन्न होते. मनाचें औदार्य आलें म्हणजे मन प्रसन्न होऊं लागतें. यासाठीं आपल्या जीवनांत सहिष्णुता आणली पाहिजे.

परमेश्वरावर ज्याची पूर्ण श्रद्धा असते तो सेनापति बापटांच्यासारखा मनुष्य नेहमींच प्रसन्न असावयाचा. अज्ञातवास असो कीं कारावास; परमेश्वरावरची अतुलनीय श्रद्धा त्यांना सदैव प्रसन्न राखीत असते.

देव जें जें करी करी भल्यासाठीं।
हीच श्रद्धा हो, उरीं आणि ओठीं॥

ही त्यांची श्रद्धा. ह्या श्रद्धेमुळेंच त्यांचें चित्त सदैव प्रसन्न असतें. निष्काम कर्म करणाराला नेहमींच प्रसन्नता वाटते. अशांना यशाबद्दल विचार करावयालाही सवड नसते. ते इतके कर्तव्यपरायण असतात. अशा प्रकारें कर्मांत बुडून जाणारा कर्मवीर नेहमींच प्रसन्न असावयाचा.

ज्याला कर्तव्यकर्म केल्याचें समाधान असतें तो प्रत्यक्ष काळाच्या दाढेंतही प्रसन्नच राहील. "पांच तोफा ऐकल्या; आतां मी सुखानें मरतों" असें म्हणतांना बाजीच्या आणि सिंहगडावर प्राण ठेवतांना तानाजीच्या चेहऱ्यावर प्रसन्नताच खेळत असली पाहिजे.

कित्येक लोक तटस्थ वृत्तीनें आपल्या फजितीचें वर्णन करतात. वास्तविक फजितीमुळें ग्लानि येण्याऐवजीं त्यांना प्रसन्नताच वाटते. काकासाहेब कालेलकर एकदां पायीं प्रवासांत होते. रस्ता रानांतून जात होता. त्यांना चालतां चालतां विंचू चावला. प्रथम त्यांना जरा दुःख वाटलें, पण नंतर दुसऱ्यालाच विंचू चावला आहे व त्याच्या निरीक्षणाची शक्ति आपल्यांत आहे असें ते समजले व कसकसें विंचवाचें विष चढतें ह्याचें निरीक्षण तटस्थ भावानें त्यांनीं केलें. विंचवाचें दुःख ते विसरले. त्यांना झोपही लवकरच लागली. ह्या तटस्थ वृत्तीनें प्रसन्नता येते.

आपण जेवणाखाणांत व्यवस्थितपणें वागत नाहीं. अजीर्ण होतें व मग चित्त अप्रसन्न राहतें. म्हणून आपण "युक्ताहारविहारश्च युक्तचेष्टस्य कर्मसु." आपल्या आहारविहारांत व कर्मांत व्यवस्थितपणा ठेवला पाहिजे म्हणजे चित्त नेहमीं प्रसन्न राहतें.

प्रसन्नताप्राप्तीचे हेच पांच राजमार्ग आहेत.

साने गुरुजी आपल्या एका काव्यांत म्हणतात:

जिथें अहंकार जिथें घमेंड।
प्रसन्नता दावी न तेथें तोंड।

अहंकार आणि घमेंड ज्या ठिकाणीं आहे, त्या ठिकाणीं प्रसन्नता असणार नाहीं.

प्रसन्नतेचे नुसते पोवाडे गाऊन भागणार नाहीं. प्रसन्नता अंगीं आणली पाहिजे. श्वासोच्छ्वासाप्रमाणें ती जिवंत असेपर्यंत आपल्या बरोबर असली पाहिजे.

भारताला एक विघटनेचा भयंकर रोग जडला आहे. आजची आमची हलाखीची स्थिति केवळ आमच्या विघटितपणामुळें आहे. तुकाराममहाराज यावर एक उपाय सांगतात. ते म्हणतात—

मन करा रे प्रसन्न । तेणें जोडे नारायण

नर-आयन (नरांचें घर) जर जोडावयाचें असेल, संघटन जर करावयाचें असेल तर मन प्रसन्न करावयाला हवें. मन निर्मळ, प्रसन्न असेल तरच उत्कृष्ट सेवा घडेल. सेवेमुळें विश्वास निर्माण होतो. घरांतलीं माणसें एकमेकांची सेवा करतात. आपण आईला भाजी आणून देतों, आई आपलें अंथरूण घालून देते. आपणांला एकामेकांचा नेहमीं विश्वास असतो. आपलें पारिवारिक संघटनही त्यामुळें दृढ असतें. संकटांत आपण एकमेकांच्या उपयोगी पडतों. आपल्या देशांत जर संघटनेचें जाळें पसरावयाचें असेल तर आपण प्रसन्नचित्तानें आपल्या सेवाकार्यांत मग्न झालें पाहिजे. सेवेनें विश्वास निर्माण होईल. संघटनेची इमारत विश्वासाच्या पायावर उभी राहूं शकते. आपण सारे प्रसन्नचित्त होऊं या.

ही जी प्रसन्नता असते ती अंतःकरणाच्या समाधानाची द्योतक असते. आणि अंतःसमाधान मिळण्यासाठीं मनुष्याला आपल्या जीवितध्येयाची स्पष्ट कल्पना असावी लागते. आपल्या जीवितध्येयाच्या साक्षात्कारानंतर मनुष्य तें ध्येय मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यांत त्याला अंतःसमाधान लाभतें व त्या समाधानाचें द्योतक अशी प्रसन्नता चेहऱ्यावर नेहमीं विलसत असते. आपली नित्य वाढ होत आहे, आपली प्रगति थांबली

नाहीं. या भावनेनें आनंद व समाधान लाभतें. एका इंग्रज लेखकानें लिहिलें आहे "Growth is happiness." वाढ हा खरा आनंद. ही वाढ मात्र हृदयाची, अंतःकरणाची, ध्येयाची, मार्गावरील गतीची असली पाहिजे. अन्तःसमाधानावांचून प्रसन्नता अशक्य आहे. आणि जीवित-ध्येयाच्या साक्षात्कारावांचून अन्तःसमाधान नाहीं. म्हणून आपण जीवित-ध्येयाचा साक्षात्कार प्रसन्नतेसाठीं करून घेतला पाहिजे. प्रसन्नतेची ती खरी साधना आहे.

★

# १४: नम्रता

* नम्रता म्हणजे ज्ञानारंभ. नम्रता ज्या ठिकाणीं नाहीं, त्या ठिकाणीं खरें ज्ञान असणें शक्यच नाहीं.

* मनुष्याजवळची नम्रता संपली म्हणजे त्याच्याजवळची माणुसकी संपलीच म्हणून समजावें.

* विद्या विनयेन शोभते ।

* जिथें अहंकार जिथें घमेंड
प्रसन्नता दावि न तेथें तोंड ॥

—सानेगुरुजी

“ शून्यवत् होऊन राहाणें ही नम्रतेची पराकाष्ठा आहे. मी म्हणजे कांहीं विशेष आहे अशी आपलें शरीर, मन, बुद्धि, विद्या, कला, पवित्रता, ज्ञान, उदारता, विनय वगैरे गुणांबद्दल कल्पना असते, तेथें आढ्यता, अहंकार ठेवलेलाच. अशा प्रकारच्या अहंपणाची कमींत कमी कल्पना असणें म्हणजे नम्रता. आपल्या निरोगी अवयवांबद्दल जशी आपली बेभान स्थिति असते तशी आपल्या सर्व गोष्टींसंबंधीं असणें म्हणजे नम्रता.”

“ अनेक सद्गुण, सुविचार यांनीं युक्त जीवनांत नम्रता आपोआपच येते.”

“ बाह्य नम्रतेंत कित्येक वेळां अहंकार दडलेला असतो. ही नम्रता खरी नव्हे.”

—गांधीविचारदोहन

“ ईश्वराच्या हातांतील साधन होतां यावें म्हणून आपण निरहंकारी झालें पाहिजे. तुमच्या आमच्या जीवनांतून प्रभूनें संगीत निर्मावें असें

वाटत असेल तर जीवनाची बांसरी अंतर्बाह्य पोकळ करून ठेवूं या. तरच देवाचा वारा तिच्यांतून फुंकला जाईल, संगीत निर्माण होईल. परंतु आपल्या अहंकारानें, आपल्या क्षुद्र, स्वार्थी वासनाविकारांनीं जर आपली जीवनाची बांसरी भरून गेली असेल, तर प्रभु तिच्यांतून वारा कसा फुंकेल? संगीत कसें प्रकट होईल? नम्रतेशिवाय कांहीं एक नाहीं. नम्रता हा ज्ञानाचा आरंभ. नम्रता नसेल तर जीवन वाढणार नाहीं. समर्थांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे—

'नेणतेपण सोडूं नये'

"आपण नेणते आहोंत ही भावना सोडूं नये. विहिरींत अपरंपार पाणी असतें. परंतु विहिरींत सोडलेली घागर जर वाकणार नाहीं, तर तें पाणी तिच्यांत कसें शिरेल? ती अहंकारानें नाचत राहील तर रितीच राहील. विनम्र झालों तरच आमच्या जीवनांतूत ईश्वरीय संगीत निर्माण होईल."

—गीताहृदय

नम्र माणसाची नेहमींच उन्नति होत राहील. नम्र माणसाला ज्ञान मिळतें. गुरुजी मग जातगोत नाहीं विचारीत. कच शुक्राचार्यांकडे नम्र होऊन गेला. त्यालाही, शत्रूचा असूनही शुक्राचार्यांनीं विद्या दिली. नम्रता हा मान मिळवावयाचा मार्ग आहे. भगवद्गीतेंत भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।

ज्ञान मिळवायचें असलें तर प्रणिपात कर; नम्र होऊन सेवा कर. शिष्याचें हृदय कृतज्ञ असलें म्हणजे मग गुरूला दक्षिणासुद्धां लागत नाहीं. नम्रतेचें एक तुळशीचें पानही साऱ्या जगाला भारी आहे.

विनम्र भावाशिवाय केलेलीं कामें मातीमोल होतात. नम्रतेनेंच लोक आमच्याकडे आकर्षित होतात. नम्रता म्हणजे जीवन आणि अहंकार म्हणजे मृत्यु.

मंडनमिश्रांना आद्य शंकराचार्यांनीं वादांत जिंकलें. ठरल्याप्रमाणें मंडनमिश्रांनीं संन्यास दीक्षा घ्यायची तयारी केली. नदीवर ते स्नानास गेले. रस्त्यानें जातांना मंडनमिश्र शंकराचार्यांच्या ज्ञानाबद्दल आपल्याला वाटलेलें आश्चर्य व्यक्त करीत होते. शेवटीं ते म्हणाले, "महाराज, आपणांस किती ज्ञान झालें आहे? शंकराचार्यांनीं आपला दंड नदीच्या पाण्यांत बुडवून वर काढला. दंडाला थोडेंसेंच पाणी चिकटलें होतें. आचार्य म्हणाले, "ह्या नदींतलें जितकें पाणी माझ्या सोट्याला लागलें, तितकेंच ज्ञानसागरांपैकीं ज्ञान मला झालें आहे." शंकराचार्य एवढे विद्वान पण त्यांची ही नम्रता. विद्या विनयामुळेंच शोभते.

हल्लीं मनुष्य धनी झाला, कीं तो उद्दाम होतो. त्याच्याजवळ ज्ञानधन असो कीं दुसरें कोणतेंही असो. पण निसर्गाचा हा नियम नाहीं. झाडें फळांनीं लदलीं म्हणजे तीं वाकतात; मेघ पाण्यानें धनवान झाले कीं ते वाकतात. संत-सज्जनही आपल्या साधनसंपत्तीनें नम्र होतात. नम्रता हा निसर्गनियम आहे. झाडाचें वैभव वाढावें असें त्याला जर वाटत असेल तर त्यानें मातीच्या कणाहून नम्र व्हायला हवें. तें जितकें नम्र होऊन खोल जाईल तितकें त्याला जीवन मिळतें.

उद्दामपणा हें अर्धवट ज्ञानाचें लक्षण आहे. ज्याला थोडेंसें सायन्स कळलें तो म्हणतो, आम्हीं निसर्गावर मात केली, विजयी झालों. पण खरा शास्त्रज्ञ असें करीत नाहीं. एक शोध त्याला लागला, कीं तो म्हणतो, "देवा, तुझी लीला अगाध आहे. किती कौशल्यानें तूं जगांत वस्तु निर्माण करतोस. जितकें जितकें मी शोधतों तितकें तितकें माझें अज्ञानच प्रकट होतें. परमेश्वरा, तूं दिलेला हा मेंदू किती रे चांगला." असें म्हणून तो परमेश्वरापुढें नम्र होतो. सायन्सनें आज आमचा अहंकार कमी केला. हें विश्व केवढें आहे, त्यांत आपण रजःकणापेक्षां फारसे मोठे नाहीं हें विज्ञानानें आम्हांस शिकविलें. विज्ञानानेंच सत्य दर्शन करवून

आमच्या अहंकाराचा धुव्वा उडविला. खरे जे शास्त्रज्ञ, त्यांची वृत्ति अशी होते.

तुकाराममहाराज एका अभंगांत म्हणतात, "महापुरें झाडें जाती, तेथें लव्हाळे वांचती." जगाचा मामला धक्काधक्कीचा आहे. त्यांत वांचायचें असेल तर नम्रता धारण करायला परमेश्वरापाशीं आपण जातों. त्या दगडाच्याही पुढें आपलें मस्तक नमवितों. कां? आपण दाखवितों, परमेश्वरा, माझ्या बुद्धीची, कार्यांची सपाटी जमिनीबरोबर आहे, दगडापेक्षां मी कांहीं मोठा नाहीं. कांहीं नाहीं माझ्याजवळ आणि तूं तर सर्वसंपन्न! लहान मुलाप्रमाणें आपण तोंडावर चापट्या मारून घेतों. आपली नम्रता व्यक्त करण्यासाठींच आपण हें सारें करतों. नम्रता संपली कीं माणुसकीही संपलीच.

समर्थांनीं दासबोधांत म्हटलें आहे —

सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें॥
परंतु येथें भगवंताचें। अधिष्टान पाहिजे॥

आपल्याला वाटेल, समर्थांनीं चळवळीचें सामर्थ्य सांगितलें, आपल्यांत केवढी शक्ति आहे? माणसांना तत्काल गर्व होईल; मग तो दुसऱ्यांची मदत लाथाडील हें समर्थांना ठाऊक होतें, म्हणून त्यांनीं "भगवंताचें अधिष्टान पाहिजे" हेंही त्याच ठिकाणीं सांगून टाकलें. पाहिजे याचा अर्थ हवें असा नाहीं. पाहिजे म्हणजे देखिजे. ती जी तुझी चळवळ ती भगवन्ताच्या प्रसादानें चालते आहे हें पहा व नम्र हो असें रामदासस्वामी या श्लोकांत सुचवीत आहेत.

सार्वजनिक कामें करणारांना अनुभव येतो, कीं एकाला हलकें काम दिलें, दुसऱ्याला भारी दिलें म्हणून भांडणें होतात. काम सोडून जायला लोक तयार होतात. भगवान श्रीकृष्णांनीं तोंडी उपदेश केला नाहीं. त्यांनीं अर्जुनाच्या घोड्याला खरारा केला, राजसूययज्ञाच्या वेळीं उष्टीं

काढलीं आणि प्रसंग आला तेव्हां भगवद्गीताही सांगितली. कामांत ज्याला राम दिसला त्याला अहंकार होणार नाहीं. जो आपल्या कामांत मग्न राहील त्याला अहंकार करायला तरी वेळ कसा मिळणार ? आपण दिवसांतून दोन तास काम करतों, आपल्याला अहंकार वाटायला लागतो ; पण विश्वाकडे पाहा, चोवीस तास तो सूर्य जगाची सेवा करतो, ती हवा चोवीस तास आराम पोहोंचवते पण त्यांना अहंकार नाहीं. कामानें अहंकार जातो म्हणून परमेश्वरानें सांगितलें,

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।

आपल्या कर्मांत जो मग्न असेल त्याला सिद्धि मिळेल. कर्माची पूजा ही खरी पूजा. बाकी फळा-फुलांची पूजा, चांदी–सोन्याची पूजा, पक्वान्नांची पूजा म्हणजे अहंकाराची पूजा. कर्म करतांना जर अहंकार वाटत असेल तर ती पूजाच नव्हे.

माणसें कामें तर करूं लागलीं. त्यांना कामांतही गर्व वाटायला लागला. मीं यज्ञ केला, मी श्रेष्ठ. मीं ब्राह्मणभोजन दिलें, मी श्रेष्ठ. देवाच्या भक्तांतही श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचें बंड माजलें. कर्मणा शुद्धिः येण्याऐवजीं अशुद्धि यायला लागली. मग परमेश्वरांनीं सांगितलें.

यत्करोषि, यदश्नासि, यज्जुहोषि ददासि यत् ।

यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥

जें खातोस, जें करतोस, जें होमतोस, जें दान देतोस, जें तप करतोस तें मला अर्पण कर. जें दुसऱ्याला दिलें त्याचा अहंकार कसला ? म्हणूनच सारीं कामें "कृष्णार्पण" करायला सांगतात. गीतेचा हाच संदेश आहे. कर्म करा, पण त्याचा अहंकार नका होऊं देऊं. काम करून नम्रता येऊं द्या तुमच्यांत. कामावरून प्रतिष्ठा नका ठरवूं. श्रीकृष्णांनीं गीतेच्या निमित्तानें जगाला सारें जीवनशास्त्र सांगितलें आहे,

सेनापति बापट नाशिकच्या कारावासांत होते. डोकेंदुखीच्या भयंकर आजारानें ते हॉस्पिटलमध्यें पडले होते. साने गुरुजींनाही पकडून आणलें होतें. ते भेटायला गेले व गेल्याबरोबर त्यांनीं सेनापतींचे पाय धरले. सेनापति तशाही दुःखद स्थितींत आपलें दुःख क्लेश विसरले, प्रेमानें गळा दाटून आला. एवढे साने गुरुजी, पण त्यांच्यापाशींही नम्रता आहे. आम्ही इतर सेनापतींच्याकडे जात होतों, पण त्या महर्षींच्यापुढें आम्ही वाकलों नाहीं; पण साने गुरुजींनीं पाय धरले. नम्रता म्हणजे प्रेमाची, स्नेहाची जननी आहे. नम्र माणसावर सारे प्रेमाचा, स्नेहाचा वर्षाव करतात. नम्रता म्हणजे कृतज्ञता. दुसऱ्याच्या हृदयस्थ दयाघन परमेश्वरापुढें कृतज्ञता प्रकट करणें. दररोज ह्या भूमीला आम्ही लाथा मारतों, जी आम्हांला आधार देते तिला लाथ ? आपल्या आचार्यांनीं सकाळीं उठल्यावरोबर

समुद्रवसने देवि ! पर्वतस्तनमण्डले ।
विष्णुपत्नि नमस्तुभ्यम्, पादस्पर्शं क्षमस्व मे ॥

म्हणून तिला नमस्कार केला, तिची क्षमा मागितली. सकाळीं उठल्यावर त्या नम्र भूमिमातेचें स्मरण. आकाशाची प्रार्थना नाहीं कोणीं केली. जमीन नम्र म्हणूनच तिचें पावनपुण्यस्मरण. 'वंदे मातरम्' च्या जयघोषानें त्याच नम्र भूमिमातेचें आम्ही स्मरण करतों. आमचीं अंतःकरणें उचंबळून येतात.

ज्या ठिकाणीं घमेंड, अहंकार आहे, त्या ठिकाणीं नम्रता असणार नाहीं. ज्या ठिकाणीं नम्रता नाहीं, त्या ठिकाणीं प्रसन्नता असणार कोठली ? आणि प्रसन्नतेशिवाय बुद्धीची स्थिरता, एकाग्रता नाहीं; आणि ज्या ठिकाणीं बुद्धीची स्थिरता, एकाग्रता नाहीं, त्या ठिकाणीं यशही असणार नाहीं. ज्या ठिकाणीं आपल्या राईएवढ्या गुणाला पर्वतासारखें स्थान आहे तेथें यश असणार नाहीं. आपल्या अल्पतेचें दर्शन करणें हा महान् होण्याचा मंत्र आहे, जलाचा एकाकी बिंदु जर आपल्या वंशाची घमेंड बाळगून

स्वतःला समुद्र म्हणवीत राहील, तर तो सुकून जाईल, नष्ट होईल; पण जर तो आपल्या अल्पतेचें दर्शन करील तर नम्र बनेल आणि सागरांत मिळून सागर बनेल. आपल्या अल्पतेचें दर्शन होणें म्हणजेच नम्रता अंगीं येणें. एक उर्दु कवि म्हणतो, लहानापुढेंही आपलें मस्तक नत करतो तो श्रेष्ठ आहे. § आपल्या संस्कृतांतही " बालादपि सुभाषितम् ग्राह्यम् । " म्हणतात. लहान मुलगा म्हणून त्याची उपेक्षा नका करूं. त्याच्यापासूनही शिका.

महात्माजींनीं आपल्या एकादश व्रताइतकेंच नम्रतेला महत्त्व दिलें आहे. आज जे मोठ्या पदाला चढलेले दिसतात, त्यांच्या उन्नतीचें नम्रता हेंच कारण आहे. " अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो " पण जेव्हां त्याच्या जवळची नम्रता संपते तेव्हां.

पूर्वींच्या गुरुकुलांत नम्रतेचे प्रत्यक्ष पाठ मिळत. मोठ्या श्रीकृष्णाला गरीब सुदामाबरोबर लाकडें आणायला जावें लागे. गुरूपुढें नमावें लागे. राजे लोक जेव्हां ऋषींच्या आश्रमांत जात, तेव्हां सर्व वैभव सोडून नम्र होऊन जात. आचार्यांच्या पायां पडत. आपली संस्कृति नम्रतेवर अधिष्ठित आहे. प्रत्येकाला पहिला पाठ " मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव " हा मिळत असे. आई-बापांच्या पुढें नम्र हो, आपल्या शिक्षकांच्या पुढें नम्र हो आणि अपरिचित अतिथीशींही उद्धटपणानें वागूं नको. त्याच्याशींही नम्रतेनेंच वाग. मातीच्या पुढें एकलव्य नम्र झाला तर त्यालाही विद्या मिळाली. मातीपुढें नतमस्तक होणारा तो एकलव्य धन्य होय ! नम्रता पूर्वीं आपल्यांत जन्मजातच असे. एवढा मोठा विंध्य, अगदीं फत्तर दिलाचा, पण तोही अगस्तिऋषींच्या पुढें नम्र झाला, ऋषींनीं ऊठ म्हटलें नाहीं म्हणून उठला नाहीं. नम्रता समर्थ-शिवबाच्या स्मरणाशिवाय अपूर्णच. गुरुजींच्या झोळींत राज्य-सर्वस्व

§ अदनासे सर झुकाये आला वह है ।

टाकलें आणि दाखविलें, "गुरुजी, मी भिकारी आहें." कोठें गेली ही नम्रता ? त्या हनुमानाची नम्रता कोठें गेली ? रामाचा पदरज होऊन तो हनुमान राहिला म्हणूनच तो सर्व शक्तिमान झाला.

इंग्रजी राज्यापासून आमच्यांतली नम्रता नष्ट झाली. आमच्यांतल्या सरकारी नोकरांची जनतासेवक ही भावना नष्ट झाली. ते अधिकारमदानें धुंद झाले. जे अधिकारमदानें धुंद झाले त्यांनाच परकीय सरकारनें श्रेष्ठ म्हटलें. नम्रता गेली आणि स्वराज्य गेलें. नम्रता गेली आणि अन्नाला मोताद झालों. मायर्स एक युरोपियन शास्त्रज्ञ. नायट्रोजनचे गुणधर्म शोधायचा तो प्रयत्न करीत होता. अचानक स्फोट झाला आणि एक हात व एक डोळा निकामी झाला त्याचा. परंतु त्याला दुःख झालें नाहीं. त्यानें गुडघे टेकले व म्हणाला, "परमेश्वरा, तूं किती रे दयाळू ! अजून एक हात व एक डोळा तूं माझा शाबूत ठेवला आहेस." दुःखांतही परमेश्वराचीच कृपा पाहाणाऱ्यांची नम्रता खरोखरच उच्च दर्जाची आहे.

नम्रता सर्व धर्मांचा आधार आहे. बौद्ध-जैनांची अहिंसा यांतूनच निर्माण झाली. नम्रता म्हणजे उन्नत होण्याची गुरुकिल्ली. ज्या राष्ट्राला अजून जगापासून पुष्कळ शिकायचें आहे, जें राष्ट्र मागासलें आहे, त्याला उत्कर्षाप्रत जायला नम्रतेशिवाय दुसरें साधन नाहीं. भारतीय तरुण जोंपर्यंत त्यांच्यांतली अहंकार, घमेंड नाहींशी होऊन नम्र बनत नाहींत, तोंपर्यंत त्यांचा उद्धार होणें कठीण आहे. मात्र नम्रता म्हणजे अन्यायांपुढें मान वाकविणें नव्हे. अन्यायाचाहि सविनय प्रतिकार करतां येतो. कृतज्ञतेची नम्रता म्हणजे खरी नम्रता !

हिंदुस्थानी साहित्यांतही नम्रतेबद्दल पुष्कळच लिहिलें आहे. कवि आतिश म्हणतो, "नम्रता श्रेष्ठालाही नम्र बनविते[1]" तर कवि अनीश म्हणतो, "नम्रपणानें, निष्ठुरहि आपल्या ताब्यांत येतो. जीभ नम्र आहे

---

१ झुकाती है अजीजी सरकशकी गर्दन को।

म्हणून सारे निष्ठुर दांत तिच्या रक्षणार्थ एका ओळींत तयार राहातात[1]" तर तिसरा एक कवि म्हणतो, "ऐन युद्धांत घोडेस्वारही पडतात; पण ज्यानें प्रार्थनेसाठीं गुडघे टेकले आहेत तो काय पडणार[2]?"

आपल्याला जर आपला उद्धार करायचा असेल, हा प्राचीन वैभव-संपन्न देश पुन्हा वैभवशिखरीं जावा असें वाटत असेल, तर त्याला एकच उपाय आणि तो म्हणजे नम्रपणानें सदैव, परगुण, परकला आत्मसात करण्याचा प्रयत्न करणें. पुढें येण्याचा, महान होण्याचा, वैभवसंपन्न होण्याचा एकमेव मार्ग म्हणजे नम्रता. हें राष्ट्र आतां स्वतंत्र झालें आहे. त्याचा सर्वांगीण विकास करावयाचा आहे. नवसमाजाची रचना करावयाची आहे. नम्रतेवांचून जगांतलें ज्ञान मिळणार नाहीं. सर्वांगीण विकास होणार नाहीं.

सद्गुरु रामदासस्वामी दासबोधांत म्हणतात :

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । नाना सज्जनासी ॥
नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती ।
नमस्कारें मोडले जडती । समाधानें ॥
नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकावरीं ॥
विशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ —दशक ४, समास ६

तो दयाघन परमेश्वर आम्हांला नम्रता देवो व विकासाचा मार्ग दाखवो !

१ नर्मीसे मुतिअ संगदिल होते हैं । वेदाँ सफ़ बस्तां हैं ज्वानांके आगे।
२ गिरते हैं शहसवार मैदाने जंगमें । वह तिफ्ल क्या गिरेगा जो घुटनोंके बल खडा है ।

क्र. नों. दि. 391701

REFBK-0007393